www.maayboli.com
हितगुज दिवाळी अंक 2003
शुभ दिपावली

संपादकीय 4

संपादक मंडळ 5

काव्यधारा 6

आतुर मन . . . . सैनिक 7
ऋतू बदलू पहातो 8
माणसं रातरव 9
स्वप्न अबोलीस 10
तुळस ज्ञानास आव्हान 11
वैफल्य आम्ही फक्त भारवाही 12
बार्बी अग्नीदिव्य 13
श्वास एक हवे स्वप्न मला 14
जीवन 14
तुझा माझा चंद्र जखम ती जखमच 15

गोष्टींचा गाव 16

चेक 17
जो आवडतो सर्वांना 18
तिचे आकाश 21
मुद्राराक्षस 22
व्हॅलेंटाइन 24
मित्र 25
मळभ 26
प्रतीक्षा 28
सराईत 29
देवाचच कार्य 30
वाट 32

लालित्य 33

अमेरिकेतील मराठी काव्य आणि कवि 34
लच्छी 38
मंगलमय क्षणांची साक्षीदार 40
मराठी साहित्यातील अमेरिकन स्पंदने 42
प्रवास अरंगेट्रमचा 45
उलटा प्रवास 46
त्या वाटेवर 48
प्रवास 50
माझिया गावी 51

हास्यमंच

हास्यमंच 54
लेडी पोलीस 55
उगाच आपलं काहीतरी 58
चाल ः संथ वाहते कृष्णामाई 61
दिवस तुझे हे फुगायचे 61

उणे अधिक

उणे अधिक 62
मधुमेह आणि हृदयविकार 63
साठवण 65
साडेसातीचा महीमा 67
आठवणींचा फराळ 68
गोळ्यांची करामत 69
या शिकुया अ आ इ 71

आणिक स्मृती ठेवुनी जाती

आणिक स्मृती ठेवुनी जाती 72
सु. शिं. 73
गौरी देशपांडेंच्या साहित्यातील नायिका 74
'लंपन' आणि त्याचे बाबा 75
आकाश उजळले होते 76

संपादकीय

लक्षदीप हे उजळले घरी!!
दारी शोभली सडा रांगोळी!!
आली दिवाळी! आली दिवाळी!!

घराघरातून लखलखणाऱ्या पणत्या, झगमगणारे आकाशकंदिल, मनमोहक रांगोळ्या, चिवडा, चकली, लाडू, करंज्या आणि साहित्याची मेजवानी असलेला 'अंक' हे सारे काही " दिवाळी " या एका शब्दातच सामावलेले आहे .

दिवाळी अंक हा तर मराठी संसकृतीचा अविभाज्य भाग झालेला आहे . 5 वर्षापूर्वी देश - विदेशातील मराठी लोकांना एकत्र येण्यासाठी व्यासपीठ मिळवून देण्याच्या हेतूने हितगूजचा जन्म झाला . मराठी भाषा, साहित्य, कला, संसकृती यांबद्दल प्रेम, आस्था असणाऱ्या आणि याच समान धाग्याने एकमेकांशी जोडल्या गेलेल्या मराठमोळ्या लोकांनी 'या मनीचे त्या मनी' पोहोचविण्यासाठी हितगूजवरील 'गुलमोहरा' च्या छायेचा विसावा केला . हितगूजवरील नव्याने बहरणाऱ्या प्रतिभावंतांच्या साहित्याने नटलेला पहिला दिवाळी अंक 2000 साली प्रकाशित कराण्यात आला . मायबोलीकरांनी मराठी साहित्यिक विश्वात ठेवलेले हे बाळ पाऊल! ही दिवाळी अंकाची परंपरा समस्त मायबोलीकरांच्या प्रोत्साहनाने आणि सहकार्याने फुलत आहे, बहरत आहे .

यंदाच्या दिवाळी अंकात आणखी एक पाऊल पुढे जाऊन मायबोलीवरील प्रस्थापित आणि नवोदितांबरोबरच काही प्रथितयश साहित्यिकांचे साहित्य समाविष्ट करण्याची कल्पना पुढे आली . आमच्या विनंतीला मान देऊन काही सन्माननीय साहित्यिकांनी उपक्रमाचे कौतुक केले . यंदाचा अंक हा केवळ मायबोली परिवारापुरता मर्यादित न राहता जगभरातील तमाम मराठी लोकांसाठी दिवाळीची सुखद भेट ठरेल याची आम्हाला खात्री आहे . या निमित्ताने मायबोली आणि हितगूज परिवार आणखी विस्तारेल अशी आम्हाला आशा आहे .

मराठी रसिकांच्या सारस्वतांच्या दरबारी आमच्यातर्फे आणि सहभागी साहित्यिकांतर्फे हा दिवाळीचा नजराणा!

ही दीपावली आपल्या सर्वांना सुखाची, समृद्धीची, व समाधानाची जावो ही सदिच्छा!!

संपादक मंडळ

सर्वजण ज्याची उत्सुकतेने वाट बघत आहेत तो हा हितगुज दिवाळी अंक प्रकाशित करण्यासाठी हितगुज ॲडमीन यांचे आम्हाला अत्यंत मोलाचे सहकार्य लाभले . त्यांनी आम्हाला जेव्हा गरज लागली तेव्हा आपला मौल्यवान वेळ आम्हाला देउन आमच्या अडचणी सोडवल्या त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार .
सुप्रिया जोशी, प्रशांत उपासनी व जयश्री वाडेकर यांनी काही लेखांचे देवनागरीकरण करून आम्हाला मदत केल्याबद्दल त्यांचेही मन:पूर्वक आभार .
हा अंक 800 X 600 या resolution मध्ये अधिक चांगल्या प्रकारे दिसू शकेल .

संपादक मंडळ : (अनिलभाइ, परागकण, वाटसरू, स्तोरवी, मैत्रेयी, मृणाल,योगीबेअर व SV समीर)

मांडणी, सजावट व मुखपृष्ठ : मृणाल

काव्यधारा

आतुर मन	- मेघधारा
सैनिक	- अश्विनी
ऋतू बदलू पहातो	- डॉ आशुतोष
माणसं	- मेघधारा
रातरव	- शमा
स्वप्न	- अनघा
अबोलीस	- गिरिराज
तुळस	- गिरिराज
ज्ञानास आव्हान	- अनुराधा गानू
सावराया लागले	- क्षिप्रा
शोध	- स्मिता कसबेकर
वैफल्य	- सौरभ ओक
आम्ही फक्त भारवाही	- शशिकांत पानट
बार्बी	- पेशवा
अग्निदिव्य	- पेशवा
श्वास	- नीरजा
एक हवे स्वप्न मला	- गौरी देशपांडे
तुझा माझा चंद्र	- हेम्स
जखम ती जखमच	- उपास
जीवन	- तेजस्विता

आतुर मन . . . .

आतुर मन
आतुन आतुन
वर वर दिसतं शांत
बाहेर फुटू पाहतं

आतुर मन
आतुन आतुन
शब्द शब्द चुकवीत चुकवीत
शब्द एक बनू पाहतं

आतुर मन
आतुन आतुन
कशासाठी? कोणासाठी?
विचारतं
कारण जगण्याचं
आतुन आतुन शोधतं

आतुर मन
आतुन आतुन
नसतं स्वस्थ कधीही, कुठेही!
धडपडत तडफडत तरीही
मरगळीशी झगडा करतं

आतुर मन
आतुन आतुन
बाहेर अचानक का डोकावतं?
नजरेतून, स्पर्शातून
किंवा अगदी अश्रू बनून
जग पहायची अभिलाषा बाळगीत
की परिस्थितीला सामोरं जातं?

काही म्हणा!

आतुर मन
आतुन आतुन
मला आत बोलावतं
चेहरे बदलून कंटाळशील
म्हणत
आतुन आतुन
मला थोपटतं .

– मेघधारा

सैनिक

देहाचा कोट करून
देशाचे रक्षण करणाऱ्या
हे अज्ञात वीरहो,
सीमेवर खर्ची पडलेल्या
रक्ताच्या प्रत्येक थेंबाचे
आम्ही शतश: ऋणी आहो!

आम्ही सुखाची निद्रा घेतो
तुमच्या हाती सोपवता,
दूर देशी सोडून आलेल्या
मायबापांची सुरक्षितता

अन् अंगाची हळदही न पुसलेल्या
पत्नीचा तुम्ही निरोप घेता,
पहाडांमध्ये लपलेल्या
मृत्युशी लढायला सिद्ध होता

कुठून येतं हे बळ?
कुणी दिलं हे सामर्थ्य?
तुमच्या महान बलीदानापुढे
आमची सामान्य आयुष्यं व्यर्थ

ज्या मातीत असे वीर जन्मले
तिचा मला अभिमान वाटतोय
पण माझ्या डोळ्यामधला अश्रू
एका प्रश्नाचं उत्तर मागतोय

त्या अखेरच्या क्षणी,
शत्रूची गोळी वर्मी बसता
उजाड एकाकी रणभूमीवर
शेवटचा श्वास घेता

आजुबाजूची सृष्टी
धूसर होत जाताना
कोणती एकच स्मृती
बिलगून असेल सरत्या प्राणांना?

पाळण्यामधल्या बालजीवाचं
निष्पाप हसरं चित्र
का दारामागे लपलेले
ते अबोल नेत्र?

– अश्विनी

ऋतू बदलू पहातो

सैनिक

देहाचा कोट करून
देशाचे रक्षण करणाऱ्या
हे अज्ञात वीरहो,
सीमेवर खर्ची पडलेल्या
रक्ताच्या प्रत्येक थेंबाचे
आम्ही शतश: ऋणी आहो!

आम्ही सुखाची निद्रा घेतो
तुमच्या हाती सोपवता,
दूर देशी सोडून आलेल्या
मायबापांची सुरक्षितता

अन् अंगाची हळदही न पुसलेल्या
पत्नीचा तुम्ही निरोप घेता,
पहाडांमध्ये लपलेल्या
मृत्युशी लढायला सिद्ध होता

कुठून येतं हे बळ?
कुणी दिलं हे सामर्थ्य?
तुमच्या महान बलीदानापुढे
आमची सामान्य आयुष्यं व्यर्थ

ज्या मातीत असे वीर जन्मले
तिचा मला अभिमान वाटतोय
पण माझ्या डोळ्यामधला अश्रू
एका प्रश्नाचं उत्तर मागतोय

त्या अखेरच्या क्षणी,
शत्रूची गोळी वर्मी बसता
उजाड एकाकी रणभूमीवर
शेवटचा श्वास घेता

आजुबाजूची सृष्टी
धूसर होत जाताना
कोणती एकच स्मृती
विलगून असेल सरत्या प्राणांना?

पाळण्यामधल्या बालजीवाचं
निष्पाप हसरं चित्र
का दारामागे लपलेले
ते अबोल नेत्र?

- अश्विनी

ऋतू बदलू पहातो

ऋतू बदलू पाहतो
वारा चोरू लागे अंग
मेघ पांगू लागताच
आकाशाचा प्रेमभंग

ऋतू बदलू पाहतो
पानाŌलालाही कळे
पण मानतच नाही
झाड एक वेडेखुळे

-- आता गळणार पाने
आणि फांद्या सुकणार
थंड धुक्यात अवेळी
श्वास श्वास कोंडणार

ऋतू बदलू लागला
धरा देई त्याला साथ
पण झाड आडमुठे
याला नाही रितभात

ऋतू बदलेल आता
नाही थांबणार तोही
मरणाच्या पालखीचा
शिशीरच असे भोई

हिरवेसे पान बघा
आता लागेल सुकाया
रस आटेल सगळा
फांदी लागेल झुकाया

झुकताच अशी फांदी
चोर शिशीर येइल
तोल तिचा घालवाया
धडपडेल Ź छळेल

मग कडाड आवाज
आर्त किंकाळी Ōटेल
भो□ सुक्या लाकडाची
नवी पालखी वाहील

मला सरळ दिसते
काय होणार आहे ते
पण जिंकेलही झाड
असे आतून वाटते

ऋतू लागला बदलू
आता कळेलच सारे
कोण हारते Ź जिंकते
कुठे वाहतात वारे

- Dr. आशुतोश जावडेकर

माणसं

सतत दिसणारी
चेहरा दाखवणारी
पैसा दाखवणारी
हसत हसत
आतुन रडणारी
मन लपवणारी . .

माणसं
माणसात राहणारी
जनावरागत वागणारी
रुढी जपणारी
घाण्याच्या बैलासारखी
कधी . . चक्रात अडकलेली

माणसं
देव देव करणारी
पोथ्या पुराणं वाचणारी
गुरु शोधणारी
स्वदेहापलीकडचा माणूस
न जाणवणारी

माणसं
आपलं घर, मुलं, बाळं
संसार राखणारी
खिडकीवरील घर
घरटं म्हणुन
पिलांसकट पाडणारी . .

माणसं
नाती जोडणारी
मैत्री करणारी
जीव लावणारी
रस्त्यातल्या जखमीचा
अनोळखी होऊन
जीव न वाचवणारी . . . !

पण तरीही . .

माणसं ही माणसंच
पुढल्या साऱ्या रुढी
नाती, परंपरा , संसार
धर्म, जात, व्यवहार
व्यर्थ भास!

माणसं ही माणसंच
अस्तित्व भूकंपताना
आधार देणारी
अश्रु पुसणारी
देवत्व कर्मणारी
माणुसकीचा
बंध जपणारी!

- मेघधारा

रातरव

कांकणांची रुणझुण
आठवांचे हात हाती
काजव्यांच्या ईवल्याशा
दिवट्यांच्या चांदराती

नक्षत्रांची लगबग
तारकांचा थाटमाट
चंद्र मांडितो स्वप्नांचे
अलगद सारीपाट

आंबा लिंबावर काही
खट्याळसे चकाकते
लुक लुक करुनिया
चांदण्यांना भुलविते

रात्र चढते हळुच
चोहिकडे सामसूम
दूरवरी खुलणारी
रातराणीचीच धून

अशातच कुठुनिया
सूर भैरविचा येई
कोमलता रिषभाची
मनी वर्ख साज लेई

- शुभा

स्वप्न

कोसळणाऱ्या पावसाने
वहाल केले एक
हिरवेकंच गाणे
धरित्रीला;
सावळ्या मेघांची
तीट लावून
बरसणाऱ्या आभाळाला
झेलताना धरित्रीने
सप्तरंगी सुखस्वप्न
साक्षात समोर पाहिले
अन मन मयुर झाले

- अनघा

अबोलीस . . .

जितकी ओढ मला तुझी,
    तितकीच तुलाही आहे का?
जितकं प्रेम माझं तुझ्यावर,
   तितकच तुझंही आहे का?

मी समोर नसतांनाही ,
    मला कधी पाहतेस का?
उत्तररात्री शांतसमयी,
    स्वप्नांत मला पाहतेस का?

एक क्षण मी दिसावं,
    म्हणून व्याकूळ होतेस का?
तो क्षण संपूच नये,
    असा विचार कधी करतेस का?

एकांती आपल्या गुजगोष्टी,
    आठवून कधी पाहतेस का?
त्यातल्या प्रत्येक शब्दाने,
    मोहरून कधी जातेस का?

माझा वेडेपणा आठवून,
    स्वत:शीच कधी हसतेस का?
माझ्यासोबत वेडं व्हावं,
    असं कधी ठरवतेस का?

काळही सगळा संपून जाईल,
    विचारणं माझं संपणार नाही;
प्रश्नं माझे अनेक आहेत,
    उत्तर एकाचं तरी देशील का?

- गिरीराज

तुळस

उत्तररात्रिची शांतता चिरून,
भयाणता पसरावी;
एक किंकाळी फुटावी,
निद्रिस्त शहरामध्ये...

शहर असे की,
डोळे थिजलेले,
स्नेह सुकलेले,
हृदयामध्ये...

यंत्रवत माणसे,
भेदरल्या हालचाली;
केव्हा पडावे दान,
अज्ञात मरणाचे...

टांगले जीव,लटकती घरं,
पैशांच्या भींती,
अन् गॅलरीतली तुळस,
हीच खूण जगण्याची...

- गिरीराज

ज्ञानास आव्हान

तपशीलांची खोगिरभरती
मिळे न ज्यातुन काही माहिती
हवी कशाला तुमच्या माझ्या
डोळ्याला मग पीडा नसती?

हवी माहिती ज्ञानासाठी
ज्ञान हवे हे कामासाठी
बुद्धीवरची धूळ जळमटे
पुसुन झळाळी देण्यासाठी

हृदय कळवळे एलियटचे
काय प्रयोजन या जगण्याचे?
प्राणाविण ज्या श्वासमालिका
जीवन का त्या म्हणावयाचे?

संगणकाचे नवयुग आले
तंत्रज्ञानही प्रतिदिनि बदले
दिसले का पण शेतकऱ्याच्या
खोपटातले चित्र बदलले?

लोहार,चांभार,सुतार,विणकर
गवन्डी,गवळी,शिंपी,प्लंबर
नवतन्त्राचा वापर करुनी
किती तयातिल झाले गब्बर?

शतकामागुन शतके गेली
राज्यामागुन राज्ये गेली
दिसली का पण खेड्यामध्ये
कुठे जादुची कांडी फिरली?

खेड्यापाड्यामधले जीवन
शहरवासियां कसे कळावे?
एकच राष्ट्राचे दो पाइक
दोघानाही मुळी न ठावे

काळाच्या जणु दोन स्तरांवर
दोन घटक हे स्थिरावलेले
नवतंत्रांनी,नवमंत्रांनी
मुळी न त्याना जवळ आणिले

आजवरी या नवतंत्रांने
काय दिले या समाज देशा?
पढीक मूर्ख, फसव्या गरजा
पश्चिम संस्कृती , भाषा, वेषा!

जीवन सुसह्य करते त्याला
आपण म्हणतो खरेच शिक्षण
जाळायाचे का हे ज्ञान
जे न बदलते असले चित्रण?

- मुळ इंग्रजी कवि : प्रभाकर देवधर
अनुसर्जन : अनुराधा गानू

सावराया लागले . . .

आता कुठे मी जराशी सावराया लागले
ऊन चांदणे म्हणून पांघराया लागले

आले तुझ्या अ□ठांवरी गीत माझे एकदा
झंकारून सूर साती गावयाला लागले

नुसताच तो भास की रे होती तुझी साद
गालांवर उष्न श्वास जाणवाया लागले

फिरफिरुनी स्वर तुझे येती बोलवाया
अवेळीच ख्याल माझा आवराया लागले

रुनझुणला स्पर्श तो सावळ्या तनुवरी
शांतावुनी दिवे तुझी व्हावयाला लागले

- क्षिप्रा

वैफल्य

ते एक स्वप्न होते आधीच भंगलेले
ते एक फुल होते आधीच वाळलेले

ज्यानी दिला दिलासा मनास काल माझ्या
ते सोवती घडिचे जन्मास हासलेले

ऊरले न काही आता भीती असे कुणाची
प्रत्येक वार त्यांचे आधीच सोसलेले

मृत्युस आज माझ्या गर्दी दिसे कशाला ?
जे प्रेत आज दिसते ते पुर्वीच वारलेले

- सौरभ ओक

शोध

गर्दीत मुखवट्यांच्या आधार शोधला मी
जत्रेत अनोळखी या स्वीकार शोधला मी

उत्सवात प्रत्येकाने घातल्या चमकत्या माळा
कचकड्यात बेगडी या रत्नहार शोधला मी

मैफिलीत प्रत्येकाने तापून चढविला गळा
कोलाहलात उसन्या गांधार शोधला मी

हुल्लडीत प्रत्येकाने भाळी रेखिला टिळा
आवेशात नाटकी या अंगार शोधला मी

मंदिरात प्रत्येकाने बडविल्या चिपळ्या, टाळा
प्रार्थनेत पाखंडी या ओंकार शोधला मी

- स्मिता कसबेकर

आम्ही फक्त भारवाही

कलाक्षेत्रांत एखादी व्यक्ती खूप यश मिळविते, प्रगती करते, परंतु साधलेल्या यशापेक्षा अजून खूप काही मिळवायचं आहे, खूप अभ्यास करायचा आहे याची नम्र जाणीव त्या व्यक्तीला असते . आपल्यापेक्षा अधिक तपश्चर्या असलेल्या कलाकारांचे उदाहरण त्यांच्यासमोर असते, म्हणूनच स्वत:मध्ये असलेल्या त्रुटींची जाणीव त्यांना निश्चीत असते, अशाच एका कलाकाराच्या मनात अलेले हे विचार . . . .

आम्ही फक्त भारवाही
आम्ही लमाण लमाण
नाहि सुरांचे, स्वरांचे
आम्हासी प्रमाण प्रमाण!! 1 !! धृ . !!

नाही शब्द, नाही सूर
आमुच्या गणती
नाद, स्वरांचीही नाही
आम्हावर प्रीती
नाही साहित्याचा गंध
नसे आम्हा भान !!2!!

आम्हा नाही ताल कैचा
नाही ज्ञान वाद्यांचेही
आम्ही आमच्या विश्वांत
मग्न राहतो प्रत्यही
आम्ही बांधतो पुजेसी
पुष्प फलांविन !! 3 !! धृ . !!

नाही जिंकिले ना आम्ही
स्पर्शीले नभासी
धांव आमुची संपते
गृहा कुंपणाशी
सावलीच आमुची थोर
आम्ही मात्र सान!! 4 !!धु . !!

- शशिकांत वि . पानट

बार्बी

दिवस उजाडताच
पदर खोचत
एक बार्बी
टिकटॉक

तिने you know
मॉड असायला हवे
काचेसारखे गुळगुळीत
पॉलिश्ड असायल हवे . . .

उघडाबंब रगेल प्राणी
मोरीत ढकलायला हवा
सकाळचा चहा
वेल . . .
तिनेच टाकायला हवा . .

बार्बी तुझे मराठी टॉक . .
इंग्लिश वाटायला हवे
बार्बीचे टिकटॉक
ते तर टिपटॉप असायला हवे
एकातरी मानेने तिला पहाताच
मुरगळायला हवे

दिवस उजेडताच
पदर खोचत
बार्बी उभी रहाते
गॅलरीतील झाडावर
फुलपाखरू होते . . .

बार्बी एक शोपीस
जवळ घेताच मोरपीस
जातीवंत फुलाचे कोमल झाड
यार
बार्बीने नसावे कधीच जाड . . .

बार्बी मग कधी
हळूच आरशात पहाते
हरवलेल्या गार्गीला
साद घालू पहते

शू
असलं काही बोलू नका . .
ब्रँड वॅल्यू घालवू नका . .

दिवस उजेडताच
दिवस मावळताच . .
बार्बी साठी
एकच गाणे
टिकटॉक टिकटॉक

- पेशवा

अग्नीदिव्य

सर्वप्रकाशीय इवल्या देठांचे
अगणित चित्कार उमटणारी
शरीरे
जेव्हा त्या चित्काराच्या
रांगोळ्या रूजवतात
तेव्हा अद्‌भुत प्रकाशाची
आनंदमयी उत्सवरात्र
गात्रघंटातून किणकिणते . .
अंतराअंतरावर मिणमिणत्या
मानवीय रचना
आनंद्‌गर्भ पोसताना
त्यातून निर्माण होणारे
संसकृतीचे उन्मादक पतंग . .
असंख्यपात्र मानवी डोहावर
चंद्रप्रकाशी दिवे मालवू लागताच
त्या काठावर
सहस्त्र ढोलथापांवर
सर्वप्रकाशीय इवल्या देठांचे
दीपोत्सव मांडतात की
चिरप्राचीन अग्नीदिव्य . .

- पेशवा

श्वास

आकाश कवेत माझ्या, डोळ्यात लक्ष ज्योती
पापणी एकदा मिटली, जाणिवा उजळल्या भवती

अंधाराच्या तीरी माझे चालणे अनवाणी
हमूत माझ्या आहे रूपेरी अंधाराचे पाणी
रूपेरी अंधाराचे पाणी, श्वासांचे मोती वरती
पापणी एकदा मिटली, जाणीवा उजळल्या भवती

उमटली धरेवर माझ्या ती सावल्यांची विराणी
शोधून चंद्र गातो मी मन आनंदाची गाणी
मन आनंदाची गाणी श्वासातून उमलून येती
पापणी एकदा मिटली, जाणीवा उजळल्या भवती

नीरजा

जीवन

धावपळीच्या जीवनात
माणूस जणू हरवून गेलाय|
शोधूनही सापडणार नाही अशी
माणुसकी तो विसरून गेलाय|
जन्मापासून मृत्यु पर्यंत
स्पर्धा आणि पैसा
यातच तो गुंतून राहिलाय|
चेहऱ्यावरचे मुखवटे बदलत
जीवन तो जगत राहिलाय|

- तेजस्विता

एक हवे स्वप्न मला

एक हवे स्वप्न मला
अप्राप्य क्षितिजासारखे
चालताना वाट ज्याची
आयुष्य जरी पारखे

एक हवा सूर मला
वसे जरी जो अंतर्यामी
नादत राहील उन्मेषाने
वैफल्याच्या गर्द तमी

एक हवा चक्षू मला
आरपार पाहण्या
मुखवट्याच्या आडचा
माणुस तो शोधण्या

एक हवा अश्रू मला
तत्परतेने ढळणारा
उपेक्षितांच्या व्यथांनी
करुणार्द्र बरसणारा

एक हवी साथ मला
नेक जितुकी साऊली
कंटकांनी जखडलेली
वाट असो मग पाऊली

- गौरी देशपांडे

तुझा माझा चंद्र

1 .
सारं कळलं . .
मी आत्तापर्यंत
माझाच म्हणून कवटाळलेला चंद्र,
तुझ्याही मनात उगवलेला पाहिला
तेव्हा... .

2 .
मनातलं चांदणं
थोडं दूर केलं प्रयत्नानं
आणि विचार करू लागले,
'तू भेटलास की नक्की काय होत ?'
...तंद्रीतून जागी झाले तेव्हा
मनाचा चंद्र करून
पुनवचांदणं
अगदी मधाळ पसरलं होतं!!

- हेम्स

जखम ती जखमच

जखम ती जखमच
कितीही मलम चोळला
कशीही फुंकर मारली
तरी जखम ती जखमच!!

जखमेचं चिघळणं थांबावं
रक्ताचं ओघळणं थांबाव
म्हणून कोणतही चूर्ण फासलं
तरी जखम ती जखमंच!!

घाव चटकन भरले जातात
पण व्रण तसेच कायम राहातात
लवकर काय आणि उशिरा काय कशीही भरली
तरी जखम ती जखमंच!!

धागे टचाटचा तुटतात
मग दोन टोकं एकत्र येऊन गाठी बनतात
गाठ म्हणजे काहीतरी तुटल्याची साक्ष
भरून आली तरी त्या जखमेकडेच लक्ष !!

येशूला क्रूसावर झालेली
महात्म्यास पोटात केलेली
अश्वत्थाम्याच्या डोक्यावर राहिलेली
जखम ती जखमच !!

फेव्हीकॉल काय आणि फेव्हिक्विक काय
डाग रहातोच
प्लास्टर घालून जोडलं हाड तरी क्रॅक रहातोच
जखम ती जखम्च!!

हत्यार धारधार असलं की झालं
ती शस्त्रानं केली काय
आणि शब्दानं केली काय
कारण जखम ती जखम्च!!

पुन्हा जखम झाली कधी
की जुन्या जखमेची आठवण येतेच
जुनी जखम नकळत आसवांत ओली होतेच
अगदी खरं, जखम ती जखम्च!!

जखम अशी होत रहाणार
व्रण ठेवून चिघळत रहाणार
तिला खरंच पचवायचं असेल तर मोठ्ठं मन हवं
नाहीतर जखम ती जखम्च!!

- उपास

गोष्टींचा गाव

- चेक - श्रीनि
- जो आवडतो सर्वांना - मित्रा
- तिचे आकाश - उज्वला
- मुद्राराक्षस - असामी
- व्हॅलेंटाइन - ध्रुव
- मित्र - वॉम्बे व्हायकिंग
- मळभ - अर्चना जोग
- प्रतीक्षा - गर
- सराईत - राहुल फाटक
- देवाचंच कार्य - राधा T
- वाट - हेम्स

चेक

रात्रीचे दहा वाजले असावेत . मी जेवण आटोपून, आरामखुर्चीत पसरून पुस्तक वाचत होतो . बाहेर पावसाचा हलकासा आवाज येत होता, त्यामुळे दिवाणखान्यातली उब आणखीच सुखावत होती .

इतक्यात दाराचा आवाज झाला, आणि बाहेरच्या पावसातून एक साडेसहाफुटी, दैत्यकाय माणूस आत आला .

मी इतका अवाक् झालो होतो की बंद दार त्याने कसे उघडले हा प्रश्नदेखील मला सुचला नाही .

तो सरळ माझ्या समोरच्या खुर्चीत येउन बसला, आणि माझ्याच सिगारेटच्या पाकिटातील एक सिगारेट घेउन ती शिलगावत त्याने आपले पाय टेबलावर पसरले .

'मी या घरावर गेले काही दिवस लक्ष ठेवले आहे,' तो सिगारेट्चे झुरके घेत म्हणाला . 'तू एकटा आहेस . तुझ्याकडे कोणी येत नाही किंवा तू कुणाला भेटत नाहीस . तुला आवश्यक जिनसा तू मागवून घेतोस, पण त्या दाराबाहेरच ठेवायला सांगतोस, आणि नंतर कधीतरी घरात आणतोस . तुला माणसांची विलक्षण घृणा वाटते .'

'हे सगळे तू मला का सांगत आहेस ?' मी विचारले .

'अशाकरता, कि समजा, आत्ता तुझा खून झाला, तर खूप दिवसांपर्यंत ते कोणाला कळणारही नाही, आणि नंतर, खून कोणी केला हे शोधणे अशक्य होईल .'

त्याच्या म्हणण्यात बरेच तथ्य होते . माझे घर आहे देखील खूप आडबाजूला . त्यामुळे काही काम नसेल तर महिनोंमहिने इथे कोणी फिरकत नाही .

'पण कोणी माझा खून का करेल ?' मी आवाजातली भिती शक्य तेवढी लपवत विचारले .

'कारण तुझ्याकडे बच्चापैकी पैसा आहे!' त्याने सिगारेट टेबलावर चुरमडत उत्तर दिले .
'तेव्हा जर तुला जगायचे असेल, तर बँकेतल्या तुझ्या सगळ्या पैशाचा माझ्या नावे चेक दे . नंतरही गरज पडेल तेव्हा मी तुझ्याकडून पैसे मागीन, आ णि मिळाले नाही तर तुला मारुन टाकीन!'

तो हे इतक्या सहज बोलत होता कि त्यानेच मला धडकी भरली .

'पण, पण . . . मी पोलिसात जाईन . . .' मी थरथर कापत उत्तरलो .

'तू तक्रार केलीस तर ते मला कळेल आणि मी तुला मारुन टाकीन! चल, चेक लिहायला घे!'

माझे चेकबुक टेबलाच्या खणातच असते . मी ते बाहेर काढले आणि थरथरत्या हाताने त्याला चेक लिहून दिला .

चेक खिशात घालत तो उठला .

'तुझे फोन कनेक्शन मी कापले आहे . काही भलतेसलते करु नकोस . तुझ्या घरावर माझी अजूनही नजर आहे . तुझी मान मी क्षणात मोडू शकेन .'

दार आपटून तो निघून गेला .

मी बराच वेळ सुन्नपणे बसून राहीलो . मग मी दाराशी जाऊन त्याची तपासणी केली . साल्याने कुलूप बाहेरुन तोडले होते . आता नवीन कुलूप बसवणे आले .

दुसरा दिवस मी त्याची वाट पहात घालवला . माझ्या अपेक्षेप्रमाणे तो रात्री दहाला हजर झाला . मी दार उघडेच ठेवले होते .

तो दाणदाण पाय आपटत आत आला .

'मूर्खा, तुला आपला जीव खरच नकोसा झाला आहे!' तो ओरडला, 'नाहीतर चेकवर तू उद्याची तारीख घातली नसतीस!'

'अरेरे! माफ कर! पण काल मी इतका घाबरलो होतो कि चूक झाली . मी आत्ता तुला दुसरा चेक लिहून देतो .' मी सारवासारव केली .

'लवकर!' तो गुरगुरला .

मी खणातून चेकबुक बाहेर काढले . तो मोठ्यांदा शिंकला .

मी त्याच्याकडे पाहीले . त्याचे तारवटलेले लाल डोळे, नाकाडोळ्यातून वाहणारे पाणी, तापामुळे लाल झालेले गाल . मध्येच त्याचा झोंक गेला . त्याने टेबलाच्या आधाराने स्वत:ला सावरले .

'तुला बरं वाटत नाहीये का ?' मी विचारले .

त्याचे शरीर जबरदस्त थडथडले आणि तो जमिनीवर पडला .

मी त्याच्या चेहऱ्याजवळ वाकलो .

'मी एका असाध्य आणि संसर्गजन्य रोगाचा वाहक आहे,' मी म्हणालो .
'याची लक्षणं फ्ल्यू ची आहेत . माझ्या संपर्कात आल्यानंतर चोवीस तासात माणूस मृत्यूपंथाला लागतो . गंमत अशी कि माझ्यामुळे ज्यांना हा रोग होतो ते तो पसरवू शकत नाहीत . उलट, जे याचे वाहक आहेत त्यांच्यावर याचा काही परिणाम होत नाही .'

'तुझ्याकडे फारतर अजून तासभर असेल . तू मेलास की मी तुझे प्रेत कुठेतरी निर्मनुष्य जागी सोडून येईन आणि तुझ्या गाडीचीही वासलात लावीन . पण आधी मला माझा चेक परत घेऊ दे .'

माझे बोलणे त्याला समजले होते का देवच जाणे . तो डोळे मिटून कण्हत होता . मी त्याच्या खिशातून चेक काढून घेतला आणि आरामखुर्चीत पडून पुस्तक वाचू लागलो .

– श्रीनिवास कुलकर्णी

जो आवडतो सर्वांना . .

अगदी लहान असेन तेव्हा मी . तरीही चांगलं आठवतंय .
त्यादिवशी मला गावाला न्यायला आले होते काका . . आई मात्र पाठवायला घाबरत होती म्हणून तिला ते म्हणत होते
. . . अहो वहिनी! . . तुम्ही कशाला तिची काळजी करताय? . . आम्ही सगळे आहोत ना तिथ!! . .
तर आई माझी चिंता लपवत बोलली . . . तिची नाही हो मला तुमची काळजी वाटतेय!! . . लहान आहे आजून ती . . रात्रीची उठून रडायला लागली म्हणजे आईसाठी?? . . आपलं गावही काही एव्हढं जवळ नाही की परत घेऊन यायला इथं रातोरात . . अन त्यातून तिला घेऊन एस्टीचा प्रवास कसा कराल? . . गर्दी किती असते? . . थोडी मोठी होऊ दे तिला मग न्या की खुशाल अगदी हवे तितके दिवस!! . .

पण काकाच ते !! . . त्यानी एकदा ठरवलं म्हणजे ठरवलं!! . .
आजीनही त्यानाच दुजोरा दिला . . . अग शशीनं जबाबदारी घेतलीय ना? . . मग आपल्याला काळजी करायचं काऽऽही कारण नाही !! जीवापलीकडं जपून नेईल तो!! . .
. . बहीनी प्लीऽज!! . नाही नका हो म्हणू!! . .एकदा का तिची शाळा बिळा सूरू झाली की तिला न्यायला मिळेल न मिळेल . . आणि मी घरी सगळ्याना कबुल करून आलोय . . चला द्या तिची बॅग . . अस म्हणून काकानी कपाटातले दोरी बरचे मिळतील ते माझे कपडे स्वत:च गोळा करायला सुरवात केली . मग मात्र आईचं काही चाललं नाही आणि काका मला घेऊन गेले .

काकाबरोबर कुठं जायचं म्हणजे रस्त्यात सतराशे साठ ठिकाणी थांबावं लागायचं . भेटेल त्याच्याशी बोलत रहायचे . आमच्या घराजवळचे जवळपास सगळेच लोक ओळखायचे त्याना . होतेच ते तसे . . एकदम प्रसन्न, हसरे , बोलके, कुणाच्याही मदतीला न बोलावता धावून जाणारे . आमच्या घरातली बाकीची मंडळी इतकी कुणाला ठाऊक नसतील काकाना मात्र सारे ओळखून होते .

तसेच त्यादिवशी रस्त्यात भेटलेल्या प्रत्येकाशी थोडा थोडा वेळ गप्पा मारून झाल्यावर आम्ही एस्टी स्टँडवर पोहोचलो . भयंकर गर्दी होती तिथं . . . काकाना कुठली बस कुठल्या वेळी सुटते सगळं पाठ असायचं . . आमची बस यायला अजून वेळ होता . मग तिथं डेपोतल्या ऑफिसमध्ये जाऊन साऱ्यांची धावती भेट . . तिथले सारे, ड्रायव्हर ,कंडक्टर सारे काकांच्या ओळखीचे!! . . काकांच तेव्हा नुकतच लग्न झालं होतं . मग तिथल्या त्यांच्या मित्रांनी थोडी चिडवाचिडवी केली . काकानीही हसून तितक्याच हजरजबाबीपणे साऱ्याना टोलवून लावलं . आणि आमची बस आली तसे मला उचलून बसच्या दिशेने धावले .

बसच्या दाराशी भयंकर झुंबड उडाली होती . जो तो दुसऱ्याला ढकलून स्वत: आत घुसण्याच्या प्रयत्नात . काकानी मला चक्क बसच्या पुढच्या एका खिडकीतूनच आत टाकलं . . एवढी घाबरले मी !! . . काकाना चढायला नाही मिळालं आणि बस सुटली म्हणजे? . . सीट पकडून ठेवण्याचं भानही राहीलं नाही आणि मी सीट्समधल्या पॅसेजमधे ऊभी राहून काका कधी चढतायत ते पाहू लागले . तेव्हा पटपट लोकानी घुसून सगळ्या जागा अडवल्या . सगळ्यात शेवटी एका म्हाताऱ्या आजीबाईना चढवून . . अरे निदान म्हाताऱ्या कोताऱ्यांचा तरी विचार करा!! . . असं काहीतरी ओरडत काका चढले तेव्हा कुठं हायसं वाटलं मला . मग गर्दीतून शिताफीनं आपला काटकुळा देह घुसवत काका माझ्यापर्यंत आले आणि मला घाबरलेलं पाहून बोलले . . अग घाबरते काय? मी आहे ना !! . . तुला बरा हरवू देईन!! . .
त्यानी इथं तिथं पाहीलं . बाजूच्या सीटवरचा माणूस त्यांच्या ओळखीचा निघाला . त्याच्याशी गप्पा मारता मारता त्याला आत सरकायला लावून बसायला जागा करून घेतली आणि मलाही लगेच खिडकीजवळची जागा मिळवून दिली . मग गाव येईपर्यंत पुढे ,पाठी, मागे वळून सगळ्यांशी गप्पा चाललल्या होत्या . बस आमच्या गावाकडंच जात असल्यामुळे बसमधले बहुतेक लोक काकाच्या ओळखीचे होते . मग चालली होती साऱ्यांची विचारपूस . . . यंदा पाऊस चांगला नाही पडला,नवीन खत किटकनाशक कुठली आली बाजारात, कुणाची लग्नं जमली कुणाची मोडली,कोणाला मुलं झाली तर कोणाची पोरगी पळून गेली, तालुक्याच्या थेटरात कोणता सिनेमा लागला . . . एक संपलं की लगेच दुसरं !! . . तोंडाला शांतता म्हणून नाही . आमची आजी म्हणायची ना . . हा शशी घरात असला की टी . व्ही . , रेडीओ काऽऽही लावायला नको नुसती याचीच बडबड ऐकत रहावी!!! . . जगभरच्या साऱ्या बातम्या ठावूक असायच्या त्यांना .

गाव आलं तशी आम्ही उतरलो . तसं एस्टी स्टँडपासून आमचं घर दहा मिनिटावर असेल पण काकांबरोबर जायचं म्हणजे!!! . . रस्त्यात भेटलेल्या प्रत्येकाला . . काय काका ? बराय न मावशी? . . वगैरे करत . वाटेत भेटलेल्या एका बैलगाडीत उन लागू नये म्हणून मला बसवलं . स्वत: मात्र मागे उलटे पाय सोडून बसले म्हणजे . . कोण दिसलं आणि आपण हाक मारली नाही असं नको व्हायला . . तिथं बसूनच दिसेल त्याच्याशी जमेल तितकं बोलून घेत होते . मी आत एकटी घाबरीन म्हणून खाली उतरत नव्हते इतकंच . तरी वाटेत मध्ये एकदा उतरून तिथल्या मेडिकल स्टोअरमधे गेले काहीतरी घ्यायला म्हणून आणि तिथंच बोलत बसले . बैलगाडी पुढं गेली निघून तशी आले मागनं धावत .

असे एकदाचे घरी पोहोचलो!! सगळे वाटच पहात होते आमची . काकांचे वडील, म्हणजे माझे चुलत आजोबा, त्याना अप्पाच म्हणायचे सारे . ते गेल्या गेल्या काकांच्या अंगावर वस्कन ओरडले . . काय रे गाढवा ?? . . किती उशीर लावलास ? केवढी काळजी लागली होती इथं!!! . . काका मात्र हसून बोलले . . अहो अप्पा !!किती काळजी कराल माझी ? सांगितलय ना तुम्हाला काळजी बीळजी काही करायची नाही . त्यावर अप्पा अजूनच तिरसटून बोलले . . तुझी नाही हो!! तुझी काळजी करणे केव्हाच सोडून दिलेय मी . . करून उपयोग तरी काय

म्हणा!!. . परंतु आज हिला घेउन येणार होतास म्हणून!!. .

काकांच आणि अप्पांचं सारख कशाना कशावरून तरी वाजायचं . अप्पा सतत ओरडतच असायचे त्याना . . एवढा मुंबईला शिकायला ठेवला दादाकडं, काऽऽही उपयोग नाही !! बाकीच्या दोघांनी पहा संधीचे कसे सोने करून घेतलेन ते? . . ह्याला साधी एक डीग्री सुद्धा नाही मिळवता आली . . . . काका व त्यांचे दोन भाऊ मुंबईला आमच्या घरी शिकायला होते . बाकीचे दोघे चांगले शिकून मुंबईत स्थिरस्थावर झाले होते . काकानी मात्र शिक्षणापेक्षा मित्रमंडळीना जास्त महत्व दिलं . ही त्यांची मित्रमंडळी म्हणजे कोणत्याही वया अथवा वर्गापुरती मर्यादीत नव्हती . तान्ह्या बाळापासून वयोवृद्ध माणसापर्यंत अगदी कुणाशीही मैत्री व्हायची त्यांची . कॉलनीत सार्वजनीक वा कुणाच्याही घरी काहीही कार्य असो काका स्वत:हुन तिथली सारी जबाबदारी उचलणार ! . . काय आनंद मिळायचा त्यात त्यानाच माहीत . अगदी वाट्टेल ते काम करायला तयार असायचे, तेही कशाचीही अपेक्षा न धरता . त्याबदल्यात त्याना कुणी काही देऊ केलं तर उलट रागच यायचा त्याना . . . मी परका आहे का कुणी कामाचा मोबदला घ्यायला? . . अस म्हणून हे दिलत तर पुढच्या वेळी मी येणार नाही अशी धमकीच द्यायचे सरळ . त्यांच्या या अशा स्वभावापायी अभ्यासाकडे दुर्लक्ष झालं . जेमतेम बारावी झाले आणि पुढं बऱ्याच गटांगळ्या खाल्ल्यावर . . याला इथं ठेवण्यात काही अर्थ नाही, शेतीच्या कामात तरी मदत होईल म्हणून अप्पा त्याना गावी परत घेऊन गेले . तर तिथही घरच्या शेतीत लक्ष देण्याऐवजी अख्ख्या गावभरची काम करत बसायचे . त्यामुळ अप्पा सतत नाखूश त्यांच्या बाबतीत .
. . गावात पत काय आपली ? आणि हा कुणाचीही वाट्टेल ती कामे करून नाव उधळतोय!!. . याच्या लश्करच्या भाकऱ्या भाजायच्या सवयीमुळं मला या वयात सारे पहावे लागते . . म्हणून सारखे बोलत रहायचे . अर्थात काकांच्या वागण्यावर याचा काही परीणाम व्हायचा नाही . मग इतर भावाशी त्यांची तुलना करत रहायचे . . .ते पहा कुठे पोहोचले आणि स्वत:कडे बघ !!
. . काय मिळवलेस इतका वाढलास तर? . . घराण्याचे नाव मोठे म्हणून चांगली बायको मिळाली तिला तरी नीट सांभाळ म्हणावं आता!!. .

काकाना हे सारं आता सवयीचं झालं होतं पण काकी मात्र अगदी नवीन होती . अप्पा सतत . . या उनाड पोराच्या गळ्यात बांधून चांगल्या मुलीच्या आयुष्याचे नुकसान केले मी!! . . अस तिच्या समोरच बोलायचे . . तिचे अपराधी असल्यासारखेच वागायचे . तिला कसंसच व्हायचं बिचारीला . त्यातून ती मुंबईला वाढलेली त्यामुळं इथं गावच्या वातावरणात जुळवून घेणं कठीणच जायच तिला . खर तर तिचं मन तिथं रमावं म्हणूनच काका मला त्यावेळी घेऊन गेले होते पण मला तिची सवय नसल्यानं बहुतेक सारं काकाच करत होते . त्यादिवशी माझं जेवण भरवण्यापासून रात्री गोष्ट सांगून झोपवण्यापर्यंत सारं काकानीच केलं . मला अस काही गोष्टीत गुंतवून ठेवलं ना त्यानी की अजिबात आईची आठवण आली नाही .

. . ए आत्ता आइस्क्रीम खाते का मग खाशील? . . या कानात हळुच आलेल्या आवाजाने दुसऱ्या दिवशी मी ताडकन उठले . उठताच नेहमीप्रमाणं मुंबईच घर दिसण्या ऐवजी गावच्या खाटेवर आपण आहोत हे जाणवताच एकदम विचित्रच वाटलं . त्यात नवी काकी समोरच हसत होती . ती कधीपासून मला उठवायचा प्रयत्न करत होत्ती बहुतेक पण मी उठत नाही अस पाहून मग काका आले . त्यांच्याकडं कुणालाही झोपेतून पट्कन उठवण्याच्या बऱ्याच ट्रिक्स होत्या त्यातलीच ही एक वापरून त्यानी मला उठवलं . . कशी गम्मत केली!!. . म्हणून काकाना मागे हसताना पाहून मला परत बरं वाटलं . . . चल आता दात घासून अंघोळ वगैरे करून घे लगेच . . आपल्याला भूर जायचय बैलगाडीतून . . .
मग मी न्हाणीघरात गेले तिथं काकांची आई होती . . तिला काकु म्हणायचे सारे . .तिची स्वत:ची मुलंही .
तिनं माझ्या हातावर कसलीशी काळी पूड दिली . . .शी!!! हे काययेे ? . . मी बोलले . तर ती म्हणाली . . दात घासायची पावडर आहे आम्ही सगळे यानीच दात घासतो . . मी त्या डब्यावरल्या माकडासारखं तोंड वाकडं केलं आणि दात घासायला जाणार तोच काका आले, काल मेडीकल स्टोअर मधून आणलेला पुडा घेऊन .
. . काकु तूपण ना!!. . तिला कुठं ती माकडछाप देतेस ? . . तिला ब्रश पेस्टनं दात घासायची सवय आहे . मी काल घेऊन आलोय . . म्हणून त्यानी त्या पुड्यातून कोलगेट काढून छोट्या ब्रशला लावून दिली आणि पियर्सचा साबण नव्या काकीकडं देत बोलले . . हिच्यासाठी हा साबण वापरा आपला ओ . के . विके नको . . सगळी तयारी झल्यावर काका मी आणि नवी काकी बाहेर जायला निघालो .
. . जास्त उशीर लावू नका !! दुपारच्या जेवणाच्या आत या परत!. . जाता जाता अप्पानी ऑर्डर सोडली . . . होय अप्पा!! . . धावत जातो आणि पळत येतो . . मला माहिताय माझ्याशिवाय जेवण जाणार नाही तुम्हाला . . काकाही काही कमी नव्हते . अप्पांच्या ओरडण्यानंतर काहीतरी गमतीशीर बोलून त्यांचं तोंडच बंद करून टाकायचे . आणि मग अप्पा डोकं दोन्ही हातात गच्च धरून . . कठीण रे कठीण देवा या पोराचे!!!! . . करत बसायचे .

मग आम्ही तिघं घराबाहेर पडलो . बाहेर गाडीवान गाडीला बैल जोडत होता त्याला . . . हे बघ पक्या . . असं काकानी म्हणताच त्याच्या तोंडाची गाडी सुरू झाली आणि काकाची पुढची वाक्य पक्यानच पाढा पाठ म्हणून दाखवल्यागत धडाधडा म्हणायला सुरवात केली .
. . हा हा!! माहितय . . गाडी अगदी आरामात घे . . उगा जोरात हाणून त्या बैलांचा जीव काढू नगं . . आपल्याला कन्चा मुहुरत गाठाचा नाय . . तवा काऽऽय बी घाई नाय !!. . हे ऐकून नव्या काकीचं एवढा वेळ दाबून ठेवलेलं हसू बाहेर पडलं आणि ती जोरात हसत सुटली . मग काका पक्याच्या पाठीवर थाप मारत अजूनच जोरात हसून बोलले . . बस काय पक्या!! आता तू पण का? . . अरे निदान बायकोसमोर तरी मला चिडवू नका !! तिला काय वाटेल?? . . आपला नवरा म्हणजे अगदीच हा आहे म्हणून . . .मग सगळेजण स्थानापन्न झालो .गाडीवान पक्या पुढं , मी आणि काकी आत आणि काका नेहमीप्रमाणे मागे पाय लटकवत . गाडी डुगु डुगु सूरू झाली काकानी सांगीतल्याप्रमाणे . आमच्या करमणुकीला पक्याची अखंड पकपक,मधूनच जोरात हेल काढून दादा कोंडके टाईप गाणी होती . काकांचा पाय मात्र अजीबात गाडीत ठरत नव्हता . जाता जाता वाटेत उतरून दोन तीन घरात जाऊन कुणाकुणाला भेटूनही आले . . एकटेच . . . गाडी सूरूच .ए रस्त्यात कोण दिसलं की उतरायचे मग पुन्हा धावत येऊन गाडीत बसायचे . असं त्यांचं अर्धा अधिक रस्ताभर धावून झाल्यावर आम्ही जाणार होतो ते मंदीर आलं . मंदीर शेतांच्या मधे होतं . तिथपर्यंत गाडी जाऊ शकत नव्हती . मधला चिखलाचा पट्टा चालत पार केल्याशिवाय तिथं जाता येणार नव्हतं . मग काकानी मला कडेवर उचलून घेतलं . काकी मागून येऊ लागली . तिला सवय नसल्याने ती घसरत होती . . . अरे देवा!. . आता तुला कसं उचलणार? . . अस काका बोलताच जाम लाजली ती
पण मग काकानी तिच्या हातातली हाराची पिशवी स्वत:च्या खांद्यात अडकवली .माझ्या मळक्या बुटाची फ़िकीर न करता . . . गणपती बाप्पा मोरया!!!. . करत मला खांद्यावर घेतलं आणि . . या राणीसाहेब . . म्हणून काकीसाठी हात पुढं केला . तेव्हा काकी घाबरून इथं तिथं पाहू लागली . . कुणी पाहील म्हणून . . तर तिची ती भीती ओळखून काका बोलले . . घाबरू नको !! इथं कुणी पहात नाहीये . आणि पाहीलंच तरी कोणी आपल्या घरी जाऊन सांगणार नाही . मी तशी लाच देऊन ठेवलेय सगळ्याना . . तेव्हा मग काकीने निर्धास्तपणे हात त्यांच्या हातात दिला आणि काका आम्हा दोघीना अजीबात न पडू देता अगदी जपून देवळापर्यंत घेऊन गेले .

. . काय शशीभाऊ? . . लगनानंतर आज मुहूर्त मीळाला होय इथं यायला? . . रामनवमीच्या उत्सवाला किती वाट पाहीली साऱ्यानी तुमची!!. . देवळातले पुजारी काकाना बोलले . त्यावर काका दिलगीरीनं हसत बोलले . . होय हो गुरुजी!! जमलंच नाही यावेळी .सासुरवाडीला जावं लागलं .पहीलंच वर्ष ना आमचं !!. . मग तिथल्या देवाला नमस्कार वगैरे करून झाल्यावर काकानी तिथल्या ओळखीच्या लोकांशी बोलून घेतलं आणि काही नवीन आलेल्या लोकांशी ओळखी काढल्या .
आम्ही देवळाबाहेर पडलो तेव्हा थोडा पाऊस सुरू झाला होता . पुन्हा तशीच तारेवरची कसरत करत काका आम्हाला बैलगाडीपर्यंत घेऊन गेले . परतीच्या वाटेवर पुन्हा सकाळचाच प्रकार वाटेत एक टपरीवजा हॉटेलवर आम्हा साऱ्यानाही उतरवलं .
. . चहा ,भजी मला सोडालेमन . . वगैरे . काकी उशीर होईल म्हणून घबरून नको नको करत होती . मग . . आपल्याला असं रोज रोज थोडीच यायला मिळणार आहे म्हणून काकानी आग्रहानी तिला तयार केलं . आमचं साऱ्यांच खाऊन पिऊन झालं तरी काकांच्या तिथल्या लोकांशी गप्पा संपत नव्हत्या . घरी पोहोचल्यावर . . उशीर का झाला म्हणून आप्पा ओरडायच्या आधीच . . अहो त्याचं काय झाल आप्पाऽऽ . . करून त्यानाही बोलण्यात गुंडाळून टाकलं काकानी .

सकाळच्या उन्हामुळं म्हणा किंवा नंतर पावसात थोडं भिजल्याने म्हणा दुपारी मला थोडा सर्दी ताप आला . अप्पा म्हणत होते . . तिला मिरीचा काढा करून पाज . . पण काकानी त्याला सख्त विरोध केला . .आपलं गावठी औषध तिला सोसलं नाही म्हणजे? . . म्हणून अप्पाना न जुमानता ते डॉक्टरकडे जायला निघाले . बाहेर पावसाने तेव्हा चांगलाच जोर धरला होता . . . अहो छत्री घेऊन जा . . काकी बोलली . त्यावर अप्पा कुत्सीतपणे हसून म्हणाले . .शशी आणि छत्री ??? . . तेवढे वजन उचलायचे कष्ट बरे घेईल तो !!!!. .

. . हो नाहीच घेणार !. . पण थोडा जरी भिजून आलो तरी काय सांगाल ते हरायला तयार आहे मी !!. . बोला लावता पैज???. . असं म्हणून काका हसत हसत घराबाहेर पडले . . . ह्याचा पाच मिनिटे घरात पाय ठरेल तर शपथ !!. . अप्पा तणतणत होते . मी खिडकीतून बाहेर पाहीलं . ओटीच्या बाहेर पडायच्या आधीच बाहेर छत्री घेऊन जाणाऱ्या एका माणसाला एऽऽऽ गणपतदादाऽऽ!! करून थांबवून त्याच्या छत्रीत घुसले आणि त्याच्या खांद्यावर हात ठेऊन गप्पा मारत मारत निघून गेले . बऱ्याच वेळान आले परत . अगदी शब्दाला जागले होते . . .पाहीलंत? थोडा तरी भिजलो का? . .म्हणून अप्पाकडे हात पुढं करून बोलले . . द्या आता टाळी!!. . . आणि मग अप्पांचा क्रुद्ध झालेला चेहरा पाहून जीभ चावून हात लगेच मागे घेतला काकानी .

रात्री अप्पाना झोपण्यापुर्वी अगदी कढत पाण्यानी अंघोळ करण्याची सवय होती . काकीनी बंब पेटवून घंगाळात गरम पाणी सोडलं आणि जेवण वाढायला गेली . मला दरवाजा उघडा मीळताच मी आत जाऊन नेमकं तेच पाणी पायावर ओतून घेतलं आणि पाय सणकून भाजले तशी जोरात बोम्ब ठोकली .
. . काय झालं? पोरीला काय झालं? बघा बघा !!! . . ओरडत काका जेवण तसंच टाकून धावत आले . मी ही माझ्या नेहमीच्या सवयी प्रमाणे बराच कांगावा केला . काकांच्या जीवात जीव नव्हता !!. . तसे घाबरले होते सगळेच !!. . पण काका त्या रात्री न जेवता माझ्या पायाला कसलं तरी मलम चोळत बसले होते आणि मग मी झोपेपर्यंत ओटीवर मला घेऊन येरझारा मारत होते . कुठ चांदोबा दाखव ,हे दाखव ,ते दाखव बऱ्याच उशीरापर्यंत चालू होतं .

नंतर त्या सगळ्या प्रकारांतून बरी झाल्यावर काकानी मला आणि त्यानिमीत्तानं काकीला खूप कुठं कुठं फिरवून आणलं . त्यांच्या बरोबर फिरताना फक्त आमच्याच नाही तर आसपासच्याही गावांमधे ते किती लोकप्रिय आहेत याचा वारंवार अनुभव येत असे . गावात कुठं काही भानगडी ,भांडण तंटे झाले की लोक काकाना बोलवायला यायचे . हे सारं अर्थात मागल्या दारानं!!. . पुढल्या दारात जाऊन अप्पांचा ओरडा कोण खाणार???. . मग मागनं हळुच . . काकु जरा शशीला पाठवता का? . . अशी विनंती व्हायची आणि ती हळुच अप्पांच्या नकळत काकापर्यंत पोहोचवली जायची . मग काका काहीतरी कारण काढून बाहेर सटकायचे आणि सगळ ठिक करून मगच परत यायचे . गोडीगुलाबीनं ,कोणाचंही मन न दुखवता तंटे सोडवण्यात काकांचा हातखंडा होता . त्यांची लोकप्रीयता पाहून त्यांचे कित्येक मित्र त्याना निवडणुकीच्या तिकीटासाठी अर्ज करण्याचा आग्रह करत . पण . . आपल्याला तो प्रकार झेपणार नाही . . म्हणून काका नेहमी उडवूनच लावायचे . . . . कुठल्याही पक्षाशी बांधिल राहीलं की शत्रु निर्माण होणार !. . ते नको होते त्याना .
निवडणुकांच्या वेळी त्यांचं आवडीचं काम म्हणजे मतदानाला जाऊ इच्छिणाऱ्या अपंग किंवा म्हाताऱ्या माणसांना तिथपर्यंत नेऊन पोहोचवणे आणि परत आणणे . तेव्हा तसा त्यांचा फोटो एकदा वर्तमानपत्रात छापून आला होता . . . वयोवृद्ध मतदाराला पाठुंगळी घेऊन आपला मतदानाचा हक्क बजावण्यासाठी पोहोचवताना एक होतकरू तरूण . . अशा मथळ्याखाली .
तो पाहून अप्पा . . वाह रे वाह!! म्हणे होतकरू तरूण . . असं म्हणून त्याना खिजवायला जाणार तोच त्यांचा हात धरून आपल्या पाठीवर मारून घेत त्यांची जबरदस्तीची शाबाशकीही घेतली काकानी . . . बघा बघा !! . . .तुमच्या थोर घराण्यातल्या एका तरी मुलाचा फोटो पेपरात आला !!!. . म्हणून .

एकूण त्या थोड्याशा दिवसात मी जे काका पाहीले मला अगदी हिरोच वाटु लागले होते ते !!. काकीशीही छान गट्टी जमली होती नंतर . मग जेव्हा माझी परत जायची वेळ आली तेव्हा ती हळहळत बोलली . . मला करमणार नाही ग आता!!. . तर काका लगेच म्हणतात . . काळजी नको करू अजीबात !! आपली वरपर्यंत ओळख आहे !! मी सांगीतलं आहे त्याला . .लवकरच तो आपल्यालाही अशी एखादी मुलगी देईल . . मग बघ कसं करमतय ते तुला . .

देवानं लवकरच काकांच ऐकल . ,चांगलच ऐकलं !! वर्षा दोन वर्षाच्या अंतरावर लागोपाठ त्याना चांगल्या तीन मुली झाल्या . तीसरीच्या वेळी काकुआजी . . वंशाला दिवा हवा . . वगैरे बोलू लागली तर काका तिला गंमतीनं म्हणतात कसे . . अरे देवा!!!. . अजून दिवा पण हवाय का तुला ?? एवढ्या तीन तीन दिवट्या दिल्या तरी . . आता त्याच बघ किती उजेड पाडतील !!. त्यावर अप्पा चिडून बोलले . . अरे . . !! तीन तीन मुलींचा बाप झालास निदान आता तरी गंभीरपणे विचार करायला शिक!!!. . तर त्यानंतर काही दिवस काका मुद्दाम मौन व्रत धारण करून घरात वावरत होते . शेवटी मग अप्पानाच रहावलं नाही आणि त्यानी त्याबद्दल विचारताच . . बघा मी गंभिरपण विचार करतोय तर पहावत नाही ना तुम्हाला?? . . म्हणून परत त्यांच ये रे माझ्या मागल्या सुरू !!.

काकाना मुली झाल्या तरी सुटीत न चुकता मला न्यायला यायचे . तसे एरवीही बऱ्याचदा यायचे . येताना कामाची भलीमोठी लिस्टच असायची बरोबर . कोणाची लग्नाची खरेदी , कोणाचं शेतीचं सामान ,कोणाची औषध तर कोणाचा निरोप . . सगळी काम फत्ते करून मगच जायचे परत . अगदी रात्री बेरात्री केव्हा येतील त्याचा नेम नाही . आजी तर रोज त्यांच्यासाठी जेवण काढून ठेवायची बाजूला . . रात्रीचा कधीपण भुक भुक करत येईल म्हणून . . इतरांपेक्षा त्यांच्यावर तिचा फार जीव . . साऽऽरखी माझा शशी माझा शशी! करत रहायची . . हा शशी नसता तर एवढ्या पोरांसकट घर मी सांभाळूच शकले नसते !!. . म्हणायची . कारण लहानपणी बाकीचे सारे अभ्यासात दंग असताना घरच्या बाहेरच्या साऱ्या कामात काकाच तिला स्वत:हून सारी मदत करायचे . त्यातून कधी तिनं ओरडून अभ्यासाला बसवलंच तर सरळ पुस्तकात डोकं खुपसून झोप काढून घ्यायचे की पुन्हा उठून उनाडायला ताजे तवाने . त्याना उनाड म्हणणं पण चुकीचं ठरेल .कारण कित्येकांचे पालक आपल्या वाया जाणाऱ्या मुलाला मार्गी लावण्याचं श्रेय त्यानाच देतात आणि कॉलनीतल्या आता आज्या झालेल्या कितीतरी मुली शशीनं तिथल्या मवाल्यांना कायमचा धडा शिकवून आपली कशी सुटका केली याच्या गोष्टी अजूनही सांगतात .

जगाला सुधारणारे काका स्वत: मात्र अप्पांसाठी कायम फुकट गेलेला मुलगा म्हणूनच राहीले . शेवटी काकानी स्वत: काहीतरी करून दाखवावं म्हणून एका बिल्डरकडे छोटीशी नोकरी धरली कारकुनाची . . तर अप्पांचा त्यालाही विरोध . . घरचे एवढे सोडून हे कसले . . चे डोहाळे ?? . . म्हणून . पण काकानी नाही ऐकलं . ती नोकरी सांभाळून त्यांचे नेहमीचे उद्योगही चालुच होते आणि त्यामुळे अप्पांची सततची बोलणीही . असेच त्यादिवशी सकाळी सकाळी . . काय दिवे लावलेस ?? काय मिळवलेंस इतक्या वर्षात ??. . ही आप्पांची नेहमीचीच मुक्ताफळं ऐकून . . . काय मिळवलं ते दिसेल तुम्हाला लवकरच!!!. . असं म्हणून काका जे घराबाहेर पडले ते कायमचेच!!.

जाताना गावच्या इन्स्पेक्टरानी त्याना आपल्या बाईकवर लिफ्ट दिली . त्यांच्या मागे बसून जात असताना एका वळणावर भरधाव ट्रकनी त्याना उडवलं . ते इन्स्पेक्टर जागच्या जागी गेले . काकाना हॉस्पीटलमधे नेता नेता त्यांचा जीव गेला . त्याआधी जोपर्यन्त शुद्धीवर होते तेव्हा त्याना हॉस्पीटलमधे घेऊन जाणाऱ्या मित्राना . . . बघा तुमची इच्छा होती ना फार?? . . आता लवकरच मला तिकिट मिळणार !!. . पण वरचं !!. . . असं म्हणून त्याही परीस्थीतीत स्वत:बरोबर हसायला भाग पाडलं होतं म्हणे .

तिथं आधीच जमलेल्या प्रचंड गर्दीतून वाट काढत आम्ही काकांपर्यंत पोहोचलो .काकांचा चेहरा गेल्यावरही हसरा दिसत होता !! इतका की . . हेऽऽ हेऽऽ !! कशी गम्मत केली . . . म्हणत आत्ता उठून बसतील असंच वाटत होतं त्यांच्याकडे पाहून . पस्तीशीचेही नसतील तेव्हा ते . एवढ्या वर्षात त्यानी जमवलेला प्रचंड मित्रसमुदाय आसपासच्या साऱ्या गावातून, पुण्या मुंबईहून आपल्या लाडक्या मित्राला शेवटचं पहायला आला होता . एखाद्या मोठ्या मंत्र्याच्याही अंत्ययात्रेला होणार नाही एव्हडी गर्दी तिथं जमली होती!!.
आणि त्या अफाट गर्दीत हरवून गेल्यासारखे होते अप्पा !! . .त्यांचा तो नेहमी गुर्मीत असणारा चेहरा आज पहावणार नाही इतका दिनवाणा दिसत होता . एकदम शुन्यात नजर लावून होते एकही अक्षर न बोलता !!. . . त्यांची वाट्टेल ते बोलणी हसत हसत झेलणारं हक्काचं माणूसच राहील नव्हत आज .
. . पहा !! काय मिळवलं मी इतक्या वर्षात . . हे जाता जाता प्रत्यक्ष दाखवून त्याना शेवटचं निशब्द केलं होतं काकानी .

काकाना जाऊन इतकी वर्ष झाली .आजही आमच्या घरात , ओळखीत कुठलंही कार्य असो . . हे सारं करायला आज शशीच हवा होता !!. . हे वाक्य हमखास ऐकायला मिळतं . . .खुप मोठी हो शिकुन !! माझ्यासारखी नको होऊ !!!. . काका नेहमी म्हणायचे .खरं तर मला त्यांच्यासारखंच व्हायचं होतं !! पण . . . . . .
अशी देणगी फार थोड्या लोकाना देतो देव !!. . आणि अशी सगळ्यांना जीव लावणारी माणसं देवालाही तितकीच मोहात पाडतात .

मग लवकरच तो त्याना परतही घेऊन जातो !!!

- सुमित्रा

तिचे आकाश

रात्रीची धुंदी साऱ्या आसमंतात पसरली होती . मंद प्रकाश ओसंडून वाहात होता .वाऱ्याची एखादी झुळुक मधूनच अंगाला गारवा देत होती . रातराणीचा सौम्य गंध आसमंतात दरवळत होता . आणि अशातच तो आला .ती म्हणाली आज इतका वेळ का लावलास आणि दादा कुठे आहे तो नाही आला, आणि हे काय मावशी देखील नाही, पण तो काहीच बोलला नाही . मग ती आणि तो असे ते दोघेही एकमेकांकडे मुकपणाने पाहात राहिले . रात्र सरत होती . काजवे किरकिरत होते आणि हे दोघे मात्र नि:शब्दच होते अजुनही . त्यांना साथ होती अथांग अशा त्या आकाशाची .
तिचे जग उध्वस्त झाले आणि ती एकटी झाली, दिवस तर कसाही जायचा पण रात्र तिला खायला उठायची . यानेच आधार दिला होता तिला तिच्या या एकटेपणात .

तिचे नुकतेच लग्न झाले होते . नविन घर, नविन माणसे , नविन नाती सारे कसे नविनच होते तिला . एक मोठे कुटुंब काय असते हे तिला ठावुक नव्हते . त्यामुळे सासरी आल्यावर ती एकदम गोंधळुन गेली होती . लहानपणीच आई, बाबांचे छत्र हरवलेली ती आणि तिची भावंडे मावशी कडे राहिलेली . मावशीला देखील कुणीच नव्हते . त्यामुळे तिचे आइ बाबा गेले तेव्हा मावशीनेच त्यांना आधार दिला .दुधाच्या पिशव्या विकून मावशीने त्या तिघांचा मोठ्या हालाखीच्या परिस्थितीत सांभाळ केला . एक दिवस तिच्या मोठ्या बहिणीचे लग्न झाले, आता हिचे लग्न, घरी राहिले ती फक्त मावशी आणी दादा, पण दादा तरी कुठे नेहमी घरी असायचा, मावशी पुन्हा एकटी झाली . तिला खुप दु:ख वाटायचे मावशीचे पण ती काहीच करु शकत नव्हती . सासरची माणसे चांगली होती तरी वारंवार मावशीकडे पाठवायला ती देखील तयार नसायची . एक दिवस दादा अचानक कसल्याशा आजाराने जग सोडुन गेला . ती खुप दु:खी झाली . मावशीने तर हंबरडाच फोडला . बायका चंद्राला भाऊ मानतात . चंद्रात ती नेहमी दादाला पहायची .त्याच्याशी मुकपणेच काही बोलत बसायची . घरचे तिच्या या वागण्याने त्रासले,
तिचा नवरा तिला समजुन घ्यायचा .तिला आधार द्यायचा . तिला आपल्या कुशीत घेउन आई प्रमाणे थोपटुन झोपविण्याचा प्रयत्न करायचा . त्याच्या या प्रेमाने ती दादाला हळु हळु विसरु लागली होती . पण कधी कधी ती त्याला म्हणायची त्या चंद्राला पाहिल्यावर तिथे डोंगर दिसतात आणि त्या डोंगराच्या आडुन असे वाटते की दादा डोकावुन पहातो आहे . हो मला दिसतो रे तो कधी कधी . अशावेळी तो तिच्या केसात हात फिरवायचा आणि म्हणायचा आपण देखील जाऊया कधी तरी तुझ्या दादाबरोबर लपाछुपी खेळायला . मग आपण लपू आणि तो आपल्याला शोधेन . आता तुझ्याबरोबर तो लपाछुपी खेळतो खरा . त्याची त्याला शिक्षा देउया आपण . चल आता पड, सकाळी लवकर उठायचे आहे ना? . तो तिला अस नेहमीच समजून सांगायचा आणि मग ती त्याच्या कुशीत एखाद्या लहान बाळाप्रमाणे झोपायची . तिच्या निरागस चेहऱ्याकडे तो तासन तास पाहत बसायचा . थोड्याच दिवसांत ती दादाला विसरली मात्र कधी कधी तिला त्याची फार आठवण यायची आणि नकळत ती खिडकीत जायची, पण तो आल्यावर त्याला त्रास होऊ नये म्हणुन ती झटकन बाजुला व्हायची . तो तिच्याकडे पाहून तिला वेडाबाई म्हणायचा .

आता संसारात तिचे मन रमले . मावशी कडे ती अधुन मधुन जात होती . सगले कसे छान चालले होते . आणि अशातच एक दिवस त्याला अपघात झाला . तिचे सारे विश्वच उध्वस्त झाले अशात तिला मानसिक आधार देणारे कुणीच नव्हते . खुप रडली ती त्या दिवशी . घरातली लोक समंजस होती पण अशा क्षणी त्यांनी तिला समजुन घेतले नाही . तिला घराबाहेर काढण्यात आले . औदसा म्हणुन तीला हिणविले गेले . पाणी भरल्या डोळ्यांनी तिने शेवटचे त्या घराला पाहिले . पण एक गोष्ट तीला जाणवली आणि ती म्हणजे तो जरी तिच्या आयुष्यातून गेला होता तरी काही क्षण तिला वाटले तो तिच्या बरोबर आहे . एक दिवस तो तिला असेच काही म्हणाला होता की जेव्हा मी तुझ्यापासुन खूप दूर असेन तेव्हा तु तुझ्या दादाला जशी ह्या चंद्रात पहातेस ना तसे मला पण बघ मी तुला तिथेच दिसेन . तिने आकाशात पाहिले पण तिला तो दिसला नाही . आणि मग तिला एकदम एकटे वाटू लागले . त्या क्षणीच जमिनीने तिला आपल्यात सामावुन घ्यावे असे वाटले पन नंतर ती स्वत:हाशीच म्हणाली त्यासाठी पदरात पुण्य असावे लागते . पुन्चजन्मीच्या पापाची फळे म्हणून की काय लहाण्पणि आइ, बाबांचे सुख मिळाले नाहि, दादा ही सोडुन गेला आणि आता . . . . . .ती खूप मोठमोठ्याणे रडु लागली .

मावशीकडे आल्यावर मावशी ने तिला जवळ घेतले आणि खुप रडली म्हणाली माझ्या नशिबात जे नव्हते ते माझ्या मुलांना मिळावे म्हणुन मी देवाकडे नेहमी प्रार्थना केली पण देवाने तेही माझ्या मुलांना दिले नाही . दिवस येत होते जात होते , तीला याची कसलीच जाणिव नव्हती .
एक दिवस ती अशाच तंदित घराच्या gallery मध्ये उभी होती . सगळिकडे अंधारच अंधार होता . वातावरण सामसुम होते . टाचणी पडुन आवाज व्हावा इतकी शांतता होती . भयाण अशा त्या रात्रीत ती एकटीच जागी होती . तीला त्याच्या स्पर्शाची जाणिव झाली .काही क्षण तिला तो गेला आहे याचा विसरच पडला आणि अचानक तिला कसनुसे झाले . किरकिरणाऱ्या काजव्यांनी तिची तंद्री उडवली होती . सळसळणाऱ्या पानांनी तिचा कैफ उधळुन लावला आणि काही तरी आपल्यापासून खूप लांब जाते आहे असे तिला झाले तिची नजर आभाळीच्या चंद्रावर पडली . आज पौर्णिमा होती . चंद्राकडे पाहून तिला त्याची आठवण आली . पण तीला आज समजवणारे कोणीच नव्हते . ती त्याच्याशी बोलु लागली आणि तेव्हापासुन तिला पुन्हा रात्र जागण्याची सवय लागली . ती काहीही कल्पना करु लागली होती . हातवारे करून स्वत:शीच बोलत बसायची .

आता तिच्या जवळ मावशी देखील नाहिये . पण तिला याची जाणिव कधी होतच नाही कारण ती रोजच दादाला, त्याला आणि मावशीला भेटते . लोक तिला आजकाल वेडी म्हणु लागले आहेत , पण तिला त्याचे काहीच वाटत नाही . ती असतेच कुठे लोकांमधे . तिच्या जगातला दिवस रात्री उगवतो आणि सकाळी मावळतो . तिला माहीत आहे ती लवकरच दादा,मावशी आणी त्याच्याकडे जाणार आहे . पण तरी अजुन लवकर बोलवावे म्हणून ती रोज त्यांच्या कडे हट्ट करते .

आज ते दोघे एकमेकांशी काहिच बोलत नव्हते ,पण नंतर तिलाच रहावले नाही ,म्हणाली आज तु बोलत का नाहीस ,बोल ना . नाहीतर मी रडेन . तर तो म्हणाला कस बर फसवल एका माणसाला . ती म्हणाली जा मी नाही तुझ्याशी बोलणार, तो म्हणाला नको बोलुस मग मी येणारच नाही तुझ्याकदे दादाला पण नाही आणणार आणि मावशीला देखील नाही आणणार . हे ऐकुन तिचे डोळे पाणावले . म्हणाली तुम्ही सगळे मला एकटीला सोडुन गेलात ,कसे वाटते मला याचे तुम्हाला काय . मी कशी जगते मलाच माहीत, तो म्हणाला म्हणुनच तर येतो ना मी रोज . बर जाउदे आज तुला मी माझ्याबरोबर नेणार आहे . येणार का ? मला तुझा एकटेपणा पाहवत नाही ग . तीला खूप आनंद झाला . तिने त्याच्या कडे हात पसरवले, त्याने तिला आपल्या मिठित घेतले, सकाळी ती तशीच उभी राहिलेली आढळली लोकांना .दोन्ही हात पसरविलेल्या अवस्थेत सताड नजरेने पाहात होती ती वर आकाशाकडे .

- उज्वला

मुद्राराक्षस

(मूळ लेखक : **Timothy Maayers**)

मी जेसूसमोर तो पेपर ढकलला . " हे बघ रे "

माझ्याकडे सम्पूर्णपणे दुर्लक्ष करत जेसू त्याच्या ग्लासमधली धोसत राहिला . त्याला पीताना त्रास दिलेला आवडत नाही हे मलाही माहित होते . पण इलाजच नव्हता .

मी सरळ उचलून पेपरचे पान त्याच्या चेहऱ्यासमोर धरले . अगदी नाइलाज झाल तेंव्हा त्याने TV वरची नजर उचलली आणी एक क्षणभर पेपरकडे टाकून त्याने माझ्याकडे जड नजरेने पाहिले . त्याच्या डोक्यातला मठ्ठपणा त्याच्या डोळ्यात साकळला होता . मला माझीच कीव आली .

का आपण ह्याच्याबरोबर काम करतो ? पण इलाज नव्हता . आमच्या धंद्यात नुसती अक्कल कामाची नाही . वेळप्रसंगी हातपाय चालवून एकदोघांना आडवे करायची तयारी लागते आणि जेसू ह्याबाबत सहजासहजी हार खाणाऱ्यातला नव्हता .

जेसू अतिशय मद्दडपणे बोलला " बीअर पिऊ दे रे "
जेसूबरोबर काम करून एक फ़ायदा नक्कीच झाल असेल माझा, तो म्हणजे सहनशक्ती वाढण्याचा .
आणि आमच्या धंद्यामधे तीची फार आवशक्यता असते . भुरट्या चोऱ्या करणे हे वाटते तितके सोपे नसते .
त्यामागेही बरीच मेहनत करावी लागते . डोके लढवावे लागते . नव्या नव्या शकली शोधाव्या लागतात .
अर्थात आमच्या दुकलीमधे हे सगळे काम माझ्या वाट्याला होते . जेसू काही कामाचा नव्हता तिथे .

" नाही आत्ताच्या आत्ता बघ . त्या TV मधल्या पोरींसारख्या छपन्न पोरी तुला मिळतील अशी बातमी आहे . "

2 आठवड्यांपुर्वी केलेली कमाई आत्ता संपत आली होती . बऱ्यापैकी hotel मधे गिळायचे असेल तर परत हातपाय मारावे लगणार हे उघड होते . पटकन काही सुचत नव्हते . आजकल पोलिस pressure जरा जास्तीच होते . त्यामूळे नीट विचार करावा लागत होता . पण पेपर पाहिल्यावर माझी चक्रे जोरात सुटली होती . जेसूच्या बथ्थड डोक्यातला त्याचा लहान असलेला मोठा मेंदू हलवण्याचा प्रयत्न म्हणूनच तर मी करत होतो .

" एक नजर टाक . " माझा आवाज थोडा चढला होता . जेसूच्याही ते लक्षात आले . त्याने पेपर समोर खेचला आणी संथपणे म्हणाल " ह्या शिळ्या बातम्या आहेत . मला वाटते आपण उद्याबद्दल विचार करायला हवा . "

" अबे त्याचसाठी सांगतोय ना . "

अगदी नाइलाज झाल्यासारखा चेहरा करत जेसूने वाचायला सुरूवात केली .
" पोलिस निरिक्षक देविका भागवत राष्ट्रकुल स्पर्धेतील अव्वल नेमबाजीबद्दल राष्ट्रपती पदकाने सन्मानीत .
तर ? आपल्याला काय फायदा ? सोन्याचे पाणी दिलेले ते पदक . झोपडपट्टीतल्या बाइचे मंगळसुत्रा मारले तरी जास्ती सोने मिळेल . "
त्याने परत बीअरचा ग्लास उचलला .

त्याचा हात खाली करत मी त्याच्यापुढच्या पेपरवर बोट ठेवले . " हे वाच . ते नाही . "

जेसूने परत सुरूवात केली . " महराष्ट्रा सरकारच्या पन्नास लाखाच्या दिवाळी बम्पर सोडतीचा निकाल जाहीर . "
एक शिवी हासडत तो म्हणाला " साला आपल्याला कधी लागली नाही . "

" हळू बोल मूर्खा . लागलिये ना . आता कोपऱ्यातल्या टेबलावर बसलेली बाई पाहा . काही उजेड पडतोय का ? "
जेसूचे डोळे थोडा वेळ त्या टेबलावरच्या बाईपासून पेपरातल्या सोडतीच्या निकालापुढे छापलेल्या photo पर्यंत मागे पुढे गरगरले .
तोपर्यंत ती बाई उठून बाहेर जायला निघाली होती .
" तीच आहे रे . चल , तीच पीछछा करून purse उडवू . "

मी जेसूला थोपवले . " माझ्याकडे त्याहून चांगली कल्पना आहे . ती काय पैसे बरोबर घेउन फिरत नसणार . जे काही असेल ते bank मधे असेल . आणि ते आपल्या आवाक्याच्या बाहेर आहे . पण एवढे पैसे एकदम मिळाले म्हटल्यावर बऱ्यापैकी माल घरात आणला असेल .
उसका पिछा करते है और उसके घर का पता लगाते है . "

जेसू फ़ारच excite झाला होता . तो जवळजवळ उठलाच .

" बघ इथे लिहिलाय कि काल तीला बक्शिसाचा एक हफ्ता मिळालाय सुद्धा . तीने घरी काहितरी भाग ठेवला असेलच . मोठी रक्कम बरोबर घेउन फ़िरेल असे वाटत नाही . "

" चल इसका पिछ करते है . "

आम्ही दोघे भराभर तिच्या मागे निघालो . मधेच ती एका stall वर थाम्बली आणि तीने एक पेपर विकत घेतला .
" आपला photo बघून खुश होत असेल . " जेसू फिसकारला .
थोडा वेळ पेपर चाळून झाल्यावर तीने तो purse मधे टाकला आणि आपल्याच तंद्रीमधे ती चालू लागली .
कसल्या तरी विचारात . . . बहुतेक मिळणार्या पैशांच्या असेल . . ती एव्हढी गुंतलेली होती कि
तीचा पाठलाग होतोय हेही तिच्या लक्षात आले नाही .

दहा - एक मिनिटे चलून ती एका जुनाट इमारतीत शिरली . एकून त्या इमारतीचा रंग , तो परिसर पाहून ती तिथे आता
फ़ार काळ राहील असे वाटत नव्हते . जेसूच्या डोक्यातही तोच विचार येउन गेला .
" किती दिवस राहील इथे असे वाटतेय रे हि ? "
" आठवडाभर राहिली तरी पुष्कळ झाले . जास्ती हावरटपणा न करता आपण जे काही करायचे ते आत्ताच करूया .
नाहीतर हाती काहीच पडणार नाही . "

" तू इथेच थाम्ब . "
हाताने मला थाम्बण्याचा इशारा करत तो पण इमारतीमधे घुसला , तो तीन चार मिनिटांनी परत उगवला .
" इथेच राहते ती . दुसऱ्या मजल्यावर . आजूबाजूला कोणीच राहात नाही तिच्या . इससे अच्छा मौका और नही मिल सकता "

तीच्या दरवाज्यासमोर पोचल्यावर जेसूने विचारले . " आणि दारातून आत कसे घुसायचे ? तोडून ? "
दुपारची वेळ होती . सगळिकडे शांतता होती . दरवाजाला धडक मारल्याचा आवाज सर्वत्र ऐकू गेला असता .
परत आतली ती बाईहि सावध होण्याचा धोका होता .
" इथेच थाम्ब . मी पाहातो काय करता येते ते . मला काहीतरी आठवलेय . "

मी परत वर आलो तेंव्हाअ माझ्या हातात समोरच्या दुकानातून घेतलेला एक पुष्पगुच्छ होता .
" इसका क्या करना है ? " जेसूने विचारले पण त्याच्या डोक्यत लगेच प्रकाश पडला असावा , कारण त्यान खूष होउन एक शीळ मारली .

" तू अस कर जेसू . एका बाजूला उभा राहा . peep hole मधून किंवा दरवाजा किलकिला करून तीने पाहिला तरी दिसला नाही पाहिजेस .
आणि जसा मी आत शिरेन माझ्या पाठोपाठ आत घूस आणि तीचे तोंड बंद कर . "
" ये तो अपुन के बाये हात क खेल है " जेसु फुरफुरायला लागला होता . त्याने आपला रामपुरी पण बाहेर काढला .
" साम्भाळून . चोरीपर्यंत ठीक आहे . खून नकोय . " दरडावत मी त्याला बाजूला होण्याची खूण केली .

तो बाजूला सरकताच मी bell दाबली . कोणीतरी peep hole मधून बघून दरवाजा किलकिला केला . दरवाज्याला साखळी होती .
" नमस्कार मी एकता नगर मित्र मंडळातर्फे आपले अभिनंदन करायला आलो आहे . माझे नाव अमोल गडकरी . "
मी मागच्या वेळी मारलेल्या पाकिटात सापडलेले visiting card पुढे केले .
माझ्या वर एक नजर टाकून तीने ते घेतले . तो चेहरा परत बाहेर डोकावला .
" एक मिनीट "

तीने दरवाजा उघडताच मी आत शिरलो . आणी माझ्या पाठी चटकन जेसू . आत शिरतानाच त्याने तो चाकू पुढे केला होता .
माझ्या पाठोपाठ तोही जागेवरच गोठला . आमच्या दोघांच्या छातीसमोर पिस्तूल रोखलेले होते .
जेसू काही हालचाल करायच्या आधी मी त्याला दाबले . " जेसू नहि "
समोरच्या त्या बाईने ज्या तऱ्हेने ते पिस्तुळ धरलेले होते त्यावरूनच तीने पहिल्यांदाच ते हाताळले नाही हे कळत होते .

" कम्बख्त . इस्के पास तो गन है " जेसू चिरकला . " पैसा मिलतेही पहिली चीज़ येही खरेदी लगती है . "
त्याच्या अवाजात विषाद होता .

ती हसली . " आत्ता कळले तुम्ही माझा पाठलाग का करत होता ते ? दुपारची edition वचलेली दिसत नाहित तुम्ही "
बोलता बोलता तीने तीच्य purse वर पडलेला पेपर समोर फेकला .
" कोपऱ्यातली चौकट बघा . "

मी मुकाट्याने तो उचलला . त्यातला मजकूर असा होता .

दुरुस्ती : आमच्या दिनांक 22 मेच्या सकाळच्या आवृत्तीमधे राष्ट्रपती पदक विजेत्या पोलिस अधिकारी देविका भागवत
ह्यांच्या फोटोची अदलाबदल महाराष्ट्र सरकारच्या पन्नास लाखाच्या दिवाळी बम्पर सोडतीच्या विजेत्या सम्पदा काळे
ह्यांच्या फोटोशी झाली आहे . ह्यामूळे झालेल्या मन:स्तापाबद्दल सम्पादक दिलगीर आहेत .

- बिपीन चौधरी

व्हॅलेंटाइन

गुरुवारी नेहेमी डोक्टर नीता घाटे ससुनमधे मानसोपचार विभागाला भेट द्यायला यायच्या . आजही नेहेमीसारख्याच त्याच त्याच केसेस पहायला भेटतील असं नीताला वाटलं होतं, पण आजचा दिवस काहीतरी वेगळंच घेउन आला होता . डो . देशपांडेंच्या केबिनमधे ती गेली, त्यांनी आपलं नेहेमीचं स्मितहास्य दिलं . नीता त्यांना अभिवादन करुन रिपोर्ट्स पाहु लगली . एक नवीन केस दाखल झाली होती . गिरीश काळे, वय वर्षे चोवीस, आत्महत्येचा प्रयत्न, कारण प्रेमभंग . व्यवसाय नोकरीच्या शोधात, शिक्षण BSC Agree. नातेवाईक आईवडील जवळच्याच खेड्यामधे, शेतकरी कुटुंब . 'साहेबांनी नोकरीच्या ऐवजी पोरगी मिळवायचा प्रयत्न केलेला दिसतोय .' नीता स्वताशीच बोलली .

देशपांडे डोक्टरांना एक violent झालेला पेशंट पहायला अचानक जावं लगलं त्यामुळे नीताला ही केस एकटीलाच पहावी लगणार होती . नीता वार्डमधे गेली तर, दोन तीन मुलं सधारणता पेशंटच्याच वयाची त्याच्या बेड शेजारी बसली होती . नीता आली तशी ऊठुन बाजुला उभी रहिली . नीताने दिलासादायक हास्य दिलं आणी ते थोडे comfortable झाले . गिरीश झोपी गेला होता .
'नमस्ते मडम, मी शशील गिरीश्चा मित्र . आम्ही एकाच रुममधे रहातो, शिवाजीनगरला .'शशील म्हणाला .
नीताने खुणेनेच त्यांना बरोबर येण्यास सांगितले . गिरीशला लगेच भेटण्यापेक्षा आधी त्याच्याबद्दल माहिती गोळा करता येतेका हे पहावं म्हणुन नीताने हा निर्णय घेतला . बाहेर येऊन ती केबीनकडे वळली . पण एकटा शशीलच आला .
'गिरीशच्या घरच्यांना कळवलेय ?' नीता .
हो पोलिसांनी कळवले असेल एव्हाना, येतीलच त्याचे पालक एवढ्यातच कधीही . आम्हीही त्यांचीच वाट पहातोय कधीची . शशील म्हणाला .
'आम्ही गेली चारेक महिन्यांपासुन बरोबर रहातो मानकर वाड्यामधे . तो अतीशांत प्रकारातला मुलगा, कोणाशी फ़रसा बोलतही नव्हता . सध्या नोकरीच्या शोधात होता . काल हे घडलं . त्याने झोपेच्या गोळ्या घेतल्या . मी रूमवर आलो, पाहिलं तर गिरीशच्या तोंडातुन फ़ेस आलेला होता, चेहेरा काळानिळा पडलेला . मी मालकांना बोलावलं, त्यांनी दोकटर आणि पोलिसांना फोन केला .
मला आधी वाटलं कि त्याने नोकरीच्या टेंशनमुळे आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला असेल . पोलिसांना त्याच्या ऊशीखाली एक चिठ्ठी भेटली . मला महिती नाही त्यात काय लिहिलं होतं, पण पोलिस विचारत होते, की मंजिरी बद्दल काही महिती आहे का ? त्याने तिचं दुसरीकडे लग्न ठरलं म्हणुन आत्महत्या करत आहे असे लिहिले अस पोलिसांकडुन कळलं .
नीताला कळुन चुकले की शशील काही आपल्या जास्त कामाचा वाटत नाही . पण तिची पहिलीच इंडिपेंडंट केस, तसं गिरीशही तिच्याच वयाचा होता, तिला माहिती होतं की काहीही conclusion काढायच्या आधी पेशंटची हिस्ट्री तपासणं फ़ार गरजेचं होतं . तिने नर्सला बोलावलं antI depression चा normal डोस द्यायला सांगितला आणि नाईट शिफ़्त्या नर्सला नीट लक्ष ठेवायला सांगितले .

तेवढ्यात शशील म्हणाला 'मडम गिरीशच्या ऊशीखाली त्याची डायरी मिळाली . पोलिसांना द्यावी की नको हे ठरत नव्हतं . पण मला वाटतलं तुम्हाला द्यावी, तुम्ही पोलिसांना द्या हवं तर . नीताला हायसे वाटले कारण पोलिसांकडुन लगेच डायरी मिळाली असती की नाही कोणास ठावुक ? तिने डायरी घेतली आणि शशीलला सांगितले की जर गरज असेल तर मी देईन पोलिसांना . आता गिरीश ठीक आहे तर ह्याची पोलिसांन ह्याची काही गरजही नसावी . त्याला कदाचीत सौम्यशी शिक्षा होईल, किंवा नाहीही होणार . पण त्याला ह्या डिप्रेशन मधुन बाहेर काढायला ही डायरी बरीच उपयोगी ठरु शकेल .

येवढे सांगुन ती तिथुन घरी गेली . जाऊन कसबसं जेवण ऊरकलं आणि आपल्या रुम मधे जाऊन डायरी वाचायला सुरुवात केली . बऱ्याच कवीता होत्या, खुपशा प्रेमकवीता, चन्द्र, तारे, निसर्ग आणि अगम्य प्रेम आयुश्यभर भरून रहिलेलं . नीताला नकळत आपले स्वप्नाळु दिवस आठवले . तिचं एवढ्यातच लग्न ठरलेलं, अगदी चारच दिवसांपुर्वी तिची एंगगेमेंट आदित्यशी झालेली . नीताला एकंदर मजाच येत होती वाचयला . काम आणि करमणुक बरोबरच . बऱ्याच कविता, आणि मधे मधे काही ललित लेखनही होते . नीता वाचत होती . . . . . .

'एका सोनसकाळीला गुलबक्षी पावलं देऊन तु निघुन गेलीस आणि माझं आयुश्य एकट एकट झालं . आता तुझ्या मधुर आवाजाने मला जाग नाही येणार, मझ्या आजुबाजुला फ़क्त घुटमळत रहातील तुझे भास, थांबुन राहिलेल्या माझ्या श्वासांसारखे . . . .तु येशीलना परत, माझी होशीलना ?'

दुसऱ्या एका पानावर लिहिलेलं . . .'त्या पित फ़ुलांचा गहीवर दाटेलं आता झाडांना, गुलमोहोर फ़ुलतील, एक नवं रुप घेउन सारी सृष्टी समोरी येइल . . .तुही तशीच वस . तात न्हाऊन माझी मधुमंजिरी बनुन येशील ना ? मी वाट पहातोय कधीचा . . . .'

सगळ्या कवीता सगळं लेखन कोणाचीतरी वाट पहाणारं, तिचं चित्र समोर ऊभ करनारं . . .एकच गोष्ट भरुन राहिलेली सगळ्या डायरी मधे . . . .पण कामाची काहीही माहिती नीताला तरी मिळत नव्हती . डायरीमधल्या एकंदर प्रकारावरन फ़क्त एकच कळत होतं की गिरीश कोणावर तरी नितांत प्रेम करत आहे . पण तिचे काहीही डिटेल्स, किंवा वास्तवातले संधर्भ दिसत नव्हते . ऊद्या गिरीशला भेटुनच उलगडा होईल सगळ्या प्रकरणाचा . फ़क्त त्याला बोलतं करयला किती वेळ जाणार हे माहीती नाही .'हे कवीलोक म्हणजे अर्धे आधीच वेडे असतातच .'तिला आपल्याच विचारांचं हसायला आलं . आपल्यावरपण अश्याच कोणी कविता केल्या असत्या, इतकं प्रेम केलं असतं तर किती सुंदर दिवस असते ना ते ? आयुश्य वेगळच असतं . . . पण आपण आपलं करिअर, अभ्यास यांच्याच मागे होतो . . हे सर्व कळन्याचे, करन्याचे दिवस कधी आपल्या आयुश्यात आले आणि गेले ते कळलं कसं नाही आपल्याला ? आपल्याला चित्रकलेची केवढी आवड होती . . . पण गेली दोनेक वर्षांत ब्रशसुद्धा हातात धरला नाही आपण . . . . . तिचं तिलाच आश्चर्य वाटत होतं . . . . आता आदित्य होता तिच्या आयुश्यात . सकाळी पुन्हा तिची नोर्मल व्हिझीट नसतानाही, फ़क्त गिरीशची केस पहायला म्हणुन ससुनमधे जयचे तिने ठरवले . झोपायच्या आधी तिने अलार्म लावताना घड्याळात पहिले, पहटेचे तीन वाजत आले होते . 'बापरे आपण चक्क इतक्या वेळपर्यन्त ही डायरी वाचत होतो ? आणि कळलही नाही ? पण खरचच काही कविता खुपच सुंदर होत्या . . . अजुनही मनात घोळतायत . . . . खरंच . . . .' नीता एका वेगळ्याच विश्वात रममान झाली होती .

फ़क्त चार तासांची झोप होऊनही ती एकदम फ़्रेश होती . तयार होऊन सरळ ससून मधे ती आली, देशपांडेंच्या केबीनकडेही न जाता ती वार्डात गेली . गिरीश आत्ताही झोपलेला होता . तिला माहिती होत, आत्महत्येच्या प्रयत्नाची केस असली की, पेशंट नेहेमी इतके डिप्रेस फ़िल करत असतात कि त्यांना कोणालाही भेटायची इच्छा नसते . स्वताचीच लाज वाटत असते . तेंव्हाच खरंतर त्यांन नीट सांभाळुन घ्यायची गरज असते . पण आपलं त्याच्याशी बोलणं महत्वाचं आहे, त्याशिवाय केस सोडवनार कशी व त्याला मदतही कशी करनार ? तिने मग नर्सला विचारलं कि गिरीशचे कोणी नातेवाईक आले की नाही ? कोणीच नव्हत आलेलं, तिला आश्चर्य वाटत होतं . त्या विचारातच तिने गिरीशच्या तोंडावरचं पांघरुन दूर केलं . . . . . .तिला आश्चर्याचा धक्काच बसला . . . . .'आदी . . तु ??? तु काय करतोयस इथे?' आदित्यच्या चेहेऱ्यावर मिश्कील हास्य होतं . तिचा चेहेरा गोरामोरा पडलेला . आदित्य हसत हसत तिला म्हणाला 'happy velentine day !!!!. चल आपण बाहेर जाऊयात तुला सर्व सांगतो' .
गाडीमधेही नीता घुश्यातच होती आणि तरीही आतुन खुश झालेली .तिचा अजुनही विश्वास बसत नव्हता काय चाललंय यावर . ते शहरा बहेर एका रेस्टोरंटमधे गेले . आदित्य सांगु लागला 'sorry' नीता, पण आपलं एंगेजमेंट झाल्यापासुन मनात होतं तुला माझ्या कविता द्याव्यात . पण तु आपल्या कामात इतकी बिझी होतिस, गुरफ़टुन गेली होतीस की तुला अजच्या दिवसाची देखील आठवण राहीली नाही . काम सोडुन कशाचाच विचार करत नव्हतीस . मग ठरवलं की तुला valentine day ला त्या प्रेझेंट द्याव्यात . आणि हे सर्व तुला तुझ्या रुटीनमधुन बाहेर न काढुन श्क्य व्हाव असे वाटले . . .म्हणुन हे हा सगळा प्रकार देशपांडे सरांच्या परवानगीने केला .

नीता मी सुद्ध तुझ्यासरखाच झालो होतो माझ्या नोकरीच्या सुरुवातीच्या काळात . मझ्यातल्या ह्या दुसर्या विश्वाची प्रचंड तडफ़ट व्हायची तेंव्हा . मलाही माझं माझं काम आवडतं पण बाकीच्याही गोष्टी आहेत की ज्यांना मला टाईम द्यायला हवा आपण . ह्या सगळ्या गोष्टीतर आपल्यातला 'चार्म' जिवंत ठेवतात . मला माहिती आहे, तु सुद्धा सुंदर सुंदर चित्र काधायचीस आधी . पण नंतर अभ्यास आता नोकरी ह्या सर्व प्रकारात, ते विसरुन चाललियेस .
आपली लहानपणापसुन तोंडओळख, एकाच गल्लीमधे रहाणारे . मी तुझ्यावर खुप आधीपासुन प्रेम करायचो पण तुझ्या आणि माझ्या करीअरमधे अडथळा नको यायला म्हनुन कधी व्यक्त नाही . मला तुझ्या नकळत तुला निहाळायला खुप आवडायचं . मला वाटलंही होतं कि यात फ़ार मोठी रिस्क घेतो आहे मी, कदाचीत तुला कोणीतरी दुसरा आवडेल, भेटेल, माझी तयारी होती त्यासठी सुद्धा . . . आणि एकीकडुन वेडी आशा . तुला जेवधं मी ओळखत होतो त्यावरुन कोणी दुसरा येणं अशक्यही वाटत होतं . . पण सर्व कवितांमधे तुच होतिस . . . मंजिरी माझ्या कल्पनेतलं तुझं ठेवलेलं नाव . . .
नीता आदित्यकडे नुसतीच पहात होती . चित्रा सरखी . . . . .
कुठलेही प्रश्न नव्हते, फ़क्त प्रेम होतं . . . . .

- दीपक जाधव

मित्र

" हॅलो आदि, मी रम्या बोलतोय . . . एक वाइट बातमी आहे अगं आपला सॅझ एका अपघातात गेला . . कालच मला मध्याचा फ़ोन आला होता अमेरिकेतून . . हल्ली तो सुद्धा तिथेच असतो . . . "

" काय ? अरे कुठे ? कसा ? केव्हा ? "

" अगं तुझे लग्न झाले आणि तू सासरी गेलीस . ह्याला कंपनीने अमेरिकेत पाठवला . तिथेच एका कार अपघातात हा गेला . . . उद्या त्याचे अंत्यसंस्कार आहेत . काका काकी तर पार खच्चून गेलेत . एकुलता एक मुलगा गेला . . पुढच्या वर्षी त्याचे लग्न करायचे म्हणत होत्या . . आणि तेवढ्यातच हे अस घडलं . . . . "

****
*

" हे सॅझ , कसा आहेस ? मला जरा त्या बायोच्या नोटस देशील का रे ? मी नव्हते बसले लेक्चरला . . . ऽरे काय करू बरंच वाटत नव्हतं मला ! "

" हं . . . देईन ना . . . त्यात काय एवढं मोठ्ठं . . . . शेवटी तुला नाही मदत करणार तर कोणाला करणार नाही का आदिती ? "

" क'मॉन सॅझ . . . तू काय हुश्शार आहेस . . . सगळ्या लेक्चरला बसतोस . . . पुढच्या वर्षी नक्कीच बोर्ड फ़ाडून येशील . . . . काय रम्या खरे ना ? "

" बोर्ड फ़ाडून येईल असे वाटत नाही पण बोर्डात मात्र नक्कीच येईल हा . . . "

" आदि . . . . वर्गात मी असतो . पण चित्त मात्र तुझ्याकडेच असते . तुझे ते निळेशार डोळे , सोनेरी रंगाचे वाऱ्यावर भुरभुरणारे केस . . . . तुझा तो अवखळपणा . . खरंच हेच का प्रेम आहे ? "

" अरे कसला विचार करतोस ? मला नोटस देतोयस ना ? "

" अं हो . . . दे तो ना . . . "

"You are my best friend...."
****
*

" चला . . . झाली परिक्षा एकदाची . . . आता काय मेडिकल का ईंजिनीयरिंग का ईन्फ़ोर्मेशन टेक्नोलॉजी . . . "

" बहुदा आयटीच करीन . . "

" मी पण तोच विचार करतेय . . . . आपण एकाच कॉलेजला ॲडमिशन घेऊ . . . . "

" हो . . . जरूर . . . घेऊ की . . . "

"You know ... सॅझ, You are my best friend...."
****

*

" सॅझ,मला कळतच नाही आहे रे . . . काय आहे त्या Von Neumann Structure मध्ये . . . मला काही काही म्हणून समजत नाही आहे . . आणि उद्या नेमका त्याचाच viva आहे . . . "

" हे आदि . . . Don't Worry.. मी आहे ना . . . सगळं समजाऊन सांगतो . त्यात काहीच अवघड नाही आहे . "

"Thanks... सॅझ, You are my best friend...."
****
*

" सॅझ . . ही घे माझ्या लग्नाची पत्रिका . . . आणि कितीही काम असले तरी सुद्धा माझ्या लग्नाला नक्की यायचं बरंका!!! नाही आलास ना तर बघ . . कधीच नाही बोलणार मी तुझ्याशी . . . So,I dont want any excuse and you know me better right ? "

" Ohh sure.. I'll be there because I know you better...hahaha मी नक्की येईन ग . . . . ok ?34;

"Thanks... सॅझ, You are my best friend...."
****
*

" सॅझ . . . असा कसा रे तू ? कॉलेजच्या पहिल्या वर्षापासून आपण एकत्र अभ्यास केला . . . वर्गात असताना मी कित्तीवेळा तुला माझ्याकडे एकटक लावून पहाताना पाहिलं होतं . . . मला मदत करायला तू नेहमी हजर असायचा . . . माझ्या लगनाच्या वेळी तू जातीने हजर राहिलास . . . एवढा हुश्शार रे तू . . . पण खरे सांग माझं मन कधीच नाही कळले का तुला ? अरे फ़क्त एकदा विचारून पाहिले असतंस तरी मी तुला लगेच हो
म्हणाले असते . शेवटपर्यंत तू मला काही विचारले नाही आणि नाईलाजाने मला बाबांनी आणलेल्या स्थळाला होकार द्यावा लागला . . . .
सॅझ , You are not my best friend.....You are not my best friend....."
****
*

- सचीन

मळभ

सोमवारची सकाळ . दादर स्टेशन . मुंबई उपनगरातलं सगळ्यात गर्दीच स्टेशन . ती मनातल्या मनात दिवसाची आखणी करत तिच्या गाडीच्या दिशेनं पटपट पावलं उचलत होती . हवेत भरलेला स्टेशन्चा वास, आजूबाजूचा कोलाहल आणि चिरक्या आवाजात केलेल्या गाड्याबद्दल्याच्या घोषणा सगळं ती एकीकडे feel करत होती . आज पुन्हा तिला ही घाईची सोमवार सकाळ आवडून गेली . तिनं इंडिकेटरकडे पाहिलं . तिची गाडीची वेळ गडद लाल अक्षरात चमकत होती . ती घाईघाईनं प्लॅटफॉर्मकडे निघाली . पुलावरून खाली जाता जाता ती गर्दीची सगळी डोकी वरून बघत होती . तिला नेहेमीच याची गम्मत वाटत असे . तिला वाटलं ,' किती
असंख्य विचार असतील या असंख्य डोक्यांमधे . ' आपणही या गर्दीत हरवून जाणार या विचारानं तिच्या अंगावर शहाराच आला . गाडी आल्यावरोबर सगळे विचार जणू थांबले आणि सगळी गर्दी आधीच गच्च भरलेल्या गाडीच्या अंगाशी झोंबू लागली . तिला अचानक वाटलं तिनं त्याला पाहिलं . ती एक क्षणभर
थबकली पण पुन्हा तो चेहेरा शोधणं अशक्य होतं . ती गाडित चढली आणि छानशी जागा शोधू लागली . मघाशी मनाशी आखलेला दिवसाचा प्लॅन To Do लिस्ट करून तिला तिच्या लॅपटॉपमधे टाकायचा होता .

तिनं बसून आपला लॅपटॉप उघडला आणि तिला शेजारच्या सगळ्या रंगवलेल्या मॉडर्न चेहेऱ्यांवरच कुतुहल जाणवलं . काहिच बदललं नव्हतं तर गेल्या पाच वर्षात ! पाच वर्षापूर्वी ती जवळ जवळ दररोज याच गाडिनं प्रवास करत असे पण आजही मुंबई जराही बदलली नाही . हायवेंना जोडणाऱ्या पुलांची संख्या वाढली होती पण मुंबईचा रागरंग आजिबात बदलला नव्हता . सगळं काही तेच , तसंच .

ती आजूबाजूचं कुतुहल अंगावर घेत तशीच काम करत राहिली आणि स्टेशन आल्यावर सावकाश आपला लॅपटॉप बंद करत स्टेशनवर उतरली . पुन्हा एकदा तिनं तो चेहेरा शोधण्याचा प्रयत्न केला पण तो तिथं नव्हताच . तिच्या मनात सतत विनोदचे विचार येत होते , खरं तर रेल्वेनं येण्यामागे सुद्धा तो दिसेल कि काय असाच विचार होता . तिला पुन्हा ते दिवस जगावेसे वाटले . ते रोज प्लॅटफॉर्मवर भेटणं . तासनतास कितीतरी गाड्या चुकवत तिथेच एकत्र उभ रहाणं . खोल मनात कुठेतरी तिला पुन्हा विनोदशी संपर्क साधायचा होता . पण कसा ? विनोदच्या आठवणीनं तिला एकदम गुदमरल्यासारखं झालं . तिला त्याच्याशी बोलायचं होतं त्याच्याबरोबर सूर्यास्त बघत बसायचं होतं .

ती गर्दीनं भरलेल्या रेल्वे पुलावर आली . तिला एकदम गर्दी नकोशी झाली . सगळं कसं अगदी तसच होतं . ती दोन वर्षापूर्वी सोडून गेली होती तसच . तिनं स्टेशनबाहेर येऊन रिक्षा केली आणि ती रस्त्याकडे , त्या वरील बदलांकडे , जुन्या खुणांकडे बघत राहिली . ऑफिसच्या इमारतीपाशी पोहोचली आणि तिला जाणवलं की ऑफिसची इमारत आता खूपच चांगली दिसत होती . आजूबाजूचं बांधकाम संपलं होतं आणि तो परिसर कितीतरी स्वच्च , नीटनेटका दिसत होता . काहितरी बदललय हे बघून कुठेतरी तिला मनात बरं वाटलं . लिफ्टची वाट बघताना कितीतरी असेच छोटे छोटे क्षण तिला आठवले आणि वाटलं या छोट्या छोट्या क्षणांच्याच कशा गोड , न विसरता येणाऱ्या आठवणी होतात . ऑफिसमधे पोहोचेपर्यंत तिला एकदम तिथल्या

सगळ्यांना भेटायची ओढच लागली . सगळे कलिग्स तिची वाट बघत होते . त्यांनी सगळ्यानी तिचं खूप प्रेमानं स्वागत केलं . ऑफिसमधल्या नविन लोकांशी तिची ओळख करून दिली . जुन्या लोकांना झालेला मनापासूनचा आनंद तिला जाणवला . जुन्या आठवणींची उजळणी झाली , तिच्याशिवाय पार्टीत कशी मजा वाटत नाही हे तिला सांगितलं गेलं . हे सगळं प्रेम बघून तिला भरूनच आलं आणि वाटलं ती सुद्धा हे सगळं असच miss करत होती . तिची बसायची खुर्ची , तिचं टेबल , भोवती बसणारी लोकं हे सगळं तिला खूप खूप सुखावून गेलं . तो फोन , त्यावर विनोदशी मारलेल्या लांबलचक गप्पा , वाद , रूसवे , आखलेले प्लॅन्स .
पूर्वीसारखच सगळ्यानी मिळून जेवण मागवलं , एकमेकांच्या आवडत्या डिशेसवरून एकमेकांना चिडवाचिडवी झाली .

जेवल्यानंतर आपल्या जागेवर बसल्यावर तिला पुन्हा एकदा विनोदची प्रकर्षानं आठवण झाली . सकाळी सकाळी एकमेकांना पाठवलेले SMS आठवून तिला हसू आलं . तिला वाटलं कसे वेडे दिवस होते ते , दिवसातून असंख्य वेळा एकमेकांना फोन करणं messeges पाठवणं , मग संध्याकाळी सूर्यास्त . कधी कधी दिवसा एवढं बोलून संध्याकाळी काहिही नसायचं बोलायला , पण तरी रोज भेटणं किती महत्त्वाचं वाटयचं . तिला पुन्हा एकदा त्याला फोन करावासा वाटला . संध्याकाळची भेट ठरवाविशी वाटली .

नंतरचा वेळ ती कामात मिटिंग्ज मधे गुंतून राहिली . दिवस संपल्यावर मात्र तिला पुन्हा एकदा जुन्या गोष्टी कराव्याशा वाटल्या . तिला त्या सगळ्या
जुन्या खूणा तपासाव्याशा वाटल्या . सूर्य केशरी लाल समुद्रात बुडताना बघत गाणं म्हणत वाळूवर बसावसं वाटलं . विनोदशी बोलावसं वाटलं .

त्याला फोन करून त्याच्या फिल्मसाठी नुकत्याच मिळालेल्या international award बद्दल त्याचं अभिनंदन करावसं वाटलं . त्यांचे दोघांचे वाद ऐकून तिच्या ओठांवर परत एकदा हसू फुललं . खूप वाद घालत दोघं . जिंकण्यासाठी नाहीच . सहज . एकमेकांच्या महत्त्वाकांक्षा, स्वप्नं ऐकत समुद्राकाठी बसत असत . ते सगळं किती आत्ता आत्ताचं वाटलं , जसं काही अगदी कालपर्यंत घडत होतं .

अचानक फोनच्या आवाजानं ती दचकली , भूतकाळातून वर्तमानात अक्षरश : फेकली गेली . तिच्या नवऱ्याचा , राजनचा फोन होता . तो म्हणत होता ," अगं , मला माझ्या या मुंबई भेटीसाठी एका चांगल्या आणि सुंदर गाईडची गरज आहे . तुझे ते जुने दिवस आहेत तरी काय असे छान ! आहे तरी काय या मुंबईच्या सूर्यास्तामधे एवढं . By the way, तुझ्यासारखी सुंदर गाइड मला मिळाली तर गाइडला डिनरला घेऊन जाईन म्हणतो . मग काय आहे का ऑफर tempting enough? की तुम्ही आपल्या तुमचे जुने सूर्यास्तच आठवत रहाणार आम्हाला विसरून ?" तिला त्याच्या चिडवण्याची , खोट्या रूसण्याची गम्मतच वाटली . मग त्या दोघांनी समुद्रावर जायचं ठरवलं . ती त्याला तिचा आवडता जुना किल्ला पण दाखवणार होती .

राजन नेहेमीप्रमाणे उत्साही , खेळकर मूडमधे होता . त्याने तिला दिवस कसा गेला ते विचारलं , त्याचा दिवस मिटींग्ज मधे कसा बोरिंग गेला ते सांगितलं . त्यालाही तिचा आवडता तो जुना किल्ला आवडला . " अगं पण किल्ला कुठाय ? हे तर फक्त ओबडधोबड रस्त्यावरून दमछाक करत चढत यायचं आणि चार दोन चिरेबंदी मोडक्या भिंती आणि बुटकुले खांब बघायचे . हं वारा मात्र मस्त येतो हं आणि समुद्रपण सुपर्ब दिसतो इथून . " असं बडबडत , तिला चिडवत त्यानं जुन्या देवळाचे फोटो काढले . ' मस्त लाइट आहे ' म्हणत राजनने तिचे पण भरपूर फोटो काढले . तिला देवळात पूर्वीपेक्षा वर्दळ जास्त वाटली पण किल्ला मात्र तसाच होता . राजनला तिनं तिची तिथली आवडती जागा दाखवली . त्याला अगदी स्वत : चं घर दाखवावं तसा किल्ला दाखवला . किल्ल्याबद्दलचे किस्से सांगितले . तशा पूर्वीसारख्या आडोशाला बसलेल्या जोड्या दाखवल्या , त्यांना बघायला येणारे आंबटशौकीन
दाखवले . त्यांच्याबद्दलचे विनोदचे काही जुने मजेशीर किस्से सांगितले आणि ती दोघं खूप हसली .

हातात हात घेऊन त्यांनी मूकपणे सूर्यास्त पाहिला . राजननं तिला गाणं म्हणायला सांगितलं . ती सूर्यास्त बघताना हरवलेली बघून राजनने तिचे पुन्हा फोटो काढले . इतका छान वेळ जात होता की तिला जुने दिवस आठवलेच नाहित , पण विनोदची आठवण मात्र गेली नाही तिच्या मनातून . राजननही तिला त्यातून बाहेर आणलं नाही . तिला जाणवत होतं की राजनच्या मनात खूप प्रश्न आहेत पण तो विचारत नाहिये .

तिनं राजनशी लग्नाला होकार दिला कारण तो खूप सम्जुतदार वाटला तिला . त्याच्या career मधे दंग होता , focused होता . याच कारणांसाठी तर तिनं विनोदवर प्रेम केलं होतं . राजन त्याच्या विश्वात दंग होता पण विनोदसारखा हरवला नव्हता . राजनबरोबर तिला अता एक वर्ष झालं होतं आणी हे एक वर्ष खूप छान गेलं होतं तिचं . पण विनोद तिच्या मनातून गेला नव्हता . राजनला हे समजत होतं तो स्वत : सुद्धा अशाच एका माग सोडलेल्या नात्यातून आला होता .

तिला तिची विनोदबरोबरची शेवटची भेट आठवली . त्या दोघांची आयुष्य वेगळी होती , त्यांच्या दिशा वेगवेगळ्या होत्या आणि हे न समजण्याएवढी , न समजून घेण्याएवढी त्यांची मैत्री कोवळी नव्हती . त्या दोघांनी खूप सुंदर क्षण एकत्र घालवले होते . त्यांनी एकमेकांची दु : ख , आनंद , राग , भिती एकमेकांशी वाटून घेतली होती , ओळखली होती . पण त्यांची दोन वेगवेगळी आयुष्य होती . एकमेकांच्या विश्वात न सामावणारी . त्यांचंही दोघांचं एक वेगळं विश्व होतं पण त्यांचं एकत्र येणं त्यांच्या स्वतंत्र विश्व उल्थवून टाकणारं झालं असतं हे दोघांना माहिती होतं आणि म्हणून त्यांनी वेगळं व्हायचं ठरवलं . मग तिला राजन भेटला . ती दोघही आपापल्या विश्वात एवढी दंग होती की त्यांना एकमेकांचं अस्तित्वच जाणवलं नाही सुरूवातीला . आईनं जेव्हा तिला राजनशी लग्न करण्याबद्दल सुचवलं तेव्हा ती फारशी तयार नव्हतीच . राजन आणि ती पहिल्या भेटीत आपापल्या
करिअरबद्दलच बोलले . त्या भेटिनंतरही त्यानी एकमेकांबद्दल विचारच केला नाही आणि म्हणूनच तिच्या आइनं जेव्हा तिचं मत विचरलं तेव्हा तिला काही सांगता आलं नाहि . तिच्या आईनंच तिच्यासाठी निर्णय घेतला आणि आज तिला राजनबरोबरचं आयुष्य खूप मजेत असल्याचं पुन्हा एकदा जाणवलं . तो तिचा मित्र
होता , नवरा होता आणि हो त्यांचं एकमेकांवर खूप प्रेम होतं .

किल्ल्यावरून एकमेकांना आधार देत देत उतरता उतरता तिनं त्याच्या कानात हळूच सांगितलं ," माझं तुझ्यावर प्रेम आहे " . तिला अलगद स्वत : जवळ घेत तोही तेच कुजबुजला . ती गुदगुल्या झाल्यासारखी खुदकन हसली . खाली कारमधे बसून त्यांनी ठरवली की मुंबईत असेपर्यंत रोज इथे यायचं . राजनला इतकं विचारायचं होतं , तिला इतकं सांगयचं होतं . तिला एकदम अंधारातून उजेडात आल्यासारखं वाटलं , दिवसभराचं मळभ सरून एकदम ऊन पडल्यासारखं वाटलं .

- अर्चना जोग

प्रतीक्षा

सकाळपासूनच डॉ. स्टीव्ह थॉमसन यांच्या प्रयोगशाळेत धावपळ चालू होती. प्रयोगासाठी लागणारी वेगवेगळी उपकरणे सज्ज करुन ठेवली जात होती. Surgical instruments निर्जतुक करण्यापासून ते sample tubes तयार करण्यापर्यंत सगळी बारीक सारीक कामे मोठया उत्साहानं चालली होती.

डॉ. स्टीव्ह थॉमसन... organ transplant क्षेत्रातलं एक नावाजलेलं व्यक्तिमत्व. Johns Hopkins सारख्या प्रख्यात संस्थेतून डॉक्टरेट पदवी मिळवल्यानंतर त्याच संस्थेत राहून स्टीव्ह नं आपल्या स्वतंत्र संशोधनाला सुरुवात केली, आणि अवघ्या पाच - सहा वर्षात डॉ. स्टीव्ह थॉमसन संस्थेसाठी एक अभिमानास्पद नाव बनले होते.

प्रयोगशाळेत चाललेल्या या सगळया धावपळीत, या उत्साहात खटकणारी एकच गोष्ट होती...

प्रत्येकवेळी लहानात लहान प्रयोगात जातीने लक्ष घालणारे डॉ.स्टीव्ह आज या सगळया धावपळीपासून अलिप्त होते. प्रयोगशाळेतल्या technician पासून ते डॉ. स्टीव्ह चा उजवा हात समजल्या जाणाऱ्या डॉ.केन पर्यंत सगळयांनाच ही गोष्ट राहून राहून जाणवत होती. डॉ.केन तर दोन - तीनदा स्टीव्हच्या ऑफ़िसपाशी आले आणि बंद दार पाहून नाईलाजने मागे फ़िरले.

आपल्या प्रशस्त office मधे बसलेले डॉ. स्टीव्ह जणू काही भूतकाळात हरवून गेले होते.

Johns Hopkins मधे एक विद्यार्थी म्हणून दाखल झाल्यापासून ते आजच्या दिवसापर्यंतचा हा प्रवास! स्टीव्हच्या डोळयासमोर ह्या प्रवासातला प्रत्येक प्रसंग तरळत गेला. कोणालाही हेवा वाटावा असे हे यश आणि ...
... आणि तो टेबलावर पडलेला फ़ोटो. Research papers च्या भल्यामोठया गठयामधे हरवलेला. बुद्धीच्या, तर्कशुद्ध विचारांच्या गर्दीत नकळत मागे लोटल्या गेलेल्या रिबेकाचा!

रिबेका.. दिसायला अतिशय साध्या, नेहेमी jeans , T-shirt अशा गबाळया पेहरावात असणाऱ्या ह्या graduate student कडे स्टीव्हचे लक्ष गेले होते ते तिने विचारलेल्या एका प्रश्नामुळे. त्या लहानश्या प्रश्नातून जाणवलेली रिबेकची तल्लख बुद्धी आणि चेहऱ्यावरचे ते निरागस हास्य डॉ. स्टीव्हच्या चांगलंच स्मरणात राहिलं. त्यावेळी स्टीव्ह्ने डॉक्टरेट मिळवून नुकतीच स्वतंत्र संशोधनाला सुरुवात केली होती. नव्या उमेदीनं, नव्या विचारांनी आणि प्रचंड आत्मविश्वासानं! आणि तेव्हाच ही रिबेका त्याच्या आयुष्यात आली, आणि बघता बघता तिने स्टीव्हच्या संपूर्ण बौद्धीक विश्वाचा ताबाच घेतला.

रात्रंदिवस organ transplant मधे होणाऱ्या नवनवीन संशोधनाबद्दल बोलताना, आपण रिबेकानं विचारलेल्या प्रश्नांना उत्तरं कधी शोधायला लागलो हे स्टीव्हला कळलेही नाही. Library मधे, cafeteria मधे किंवा biking trail वर वेगवेगळया विषयांवर केलेली चर्चा, मांडलेली आणि खोडून काढलेली मतं, आणि एखाद्या खूप अवघड प्रश्नावर रिबेकानं खळखळून हसत दिलेलं अचूक उत्तरं... लहान मुलाला आवडीचं खेळणं मिळाल्यावर होतो तसा आनंद रिबेकाला एखादा अवघड प्रश्न विचारल्यावर व्हायचा. आणि जेव्हा ती त्या प्रश्नाचे उत्तर शोधून काढायची, तेव्हा तर वाटे कि या रिबेकाच्या आतली रिबेका आनंदाने नाचत आहे.

स्टीव्ह आणि रिबेकाला एकमेकांबद्दल वाटणारं आकर्षण दिवसेंदिवस वाढतच गेलं. पण हे आकर्षण केवळ बौद्धीक आहे, यात इतर काहीही अपेक्षा नाही, हे दोघांनाही चांगलंच माहीत होतं. कदाचित म्हणूनच स्टीव्ह आणि रिबेकाचं बौद्धीक विश्व एकरुप होऊ शकलं, आणि त्यांच्या बौद्धीक संभोगातून जन्माला आलं हे मूल! आजच्या ह्या प्रयोगाची मूळ कल्पना!
Dead liver cells बाह्य वातावरणात वाढवून त्यातून एक सक्रीय , functional liver निर्माण करणे.

पण या प्रयोगाचे फलित पहायला रिबेका थांबली नव्हती. डॉक्टरेट मिळवल्यावर निघून गेली होती. " मला माझे स्वतंत्र संशोधन करायचे आहे, पूर्णपणे माझ्या बळावर. तुझ्यावरोबर राहिले तर बऱ्याच गोष्टी मला आपोआप, सहजपणे मिळतील. पण ते मला नको आहे! let me make it on my own steam."

आता आपल्याजवळ उरली आहे ती तिची तसबीर आणि हे मूल!

ही कल्पना गेली तीन वर्षे जोपासली आपण. आजचा हा शेवटचा प्रयोग. आणि नेमकी आजच रिबेका इथे नाही. टेलिपथी म्हणून खरेच काही अस्तित्वात आहे का ? रिबेकाला आपण मनापासून हाक मारली तर ती तिला ऐकू जाईल का ? ती खरंच येईल का ?
रिबेका, ये गं, मी तुला हाक मारतोय, आपल्या या मुलाकरता तरी ये!

इतक्यात दारावर टकटक झाली.

" रिबेका! माझी खात्री होती की तू येशीलच " असे ओरडत स्टीव्ह मोठया उत्साहाने खुर्चीतून उठला आणि त्याने दार उघडले.

पण दाराबाहेर रिबेका नाही, डॉ. केन उभे होते.

" आपल्या आजच्या प्रयोगाकरता आपण एक लिव्हर मागवले होते, ते आत्ताच आले सर. फिमेल. काल रात्री तीन वाजता गेली. " केन ने sample report स्टीव्हच्या हातात दिला.

Sample # 11
Patient Initials - RE
Patient name - Rebecca Edward
age - .....

स्टीव्हच्या डोळयासमोर पुढची अक्षरे पुसट होत गेली . . .

डॉ . स्टीव्हनी हातातला report केनला परत दिला आणि ते केनकडे न बघता office बाहेर निघून गेले .

डॉ . केनने आपले खांदे उडवले, अंगात lab coat चढवला आणि sample # 11 वर प्रयोग करायला सुरुवात केली .

- रार

सराईत

सकाळ 11 : 15
****
नेहमीच्या पेपर - मॅगझिनच्या स्टॉलवर सावंत गेले . तिथला पोरगा जगन एकदम हुशार होता . . त्यांना साध्या कपड्यात पाहिल्यावर तो बरोबर समजला आणि नेत्मीसारखा सलाम न करता कुठल्याही इतर गिऱ्हाइकासारखीच सहज वागणूक देऊ लागला . . ताजा पेपर त्यांच्या पुढे सरकवलान आणि हळूच कुजबुजला 'काय सायब, आज मोठी शिकार दिसते . सगळी मंडळी जमल्याती' .

सावंत फक्त मंद हसले . पोरगं एकदम चलाख होतं .
" सकाळपासून काही पाहिल का रे वेगळं ? . . राहु देत बाकिचे !" सावंत उरलेले पैसे त्याला ठेवायला सांगत म्हणाले . जगनने नकारार्थी मान हलवली .

पण जगनचा अंदाज अगदी बरोबर होता . आज त्यानी 'डिपी' ला उचलायलाच फ़िल्डींग लावली होती .

थोडा वेळ निघून गेला . पण काही घडले नाही . . . .

एक ऑंगळवाणा भिकारी हात लावून त्रास देऊ लागल्यावर सावंतनी एक शिवी हासडली आणि त्याच्या फाटक्या अंगावर आठ आणे भिरकावून ते हलक्या आवाजात त्याला म्हणाले . . " शेख हुश्शार रहा सगळे . . आधी पण येईल कदाचित . . "

. . . .
. . . .

सकाळ 7 : 30
****
" साहेब . खबर पक्की आहे . देवाशपत !"
" नरकात जाल साल्यानो . देवाचं नाव कशा घेतो उगाच . "
" नाय . खरंच साहेब . आज 'डिपी' जातोय . "
" काय बोलतोस ? सांग लवकर . पब्लिक फोनवर असशील तर आधी नाणं टाक . . . बोल बोल . . . "
" पक्की खबर आहे साहेब . आज दुपारी भागलपुर एक्सप्रेस ने पळून चाललाय 'डिपी' . मोठा गेम केला आसनार . . . .पण सांगता येत नाही साहेब आज कुठलीही गाडी धरेल तो . . आज उचलाच सायब त्याला . . आन माझ्यावाटच्या बी दोन लावा भो . . . "

सकाळ 9 :35
****

मुंबई पोलीस सह - आयुक्त पेन्डसे आपल्या धीरगंभीर आवाजात सांगत होते आणि त्या रूम मधील मोजक्या लोकांची टीम लक्ष देऊन ऐकत होती . . " 'डिपी' . . म्हणजेच दुर्गा प्रसाद उर्फ भय्या उर्फ राजदुलारे हा अत्यन्त खतरनाक गुन्हेगार आहे . बँक रॉबरीचे त्याचे किस्से निदान ह्या खोलीतल्या बऱ्याच लोकाना सांगायला नको ! नेहमी गावठी पिस्तोल बाळगतो पण हा खतरनाक अशासाठी की हा दर वेळेला नवीन युक्ती वापरतो . . . त्याची 'मोडस
ऑप्रन्डी' सारखी बदलत असते . . . सावंत मेन ऑपरेशन सांभाळतील . पण आधी पुढे असणार नाहीत . त्यानी आणि शेखनेच डिपी ला सहासात वर्षांपुर्वी उचलला होता . . तो कदाचीत ओळखेल आणि जरा संशय आला तरी हवेत गायब होईल . . . आय वॉन्ट रिझल्टस धिस टाईम . . पुर्ण तयारीनिशी जा . त्याने आधी एकदा रिवॉल्वर वापरले आहे सव - इन्स्पेक्टरवर . . "
सावंतनी दात रगडले, डोळ्यात सहा सात वर्षांपूर्वीचे धाडस चमकून गेले . शिन्देने मुठ आवळली आणि नवीन भरती झालेल्या मोहितेला कपळावरचा घाम पुसताना पाहून त्याला हसायला आलं
. . . .

सकाळ 10 : 10
****

" मला स्टेशनबाहेर एकही माणूस नको आपला . .सगळे आत हवेत . . डिपी कुत्र्यापेक्षाही वास काढण्यात पटाईत आहे . . . "
" पण सावंत साहेब . . "
" ठीक आहे . फक्त तूच बाहेर रहाशील . टॅक्सीतून एकटा उतरणारा कुणीही . . फोटो नीट बघून घ्या . कधी कधी दाढी ठेवतो . . कदाचित मोठी बॅग असेल . . एकटाच असेल बहुतेक . . नजर ठेवायची . . . बाई असली तरी लगेच दुर्लक्ष करु नका . . विशेष करून बुरखा असेल तर . . "
" साहेब ते काम शिन्देकडे द्या . कधीही ठेला लावायचा तर लेडीज डब्यासमोर लावतयं "
सगळे हसले .
" हं मला फालतूपणा नको नंतर . . फोटो कॉपी विसरू नका . वेष बदलला तरी उंची लपवता येणार नाही साल्याला . . . एकट्याने घ्यायचा नाही अंगावर . . स्टेशनवर पब्लिक पळापळ करेल . . . पिस्तुल नेहमी मोज्यात ठेवतो . . म्हणुन डाउट आला आणि तोच खाली वाकला माणूस तर मात्र सरळ झडप घाला . . "

दुपार 12 : 44
****

मुख्य प्रवेशद्वार, जिना, आणि लहान प्रवेशद्वार . . टाईट ! पण तिन्ही ठिकाणहून अजुन काहीच सिग्नल नव्हता . सावन्तनी शर्ट आउट केला होता . . हात लावुन त्यानी मागे खोचलेले रिवॉल्वर शर्टावरुनच चाचपले . . स्टॉल च्या आडच उभे राहीले होते अशा रितीने कि त्याना मात्र पूर्ण प्लॅटफॉर्म दिसेल ह्या
बेताने .
" बरोबर आहे, कॉन्स्टेबल शेख अशा लोकाना खानदानी गुन्हेगार म्हणतो ते . कॉर्नर झाले तर मांजरीसारखे क्षणात हिंस्त्र होतील पण शक्यतो थंड डोक्याने गुन्हा करुन शांतपणे हवेत विरुन गेल्यासारखे गायब होतील . 'डिपी' ह्या सगळ्या प्रकारात माहीर आहे . . आज उचलला नाही तर परत बसा एक दिड वर्ष हात चोळत . च्या मायला ह्या शिंदेला बरोबर बायकांच्या घोळक्यापाशीच ठेला लावायला होतो दर वेळेस . . पण निडर आहे एकदम . . पळापळीची वेळ आली तर एक्दम बेस्ट आहे शिन्देच . च्यायला दहा वर्षापूर्वी आपणही होतो की . . साला आज उचलायचाच डिपी ला . .येऊन गेला नसेल ना ? . . . . . .

दुपार 2 : 50
****

इकडे तिकडे न्यहाळत कॉंस्टेबल शिंदे विकत बसला होता काहीतरी . सावंत साहेब खूशेत आपल्यावर . ह्या वेळेलाही पलटी खायची नाही . . नाही तर . . जाया लागेल 18 तास ड्युटी . . सुरक्षा बंदोबस्त . शिवाय पेंडसे साहेब येगळा बांबू . . ! आयला ह्या मोहितेला बजावल होतं ड्युटीचे काळे बूट घालू नको खाली . . मग वर काय बी कापडं घालून काय उप्योग ? सादा पाकीटमार पण वोळखतो मग . . वेणं ऐकत न्हाइ . च्ययला लई कटाळा आला . . आला की
धरायचाच आता 'डिपी' . . . . हा बोलो दस रुपया डजन . नाय बाई बराबर भाव बोला . . .

संध्याकाळ 6 : 30
****

पळत पळत कॉंस्टेबल कामत स्टेशनात शिरला . प्लॅट्फॉर्मवर सवन्तना शोधायल त्यला फार वेळ लागला नाही .
" साहेब, आत्ताच वायरलेस आला . 'डिपी' ला कोरेगावकर सायबानी उचलला !!" .
" ऑं . काय म्हणतोस . आम्ही सकाळपासन इथे आहोत . . . "
" व्हय साहेब . रेश्माकडे येईल जाण्यापुर्वी म्हून चानस घेतला . . अलगद सापडला . हत्यार पण नव्हत जवळ . . "

" हं . . . " कपाळावरचा घाम पुसत सावंत बाकड्यावर बसले . " दोन लिम्बु पाणी सांग रे ! च्यायला सकाळपासन टांगणीला जीव . . . अं . . परवा भाऊबिजेला जायला निघणार ना रे तूही ? "

" व्हय सायब, सकाळची यष्टी हाय . अजून एक गोष्ट साहेब, गनपत दिसला येताना . तुम्हाला भेटाया चौकीत चालला व्हता म्हून व्ह्यॅन मदी घालून आनला . "

" कुठाय . . . ? काय रे गणपत . भडव्या तुला सणाची बक्षीसी हवी असली की माझी आठवण होते काय ?"

" नाय साहेब, तसा नाय " गणपत ओशाळत म्हणाला, मग पुढे वाकून जरा बावरल्या सारखा दबक्या स्वरात बोलला " साहेब, एक पक्की खबर आहे . एकदम पक्की . . . . . .
"

- राहुल फाटक

देवाचच कार्य

श्रिपती चंदनपूर गावातला एक ज्येष्ठ सुजाण गावकरी . गावकऱ्यांच भल कस कस होईल हाच विचार त्याच्या डोक्यात सत असे . मूल बाळ नव्हत पण गावातल्या सगळ्या मुलांवर त्याची खूप माया होती . त्या मुलांसाठी त्यांच्या शिक्षणासाठी त्याची तळमळ बघून त्याचा गावकऱ्यांनी एकदा सत्कारही केला होता . गावातली सगळी मुलच काय इतरही सगळे जण त्याला बाबा म्हणत . श्रिपतीचा तसा देवा धर्मावर विश्वास नव्हता पण बायकोच्या हट्टाखातर त्याने बरेच देव देव केले बरेच नवस केले पण संतती सुख काही त्याच्या नशिबी नव्हत .

श्रिपती एकदा त्याचा मित्र गणू याच्या बरोबर असाच माळरानावरून चालत चालत येत होता . बांधावरून चालता चालता त्यांना तिथे माळरानात काही तरी चमकल्याच जाणवल . कुतूहल म्हणून ते बांधावरून उतरून त्या चमकणाऱ्या वस्तू कडे जाऊ लागले . जवळ जाताच त्यांच्या लक्षात आल की एक साधा काचेचा तुकडा होता . आणि स्वत:वरच्या पोरकटपणावर हसत ते पुढे चालू लागले . इतक्यात गणू कसा तरीच करु लागला . त्याला फ़ीट आल्यासारखे हात पाय झाडू लागला . श्रिपतिला काहीच कळेनासे झाले . काय करावे सुचेना . तो गणूला विचारू लागला काय रे काय होतय . तुला अस कधी पूर्वी झाल होत का . काही औषध गोळ्या आहेत का . पण गणू काही बोलू शकत नव्हता . त्याची फीट इतकी तीव्र होती की मानेला आलेल्या झटक्यांमुळे त्याची वाचाही बंद पडली . कसा बसा तो हात करून दुसरीकडे जायची खूण करू लागला . गणू जरी अंगाने किडमिडा असला तरी त्या अवस्थेत त्याला उचलून न्यायला श्रिपतिला बरेच कष्ट पडले . फीट आलेल्या जागेपासून बरेच लांब गेल्यावर तो नॉर्मल झाला आणि आनंदाने उड्या मारू लागला .श्रिपतीला काहीच कळेना . " अरे काय झाल काही सांगशील का? तुला हे अस कधीपासून होतय ? आणि आता एवढा आनंद का झालाय तुला? "

मग झालेला आनंद आवरत हळू हळू गणू बोलू लागला . " अरे येड्या मला काय झाल नाय . मी पायाळू हाय न्हव्ह म्हणून अस झाल . "

श्रिपतीच्या चेहेऱ्यावर मोठ्ठ प्रश्नचिन्ह .

गणू पुढे म्हणाला, " तुला नाय कळाल? आर या हिथ खाली जमिनीत साधारण अडिजशे फुटावर मो ऽऽऽऽ प पाणी हाय . "

श्रिपतीच्या चेहेऱ्यावरच आश्चर्य आनंदमय आश्चर्यात बदलल . त्यालाही खूप आनंद झाला . गणू पुढे बोलतच होता . " अरे इथे जर तेवढ खणल तर तलाव होईल मोठा तलाव . "

श्रिपतीच्या डोळ्यासमोर आता तलावातल पाणी चमकू लागल . कधी जाऊन गावकऱ्यांना सांगतो आणि इथे खणून तलाव बांधतो अस त्याला झाल होत .

" खंडेराया पावला बघ . गावात तशी बी पाण्याची लय आबदा हाय न्हव्ह . "

" खरच रे इथे जर तलाव बांधला तर कमीत कमी प्यायच्या पाण्याचा तरी प्रश्न सुटेल . "

गावात चावडीसमोर नेहेमीप्रमाणे बरीच जण विरंगुळा म्हणून बसली होती . दिवसभरच्या कामानंतर इथे गप्पा मारत बसल की तेवढीच एकमेकांची सुख दु:ख जाणून वाटून घेता येतात . श्रिपती गावात आला तसा आधी चावडीकडे वळाला .

" तुम्हा सर्वांसाठी एक आनंदाची बातमी आहे . "

" काय शिरपतराव? " कुतूहलाने एकाने विचारले .

" तुम्हाला माहितेय का त्या आमराईच्या पलिकडच्या माळरानाखाली खूप मोठा पाण्याचा साठा आहे . गणू आणि मी आज येत होतो तर त्यानच सांगितल मला . "

" असल असल, पायाळू हाय न्हव्ह त्यो " नामू सुताराने त्याला पुष्टी दिली .

" तुमास्नी ठाव न्हाय व्हय . माग बी एक सादू आला व्हता न्हव्ह त्यान सांगितल्याल . थित पानी हाय . सरकारकड अर्ज देकूल दिला हाय पाटलान . मंजूर बी झालाया जनू . " बकरे आजोबांनी माहिती पुरवली .

" आणि गणू तर म्हणतो तिथ तलाव बांधता येईल एवढ पाणी आहे . " , श्रिपती .

" व्हय खर हाय . सरकारचा मुकादम येऊन बघून बी गेलाय . पन आपला अर्ज काय फुढ हालत नाय . कवा धरन, आता बघ जवळ जवळ सातेक वर्स झाली असतील या गोष्टीला पन अजून काय सरकार कडन कायच हालचाल नाय . " बकरे आजोबांची निराशा आणि हतबलता स्पष्ट जाणवत होती .

" पण मी म्हणतो आपण अस केल तर . आपणच सगळ्यांनी मिळून थोड थोड श्रमदान करून तलाव बांधला तर? " , श्रिपतीची उत्साह शिगेला पोहोचला होता .

" आरं पन सरकारन आत मन्जुरी दिलिया, व्हईलच की . आपुन कशाला उगाच तरास घियाचा . "

" आता सरकारची कामं कशी असतात तुम्हाला तर माहितच आहे . आपणच सगळ्यांनी मिळून आपला हा पाण्याचा प्रश्न सोडवायला हवा . मी म्हणतो काय हरकत आहे . थोडि थोडी वर्गणी काढू लागतील ती सामग्री आणु थोड्याश्या श्रमदानाने सुद्धा होइल की तयार तलाव . "

पण व्यर्थ, श्रिपती कितीही पोटतिडकीने बोलत होता तरी त्याच्या बाजूने बोलायला कुणीच तयार होईना . जो तो आपला सरकारवर बोल लाऊन स्वत: हात झटकत होता . त्याची एकट्याची तळमळ फोल ठरत होती .

काही दिवसांनी त्या गावात एक साधू महाराज आले . शंकराचे परम भक्त . " जय भोलेनाथचा गजर सतत त्यांच्या मुखी असे . चावडीसमोरील एका झाडाखालीच त्यांनी आपला मुक्काम ठोकला होता . बरीच व्क्त मंडली हळू हळू त्यांच्याभोवती जमा होऊ लागली . थोड्याच दिवसात साधू महाराजांच्या लक्षात एक गोष्ट आली ती म्हणजे या गावात शंकराच एकही देऊळ नाही . गावकऱ्यांवर जी काही संकटं येत होती ती सगळी त्यामुळेच येताहेत अस साधू महाराज सांगू लागले .

या गावात लवकरात लवकर एक शंकराच मंदीर बांधल पाहिजे असा त्यांनी अट्टाहास लावला . गावकऱ्यांनाही ते हळू हळू पटू लागल . शेवटी मंदीर बांधायच नक्की झाल . वर्गणी गोळा झाली . देवाचच कार्य म्हणून प्रत्येक जण जमेल तशी जास्तीत जास्त वर्गणी देऊ लागला . आपलाही हातभार या पवित्र कामात लागावा म्हणून कित्येक जण श्रमदानही करू लागले . त्यांच बघून इतरांनिही श्रमदान करायला सुरवात केली . मंदीर उभ राहिल, रंग रंगोटी झाली, साज सजावट झाली . रोज आरती होऊ लागली . महाराजांची रहाण्या खाण्याची आणि निवाऱ्याची सोय झाली . आणि पुढच्याच वर्षी पावसाने दडी मारली .

राधा

वाट

तो तिला भेटला तेव्हा डोळ्यांसमोरच एखादे फुल सहज उमलावे त्याप्रमाणे पहाट उगवली होती . तो विस्फारीत नेत्रांनी पहात असताना ती मात्र तो भेटणारच हे आधीच ठाऊक असल्याप्रमाणे हसली . तो अद्याप आपल्याच आश्चर्यमग्न स्थितीत गुंतून पडला होता . ती पुढे येताच मात्र तो भानावर आला आणि त्याने विचारले " तू मला ओळखतेस ?" तिच्या होकाराची त्याला फार आशा होती पण ती निश्चयानं बोलल्यासारखी म्हणाली " नाही! पण मला प्रत्येकाची ओळख असते !"

तिचे उत्तर समजले नाही तरी समजल्यासारखे दाखवत तो हसला . ती मात्र सरळ त्याच्याकडे पाठ फिरवून जाऊ लागली . तो मागोमाग येतोय हे तिला पाठी न वळताच कळले असावे अशी तिची चाल होती !

पायाखालची वाळू संगमरवरी फरशी असल्याप्रमाणे एकसंध आणि सपाट होती . वाट लांबलचक होती तरी त्या वाटेवर शेवटी असणारी भव्य वास्तू येथूनही चमकल्याप्रमाणे भासत होती . त्याला साऱ्याच गोष्टींचे आश्चर्य वाटत होते आणि ती मात्र सराईत असल्याप्रमाणे कोठेही न बघता चालली होती . त्याने परत खालच्या वाळूकडे पाहिले . त्या वाळूमध्ये अभ्रकाचे तुकडे मिसळले असावेत असे त्याला वाटले . त्याने तिला विचारले , hg" ही वाट तू माझ्यासाठी खास निर्माण केली आहेस ना? " ती मनोमन हसली . इथे येणारा प्रत्येक इसम त्या वाटेविषयीच कसा विचारतो याचे तिलाही कधी आश्चर्य वाटे . त्याच्या प्रश्नाला बगल देत ती म्हणाली " मी या वाळूत पारा मिसळवून टाकला आहे " आपल्या मनातील पाऱ्याविषयीची शंका तिला कशी कळली याचे नवल वाटून तो तिच्याकडे पहात राहिला .

तिला अशा पहाण्याचीही सवय होती .

पण या इसमाचे डोळे कितीतरी अधिक खरे आहेत आणि शब्द सोनटक्क्याच्या फुलाप्रमाणे निष्पाप आहेत हे तिला जाणवलेऽचानक तिला त्याच्याविष्यी प्रेम वाटले आणि ती त्याच्या जवळ सरकली .

ती जवळ येताच त्याला वाटले, याच सोउंदर्याचा आपण द्यास घेतला होता!कित्येक दिवसांपासून हेच तारुण्य हीच मुग्धता आपल्याला हवी होती . बाहेर भीषण वादळात बिजली कडाडत असतानाही एखाद्या मंदिराच्या गाभाऱ्यात निरांजनातील वात शांतपणे उजळत रहावी त्याप्रमाणे भासणारी हिची उन्मादक पवित्रता हेच आपले स्वप्न होते!

क्षणभर त्याला वाटले " आपल्याला ही वाट

नको , तो काचमहालही नको,

आप्लल्याला हवी आहे फक्त ही स्त्री, जी बोलताच मनातला गोन्धळ विझून जाऊन उंबऱ्यावर सडारांगोळी घातल्यासारखी घरगुती प्रसन्नता येते .

तो तिला स्पर्श करण्यासाठी पुढे आला आणि ती अधोमुख झालेली पाहाताच क्षणभर थबकला . तेवढ्यात ती म्हणाली " चल, आपण जरा वेगळ्या वाटेनं जाऊया . या वाटेवरची चमकदार सफाई तिथे नाही . पण आजूबाजूच्या झाडांमुळे तुला ती वाट आवडेल . मला तुझ्या जास्त जवळ येता येईल !"

क्षणभर त्याच्या डोळ्यांसमोर्गर्द वनातून जाणारी ती वाट आली . लाल मातीची हिरवे स्वप्न साकार झाल्याप्रमाणे हसणारी ती नागमोडी वाट चमकली . अगदी पूर्वी ती त्याला मोह पाडायची पण आता त्याने तो नाद सोडून दिला होता .

" नको . मला सध्या येथूनच जायचे आहे . कारण मला कोणत्याही परिस्थितीत काचमहालापर्यंत पोचायचे आहे आणि त्या वाटेची ती शाश्वती नाही . आधी इथून तिथे पोचेन आणि मग वाटलं तर . . . . "

" ब्या वाटेवरून परत गेलास तर ना !" ती एकदम बोलली आणि आपण अंमळ अधिकच बोललो की काय असं वाटून गप्प झाली !

त्याचा नकार ऐकून ती भानावर आली होती . गुंतून न पडण्याचे आपले कर्तव्य या इसमामुळे क्षणकाल का होईना आपण विसरलो याची तिला लाज वाटली . पण तिने स्वत:ला सावरले . आता ति एखाद्या सम्राज्ञीसारखी चालू लागली . या वाटेवऊन येणारा कुठचाही इसम आप्ल्या कह्यात रहावा यासाठी तिला कोणतेही प्रयत्न करावे लागत नसत . तिचि अज्ञा झेलायलाच निर्माण झाल्याप्रमाणे ते जणू लाचार असत . याचा तिला गर्व होइआणि त्याचबरोबर आपणही कुणाचीतरी आज्ञा झेलावी या अनावर इच्छेने ती वेडिपिशी होत असे . आणि या खुळ्या इच्छेवर तिचे मनापासून प्रेम होते . या इसमाला भेटल्यापासून तर तिला याच इच्छेने पछाडल्यासार्खे झाले होते .

त्याने एकदम विचारलं **34**;तू मालकीण आहेस का इथली ?"

" नाही . मी दासी आहे पण मला अजून माझ्या मालकांचा शोध लागलेला नाही . "

" मग तुला इथे आणली तरी कोणी ? या जागेवर अन्य कुणाची मालकी आहे हे तरी तुला कसे समजले ?"

" माझी माझ्याचवर मालकी नाही , मग मी चालत असलेल्या वाटेवर कशी असेल ?" आपली आवडती इच्छा आठवत ती म्हणाली .

प्रश्नांना बगल देण्याची तिची सवय आता त्याच्या परिचयाची झाली होती,पण ती अशी विचित्र उत्तरे का देते याचे कारण मात्र कळू शकले नव्हते . काहीही करून तिला जाणून घ्यावी असे त्याला वाटले आणि मग त्याल सभोवतालच्या जगाचा विसर पडू लागला .

" मला सांग तू मघाशी त्या वाटेचा आग्रह का धरला होतास ?" त्याने विचारले .

" तेथिल झाडांसाठी " ,ती असक्तीच्या डोळ्यांनी म्हणाली .

" त्या झाडांवर तुझे एव्हडे प्रेम आहे

? तुला ठाऊक नाही का की तेथिल झाडे शिशिरात अगदी उघडीबोडकी दिसतात . काचमहालात चिरंतन सतेज राहाणारी झाडे आएत ना ?" त्याने विचारलं .

मला तिच झाडे आवडतात कारण त्यांचे वसंतावर मनापासून प्रेम आहे म्हणून तर त्याचे स्वागत ती दरवेळी नवीन कोवळ्या स्वप्नांनी करतात ".

तिच्या बोल्ण्याने तो विचारात गुंतून पडला . पण तेव्ह्यात त्याला काहीतरी सुचले आणि तो म्हणाला,

" पण मग वसंतात थोड्या आनी ग्रीष्मात पूर्णपणे आटणार्या तेथिल नदीचे काय ?"

" सगळ्या गोष्टी एकाच वेळी एकाचवर प्रेम करू लाग्ल्या तर तो अन्याय होईल . तुला ठाऊक नाही म्हणून सांगते की तेथिल नदीचे पावसावर प्रेम आहे आणि त्याच्या आगमनाने ती दुथडी भरून वाहू लागते . "

ती आता त्या वाटेच्या आठवणीत हरवली होती . ती खूप काही बोलली . ते उत्सुकतेने ऐकून घेत त्याने विचारले, " तू तिकडे किती वेळा गेली आहेस ?"

परत एकदा त्याचा प्रश्न टाळत ती म्हणाली " मला तुझ्याबरोबर तिथे जायला खूप आवडेल !"

तिचे उत्तर ऐकताच त्याचा डोळ्यापुढील काचमहाल अदुश्य झाला _ आणि काचमहालापाशी नेणाऱ्या त्या पाऱ्याच्या वाटेवरचे त्याचे लक्ष उडाले . ती मात्र पुढे बोलत राहिली ,

" कारण त्या वाटेवर नकळत फुले फुलतात . कल्पनाही नसताना त्यांचा सुगन्ध पसरतो आणि ती फुले आपली निशाणी मिरवत राहातात ."

तो तर त्या वाटेवर कधीच गेला नव्हता पण अचानक त्याला आतून काहीतरी जाणवल्यासारखे तो म्हणाला " मला वाटते तिथे पर्वतही असतील होय ना ? आणि त्यांचे हृदय पाषाणाचे असले तरी त्यांना पार करून माथ्यावर झेंडा फडकवणाऱ्यांबद्दल त्यांना वात्सल्य वाटत असेल ."

तो एव्हडे बोलून वळला आणि मागे फिरला --- त्या वाटेवर जाण्यासाठी . मघापासून आपण जिच्या मागून जात होतो

ती अस्पष्ट रेखाकृतीप्रमाणे भासणारी स्त्री आपल्याबरोबर नक्कीच येईल याची त्याला खात्री होती .

--- आणि खरेच ती स्त्री शांत समाधानाने पण आपली इच्छा सफल झाल्याच्या आनंदी तोऱ्यात त्याच्यामागून निघाली होती .

हेम्स

लालित्य

अमेरिकेतील मराठी काव्य आणि कवि	- शशिकांत वि . पानट
लच्छी	- नीरजा
मंगलमय क्षणांची साक्षीदार	- दीपांजली
मराठी साहित्याची अमेरिकन स्पंदने	- विद्या हर्डिकर - सप्रे
प्रवास अरंगेट्रमचा	- स्तोरवी
उलटा प्रवास	- क्षिप्रा
त्या वाटेवर	- गिरीराज
प्रवास	- मेघधारा
माझिया गावी	- सई

अमेरिकेतील मराठी काव्य आणि कवि

" जे न देखे रवि, ते देखे कवि " असं म्हणतात. भारतातील आठ कोटी मराठी मंडळीमधून आम्ही थोडी मंडळी अमेरिकेत येउन पोहोचलो. आमच्या अस्तित्वाचे पंख थोडे फडफडवून येथल्या स्वच्छ, निरभ्र, अवकाशात भराऱ्या मारू लागलो. परंतु आमचे लक्ष मात्र सागराने जोडून ठेवलेल्या मातृभूकडेच! श्री ज्ञानदेवांसारख्या महाकविने 'अस्तित्वाच्या पलिकडे पसरलेल्या शांततेत कवितेची पाळंमुळं असतात.' असं सातशे वर्षांपूर्वीच लिहून ठेवलेलं आहे. मग अमेरिका असो, इंग्लंड असो, ऑस्ट्रेलिया असो कि महाराष्ट्रातलेच एखादे गाव असो, कविचे मन त्या साऱ्यांच्या पलिकडे जाऊन कवितेची मुळं ताजीतवानी ठेवतात.

आजुबाजुच्या वातावरणाचा काव्यनिर्मितीवर परिणाम नक्कीच होतो. सृजनशील मनाला सर्वसाधारण व्यक्तिला न दिसणारं बरंचसं दिसतं. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी लिहिलेल्या 'ने मजसी ने परत मातृभूमीला' या काव्याची आठवण परदेशात राहणाऱ्या मंडळिंना आवर्जून होते, त्या काव्याशी तादात्म्य पावण्याची परिस्थिति असते, त्या वातावरणातले एक घटक म्हणून असते; म्हणूनच लॉसएंजेलिसच्या समुद्राकाठी गेल्यावर मी मोठ्या प्रेमाने त्या समुद्राच्या लाटांना स्पर्श करतो, नमस्कार करतो. कारण माझ्या मातृभूमीला जोडणारा समुद्र हा एक दुवा आहे असेच मला वाटते. त्या सागराला स्पर्शताना मी मातृभूला 'जणू तुलाची स्पर्शेन' असे वाटते.

इकडे स्थायीक झालेल्या कविमनांना म्हणूनच आपल्या बालमनाच्या आठवणी, आपण जन्मलेलं गाव, मित्र परिवार, संगीत, चित्रपट या सर्वांची तीव्रतेने आठवण येत असते. त्या साऱ्यांचा परिणाम 'वाटे इथून आता, मागे पुन्हा वळावे' अशा काव्य निर्मितीत होतो.

येथल्या रंगेल, बेछूट दुनियेत असा एकही दिवस जात नाही कि आम्हाला भारताची, महाराष्ट्राची आठवण येत नाही. वॉशिंग्टनचे माझे मित्र दिलीप चित्रे यांनी या भावनेचे,
हिमगंध जेथूनी येतो
वेढून लपेटून सारे
त्या दिशेस कवटाळाया
प्राणांचे उत्सुक वारे
असे अगदी तंतोतंत वर्णन केलेले आहे. तर सौ. अनुराधा गानू (लॉस एंजेलिस) यांनी आपल्या विद्ध मनाचा हा प्रश्न,
फुलली जेथे मने कोवळी
त्या वाटांची दिशा हरवली
इथली नाहि, ना तिथली मी
कसे कळे कोणाते?

स्वत:लाच टाकलेला आहे. परंतु लगेच स्वत:ला सावरून त्या असाही संदेश देतात.
अखिल विश्व हे अमुचे अंगण
कवेत घेउ हे तरांगण
एकत्वाचे बांधुन कंकण
नव्या रविला, नवेच वंदन
मनामनाचे सेतु बांधून
इतिहास इथे घडवू या
शतजन्माच्या ऋणबंधाचे
स्वप्नगीत गाउ या ||धृ||

म्हणूनच आम्ही कितीही दूर असलो तरी,
सह्याद्रिचे ऋण फेडितो
वंशज आम्हि महाराष्ट्राचे
कृतज्ञतेने आज बांधतो
सेतू पुन्हा हे श्रीरामाचे

असेच आम्हा अमेरिकेतील मंडळीनां वाटते!

अमेरिकेत राहणाऱ्या बहुतांश मराठी मंडळींची मुले मराठी समजतात. पण त्यांना बोलता मात्र येत नाही. त्याला काही सन्माननीय अपवाद अर्थातच आहेत. आम्ही त्यांच्याशी शुद्ध मराठीत बोलतो, ते सारं समजतात. पण उत्तर मात्र इंग्रजी भाषेतून देतात. काव्य हे जीवनाला पोसणारं आध्यात्मिक मूल्य आहे, ते ज्या भाषेतून लिहिलं जातं ती वाचता अथवा बोलता येऊ नये ही आमची शोकांतिका आहे. परंतु एकंदरीत जगाच्या साहित्याकडे नजर टाकली तर भाषा व वाङ्मय या मरणोन्मुख प्रजाती आहेत असं म्हटलं, तर ते वावगे ठरु नये. या पार्श्वभूमीवर मी जेव्हा आमच्या मराठी युवक युवतींकडे पाहतो तेव्हा आश्चर्यचकीत होतो. त्यांच्या प्रगतीच्या भरारीने थक्क होतो. आमच्या पिढीला वयाच्या 40 - 45 व्या वर्षी मिळत असलेला पगार ही मुलं जेव्हा वयाच्या 24 - 25 व्या वर्षीच मिळवतात तेव्हा कौतुक मिश्रित भावनेनं डोळ्यात अश्रू येतात. कधीकधी असं वाटतं की याना मराठी बोलता आलं नाही तरी त्याना त्यांच्या भावना जर व्यक्त करायच्या असल्या तर कदाचीत ते असंच म्हणतील -
सांगतो नाते उद्याचे
उगवत्या किरणांस आम्ही
वंश अमुचा वेगळाची
वेगळ्या विश्वात आम्ही ||धृ||
धर्म तुमचा, तोच अमुचा
हेच आम्ही जाणतो
पश्चिमेच्या या तिरावर

गाव तुमचे वसवितो
उगवत्या किरणास आम्ही
सांगतो नाते उद्याचे
वन्हि आम्ही चेतवूनी
वाढवितो वंश तुमचे

महाराष्ट्रातल्या गरीब वातावरणातून आम्ही येथल्या श्रीमंतीत पोहोचलो. सुरुवातिला या श्रीमंतीने भारावून गेलो. आपले कसे होणार ही चिंता, चेहेऱ्यावरचा बावळटपणा, आणि श्रीमंतीची सवय नसलेल्या वाटेवरचे पहिले पाऊल, या साऱ्यातुन सावरून, ईथलेच एक झालो. अर्ध्याच्यावर आयुष्य भारतात घालविलेल्यांची जर ही परिस्थिती तर येथेच जन्मलेल्या आमच्या मुलांनी ईथल्याचपैकी एक होणे व झाले तर त्यात नवल कसले?

ईथल्या हॉलीवूडच्या वातावरणात आमच्या लॉस एंजेलिस चे आमचे कविमित्र श्री. श्रीनिवास माटे याना मात्र लावणीही लिहावीशी वाटते. " तीन त्रिकोणी तुकड्यामधली बया दाखवा मला " असं विचारणाऱ्या महाराष्ट्रामधल्या गावातल्या स्त्रीच्या मनातले विचार ते हॉलीवूडमधल्या रंगील्या वातावरणात देखील विसरत नाहीत. किंबहुना मधुनच मातृभूची आठवण येउन " हृदयात आज हळवे, स्वर जागेल स्मृतींचे " असेही लिहिण्याची प्रतिभा त्यांच्यात वावरते.

कविच्या अथवा कवियत्रीच्या मनाची ठेवणच वेगळी. सर्वसाधारण व्यक्तिचे विचार जेथे पोहोचत नाहीत तेथे या कविमंडळींचे विचार पोहोचतात. कॅलीफोर्नियामधील फ्रिमॉंट मधे रहाणाऱ्या संध्या कर्णीक 'वृद्धाश्रमा' चे वर्णन करताना डोळ्यात पाणी आणून जातात.
सायंकाळी घरी येते तेव्हा नसतं कोणी
वृद्धाश्रमात ठेवलय तिला, डोळा केवळ पाणी.
रोज संध्याकाळी आता माझी वाट पहाते.
कधीतरी तू ग कोण? असेही विचारते.
सायंकाळी घरी येते,डोळा केवळ पाणी
खुर्चीमध्ये बसलं आहे,माझ्यापरी कोणी?

आपल्या अंतर्मनाची साथ देताना वीणा शहा म्हणतात -
जितके तुझे दु:ख खोल
तितके तुझे गीत सुरेल
म्हणुन काय त्या दु:खाशीच इमानी राहशील?

किंवा सौ. पल्लवी तळवलकर आपल्या मनाचे वर्णन करतात -
मन सारखे भटकत असते
मी मनाला आवरत असते
आम्ही लपंडाव खेळीत असतो
मी आणि माझे मन
मन माझा सवंगडी
ते मला सोडुन जाणार नसते
मैत्रीचे रहस्य आम्ही जाणून असतो.
मी आणी माझे मन

तर लॉस एंजेलिसच्या सौ. राजश्री दामले म्हणतात -
सांगुन येते ती याद नव्हे
मागुन मिळते ती दाद नव्हे
अधीर नाही ती भेट नव्हे
सुटत जाते ती मिठी नव्हे

अमेरिकेत राहणाऱ्या कवि कवियत्रीनी असा एकही विषय मला वाटते हाताळला नाही जो कवितेत आला नाही. काहिंच्या गेय कविता तबकडीत उतरल्या तर काहिंच्या गद्य कविता 'क्या बात है' ची दाद मागुन गेल्या. 'तुझे आहे तुजपाशी' या कवितेत फिलाडेल्फियाच्या शीला पिंपळस्कर लिहितात -
अयुष्यभर वणवणला तो
शब्द ब्रह्माच्या शोधात
धुंडाळीत शब्दांच्या लाटा
दाही दिशाना पिसाटासारखा
मागोवा घेत शब्दब्रह्म गंधाचा
तहानलेल्या मृगासारखा
तर समोरच दिसला त्याला
आजवर कधीही न दिसलेला
शब्दब्रह्माचा तो चिरेबंदी पार
ओंकार निंबोण्या झावळणाऱ्या
सळसळत्या ओंकार वृक्षासह

तत्वज्ञानात्मक विचारांच्या कविता लिहीताना न्युयॉर्क च्या सुषमा येरवडेकर लिहितात -

सूर्यफूल सूर्याकडे पाहात रहातं .
त्याच्या बदलत्या कलाने डौलत राहातं
त्याचं मूळ निव्वळ रासायनिक आकर्षणच ठरतं
नाहीतर सूर्यफुलालाच कसं कळतं
की आपण सुर्याकडेच बघायचं असतं
तेही सूर्याच्या भावनांचा कानोसाही न घेता
त्याचं लक्ष आहे की नाही
याचा सुगावाही न लागता

अश्या एक ना अनेक कविता वर उल्लेखिलेल्या कवि कवियत्रीनी लिहील्या आहेत . अमेरीकेत वर उल्लेख केलेल्यांशिवाय अजुनही अनेक लिहिणाऱ्या व्यक्ती आहेत .त्या सर्वांच्या मनांचे ओघ हे महाराष्ट्राच्या प्रेमाने ओथंबलेले तर आहेतच,पण त्याहीपेक्षा त्यांची प्रतिभा जागृत आहे .आम्ही सारे इकडे आलोच नसतो तर कवितांची ही आतषबाजी केली असती का? मला नक्किच वाटते कि केली असती . कदाचित विषय निराळे निवडले असते पण मनाची सृजनशीलता बाहेरच्या ठिकाणापलिकडे जाऊन काव्य निर्माण करेल .

या शतकात मराठी कवितेत एक निराळेच दालन उघडले गेले आहे . कवितेमधले नवे भावविश्व, नवनवे रचनाबंध आणि पाश्चात्य मंडळींकडून घेतलेले काव्यप्रकार सुनीत, विलापिका अथवा उद्देशिका यांचा येथल्या काव्यात भरपूर समावेश आहे . एखाद्या सोनेरी केसांच्या निळ्या डोळ्यांच्या युवतीला भरजरी नऊवारी साडी नेसवून ती जशी दिसेल व तिचे मूळचे गौर सौंदर्य अजुनच उठून दिसेल तसा काहीसा प्रकार येथल्या कवितेत होतो आहे असे मला वाटते . अर्थात या उदाहरणामधील ही युवती 'ईकडची' आहे व आमचे बहुतेक सारे कवि 'तिकडचे' म्हणजे महाराष्ट्रातले आहेत एवढाच फरक . म्हणून कदाचीत आमच्या काव्यात स्वदेशी धागे अधिक गुंतलेले दिसतात असे मला वाटते . त्यात परंपरेचा जर असल्याने तर ते अधिकच शोभून दिसतात .

कवि - कवयित्रींची भाववृत्ती एकारल्यासारखी असते . काही आपल्या खड्या आवाजात दमदारपणे समर्थ लेखन करुन आपले व्यक्तिमत्व सादर करतात, तर काही दबल्या आवाजात सूचकतेने अभिव्यक्त होतात . अनुभवाचा रंग सप्तरंगी असतो . त्यात एखाद्या कविची विशिष्ट शैली आणि अभिव्यक्ती जेव्हा मिसळली जाते, तेव्हा त्यातून घडलेला काव्यप्रकार हा किती वेगळा आणि आगळा असू शकेल याचा आपणच विचार करा .

अमेरिकेत राहणाऱ्या कवि - कवयित्रीच्या कविता या भावकविताच आहेत . मणसाच्या मूलभूत वृत्ती प्रवृत्ती या जगाच्या सुरवातिपासून जशा आहेत, आत्तादेखील तशाच आहेत . जगातले अनेक देश एकत्र येतील, कुणी भांडतील,इतर देशातील मुलं मुली एकमेकांशी लग्न करतील . पिढी बदलेल, पण मूळ प्रवृत्ति कधीच बदलणार नाहीत . माणसाला लागणारी भूक, एकमेकांविषयी वाटणारी जवळीक अथवा आपुलकी आणि स्त्री - पुरुषांमधले जबरदस्त आकर्षण जगाच्या अंतापर्यंत बदलणार नाही . हे जर खरे असेल तर या मूलभूत प्रवृत्तिना प्रकट करण्याचे मार्गच माणूस कलेच्या माध्यमातून शोधत असतो . विशिष्ट देशातील अनुभव कदाचित या माध्यमातून निघालेली वाट तडफेने पार करीत असेल एवढाच फरक आणि तोही असा मी लिहिल्याप्रमाणे अनुभव असला तरच! अन्यथा कवि - कवयित्री भौगोलिकदृष्ट्या कुठेही असले तरी काव्यनिर्मिती करीतच राहणार हे सत्य!

इतर देशातील मुलं मुली एक्मेकांशी लग्न करतील . पिढी बदलेल, पण मूळ प्रवृत्ति कधीच बदलणार नाहीत .माणसाला लागणारी भूक, एकमेकांविषयी वाटणारी जवळीक अतत्वा आपुलकी आणि स्त्री - पुरुषांमधले जबरदस्त आकर्षण जगाच्या अंतापर्यंत बदलणार नाही . हे जर खरे असेल तर या मूलभूत प्रवृत्तिना प्रकट करण्याचे मार्गच माणूस कलेच्या माध्यमातून शोधत असतो .विशिष्ट देशातील अनुभव कदाचित या माध्यमातून निघालेली वाट तडफेने पार करीत असेल एवढाच फरक आणि तोही असा मी लिहिल्याप्रमाणे अनुभव असला तरच!अन्यथा कवि - कवयित्री भौगोलिक दृष्ट्या कुठेही असले तरी काव्यनिर्मिती करीतच राहणार हे सत्य!

म्हणुनच मला प्रत्येक वेळी श्री ज्ञानदेवांच्या सातशे वर्षापूर्वी लिहीलेल्या तत्वज्ञानाची आठवण येत राहते .

" जे जे अस्तित्वात असू शकते . त्याला व्यापून पलिकडे पसरणारी जी शांतता असते त्यात कवितेची पाळं मूळं रुजलेली असतात . ती एक तेजस्वी शांतता आहे . जी आपोआप आतल्या आत स्फुरण पावते . ओंवाळते, कंपन पावते, ऊघडमीट करते . ती एक प्रक्षुब्ध जाणीवेची शांतता आहे .तिच्यात हालचाली करण्याची ताकद आणि निवड करण्याची क्षमता आहे . स्वयं निर्णायक अशा विश्वाचा आत्मा म्हणजे ती शांतता होय . "

हे ज्ञानेश्वरांचे उद्गार तुमचे आमचे ही आहेत . कवितेची निर्मिती अशा शांततेतून होते . ती ज्याला सापडते तो भाग्यवान!

अमेरिकेत आलेले बहुतेक सारे जण 15 - 20 वर्षापुर्वी महाराष्ट्र सोडून आले आहेत . या वीस वर्षात दर तीनचार वर्षानी 15 - 20 दिवसांसाठी भेट देण्यापर्यंतच आमची ओळख राहिली आहे . तेवढ्या थोडक्या वेळात महाराष्ट्राच्या सांसकृतिक, आर्थिक बदलाची जाणीव होणे केवळ अशक्यच! रुपयांचा भाव किती घसरला आहे जे जाणून घेण्याची क्षमता आमच्यात नाही कारण महाराष्ट्रापासून, भारतापासून बराच काळ आम्ही दूर आहोत . या मधल्या अवधीत महाराष्ट्रातले साहित्य पोटातल्या भुकेच्या आगीने बदलत गेले आहे याची पुसटशी जाणीव आम्हाला होते, नाही असे नाही . परंतूचटका बसेल इतपत होत नाही . कारण त्या आगीपासून आम्ही दूर आहोत . त्या भुकेतून, आगीतून लिहिल्या गेलेल्या साहित्याच्या ओघापासून म्हणूनच वंचित आहोत . मग केव्हातरी भारतात आल्यावर पुस्तके विकत घेणे, वेळ मिळेल तशी वाचणे या क्रिया जरी घडत असल्या तरी त्या महाराष्ट्रातून जे साहित्य निर्माण होते आहे, याची खरी जाणीव करुन देणाऱ्या नाहीत . त्या दृष्टिने आम्ही अमेरिकेत स्थायिक असणारे कवि - कवयित्री महाराष्ट्राच्या साहित्यापासून वंचित आहोत हे खरे! मग आम्ही 20 वर्षापूर्वी आलो तेव्हाचाच काळ आम्हाला आठवतो . तेव्हाची परिस्थितीच फक्त मनात असते . त्यावर जर आम्ही लिहिले , तर ते आजच्या तेथल्या परिस्थितीला साजेसे नसणारच! म्हणजे एका अर्थाने पाहिले तर ज्या विषयावर , प्रसंगावर काव्यनिर्मिती होते ते जर 'खरे नसले तर खऱ्या अर्थाने 'काल्पनिक' ठरतात' . महाराष्ट्रापासून वर्षानुवर्षे दूर राहिल्यामुळे साहित्यनिर्मितीमध्ये हा आमचा एक प्रकारचा 'असत्य आभास' नकळत का होइना आमच्या हातून घडतो .

भारतातून इथे येऊन भेट देऊन गेलेल्या बऱ्याच मंडळीना आम्ही 'मराठीचे' जतन करतोय याचा खूप अभिमान वाटतो . अगदी प्रामणिकपणेच सांगायचे तर अभिमानापेक्षाही ती आमची गरज आहे . वर उल्लेख केल्याप्रमाणे आमची मुले बहुतांशी 'मराठी इंग्रजी' संवाद साधतात . मनाची भूक ही मातृभाषेतच फक्त शमली जाते . भाषेच्या ऱ्हासाबरोबर देशाचाही ऱ्हास होतो हे इतिहासच सांगतो म्हणूनच मराठी टिकवणे, व तेही अमेरिकेसारख्या देशात, ही आमची गरज आहे .त्यात आपल्याला कौतुक वाटते हा आपला चांगुलपणा! ते काहीही असले तरी आम्हाला कविता सुचतात हे खरे आहे . कारण,

कविता होते प्रसन्न होऊन
कधी दु:खातून कधी अश्रुतून
कारण नसता कधी उमटते
कधी कशातून कधी कशातून

प्रलयातही कविता असते
दवबिंदूतही कविता असते
आयुष्यातील क्षणाक्षणांना
कवितेचेही नाते असते

- शशिकांत वि. पनट

लच्छी

संपादक मंडळाची mail आली की लच्छी बद्दल लिहिण्यासाठी मुहूर्त पहात बसू नकोस दिवाळी अंकासाठीच दे. माझ्यातल्या आळशी प्राण्याला थोडेसे तरी ढोसले गेले आणि मी परत एकदा लच्छी नावाच्या ` नाचऱ्या ' मुलीला न्याहाळून पहायला लागले. का कोण जाणे पण ही ` नाचरी ' मुलगी मला काहीच नाचून दाखवत नव्हती. शेवटी मी थकून संपादक मंडळाला ` लिहून होणार नाही ' असे माफीपत्र लिहायला घेतले नी लच्छी समोरच येऊन बसली. " अशी कशी ग तू? माझ्यावर लिहिताना नीरजा बनून लिहितेस? लच्छी सापडायची तर लच्छी बनायला नको? ये चल टाक पावलं माझ्याबरोबर. " म्हणाली आणि अचानक मला ती गवसल्यासारखी वाटायला लागली.

ही लच्छी आहे पु. शि. रेग्यांच्या सावित्रीमधे एका गोष्टीत. लच्छी आणि मोराच्या गोष्टीत. कादंबरीच्या सुरूवातीलाच ही गोष्ट येते आणि मग पूर्ण कादंबरीत सावित्रीची सगळी पत्रे म्हणजे लच्छीचा मोर नाचताना पडलेली मोरपीसं व्हायला लागतात.

" माझा नाचण्याचा ताल आता बरा जमायला लागलाय. . . "

गोष्टीत आहे एक म्हातारी नी तिची नात लच्छी. त्या दोघींच्या झोपडीशी एकदा मोर येतो. त्याला बघून लच्छी नाचू लागते व मोरही. लच्छी हट्ट धरते की त्याला बांधून ठेवावे. पण घरात मोराला घालायला काही दाणापाणी नसते म्हणून म्हातारी नको म्हणते. शेवटी मोरच म्हणतो, मी इथच राहीन मला दाणागोटा काही नको पण एक अट आहे. मी येईन तेव्हा लच्छीनी नाचले पाहिजे. ती नाचायची थांबेल तेव्हापक्सून मीही येणार नाही. लच्छी कबूल होते. पण असं हुकमी नाचायचं म्हणजे साधी गोष्ट नव्हे. मनही तसंच आनंदी हवं. तेव्हापासून लच्छी आनंदीच राहू लागली. मोर कधी, केव्हा येईल याचा नेम नसे. पुढे पुढे मोर येऊन गेला की काय याचंही तिला भान रहात नसे.

पूर्ण कादंबरी पत्ररूपात आहे. कुण्या एका सावूने कुण्या एका सुहृदाला लिहिलेली पत्रे. यामधे तो सुहृद मात्र काहीच बोलत नाही. बोलताना, व्यक्त होताना दिसते ती सावित्रीच. त्यामुळे कादंबरीच्या सुरूवातीलाच आलेल्या लच्छीच्या गोष्टीचे प्रयोजन उमजूनच जाते आणि ' मोर हवा तर आपणंच मोर व्हायचं असं सोपं गणित मांडणारी सावूही. '

" कसं करतेस हे तू लच्छी? आधी डावा की आधी उजवा? "

लच्ची मोरासाठी नाचत रहाते. मोर येतो आणि जातोही पण ती नाचतच रहाते. हे नाचणंच महत्वाचं होऊन जातं मोर येण्यापेक्षा. मोर यायची गरजच वाटेनाशी होते करण नाचता नाचता तीच स्वत: मोर होते. खरेच अगदी असंच कादंबरीतली सावित्री पण म्हणते, " मोर हवा तर आपणच मोर व्हायचं. जे जे हवं ते आपणच व्हायचं. " मोराला आपल्यातच कुठेतरी ठेवून द्यायचं मग तो जाइलच कुठे? पण मोर आत भिनायला हवा तर मग आनंदी राह्यलंच पाहीजे.

" छे ! मला जमतच नाहीये हा तुझा पदन्यास! "
" माझ्या हातात हात दे. . जमेल. . . . "

ही लच्छी, आनंदभाविनी (रेग्यांचा शब्दच पण किती चपखल !) . मोराच्यासाठी का होईना पण कायम आनंदातच असण हेच तिचं प्राक्तन. नि त्या आनंदातूनच मोर हवासा झाला की आपणच नाचून आपल्यातल्या मोराचा पिसारा फुलवणं हेही. हे तिचं आनंदभविनीपण खूप काही सांगतं. सुंदर आयुष्याच्या सुंदर तालावर डौलात पावलं टाकत जगणं हे खरं जगणं. असं जगता यायला हवं. असं सगळ्यांनीच जगायला हवं हेच तर लच्छी म्हणत रहाते. अर्थात यासाठी खूप मोठं बळ लागतं. मोराच्या आशेमधे हे बळ लच्छी मिळवते पण नंतर त्या बळाला, त्या आशेला कसलाच अर्थ उरत नाही. एकदा नाचायची, तालाची सवय होण्यापुरतं हे बळ मग नाचण्याची धुंदी, आयुष्य तालात जगण्याची नशाच तुम्हाला पुढे घेऊन जाते. यामधे नशा आहे पण ती उन्मत्त नाही. काहीही जिंकण्याची ओढ, मिळवण्याची आस नाही. जी काय आशा असेल आपल्या आपल्या मोराची, तीही पुढे गळून गेलेली असते. अस जगणं जमलं पाहिजे.

" अशी सुंदर लवलवते लच्छी. . . मला कधी जमेल? "
" थांबू नकोस पावलं टाकत रहा. . . . "

" आयुष्याला सुंदर नाच म्हणनं सोपं आहे ग बये पण ताल बिघडायला काय वेळ? " " तुमचा ताल तुम्हीच ठरवायचा मग इतर कोण कशाला बिघडवेल तो? "

आपलं जगणं हे काही सतत सुंदर कुठे असतं. ते तस करणं हे आपल्या हाती असतं. या जगण्याला कसं सामोरं जायचं हे महत्वाचं. शेवटी ताल कधीच सुटता कामा नये.

" पावलामागून पावलं. . . किती मजा!! "

माझा माझा मीच ठरवलेला ताल तो जपत, मापत नाचत रहायचं. सतत तालाकडे लक्ष. काळाचा एक ठराविक तुकडा संपला की मगच पाय पडला पाहीजे. आधी नाही आणि नंतरही नाही. किती लक्षपूर्वक केले तरी कुठेतरी चुकतेच. सटकतोच ताल, तुटतेच लय. लयीचे तुटलेले असे छोटे छोटे तुकडेच आयुष्यात उरतात मग.

" पावलांच्या या उचलण्याला नी परत टाकण्याला पदन्यास म्हणतात का? " " जास्ती विचार करू नकोस मार एक गिरकी. नको करू काळाच्या तुकड्यांची काळजी. . "

जगण्याची लय शोधायची नाही आपणच बनवायची नी मग सोडून द्यायचं स्वत:ला त्या लयीबरोबर. लयीचं ओझं नाही होऊ द्यायचं. ते भान सुटलं पाहिजे. भान विसरता आलं पाहीजे तरच लय सुटणार नाही. आयुष्याचा ताल चुकणार नाही. म्हणजे भान सुटलं तरी नाचत रहायचं.

" जमायला लागलय का ग मला? " " विचारतेस म्हणजे नसावंच जमत अजून. . . "
" मग कसं करू आता? " " मी कसं सांगणार? तुला लच्छी व्हावच लागेल त्यासाठी. "
" . . . . . " " अग नाचाकडे का लक्ष तुझं इतकं? " " मग? "
" कुठे आलीस बघ तरी तू? कसं वाटतय आता? " " हं!! " " आनंदभाविनी हा तुलाच हवासा शब्द ना? "

' तसं पाहिलं तर खुद्द मोराला तरी नाचता कुठे येतं? एक पाय उचलला की तोल जातो तो सावरायला म्हणून तो लगेच पाय खाली टेकतो, आणि दुसरा उचलतो . पुन्हा तीच तऱ्हा . . . . असं ad infinitum. बघणारे त्याला नाच म्हणतात . '

- नीरजा

मंगलमय क्षणांची साक्षीदार

'फुलले रे क्षण माझे फुलले रे
शकुनाच्या मेहेंदी ने'
कवि नितिन आखवे यांनी भारतीय स्त्री च्या जीवनातील मेहेंदी चे अनन्यसाधारण महत्त्व अगदी नेमक्या शब्दात सांगितले आहे .
आज भारतातच नाही तर जगभर सर्वत्र मेहेंदी ही स्त्री च्या जीवनातील खास मंगलमय क्षणांची जीवा भावाच्या सखी प्रमाणी साक्षिदार बनली आहे!

मेहेंदी ची लागवड ईज़िप्त, अरब देशां मधे, सुदान, मोरोक्को आणि अफ्रिकी देशां मधे वर्षानुवर्षे होत आहे . असे म्हणतात कि फार पूर्वी क्लिओपात्रा आपली नखे आणि पावले सजवण्यासाठी मेहेंदीचा वापर करत असे . इतर अनेक देशांमधे नखे रंगवणे, डोक्याचे आणि दाढीचे केस रंगवणे अशा वापरासाठी प्रसिद्ध असलेल्या मेहेंदीला आयुर्वेदात महत्वाचे स्थान आणि खास देखणे स्वरूप दिले ते भारतीय परंपरेने, भारतीय पारंपारिक सौंदर्याकृतींनी .
इतरत्र मेहेंदी ही प्रामुख्याने हीना, हेन्ना, खिदाब, जमाईका मॅग्नोनेट्टी, egytptian privet अशा अनेक नावांनी ओळखली जाते . तर भारतात तिला मेहेंदी, मेंदी, मेदिका, नखरंजिका, रक्तगर्भा, हीना अशा निरनिराळ्या नावांनी ओळखले जाते .
प्राचीन काळापासून स्त्री आपल्या हातापायांचे सौंदर्य खुलवण्यासाथी निरनिराळी सौंदर्य प्रसाधने वापरत आली आहे .
ओल्या मेहेंदीच्या हिरव्यागार आणि रंगलेल्या मेहेंदीच्या लाल भडक रंगाने आणि मादक गंधा ने रसिक भारतीय स्त्री आकर्षित झाली नसती तरच नवल!
मेहेंदीची botanical ओळख म्हणजे (*Lawsonia inermis* , family : N.O.Lythraceae)
तिच्या पानांमधे असलेल्या hennotannic acid मुळे मेहेंदीला खास लाल रंग चढतो . या रांगाला भरतीय संसकृतीत सौभाग्याचे प्रतीक मानतात . त्यामुळे लाल सिंदूर, लाल चुडा, लाल जरी बुट्टीच्या पोषाखा बरोबरच मेहेंदीचा लाल रंग नववधूसाठी शुभ समजला जाऊ लागला . सुरुवातीला मेहेंदीची पाने वाटून, त्याची paste निरनिराळ्या आकारात थापून पावलांवर, हातांवर सजू लागली . अनेक कलांचे उगम असलेल्या राजस्थान, गुजराथ, मोगल परिसरांमधून मेहेंदी रेखाटण्यासाठी हळुहळु बारीक काडीचा, सुईचा वापर केला जाऊ लागला . हातावरची वेलबुट्टी, पावलांवारची border थोडी नाजुक बनली .
मग आली factory made मेहेंदी powder . या powder ने मेहेंदी कलाकारांचे काम थोडे सोपे केले . ती पाने निवडून तोडून आणण्याची, वाटण्याची पध्दत हळुहळु कमी झाली . आणि या कलेत जादूची छडी फिरवून क्रांती घडवली ती plastic च्या जाड sheet पासून बनवलेल्या फुटाण्याच्या पुडी सारख्या मेहेंदीच्या कोन ने !! त्याच बरोबर मेहेंदीला खास गडद रंग चढवण्यासाठी मेहेंदी भिजवताना त्यात निलरिगीचे तेल, लवंगाचे तेल, चहाचे पाणी अशा गोष्टींचा वापरही प्रचलित झाला . मेहेंदीचे कोन करण्याची पद्धत आल्याने कुशल कलाकारांना कुठलाही नाजुक, सुबक सौंदर्याकार काढायला जणू मर्यादाच राहिली नाही ! वस्त्रगाळ केलेली मेहेन्दी भिजवून पेन प्रमाणे smooth चालणाऱ्या कोनमधे भरून वापरल्या मुळे अनेक सुंदर नक्षीकामां बरोबरच पारंपारिक शुभचिन्हे मेहेंदीमधे सहज वापरली जाऊ लागली .
असे नाजुक artwork हातावर काढून झाल्यावर ते काही तास तसेच टिकून रहावे म्हणून घरीच केलेल्या लिम्बू साखरेच्या चिकट पाण्याचा वापर cotton balls च्या साह्याने केला जाऊ लागला .
मेहेंदीच्या कला कुसरीला सुरुवात झाली ती पानाफुलांच्या वेलबुट्टीने!
हेमंत, शिशीर ऋतूत पनगळ सुरु होते . कोवळ्या हिरव्या पालवीसाठी वसंताची वाट पहावी लागते . पण मेहेंदी कलाकारांनी फुला पानांनी स्त्रीचे सुंदर हात सजवून तिच्या हातांवर ऋतु हिरवा, ऋतु बरवा नेहेमीच ताजा ठेवला .

मग आले इतर खास पारंपारिक महत्व असणारे आकार! कोयरीचा आकार मेहेंदीमधे खूप लोकप्रिय झाला, कारण कोयरी हे हिंदू स्त्रीच्या सौभाग्याचे प्रतीक! सुवासिनी जे हळद कुंकुऊ आपल्या सौभाग्याचे अस्तित्व म्हणून श्रद्धेने कोयरीत जपते त्या मंगल कोयरीचा आकर आणि मेहेंदी याम्चा सुंदर मिलाफ मेहेंदी कलाकारांनी हातावर साकारला .
तसेच मेहेंदी मधे निरनिराळ्या आकारांमधे खास लोकप्रीय असणारा आकार म्हणजे मोर . पक्षीराज मोर हा रसिक पक्षी! पावसाच्या आगमनाने मोहरून जाऊन पिसारा फुलवून नाचणाऱ्या मोराचे सौंदर्य अवर्णनीय आहे!
चित्रकला, शिल्पकला, भरतकाम अशा सर्व श्रेष्ठ कलांमधे मोराला अढळ स्थान आहे . विद्यादेवी सरस्वतीने आपले वाहन म्हणून मोराची निवड केली तर श्रीकृष्णाने आपला मुगुट सुशोभित करण्यासाठी सुंदर मोरपिसच निवडले . मेहेंदी कलाकारांनीही या सौंदर्याकृतीचा निरनिराळ्या प्रकारे वापर केला .

कुठल्याही मंगल कार्याची सुरुवात होते ती श्री गणेश पूजनाने !
मेहेंदी कलाकारांनी हा शुभ आणि सुंदर आकार निवडला खास नववधूच्या मेहेन्दीचा श्रीगणेशा करण्यासाठी !
नववधूच्या मेहेंदीमधे श्री गणेशाचे अनेक सुंदर सुंदर आकार पहायला मिळतात .
श्रीगणेशा बरोबरच शुभ कार्यामधे पूजा होते ती कलशाची! कलशावर ठेवलेले श्रीफल, त्यावर कुंकवाने काढलेले स्वस्तिक, बाजूने रचलेली आंब्याची पाने अशा अनेक शुभचिन्हांनी कलश विभूषित होतो . अशा शुभ कलशाला ही मेहेंदीमधे स्थान मिळाले .

ज्या मंगल वद्यांच्या साक्षीने विवाह आणि अनेक शुभकार्ये संपन्न होतात त्या मंगल वाद्यांना ही मेहेंदीमधे स्थान मिळाले .
ढोल ताशे, शेहेनाई, तुतारी आशी मंगल वाद्यांनी नववधूचे हात सजू लगले .
शुभ कार्यासाठी वापरली जाणारी महिरप, तोरण असे आकारही ओघाने मेहेंदीमधे आलेच !
लग्नाच्या आधी आपल्या भावविश्वात भावी पतीची स्वप्ने पाहणाऱ्या भावी वधूच्या हतांवर दुल्हा, घुंगट घेतलेली दुल्हन, पवित्र मंत्राग्नि, सात फेरे, बिदाईच्या वेळी प्राचीन काळी वापरली जाणारी डोली असे खास लग्न विधिंमधले शुभ आकारही हातांवर साकरले जाऊ लागले .
पावलांवरही खास नाजुक नक्षीकाम, पैंजणाच्या निरनिराळ्या आकाराची नक्षी, नाजुक पादत्रांणां सारखी दिसणारी नक्षी असे सुंदर आकार साकार केले जाऊ लागले .
आजही हे पारंपारिक आकार तितकेच लोकप्रीय आहेत .

त्याच बरोबर कालांतराने मेहेंदीमधले काही खास आकार highlight करण्यासाठी, त्या आकरांच्या borders साठी वापरली जणारी black henaa आली, bold आणि 'diagonal' design patterns असणारी arebic मेहेंदीची style देखील आली . पारंपारिक मेहेंदी बरोबरच temporary colors , कुंदन खडे वापरून नववधूच्या पोशाखांना perfect match असे artwork केले जाऊ लागले .
पारंपारिक, लाजाळू दुल्हन थोडी bold झाली आणि मेहेंदी ही हातांपुरती आणि पावलांपुरती मर्यादित न राहता ती दंडावर बाजुबंदां प्रमाणे, पोटावर, कंबरेवर कंबरपट्टया प्रमाणे सजवली जाऊ लागली . पण आजही खास पारंपारिक मेहेंदीचे महत्व अनन्य साधारण आहे .

आज मेहेंदी भारताप्रमाणेच अरब आणि इतर मुस्लिम देशांमधे लोकप्रीय आहेच पण पाश्चिमात्य देशांमेधेही मेहेंदी उर्फ henna tattoos ची trend मोठ्या प्रमाणावर आहे .
Hollywood superstars मॅडोना, डेमी मूर यांनी हे 'henana tattoos' आपल्या videos मधे काढून घेऊन इथे लोकप्रिय केले .
Body paintings चे खास आकर्षण असणारी western संस्कृती ही हळुहळु मेहेंदीकडे आकर्षित होत आहे .
Needles वापरून केल्या जाणाऱ्या tattooing मधले काही आकार मेहेंदीमधे या लोकांना काढून घ्यायला आवडतात .
त्यात Chinese संस्कृतीचा मोठा प्रभाव दिसतो . तिथे fangshui मधे खास महत्व असणारे dragon , फिनिक्स, कासव, बुद्ध, eagle , सूर्य, चंद्र, Chinese letters , याच बरोबर खास अमेरिकन लोकांच्या आवडीचे frog, lizard, dolphins, snake, cat, arm bands असे आकारही मेहेंदीमधे कढून घ्यायला इथल्या public ला आवडते!

अजून एक इथली थोडी मजेशीर पद्धत !
baby shower किंवा American डोहाळजेवणात त्या pregnant बाईच्या पूर्ण पोटावर मेहेंदी काढायची पद्धत इथे बरेच वेळा दिसली . अर्थात पूर्ण पोटावर मेहेंदी काढून घ्यायची म्हणून ही would be mother नेहेमीच bikini किंवा तत्सम वेषात असते!
या वेळी एक अनुभव मात्र मजेशीर असतो, मेहेंदी काढायला भरपूर area मिळतो, त्यामुळे कुठलेही design कसेही बसवायला काही limit च नाही !
असो, इथेही आजकाल bride ला मेहेंदी काढून घ्यायला आवडते . नाजुक आणि छोट्या छोट्या आकारांची वेलबुट्टी त्यांना जास्त भावते .

तर आशी ही निरनिराळ्या देशांचा सांस्कृतिक दुवा जोडणारी ही खुपरंग हीना! आपल्या मादक गंधाने आणि लाल भडक रंगाने आपली जादू आशीच जगभर पसरत राहो हीच सदिच्छा!

- दीपांजली

मराठी साहित्यातील अमेरिकन स्पंदने

माझं मराठमोळं बालपण मराठी पुस्तकांशी खेळण्यात गेलं . त्या पुस्तकात 'ऐंशी दिवसात जगाची चक्कर' सारखी काही अद्भुत पुस्तकं होती . त्यांनी माझं जगावद्दलचं कुतुहल चाळवलं . 'अपुर्वाई' वाचून मी मनानं पॅरिस पाहिलं तरी तिथे उच्च शिक्षणासाठी गेलेला माझा मामा सुट्टीत कधीतरी भेटला तर त्याच्याभोवती एक दिव्य वलय आहे असा भास व्हायचा आणि त्याला काही प्रश्न विचारायलाही घाबरायला व्हायचं .

मासिकात परदेशांबद्दल काही लेख यायचे . त्या लेखांत परदेशी परिषदेला गेलेल्या एखाद्या मराठी लेखकानं घडवलेलं परदेशाचं आणि तिथे भेटलेल्या मराठी लोकांचं दर्शन असायचं .

पण अमेरिकेत येऊन प्रत्यक्ष राहिल्यावरच मला मराठी म्हणून महाराष्ट्राबाहेर आणि देशाबाहेरही रहाण्याच्या वेदना आणि जल्लोष दोन्ही अनुभवायला मिळालं . माझ्या सुदैवानं अमेरिकेत मी शिकत होते त्या मिशिगन विद्यापिठाच्या ग्रंथालयात उदंड मराठी, हिंदी आणि बंगाली पुस्तकं होती . मराठी साहित्यातील ताज्या घडामोडी समजाव्यात म्हणून मी रविवारचा महाराष्ट्र टाईम्स विमानडाकेने मागवायला सुरुवात केली .

पण हळूहळू अमेरिकेतल्या आपल्या अनुभवांची अभिव्यक्ती करण्याची गरज वाटू लागली . कुठल्यातरी फेलोशिपवर किंवा फिरायला तात्पुरते अमेरिकेत आलेल्या आणि परत गेल्यावर भराभर पुस्तक लिहिणाऱ्या लेखकांच्या लेखनातील उथळपणा, ठोकून दिलेली गैरसमजी विधाने, भारतीय संसकृतीवर वारेमाप स्तुतीसुमने उधळत केलेली अमेरिकन संसकृतीची तुलना, क्वचित हेव्यानेही, अमेरिकेतल्या मराठी माणसांची नालस्ती हे लक्षात यायला लागलं .

पाण्याच्या वर दिसणाऱ्या प्रवाहाखालचे अनेक सूक्ष्मप्रवाह (अंडरकरंट्स) या साहित्यात उमटण्यासाठी आवश्यक असणाऱ्या अनुभवांचा तेथे निश्चितच अभाव होता . यामुळे माझ्यासारखीच अमेरिकेतील अन्य मराठी लोकांना दोन गोष्टींची आवश्यकता कळत नकळत भासू लागली .

एक म्हणजे मराठी साहित्यात अनिवासी मराठी लेखकांच्या साहित्याचे पडसाद उमटणं आवश्यक होतं .

दुसरं म्हणजे, अमेरिकेतील मराठी समाजात आपल्या अनुभवांच्या देवाणघेवाणीसाठी काही संवाद असण्याची आणि त्यासाठी काही व्यासपीठ असण्याची आवश्यकता .

अनुभवांची देवाणघेवाण आपल्या सांसकृतिक संदर्भात होण्यासाठी मातृभाषेशिवाय पर्याय नसतो . या दोन्ही दिशांनी **1974** ते **1978** या काळात प्रयत्न सुरू झाले . 'कुंपणापलीकडले शेत' या कथासंग्रहाने मराठी साहित्यात पडसाद उमटवला तर 'एकता' या कॅनडातून प्रसिध्द झालेल्या त्रैमासिकाच्या उपक्रमाने मराठी लोकांना आपल्या अनुभवांच्या अभिव्यक्तीची दारं खुली केली . या दोन्ही प्रयोगांबद्दल थोडं तपशीलानं लिहायला हवं .

सुमारे **1974** च्या सुमारास वॉशिंग्टन डी . सी . येथील श्री . दिलिप चित्रे यांनी भारताबाहेर वास्तव्य असणाऱ्या मराठी लोकांच्या कथांचा संग्रह प्रसिद्ध करण्याच्या दृष्टीने काही प्रयत्न सुरु केले . सुमारे पंचेचाळीस कथा निवडून श्री . चित्रे यांनी 'मौज'चे श्री . श्री . पु . भागवत यांना पाठवल्या . त्यातून कसोटीला उतरलेल्या सुमारे एकवीस कथांचा संग्रह ' कुंपणापलीकडचे शेत ' हा मराठी साहित्यात उमटलेला अमेरिकन मराठी जीवनाचा पहिला पडसाद . यातील फारच थोड्या लेखकांच्या कथा पूर्वी प्रसिद्ध झालेल्या होत्या . बरेच लेखक हे त्या अर्थाने नवखे होते . पण त्यांच्या कथा या स्वानुभव आणि कल्पना यांच्या संमिश्र रसायनातून प्रकटलेल्या आणि म्हणून एक प्रकारच्या ताजेपणाचा अस्वाद देणाऱ्या होत्या . अमेरिकन जीवनातला वेग आणि धावपळ, बारीक सारीक बाबतीतही आधार वाटावा अशा गोतावळ्याचा अभाव आणि त्यामुळे येणारा मानसिक थकवा, एकटेपणाची जाणीव, परक्या देशात धीरानं निभावून नेण्याची धावपळ, धडपड आणि त्याच्या सततच्या ताणाचे ओझे याची प्रतिबिंबे या कथांतून आहेत . अमेरिकन संसकृतीतील व्यक्तिस्वातंत्र्य, स्वावलंबन, स्वकेंद्रिततेमुळे येणारी काहीशी अरेरावीची वृत्ती, ज्याला ' किलिंग स्पिरिट ' म्हणतात तशी ईर्षात्मक स्पर्धाळू वृत्ती यांची सवय व्हायला वेळ लागतो . त्याचे अनुभव काही कथांतून आहेत . लैंगिक स्वातंत्र्य आणि त्यातून अपरिहार्यपणे दिसणारे परिणाम, उध्वस्थ कुटुंबे यांच्या वातावरणात मुले वाढवतांना वेढणारी काळजी कथांतून येणे अपरिहार्य होतं . त्या काळातील अमेरिकेतील अस्थिरता आणि त्यामुळे ' परक्या ' देशात रहातांना वाटणारी असुरक्षितता कथांतून दिसते . तसा ' बालपणीचा काळ सुखाचा ' असा वाटणारा सुखद उमाळा आणि आपण आलो त्या वाटेने पुन्हा परतणे शक्य नाही ही वास्तवाची टोचणी यांचेही भावनिक आवर्त या कथांतून आलेले आहेत .

1978 मध्ये कॅनडातील श्री . विनायक गोखले व श्री . अशोक पांगारकर यांच्या प्रयत्नातून 'एकता' हे त्रैमासिक सुरु झाले . मराठी अक्षरमुद्रा व संगणक असण्यापूर्वीचा तो काळ लक्षात घेता हे मासिक चालवणे किती जिकरीचे होते हे लक्षात येईल . संपूर्ण अंक हाताने लिहून मग छपाईस द्यावा लागे . किरकोळ वर्गणी वाचकांना अंक देता यावा यासाठी आपला भरपूर वेळ घालवून आणि आपापले उद्योग सांभाळून अंकाचे काम करावे लागे . गेली पंचवीस वर्षे हे त्रैमासिक उत्तम चालू आहे आणि दिवसेंदिवस त्याचे अंत:रंग आणि बाह्यस्वरूप अधिकाधिक दर्जेदार होत आहे . उदार व मोकळ्या संपादकीय धोरणांमुळे एकताचे स्वरूप व्यापक होण्यास मदत झाली . वाचकांच्या कल्पना व सूचना वेळोवेळी लक्षात घेऊन योग्य दिशेने त्यात बदलही केले गेले . बदलत्या तांत्रिक सुविधांचा उपयोग करून घेतल्यामुळे आता एकताचा अंक सुबक अक्षरमुद्रा वापरून देखण्या स्वरुपात येतो . नवोदित लेखकांना उत्तेजन देण्यासाठी एकताने कथास्पर्धा आयोजित केल्या . विविध राज्यातील लोकांना अंक निर्मितीत सहभागी करून घेण्यासाठी अकरा विशेषांक काढले . आठ लेखिकांनी लिहिलेली साखळी कादंबरी प्रसिद्ध केली . समस्यापूर्ती आणि शब्दकोड्यांसारखी सदरे चालवली . गाठभेट सारख्या सदरांमुळे अनेक जुन्या मित्रांना एकमेकांचा पत्ता लागला . एकताने अनेक लेखकांना लेखनाची स्फूर्ती दिली . आपल्या अनुभवांची देवाणघेवाण करण्यासाठी एकताने एक भक्कम व्यासपीठ अमेरिकेतील मराठी माणसांना दिले यात शंकाच नाही . मी महाराष्ट्रातील रचनात्मक कार्याच्या दिशांची ओळख करून देणारे सदर एकतात जवळ जवळ वीस वर्षे लिहीत आहे .

उत्तर अमेरिकेतील मराठी सांसकृतिक व साहित्यिक चळवळीचे एकता हे मुखपत्र आहे, हे मान्य करुनही मराठी समाजाला संघठित करुन त्यात एक समाजिक सुसंवाद निर्माण करण्यासाठी एका मुखपत्राची आवश्यकता मला आणि अन्य काही मराठी माणसांना वाटत होती . एकताच्या स्वरुपाला धक्का न लावता आणि एकताशी कोणत्याच बाबतीत स्पर्धा न करता वृत्तपत्रीय स्वरुपाचे मुखपत्र 'बृहन्महाराष्ट्रवृत्त' सुरु झाले **1984** मधे . हे शिकागोहून जयश्री हुपरीकर संपादित करीत . कै . श्री . विष्णू वैद्य व श्री . शरद गोडबोले त्यांना मदत करीत .

1983 ते **91** अशी सहा वर्षे महिन्यातून एकदा प्रसिद्ध होणाऱ्या वृत्ताचे संपादन मी केले . श्री . मोहन व समिता रानडे हे माझे वृत्तातले सहप्रवासी . वृत्ताच्या मूळ स्वरुपात आम्ही काही आमूलाग्र बदल केले आणि ते वाचनीय करुन आम्ही वर्गणीदारांची संख्या पाचपटीने वाढवली .

अमेरिकेत मराठी वृत्तपत्रीय स्वरुपाचे मासिक चालवणे हा एक वेगळा आणि महत्वाचा प्रयोग आहे . त्यामुळे माझ्यातल्या पत्रकाराला ते आव्हानच होते . त्यावेळी सुचलेले नवे विचार, लिहिलेली संपादकीये, वाचकांचा प्रतिसाद, मिळालेले नवे साहित्यिक मित्र, या सर्वातून नवनिर्मितीचा आनंद मिळाला हे नक्की . एकतासारख्या वृत्ताचा एक परिवार निर्माण झाला . अनिवासी मराठी माणसांच्या जिव्हाळ्याच्या, महाराष्ट्रात घडणाऱ्या घडामोडी, अमेरिकेतल्या मराठी समाजातल्या घटना, नव्या मराठी पुस्तकांचा परिचय, विविध क्षेत्रात विशेष कार्य करणाऱ्या अमेरिकेतील मराठी व्यक्तींचा परिचय, शैक्षणिक व अन्य क्षेत्रात विशेष कर्तृत्वाने झळकणाऱ्या मराठी अमेरिकन नवयुवकांचा परिचय, अशी विविध नवी सदरे मी सुरु केली . नोकरी आणि करिअर करणाऱ्या मराठी महीलांच्या मुलाखतीवर आधारीत लेखमाला मी आणि अजिता काळे यांनी मिळून लिहिली . ज्याला पत्रकार साहित्य म्हणता येईल अशा मराठी साहित्यात बृहन्महाराष्ट्र वृत्ताने एक वेगळी भर निश्चितच घातली आहे . म्हणूनच आज महाराष्ट्रातील वृत्तपत्रांची संगणकीय आवृत्ती महाजालावर उपलब्ध असतांनाही वृत्ताची वाटचाल यशस्वीपणे चालू आहे .

मराठी अधिवेशनानिमित्त प्रसिद्ध होणारे अंक, विविध मराठी मंडळांचे दिवाळी अंक अशी आणखी माध्यमेही आता मराठी माणसांच्या अभिव्यक्तीसाठी उपलब्ध आहेत . या माध्यमांतून लिहितांना आत्मविश्वास आलेले काही आणि भारतात असल्यापासून लिहिणारे काही असे साहित्यिक आज महाराष्ट्रातील नियतकालिकांतून लिहिताना दिसतात . श्री . दिलीप चित्रे हे पूर्वी केसरीत स्तंभ लिहीत असत . श्री . रमेश गुणे लोकसत्तेत लिहितात, कै . श्री . यशवंत कानिटकरही असे पत्रकार म्हणून लिहीत असत .श्री . अशोक काळे, कै . अजिता काळे, शोभा चित्रे, विद्युत अकलूजकर, संध्या कर्णिक, ललिता गंडभीर, उषादेवी कोल्हटकर आणि असे काही लेखक महाराष्ट्रातील नियतकालिकात बऱ्याच नियमितपणे लिहितात . तर माझ्यासारखे काही अनियमित लिहितांना दिसतात . यातील काही नावे मौजेसारख्या मराठी साहित्यातील मातब्बर म्हणून समजल्या जाणाऱ्या नियतकलिकात झळकतात! काही पत्रकारांची व लेखकांची नावे अमेरिकेतील अमराठी नियतकालिकात दिसतात . रमेश गुणे हे इंडिया ॲब्रॉड मध्ये तर अर्चना डोंगरे इंडिया वेस्ट आणि हवाईहून प्रसिद्ध होणाऱ्या हिंदुइझम टुडेमध्ये लिहितात . त्यांच्या लेखनाची स्पंदने मराठी साहित्यात कमी वेळा जाणवत असली तरी ते मराठीतही तेवढ्याच ताकदीने लिहितात आणि मुख्य म्हणजे मराठी साहित्य मराठी जगाबाहेर पोहोचवण्याचे महत्त्वाचे कार्य करतात . मराठी साहित्य मराठी जगाबाहेर पोहोचवण्याच्या कामात अजिता काळे, ललिता गंडभीर आणि पुष्पा आगाशे (इंग्रजी कविता) अशा अमेरिकेतील आणखी काही मराठी व्यक्तींचाही वाटा आहे .

एकता, वृत्तात लिहिणाऱ्या आणि न लिहिणाऱ्या काही लेखकांची पुस्तके गेल्या पंधरा वर्षात प्रसिद्ध झाली आहेत. लेखसंग्रह, कथासंग्रह, कवितासंग्रह, नाटक, प्रवासवर्णने असे विविध प्रकार त्यात पहायला मिळतात. यातली काही उदाहरणादाखल सांगायची म्हटली तर...

विद्युत अकलूजकर यांची चार पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. यात ' मेपलची पाने ' आणि ' मेरा जूता है जापानी ' ही स्तंभलेखनाच्या वळणाच्या खुसखुशीत लेखांची पुस्तके तर ' यथा काष्ठंच काष्ठंच ' हा दीर्घ आणि गंभीर वळणाच्या लेखांचा संग्रह आहे. कोणत्याही वळणानं गेलं तरी हे लेखन वाचकाला अंतर्मुख करतं.

ललिता गंडभीर यांची चार पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. ' पश्चिमगंध ' आणि ' पक्षी जाय दिगंतरा ' या कथासंग्रहात एका भारतीयाच्या दृष्टीकोनातून रोज भेटणाऱ्या अमेरिकन माणसांची सुख दु:ख आहेत. 'पशुपक्षांच्या दुनियेत' ह्या ललित लेखांत अवतीभोवतीच्या आणि मुलांच्या प्राणी आणि पक्षी पाळण्याच्या वेडावर मिश्कील भाष्ये आहेत. 'तारेवरची कसरत' या पुस्तकात जुनी अंगवळणी पडलेली भारतीय मूल्ये आणि परदेशी स्थिरावताना होणारी तारांबळ आणि करावी लागणारी तारेवरची कसरत आहे.

शोभा चित्रे यांची तीन पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. ' गोठलेल्या वाटा ' त, जुन्या आलो त्या वाटा गोठल्या... आता त्या वाटेने पुन्हा परतता नाही येणार ही हूरहूर आहे. 'गौरी गौरी कुठे आलीस' असं विचारत ती जुन्या आठवणींचा मागोवा घेत घेत आजला सामोरी जाते आहे. इथे आलेल्या प्रत्येकालाच ' यू केम अ लॉंग वे बेबी ' चा साक्षात्कार होत असतो. त्या अनुभवात हृद्यता, अनामिक हुरहूर, एक विजिगिषु समाधान असे अनेक संमिश्र भाव असतात. 'पानगळींच्या आठवणीत' स्मृतिभ्रंश झालेल्या आपल्या सासऱ्यांचा आजाराशी सामना आणि सर्व कुटुंबियांचा त्यांच्या आजाराबरोबर झालेला वेदनामय मानसिक प्रवास आहे. अशा प्रकारचं, वेगळ्या विषयावरचं चित्रण मराठी साहित्यात विरळंच असावं.

अशाच प्रकारचं, मूत्रपिंडाच्या आजाराशी विलक्षण धैर्याने सामना करण्याच्या स्वत:च्या अनुभवाचं निवेदन कै. यशवंत कानिटकर यांच्या ' येईल तो दिन.. ' ह्या पुस्तकात आहे. मध्यपूर्वेत अमेरिकन राखीव सैन्यदलाबरोबर सर्जन म्हणून गेलेल्या श्री. गंगाधर महिवार यांच्या स्वानुभवांचे निवेदन करणारं पुस्तक असंच वेगळं वाचनीय आहे. श्री. अजित कुकडे यांनी कॅनडात ' ड्रायव्हिंग स्कूल ' चालवणे हा मराठी माणसाच्या व्यावसायिक कल्पनेच्या काहीसा पलीकडचा व्यवसाय करताना आलेले अनुभव काहीशा विनोदी शैलीत चित्रित केले आहेत.

कै. अजिता काळे ह्यांची दोन पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. ' दूरदेशीच्या गोष्टी ' आणि ' गोष्टी देशांतरीच्या सांगेन ' .. अमेरिकेतल्या एका छोट्याशा खेड्यात ' प्लॅन्ड पेरेंटहूड ' हे विशेषत: पौगंडावस्थेतल्या म्हणजे टीन एजर मुलामुलींसाठी असलेले कुटुंब कल्याण केंद्र चालवताना आलेले अनुभव कथारूपात चित्रित केले आहेत. आपल्या व्यावसायिक जीवनातील अनुभव लता देशपांडे यांच्या 'अनिकेत' पुस्तकातही दिसतात.

श्री अशोक काळे यांच्या 'घडलेली कथा' या संग्रहात बहुतेक कथा भारतात घडणाऱ्या प्रसंगावर आहेत तर जयश्री थत्ते - भट यांच्या 'मावळतीची झाडे' या कथासंग्रहात उगवतीच्या मनाने अनुभवलेले मावळतीच्या मनाचे रंग दिसतात. संध्या कर्णिक यांच्या 'दिवा कुणाचा तेवत राही' या ललित लेखसंग्रहाअचं स्वरूप काहीसं स्तंभलेखनासारखं आहे. अमेरिकेतल्या कोणत्याही मराठी चौकोनी कुटुंबात येणारे हे रोजचे चुटपुटीत अनुभव चुरचुरीत शैलीत मांडलेले. त्यांचं आणखी एक पुस्तक यंदा प्रसिद्ध झालं. 'हास्यरेखा' या श्री. प्रकाश लोथे यांच्या पुस्तकात असेच अनुभव सापडतील. त्यांचंही 'ऊन पाउस' हे नवं पुस्तक यंदा प्रसिद्ध झालं. खमंग खुसखुशीत भाषेत जीवनावर केलेली भाष्यं बघता बघता वाचकाला अंतर्मुख करतात श्री. आनंद गर्दे यांच्या 'अमेरिकन गुदगुल्या' या पुस्तकात. या पुस्तकाला नुकताच पुरस्कार मिळाला आहे.

मिसिसिपी राज्यात वैद्यकीय व्यवसाय करताना आलेल्या अनुभवांवर श्री विजय सबनिस यांचं 'मिसिसिपीच्या काठावरून' हे पुस्तक नुकतंच प्रसिद्ध झालं आहे. 'मुक्काम आणि वळणे' हे माझं ललित लेखांचं पुस्तक प्रकाशनाच्या मार्गावर आहे. 'प्रत्येक वळणावर आम्ही नवेच मुक्काम ठोकत गेलो.. ताकमेढ हळहळली, आम्हीही पाणावलो .. पण उंबऱ्यात अडखळलो नाही..' अशी कवी नारायण सुर्वे यांची एक कविता आहे... अशी वळणा वळणावरच्या मुक्कामांची ही चित्रणं आहेत. अमेरिकेतील स्थलांतरीत मराठी माणसांचा जीवनपट उलगडण्याचा प्रयत्न माझ्या आणखी एका आगामी पुस्तकात असेल. 'अमेरिकेच्या अंगणात' हे नीलिमा कुलकर्णी यांचं पुस्तक गेल्या वर्षी प्रसिद्ध झालं.

अमेरिकेत आलेल्या आमच्या आईवडिलांच्या पिढीचं प्रतिनिधित्व करणाऱ्या उषा गडकरी यांचं आपल्या अनुभवांचं पुस्तक प्रसिद्ध झालं आहे. तर अमेरिकेत बऱ्याच मध्यम वयात येउन आपलं बस्तान बसवून मुलांना वाढवण्याची वेगळी धडपड करणाऱ्या पिढीच्या प्रतिनिधी शालिनी सराफ यांचा 'स्वप्नदेशीच्या गुजगोष्टी' हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला आहे.

कवितांच्या क्षेत्रात दिलीप वि. चित्रे, कुंदा जोशी, श्रीनिवास माटे व शशिकांत पानट यांचे कवितासंग्रह बाहेर पडले आहेत. 'कॅपिटल पनिशमेन्ट ' या प्रभाकर देवधर यांच्या कवितासंग्रहाचा अनुवाद अनुराधा गानू यांनी केला आहे.

1987 च्या सुमारास प्रसिद्ध झालेलं श्री. दिलिप वि. चित्रे यांचं 'अलिबाबाची गुहा' आणि त्यानंतर जवळ जवळ चौदा वर्षांनी आता 2001 मध्ये प्रसिद्ध झालेलं अनुराधा गानू यांचं 'हरवले ते गवसेल का' ही दोन नाटके .. 'आलो तर खरे अलिबाबाच्या गुहेत, पण तीळ उघड चा मंत्र सापडला का?' 'अमेरिकेत येऊन काय सापडलं काय हरवलं?' अशी चाचपणी करणारी आहेत. 'कुंपणापलिकडले शेत' नंतर जवळ जवळ सोळा वर्षांनी अमेरिकेतल्या बारा लेखकांच्या कथांचा 'निरंतर ' हा कथासंग्रह 2001 मध्ये प्रसिद्ध झाला.

विज्ञानातल्या एका प्रयोगात दोन प्रतिमांतलं अंतर मिटवण्याची एक क्रिया असते. त्यासाठी त्या प्रतिमांकडे एका विशिष्ट कोनातून पहाव लागत. तसं आम्ही इथे जगताना इथे घडणारी घटना आणि आमच्या भारतीय संसकृतीत वाढलेल्या मनावर उमटणारी तिची प्रतिमा या दोहोंकडे एकाच वेळी पहाण्याचा प्रयत्न करत असतो. संगणकाच्या भाषेत सांगायचं तर मनाच्या दुभाजलेल्या पटलावर (स्प्लीट स्क्रीन) एकाच वेळी पेनसिल्व्हेनिया आणि दार्जिलिंगची दृश्यं उमटत असतात. त्यातून कधी द्विधा मन:स्थिती होते. कधी वैफल्य येते. कधी

'एक पाय तळ्यात | एक पाय मळ्यात ||

एका जुन्या आठवाचा | हात हट्टानन गळ्यात ||

अशी मन:स्थिती होते... तर कधी त्याच अनुभवाला अचानक दुसती मिती प्राप्त होते आणि द्विमिती चित्र पाहिल्याचा सक्षात्कार होतो. त्या आनंदात मग सगळीच अंतरं मिटून जातात. उरतात ते मूलभूत मानवी भावनांचे, संघर्षाचे, विचारांचे आवेश आणि आलेख ! शरीरानं हजारो मैल दूर राहिलो तरी हे अंतर आम्ही मनाने मिटवत असतो. म्हणून ही धडपड तशी निरंतर आहे. हा प्रवास निरंतरचा प्रवास आहे. ह्या प्रवासाची चित्रणं या संग्रहात आहेत.

त्यानंतर सहा महिन्यानी 'एकता'तील तीस कथांचा संग्रह 'विदेशिनी' प्रसिध्द झाल. पंधरा लेखकांनी लिहिलेल्या लेखांचा 'ल्याले ऐलपैल' हा लेखसंग्रह एप्रिल 2003 मधे प्रसिध्द झाला.. तात्पर्य, गेल्या दोन दशकात तीस ते पस्तीस पुस्तके प्रसिध्द झली आहेत. त्यापैकी तीन चार पुस्तकांना महाराष्ट्र राज्य पातळीवरचे पुरस्कारही मिळाले आहेत.

मराठी वाङ्मयाच्या मुख्य धारेत सामावून जाण्याचे सामर्थ्य आणि गुणवत्ता यापैकी बऱ्याच साहित्यकृतीत आहे. कदाचित हे साहित्य तथाकथित समिक्षकांच्या जाड चष्म्यात न मावणारं, काहीसं मुक्तछंदातलं असेल. पण त्यातल्या संवेदनांना सच्चेपणाचा ताजा गंध आहे. अमेरिकेतील संघर्षाना सामोरे जातांना येणाऱ्या अनुभवांचा वेगळेपणा वाचकाना जाणवेल.. तरीही त्या अनुभवातील सार्वत्रिकता मनाला भिडते.. त्या अनुभवांशी जवळीक वाटते. गेल्या जवळ जवळ चाळीस वर्षातली मराठी समाजाची अमेरिकेतील वाटचाल या साहित्यात प्रतिबिंबित झालेली आहे. आपल्या अनुभवांना शब्दरुप देण्यासाठी जसे येथील नियतकालिकांचे व्यासपीठ वापरले जाते, तसे गावागावातून साहित्यप्रेमी लोक नियमीत जमून साहित्यसभांचे, साहित्यवाचनाचे कार्यक्रम्ही करतात. महाराष्ट्रातील साहित्यीक घडमोडींची जाणीव असलेले लोक येथे आहेत. परंतु आपापले व्याप आणि येथील वेगवान आयुष्य यांच्या सपाट्यात लेखनासाठी हवा तसा निवांतपणा मिळत नाही. त्यामुळे येथील अनुभवांचा संपूर्ण पट अजून तथाकथित 'अनिवासी' साहित्यात उलगडलेला दिसत नाही. हिमनगासारखे येथील अनुभवांचे अस्तित्व अजून बरेचसे दडलेलेच आहे. 'शेता' पासून 'निरंतरा'पर्यंत आणि 'गुहे' पासून 'हरवलेले गवसण्या' पर्यंत काय गमावले त्याचे हिशेब आहेत. आता काय कमावले, काय जपले, याचि समृध्द तृप्ती या साहित्यात दिसायला हवी आहे. त्यापुढची अवस्था म्हणजे या सगळ्या प्रवासाकडे त्रयस्थपणे पाहतानाच्या अनुभवांचे चित्रण या साहित्यात अपेक्षित आहे.

गाडीच्या मागे पाहण्याच्या आरशात (रिअर व्ह्यू मिरर) मधून जसे मागचे दिसते, तसे या साहित्यातले " मराठीपणाचे " अनुभव पंचवीस वर्षापूर्वी मागे राहिलेल्या जगातले आहेत. " असं का, मुली बघायला जाण्याच्या कार्यक्रमात चहा पोहे असायचे ? " असं कदाचित आता महाराष्ट्रातील वाचकाला आश्चर्य वाटेल हे साहित्य वाचतांना!

महाराष्ट्राबाहेर शिक्षण झाल्यामुळे एका अर्थाने मातृभाषा मराठी नसलेल्या, तंत्रज्ञानाचे विद्यार्थी असल्यामुळे " मराठी " चा विषय म्हणून अभ्यास न केलेल्या लेखकांच्या साहित्यात भाषा आणि दृष्टिकोन यांचा वेगळेपणा जाणवतो. शुद्ध मराठीचा अभाव प्रसंगी खटकतोही!

या मराठी साहित्याला अमेरिकेतल्या मराठी समाजात, अधिवेशनात म्हणावी तशी सन्मान्यता अजून मिळालेली नाही . एखादा अपवाद वगळता मराठी साहित्याबद्दल काही चर्चासत्र मराठी अधिवेशनात झालेले नाही . मराठी साहित्य संमेलन अजून कल्पनेतच आहे .

महाराष्ट्रातील मराठी साहित्य संमेलनात ग्रामीण साहित्य, दलित साहित्य असते, तसे " अनिवासी " साहित्य अजून गणना करण्याएवढेही नाही . कोणी त्या संमेलनात आपले साहित्य सादर केल्याचे ऐकिवात नाही .

तर अमेरिकेत, " बेस्ट अमेरिकन शॉर्ट स्टोरीज " सारख्या उपक्रमात या साहित्याची वर्णी लागण्याचे स्वप्नही अजून खूप दूर आहे . दोन्ही देशात हे साहित्य अजून " अनिवासी " च आहे . एवढेच नव्हे, तर अमेरिकेतल्या पहिल्या पिढीनंतर हे साहित्य अस्तंगत होण्याची दाट शक्यता आहे . ईसकाळ, लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स सारख्या संगणकीय महाजालावरील मराठी नियतकालिकांशी आता बृहन्महाराष्ट्र वृत्त, एकतासारख्या नियतकालिकांना स्पर्धा करायची आहे .

परंतु हे सर्व असले तरी मराठी साहित्यात उमटलेल्या अमेरिकन मराठी स्पंदनांनी स्वत:चे वेगळे स्थान निर्माण केले आहे यात शंकाच नाही . !

- विद्या हर्डीकर

ला हाब्रा हाईट्स् , कॅलिफोर्निया

(पूर्व प्रसिद्धी : ग्रंथाली प्रकाशनाचे मासिक " रूची " 2001)

प्रवास अरंगेट्रमचा

अरंगेट्रम , म्हणजे रंगमंचावरचे पदार्पण . कर्नाटक शास्त्रीय नृत्यकलेच्या विश्वातील पहिलं वहिलं पाऊल . पण हे पहिलं पऊल टाकण्यापूर्वीच एक प्रवास सुरु झालेला असतो . हे पहिलं पाऊल टाकण्यापूर्वी सरकणं , रांगणं , उभं रहाणं यांची तालीम करावी लागते . ह माझा अरंगेट्रमचा प्रवास अत्यंत लक्षणीय होता आणि नृत्याव्यतिरीक्तही बरच काही शिकवून गेला .

सहा वर्षांपूर्वी मी पहिल्यांदा भरतनाट्यम शिकायला सरुवात केली ती केवळ एक शौक आवड म्हणूनच . पण नाचाची आवड ओढ यामुळे मी नेटाने शिकत राहिले . माझ्या गुरुंची या कलेवर असलेली प्रीती त्यांचा उत्साह संसर्गजन्य आहेत . त्यांच्यामूळे प्रेरित होऊन मी पुढे शिकत राहिले . शिकत असताना मला अनेक सुखाद अनुभव आले . मला आठवतय, छोट्या मुलींची स्मरणशक्ती स्वाभविकच माझ्या पेक्षा चांगली असल्याने, नो शिल्पा आँटी नॉट दॅट वे इट्स डी डी टाय . धि धि तई म्हणायचे असायचे त्यांना, त्यांच्या त्या गोड अक्सेंट मद्ये त्या मला शिकवायच्या . मला आंटी म्हणत असल्या तरी त्यांना मी त्यांच्या वयाची वाटायची, आपल्याल्या समजून माझ्याशी खेळयच्या, आणि कधी कधी मी मोठी म्हणून एखाद्य नाचात असलेल्या पौराणिक कथांबद्दल महिती विचारायच्या . या नाचातून मला स्वत:ला बरेच शिकायला मिळाले . लय ताल जवळचे वाटायला लागले, शास्त्रीय नृत्यातले बारकावे कळत गेले, व्ही . पी . धनंनजयन, वेजयंतीमाला बाली यांच्या सार्या ज्येष्ठ कलाकारांशी संबंध आला . वेजयंतीमाला बाली यांच्या इथे झालेल्या कार्यक्रमाची प्रकाशव्यवस्था करण्याचे सौभाग्यही मला लाभले . हिंदू पौराणिक कथांची महिती वाढत गेली, आपल्या संस्कृतीचे आनेक पैलू दिसले .

याही वयात स्वभाव घडवण्याचे काम ह्या नृत्यप्रकाराने केले . अरंगेट्रमची तयारी करता करता माझी जिद्द वाढत गेली, हिम्मत वाढ्त गेली, आत्मविश्वास वाढ्ला . त्याच बरोबर ह्या राष्ट्रत एवढ्या मोठ्या प्रमाणावर कार्यक्म आयोजित करण्यातल्या अड्चणी पाहिल्या, सर केल्या . कार्यक्माला अनेक मित्र मैत्र्णी आणि आप्तेष्टांनी शोभा आणली . सभागुहत सूमारे तीनशे माणसे होती . आपल्यावर माया करणारी प्रेम करणारी एवढी माणसे आज कौतुक करयला आहेत हे पाहून मन भरुन आले . ह्या करवी अनेक ऋणानूबंध जोडले गेले,सुंदर नाती जुळलीइ गेली . ह्या प्रवासात एकमेकांना पूरक असे माझे आणि किरण चे नाते जणू पुन्हा नव्याने घडत असल्यासार्खे वाटले, अनुभवले . शेवटी, जेव्हा मी रंगमंचावर गेले तेव्हा मी माझी मी नव्हतेच . पहिली दोन गाणी मी जरा घाबरत नाचले, पण त्या नंतर मात्र माझी भीड चेपली . रोजची तालीम करणारी शिल्पा मी नव्हते . तो रंगमंचाचा कैफ़च जणऊ माझ्यात संचारला, आणि हळु हळू ते एन्जॉय करायला लागले . मग इथून पुढे, मग तिल्लाना, म्हणजे शेवट्चा नाच होईपर्यंत मग ते कैफ़ चढत गेला . कुसुमाग्रजांच्या भाषेत सांगायचे, तर " तीन तासांचे अकरुप अस्तित्व " होते ते . माझ्या कार्यक्रमाच्या आद:ई माझ्या गुरु म्हणाल्या होत्या, माझ्या लेखी अरंगेट्रम म्हणजे हा प्रवास, रंगमंचावरचा नाच ह नाममात्र . खारोखरीच, माझ्या सर्वात लक्षात राहिला तो तो प्रवास, आणि त्यामौळे माझ्यात आणि माझ्या आयौष्यात झालेला अमऊलागर बदल . नाचाचा क्षण आला आणि गेला देखील, आणि मागे उरले ते
आठ्वणिंचे, नात्यांचे, अनुभवांचे सप्तरंगी गोफ़ .

- शिल्पा तोरवी

उलटा प्रवास

" काय रे आहेस का जागेवर? "
" आता मी ह्या कॉफीशॉपमध्ये तुझ्यासमोर सदेह बसलेलो आहे . माझं मन देखील इथेच आहे . तुझं ड्रेसचं कॉम्बिनेशन अफलातून आहे . बाहेरचा वाहता रस्ता दिव्यांनी उजळून निघालेला आहे . तुला माझ्याशी महत्त्वाचं बोलायच आहे असं तुझ्या चेहऱ्यावरुन जाणवतयं . काउंटरवरची पोरगी एकदम फर्स्टक्लास! मी तिच्याकडे आतापर्यंत मोजून पाचवेळा पाहीलं त्यापैकी तिने चार वेळा मला स्माइल दिलं ह्याचा अर्थ . . . "
" बास . . " ती त्याला मधेच तोडत म्हणाली " सरळ बोलायला काय घेशील? " '
" आता इथे आपण जास्तीत जास्त कॉफीच घेउ शकतो . "
'कॉफीच' ह्या शब्दावर जोर देत हे वाक्य त्याने 'कॉफिन म्हणजे ख्रिस्ती लोकांची शवपेटिका' असे उच्चारले त्यामुळे साहजिकच तिला हसू फुटले .
" ये हुई ना बात . . . आता कसं मस्त वाटतयं . . काय हे !! लांब चेहरे करून बोलायचं . "
" बास रे टीपी मला काही बोलू देशील का नाही? "

"o.k. all right... बोल काय म्हणत होतीस? "
" उलट्या प्रवासाबद्दल विचार करत होते . "
" उलटा प्रवास म्हणजे काय हे आधी मला समजावून सांगशील का? "
" म्हणजे बघ माणसाची सगळी धडपड, सगळे कष्ट कशासाठी सुरु असतात? "
" अर्थातच सुखासाठी . झालंच तर आनंदासाठी . अगं, ह्या प्रश्नाची अनेक प्रकारची वेगवेगळी उत्तरं येतील . "
" हो, माहीत आहे मला . पण सगळ्यात शेवटी मला बरं वाटावं किंवा मला समाधान मिळावं हे त्याचं सार असेल हे तर मान्य आहे? जे काही करतोय त्यातून निघणाऱ्या output मुळे मी आणि माझ्या आजूबाजूच्या माणसांनी आनंदी व्हांवं ही रास्त अपेक्षा असायला काहीच हरकत नाही . "
"yes... you are right.."
" तू कधी आपल्या अवतीभवतीच्या माणसांचं निरीक्षण केलसं का? त्यातली काही माणसं अतिशय समाधानी असतात . आनंदी असतात . त्यांच्या चेहऱ्यावर ते समाधान जाणवत राहतं . त्यांच्या सहवासात राहीलं की नकळतपणे त्या समाधानाचा, त्या प्रसन्नतेचा एक हलकासा शिडकावा आपल्यावरही होतो . मग आपल्या मनात प्रश्न येतो की ह्यांना काही दुखं नाहीत का? त्यांना हव्या असलेल्या सर्व गोष्टी त्यांना मिळाल्या आहेत का?
ह्या प्रश्नांची उत्तरं शोधताना आपल्या लक्षात येतं की त्यांनाही जीवघेणी दुखं असतात . मनात सलणारे सल असतात . त्यांच्या सगळ्याच भौतिक गरजा पूर्ण झालेल्या नसतात . त्यांचीही काही स्वप्नं असतात . पण तरीही ती समाधानी आणि आनंदी असतात . हे जे समाधान त्यांच्या जवळ असतं त्याबद्दल मला बोलायचं आहे . ते समाधान आपणही अनुभवलेलं असतं पण नंतर ते कुठे तरी हरवतं "

"Exactly असं होतं खरं . . "
" ऐक ना पुढे . हा आपला प्रवास होतो कसा? तर सर्वसाधारणपणे तो चार टप्प्यात किंवा पायऱ्यात होतो .

1. Need
2. Want
3. Desire
4. Demand

सुरवातीच्या आपल्या गरजा अतिशय कमी असतात . आपण त्या पूर्ण करण्याच्या मागे लागतो . म्हणजे पहिली पायरी 'need' ची . हळूहळू गरजा पूर्ण करता करता आपण पुढच्या पायरीवर येऊन पोहोचतो . म्हणजे 'I want' च्या पायरीवर . हे हवंय, ते हवंय आणि तेसुध्दा हवंय असं सुरु होतं . क्रमाप्रमाणे ते पूर्ण करत आपण तिसऱ्या पायरीच्या म्हणजे 'इच्छेच्या' उंबरठ्यावर येऊन उभे राहतो . इच्छा अनंत असतात . त्यांचा आणि इच्छापूर्तीचा वास्तविक काहीही संबंध नसतो . पण त्यावेळी विचार करायला आपल्याला सवडच नसते . एक इच्छा पूर्ण झाली की दुसरी . . . मग तिसरी . . . असं चक्र वेगाने फिरत राहतं . मग आपण प्रवासाच्या अंतिम पायरीवर येऊन ठेपतो . 'Demand' च्या . इच्छा जसजश्या पूर्ण होत जातात तसतश्या त्या वाढतात आणि त्यांचं हळूहळू demands मध्ये रुपांतर होतं . 'मला मिळालंच पाहीजे' असा लहान मुलाचा हट्टीपणा स्वभावात नकळत रुजू लागतो . 'कसं मिळत नाही . बघतोच / बघतेच' असं म्हणत आपण त्या demand चा पाठपुरावा करतो . परत एक झाली की दुसरी . . . मग तिसरी . . . अशी घसरगुंडी सुरु होते . घसरगुंडी संपल्यावर कसे आपण वाळूवर येऊन पडतो अगदी तसंच demand पूर्ण झाली नाही की होतं . . . . . मग . . . "

तो म्हणाला
" मग . . . . तीव्र संतापाच्या उंचच्या उंच लाटा . . . मनात तूफानासारखा खदखदणारा अपमान आणि अपरिहार्यपणे येणारी निराशेची काळीकभिन्न दरी . . .
"perfectly right... असंच होतं कारण demand पूर्ण होता होता माझी प्रत्येक इच्छा, मागणी पूर्ण होतेच आणि झाली पाहीजे अशीच आपल्या मनाला सवय लागलेली असते . भली थोरली निराशा पदरी येते . काय करावं ते अजिबात सुचत नाही . मन अगदी वेड्यासारख सैरावैरा धावू लागतं . अरे, आपल्याला तर समाधान हवं होतं मग ही निराशा कुठून आली? छे . . आपलं नशीबंच खत्रूड असे म्हणून आपण नशीबाला बोल लावतो . हा सगळा प्रवास इतका भरकन होतो की शेवटची घसरगुंडी कशी आली ह्याचा पत्ता लागत नाही . मग ती अपरिहार्य ठरते . तर हा असा होतो आपला प्रवस . also run मधले बहुतेक सर्वजण अश्याच वाटेने पुढेपुढे जातात पण . . . "
बराच वेळ बोलल्याने ती जरा थांबली .

" पण काय? बोल ना पुढे . एकदम interesting वाटतयं . . . "
तो उत्सुकतेने म्हणाला .
" . . . पण आपण ही घसरगुंडी थांबवू शकतो . त्यामुळे येणारी निराशा टाळून आपल्याला हवे असलेले समाधान मिळवू शकतो . "
"but how?" त्याने excite होत विचारले .

" सांगते ना . बघ पटतयं का ते . . .
पण त्या आधी मनाचा ठाम निर्णय हवा . त्यानिर्णयाची अंमलबजावणी करण्याचा प्रामाणिक प्रयत्न हवा . कारण निर्णय घेणं त्या मानाने सोपं असतं . अवघड असतं ते नेट लावून त्याची अंमलबजावणी करणं . त्यासाठी आवश्यक असणारी कृती करणं .
घसरगुंडी एकदा सुरु झाली की मध्येच थांबवता येत नाही . त्यामुळे उलटा प्रवास करतांना आपल्याला तिसऱ्या पायरीवर थंबायला हवं म्हणजे desire च्या . मनात इच्छा निर्माण झाली की ती पूर्ण करण्याच्या मागे न लागता, त्या पायरीवर थांबून स्वत:लाच प्रश्न विचारायचा Really, I want it or not? म्हणजेच desire कडून want कडे आपला उलटा प्रवास सुरु होतो . आधी म्हटल्याप्रमाणे इच्छा अनंत असतात . त्या कधीही पूर्ण होत नाहीत . उलट जसजश्या त्या पूर्ण होत जातात तसतशी अतृप्ती वाढत जाते आणि साहजिकच समाधान कमीकमी होत जातं . कितीही मिळालं तरी समाधान नाही अशी काहीशी मनाची अवस्था होते . हे आपल्या लक्षात येत नाही आणि आपण आपल्या नशीबाला दोष देतो . म्हणूनच I want it or not? ह्या प्रश्नाचं उत्तर शोधायचा प्रय्त्न करायचा . ह्या प्रश्नाचं उत्तर 'नाही' असेल तर मनातली इच्छा पूर्ण करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही . त्यावेळी मनापासून आपण स्वीकारायला हवे की माझी इच्छा असली तरी for time being I do'nt want it... so let us forget about it...
समजा ह्या प्रश्नाचं उत्तर 'हो' आलं तर ह्याचा अर्थ मनात ज्या गोष्टीबद्दल इच्छा निर्माण झाली आहे ती गोष्ट खरचं हवी आहे म्हणजे आपण from desire to want अशी एक पायरी उलटा प्रवास करुन आलो . त्याच पध्दनीने परत एक पायरी मागे यायचं . थोडक्यात प्रवास करतांना आपण जसजसे काहीही विचार न करता भराभर पायऱ्या चढत आलो अगदी त्याच्या उलट पद्धतीने कोणत्याही प्रकारची घाई न करता विचार करुन एक एक पायरी काळजीपूर्वक मागे यायचं .

From want to need असं मागे येताना परत एकदा शेवटचा प्रश्न आपल्या मनाला विचारायचा I want it, but really, i need it or not? ह्या प्रश्नाच्या उत्तरापाशी आपला उलटा प्रवास संपतो . वरच्या सारखंच ह्या प्रश्नाचं उत्तरही 'नाही' असं असेल तर ठामपणे मनाची समजूत घालणं आवश्यक आहे . माझी कितीही इच्छा असली तरी ही माझी गरज नाही त्यामुळे तिच्या पूर्ततेचा प्रश्न येत नाही .

ह्या प्रश्नाचं उत्तर 'हो' असेल तर ही माझी इच्छा आहे आणि माझी गरजही आहे त्यामुळे त्याची पूर्तता मी करणार आहे असं म्हणून तिच्या पूर्ततेच्या मागे लागणं, त्यासाठी प्रयत्न करणं हे सर्व सुरु होतं . "

" एकदम पट्या . . . . wonderful..." तो म्हणाला
" ऐकायला सगळं कस छान वाटतं पण प्रश्न येतो तो implement करण्याचा . . प्रत्यक्ष कृती करायची वेळ आली की संपलच रे . . . "
" खरं आहे तुझं म्हणणं . अगं पण आपण काही आकाशातून पडलेलो नाही . माणसं आहोत . त्यामुळे आपण चुका करणारच . मात्र झालेली चूक स्वीकारून ती सुधारण्याची, परत परत प्रयत्न करण्याची तयारी हवी . जमत नाही म्हणून हातपाय गाळून बसायचं नाही . Let us try.... जमलं तर उत्तमच आहे आणि समजा नाही जमलं तर better luck next time... काय? . . . बरोबर की नाही? "
yesssss...that's it... ती म्हणाली .
" चल तर मग ह्या आगळ्या वेगळ्या उलट्या प्रवासाला . . .
अग, पण ह्या रसिकांना पण विचारूयात ना . . .
काय मग येताय ना आमच्यावरोबर . . . . "

- क्षिप्रा

त्या वाटेवर . . . .

कालच्या ,
पुसल्या खुणा,
जाऊन कुणा,
त्या वाटेवर . . .
आजही,
दिसल्या जुन्या,
पाऊलखुणा,
त्या वाटेवर . . .

कितीदा या वाटेवरून मी गेलो आहे,आणि जाणार आहे;रोज एकदा तरी जातोच . . माझ्या घरापासून सुरू होऊन ऑफिसला संपणारी ही वाट . . तशी 12 - 15 कि . मी . ची . . पण माला कायम आवडणारी, कायम मोहवणारी अन् कायम सुखावणारी . . . यावरून जातांना मी सृष्टीची कितीतरी रुपं पाहिली आहेत . उल्हसित वसंत, निवांत उन्हाळा, भरभराटीचा पावसाळा . .

गावातून बाहेर पडताच छोट्याशा टेकडीवरून रेंगाळत ही वाट निघते . काही वेडिवाकडी वळणं घेत खाली उतरते तेव्हा एक शांत जलाशय तिची साथ करतो . पुढे ती शिरते एका लांबच लांब गावात . . कितीतरी ओढे, नाले लागतात . एक तर बराच वेळ वाटेला लागूनच वाहत राहतो आणि अचानक आडवा होतो वाटेसमोर . पण चिमुकल्या पुलांवरून वाट पुढे सरकतच राहते . कधी उजवीकडे वळते तर कधी गोल गोल डावं वळण घेते . . थोडं पुढे गेलं की खाणींचा भाग लागतो . तिथे ही अशीच टेकडीवर चढते आणि अजूनच लालेलाल होते . टेकडीवरून जातांना उजव्या बाजूला एक हिरवंकंच गाव लागतं . . शिरगांव . . तिथलं झाडीतलं मंदीर बघितल्यावर आठवतात ग्रेसच्या ओळी . .
---- --- -- -- -- -- -- -- -- -- झाडीत गडे देऊळ दडे . . .

गावाबाहेरची विस्तीर्ण भातांची शेतं . . त्यामध्येच आठ दहा माडांचं छोटसं बेट . . दूरवर दिसणाऱ्या डोंगररांगा . . सगळं नजरेत साठवत पुढे निघावं तर काही वेळ रेल्वेचे रूळ तिची साथ करतात . पुढे एका लाकडी साकवावरून ही वाट शिरते ती एका बेटावर .

गावात शिरताच उजव्या बाजूला संभाजीमहाराजांनी बांधलेला अगदीच लहानसा किल्ला लागतो . या गावात जाण्याचे दोनच मार्ग . . एक म्हणजे साकवावरचा आणि दुसरा विरुद्ध टोकाला असलेल्या फेरीबोटीचा . . त्यामुळे इथे कशी निरव शांतता असते . या फेरीसमोरच एक चर्च आहे . थोडंसं उंचावर . नदी इथे एक लांबच लांब डावं वळण घेते . त्या वळणावर एक छानसं मंदिर आहे . उजव्या बाजूला नदीच्या पाण्यातही दूरवर दिसणाऱ्या निळ्या निळ्या डोंगररांगा . . . फेरी ओलांडून थोडं पुढे गेलं की माझं ऑफिस येतं आणि माझ्यापुरती ही वाट थांबते .

आँधी चित्रपटात गुलज़ार यांचं एक गीत आहे . . ईस मोड से जाते है . . . यात काही वाटा 'सुस्त कदम तर काही लगबग्या आहेत . काही लाजऱ्या तर काही उगाच रेंगाळणाऱ्या आहेत . . . मला माझी ही वाट सगळेच गुणविशेष बाळगून आहे असच वाटतं . याच वाटेवरच्या या काही पाऊलखुणा . . . . .

ऋतूराज वसंताचं आगमन होतं आणि सगळी वाट बहरून येते . . निरनिराळ्या रंगांनी रंगून जाते . वाटेवरच्या तलावाचं पाणी थोडं कमी झालेलं असतं . त्याच्या कडेला असणारे सगळे गुलमोहर पानं त्यागून फुलून येतात . . सन्यासीच जसे . . पण गुलमोहर संन्यासी कसा असेल? सन्याशाला काय करायचे आहेत एव्हढे भडक रंग . . मग कोण हे . .

उभा गुलमोहर संन्यासी,
की वस्त्रे त्याजून फुले मानसी?

या गुलमोहरांच्या नारिंगी रंगातही किती छटा असतात! एक कसा लालभडक दिसतो . त्याच्यापेक्षा कितीतरी मोठ्या वडाला जणू खिजवत असतो . पण अंगाखांद्यावर पक्ष्यांना खेळवत आणि दाढी लोंबवत वडबाबा शांत बसलेले असतात . तो एक गुलमोहर कसा भरपूर पसरलेला, छानशी पिवळी झाक ल्यालेला . तो आपला एकटाच उभा आहे त्या वळणावरच्या ओढ्याकाठी . . आणि ते तीन गुलमोहर कसे रस्त्यावर गप्पा मारणाऱ्या पोरांसारखे जवळजवळ उभे आहेत . हा त्यांचा पहिलाच बहर असावा . . पुढे एका मंदिराच्या आवारात उभा असलेला पिंपळ कसा सळसळ करतोय . त्याचं वय तसं बरच असावं . . पण उत्साह कायम आहे . या सगळ्यांमध्ये खरे संन्यासी आहेत ते चाफ्याचे वृक्षं . वसंतात एकूण एक फुलून येतात . खरं तर त्याला डवरणंच म्हटलं पाहिजे . . त्यांच्या बहरण्याला आणि सुगंधाला एक संयमी वाज असतो .
हळूहळू उन्हाळा जाणवायला लागतो त्याचा एक निवांतपणा वाटेवर पसरतो . दुपारच्या वेळेला वाट आराम करत पडून असते . उन्हाळ्याची संध्याकाळही सस्वल्यांसारखीच कशी लांबत असल्यासारखी वाटणारी . पण रात्री जागून काढाव्यात तर त्या उन्हाळ्यातल्याच! मधेच एखादी झुळूक येते आणि बरोबर चाफ्याचा मंद सुगंध आणते . दुसरी बरोबर आंब्याचा गोड गंध दरवळतो . एखादीबरोबर येतो काजूच्या फुलांचा मादक गंध . अशाच एखाद्या रात्री चंद्रप्रकाशात न्हाऊन निघालेल्या या वाटेवरून जाण्यात काही औरच मजा असते . दुचाकीचे दिवे बंद करावेत आणि उन्हाळ्यातल्याच चुकार मेघाप्रमाणे संथपणे थबकत थबकत चालत रहावं . अशा रात्री टेकडीवरच्या वाटेवरून जातांना दूरवर पाण्यात उतरलेला चंद्र बघतच रहावा . जसजशी रात्र वाढत जाते तसतसा वातावरणात एक कोवळा गारवा भरून राहतो . उत्तररात्री जेव्हा एखादी झुळूक अंगावरून जाते तेव्हा मन थोडंसं विचलीत होतं आणि आठवतात गुलज़ारच्या ओळी . .

या गर्मियों की रात जो पुरवाई या चले,
ठंडी सफेद चादरों मे जागे देर तक,
तारों को देखते रहे ,
छत पर पडे हुये . . .

बहुदा दिल्लीतल्या अशाच उत्तररात्री 'गालिबला' सुचला असावा या गीताचा मुखडा
दिल ढूढता है,फिर वही फुरसत के रात दिन,
बैठे रहे तसव्वूर ए जाना किये हुये . .
. . . जो नंतर गुलज़ारने तितक्याच खुबीने वापरला .
पुढं गेलं तर साकव ओलांडतांना हाच चंद्र माडांच्या लकाकी असणाऱ्या झावळ्यांवर आल्यासारखा वाटतो . साकव ओलांडतांना तर अगदी पायात आल्यासारखा करतो . दूर लांबून पाहिलं तर सगळं बेट शांतपणे न्हाऊन निघालेलं दिसतं आणि त्याभोवतीची ती नदी एखाद्या रुपेरी कड्या प्रमाणे चमकत असते .
अशाच उन्हाळ्याच्या दिवसांच्या काही पाऊलखुणा मला कालच दिसल्या . . . . . त्या वाटेवर .

अशाच उन्हाळ्याच्या दिवशी ढग दाटून येतात ,अगदी गर्जत येतात आणि आजपासून 'आमचं राज्य ' .

हिरव्या माळापुढे निळा गिरि, गिरवित काळी वळणे काही;
छप्पर झाले लाल अधिकच,धूर दरीतून चढतच नाही .

हीच असते पावसाची सुरुवात . उन्हाळ्यातला उकाडा,हिवाळ्यातली थंडी या फक्त जाणवणाऱ्या गोष्टी आहेत पण पाऊस हा पाचही इंद्रियांना ओळखता येतो, भोगता येतो आणि कधी आपल्या Sixth Sense लाही तो स्पर्शून जातो .

पहिल्याच पावसात सगळी वाट स्वच्छ होऊन जाते . आता चार महिने तरी सूर्याचं दर्शन विरळाच . . . . वाटेवरून जाताना अचानक पाऊस लागतो . आपण एखाद्या पिंपळाचा आडोसा घ्यावा तोच कमी होतो . पण हे काही याचं खरं रुप नाही . त्याचं न थकता धो धो कोसळणारं रुप पुढे लवकरच पहायला मिळातं . मग कसला आडोसा अन् काय? त्याने भिजवावं अन् आपण भिजावं! रोजच्या त्याच वाटेवर तोच पाऊस पण दरवेळी वेगळी गंमत . . कधी झिमझिम, कधी रिपरिप तर कधी धो धो आणि हे प्रकार तसे प्रत्यक्षात अनुभवता येतात . मोकळ्या वाटेवर झिमझिम ऐकावी, रानातून जातांना रिपरिप ऐकावी तर टेकडीच्या वाटेवर धो धो पावसाचा आनंद घ्यावा . प्रत्येकाचं आपलं सौंदर्य आणि आपली ऐट . . . तेही background music सह! रिपरिप ऐकत या वाटेवरून जातांना उगीच वाटतं की कुणी आंब्यामागून येईल अन् music चालू होईल मग छानपैकी झाडांभोवती दोघांना नाचाता येईल . पण तसं कुणी येतच नाही . मी आपला एकटाच भिजत पुढे निघतो .
टेकडीवरच्या वाटेचा भाग हा माझ्या सगळ्यात आवडीचा . तिथे थोडं थांबावं . पाऊस नसतो,पण दूरवरून येताना दिसतो . एकदम पुढ्यात आल्यासारखा वाटतो . बाजूच्या टेकड्या, शेतं,गाव सगळं सगळं आपल्या कवेत घेतो . मग समजतं अरे याने तर आपल्यालाही भिजवलंय . मग त्याचं धो धो रूप दिसतं, ऐकू येतं, जाणवतं . . . अगदी दहा फुटांपलिकडचंही दिसत नाही . थोडा कमी झाला की टेकडीवरून पाण्याचे लाल लाल ओहोळ खाली उड्या मारत निघतात . दूर नदीच्या पाण्यात असेच सगळे ओहोळ मिळून काळ्या सावळ्या पाण्याला लालेलाल करून टाकतात . तो पाण्यात लाली मिसळण्याचा सोहळा फारच छान दिसतो . . टेकडीवरून!
झिमझिम पावसात फेरी ओलांडताना नदीच्या संथ पाण्यात नाचणारे थेंब पहावे . कधी कधी नदीच्या या तीरावर पाऊस असतो तर पलीकडे नसतो . गंमत वाटते! समोरचं पांढरं शुभ्र चर्च काळ्या ढगांच्या पार्श्वभूमीवर अधिकच उठून दिसतं . अशाच एखाद्या पाऊस थांबलेल्या संध्याकाळी पानांवरून थेंब संथपणे गळत असतात . . त्यांच्या त्या लयीत एक विलंब असतो,संथपाणा असतो . . जणू काळ थोडा थांबून थांबून जातोय . आणि मग सगळीकडे कसं हिरव्याचं साम्राज्य पसरलेलं असतं . वाटेच्या कडेकडेने गवताचे कितीतरी प्रकार उगवलेले दिसतात . जितके प्रकार तितकीच विविध फुलं . वाटेवरच्या छोट्या किल्ल्यावर गवत आणि शेवाळ वाढून रहातं . घरांच्या कुंपणाच्या भींतीही हिरव्या होऊन राहतात . सगळ्या पावसाचं वैभव मिरवत वाट वाहत राहते . या पाऊलखुणा या पावसानेच जपलेल्या असतात . . . . त्या वाटेवर .

पुसून गेले गगन खोलवर, काठावरती ढग थोडासा;
थोडासा पण तीच हेळणा, पिवळा झाला फक्त कवडसा . .

पावसाचे भरीचे दिवस ओसरतात . हिरवीगार वाट रंगिबेरंगी फुलांनी नटून जाते . काही पिवळीजर्द तर काही फिक्कट जांभळी गवतफुले सगळ्या वाटेवर भेटतात . त्यांच्यावर उडणाऱ्या पिवळ्या पाकोळ्या तर सतत रस्त्यावर विहरत असतात . वाटेत पाच सात गायींचा एक कळप उभा असतो . . . आपण कितीही हॉर्न वाजवा तो काही बाजूला हटत नाही . . . चिडचिड होते अगदी! पण त्याच कळपातल्या नुकत्याच जन्मलेल्या वासराला हंबरताना ऐकून सगळा राग निघून जातो . ते आपलं धडपडत उभं रहायचा, चालायचा प्रयत्न करतं आणि सगळा कळप त्याच्या कौतुकात अन् रक्षणात तसाच उभा रहातो . . मी त्या अडचणीतून वाट काढत पुढे निघतो . पावसाळा स अंपल्यानंतर सापांची काय धावपळ चालू असते कुणास ठाऊक? पण बऱ्याचदा आपण घाईत असावं आणि एखादा भला मोठा साप सळसळत आडवा जावा . . आपल्याला त्याच्यासाठी थांबावच लागतं . आधी मी थोडा घाबरत असे . पण आता सरळ गाडी बंद करून त्याची सळसळ बघत
रहातो . मधेच हॉर्न वाजवला तर बाबा घाबरून लगबगीने निघतो . . . अशाच पानाफुलांच्या सोबतीने जात असतांना वाटेवर हिवाळ्याचा अंमल पसरू लागतो . दिवस लहान होवू लागतात आणि धुक्यात लपेटलेल्या रात्री लांबत जातात . हिवाळ्यातल्या एखाद्या दिवशी वाटेला सरत्या पावसाची आठवण येते आणि दिवसभर आभाळ भरून रहातं . सगळी कसं धूसर दिसतं . अशा वेळी नदीच्या संथ पाण्यावर अजूनच संथपणाचा भास होतो . सगळं अगदी अनोळखी वाटायला लागतं . वाट धुक्यात बुडून जाते . दुपार होऊन गेल्यावरही धुकं हटत नाही . अचानक केव्हातरी गडगडाट होतो आणि शिलकीतला पाऊसही पडून जातो . अशा
पावसानंतरच्या मोकळ्या रात्री दुधाळ चंद्र उगवतो, तोच तो कोजागिरीचा चंद्र . कुडकुडत वाटेवरचं चांदणं झेलत निघावं . . . कसल्यातरी अनामिक ओढीनं . . .

भेट माझी तुझी सांजवेळी घडे,
आता उरी,या अंबरी,चांदण्यांचे सडे . . . . .

असेच दिवस जात राहतात ऋतू बदलत राहतात . . वाटही रुपं बदलत राहते . . मीही असाच जात असतो . . . पुन्हा पुन्हा त्याच वाटेवर . . .

हे सगळं लिहितांना मी कितिदा तरी त्याच वाटेवरून फिरून आलो . कधीतरी मला माझी वाट बदलावी लागेल, तेव्हा मी विसरेन का या वाटेला? कधीतरी शहरातल्या काळ्या कुळकुळीत रस्त्यावरून जातांना माझा श्वास तर नाही ना कोंडणार? असाच विचार करतांना ही वाट मोठी होऊ लागली . जलाशयाचे समुद्रा झाले . . . सागर झाले . . महासागर झाले . . माझी आवडती टेकडी हिमालयासारखी वाढली . . . खळखळणारे बालझरे मोठमोठ्या नाद्यांत रुपांतरीत झाले . तरीही वाटेचं वाढणं काही थांबेना . . कुठवर वाढणार ही वाट? ती इतकी वाढली की मी तिच्यापासून दूर जाऊच शकत नाही . पृथ्वीवरच्या सगळ्या वाटा तिच्यात सामावून गेल्या . मी कोणत्याही वाटेवरून गेलो तरी मी असाणर आहे तो . . . . . त्याच वाटेवर . . .

- गिरीश सोनार

प्रवास

माझा मृत्यू झाला? अरे, मला कळलच नाही ! म्हणजे तसं कळलं आत्ताच घरातला फोटो बघून, घरातलं वातावरण बघून, मुलींचे थिजलेले चेहरे बघून . . .जाई . . . किती उध्वस्त दिसतेय . मी केलं हे सगळं? नाही नाही . . . मी बेजबाबदार नव्हतो . . . जाई . . तनू . . चीनू . . नाही . . नाही मी खरच नाही रे फसवलं बबड्यांनो तुम्हाला . . . . या तिघींच्या इच्छा असा फुलासारखा जपायचो मी . . मी यांना एवढं दु:ख दिलं? . .

पण मी गेलो हे मला जाणवलं कसं नाही? कशाने गेलो? जरा आठवू देत . . . . हो हो बीचवर गेलो होतो . office ची पार्टी होती . आम्ही drinks घेतली होती . जास्त नाही . . . पण हो घेतली होती . आणि पाण्यात शिरलो . मस्त लाटा फोडत पोहत होतो . . . आणि . . . आणि एक मस्त लाट आली . . . अतिशय अप्रतिम . . . . फेसाळलेली . . . नाही . . पण ती जसजशी जवळ यायला लागली तशी ती भयंकर दिसू लागली . . . तिचा तो प्रचंड आकार . . . . क्षणभर मनात चर्र झालं . . . . तो क्षण पुरला . त्या भीतीत हात पाय मारायचे भानच राहिलं नाही . पुढला विचार मनात यायच्या आत लाट मला घेऊन विरून गेली . . . . . मी आता कुठेच नव्हतो .

मित्रांची किक खाडकन उतरली होती . माझ्या जाईला कोणी आणि कसं सांगितलं हे सर्व? माझी जाई . . . जाई . . . काय होउन गेलं हे? मला तिला कधीही दु:खी करायचं नव्हतं . रागावणं, भांडणं तेवढ्यापुरतच असायचं . . . जाई . . . जाई, आय लव यू जाई . . . एक शेवटची भेट झाली असती तर . . . तुला एकदा शेवटची मिठीत घेतली असती . . . जाई, मी एकटा झालो आता . . . मी आता दिवस कसा घालवणार? पण आता दिवस, तास, मिनीटं, वर्ष हा हिशोब राहिलाच कुठे? आता एक अखंड प्रकाश आणि अखंड अंधार . . . . . एकाच वेळी? कसं शक्य आहे?

. . . . . आहे! मला दिसत चाललंय . . . प्रकाश - मी आता उरलो नाही हे सत्य . . . आणि अंधार - ज्यात माझी माणसं, माझी नाती कायमची बुडाली ते जग . . .

हे कसले धागे उडतायत आकाशात आणि या लहरी कुठल्या? हे धागे अपुऱ्या नात्यांचे, इच्छांचे आणि स्वप्नांचे आणि लहरी भावनांच्या . . . सुंदर, काही तरल, काही अपुऱ्या, काही तृप्तीच्या . . बऱ्याच अतृप्तीच्या . . . लहरी . . .

इथे शब्द म्हणजे काय कुठल्याच धाग्याला माहीत नाही . . . इथे भाषा नाही, जात नाही, धर्म नाही . . . . हे फक्त धागे . . . हे कुठलं सायन्स? क्रोमोसोम्सचा धागा असतो हे माहीत होतं . पण हे धागे कसले?

अं हं ! तिथले संदर्भ इथे लावायचे नाहीत . . . इथे फक्त मुक्त प्रवास!

या धाग्यांचं काय आता? मी माझ्या माणसांना विसरत चाललोय . . . मी कोण? मी . . . मी? . . . माझं नाव? . . . . मी हे ही विसरत चाललोय . . मी चारु? नाही नाही . . मी विवेक? . . . . मी प्रशांत? केतन? . . . मी कोण? ए आई, मी कोण? . . . आई? . . . . मी? . . . . . .

मी नाहीच! सर्व धागे तंतू सगळे निर्व्याज , निरुपद्रवी, निष्पाप!

पाप तर विकार घडवतं . . . अन् त्या विकारांना माझ्या शरिराचं घर नाही आता . . . म्हणजे या साऱ्या सदिच्छा (positive energy?) तरीही एक सूक्ष्म जाणीव कुठेतरी . . . कुठल्यातरी अतृप्तीची . . . अधुरेपणाची . . . . अं ह! त्यासाठी कुणाचा मत्सर नाही, द्वेष नाही . . . सूड तर नाहीच नाही .

मग पुन्हा हा कसला शोध? . . .शोध???

छे! शोध कुठे? हे तर भ्रमण! झालंच तर संक्रमण . . . संथ . . दिशाहीन . . अनंत भ्रमण . . . कदाचित आणखी काहीतरी . . . एक अस्वस्थता? पुन्हा अस्तित्वाचा शोध? सूर्याला अस्तित्व , पृथ्वीला अस्तित्व, ताऱ्यांना , आकाशगंगेला अस्तित्व मग हे धागे, लहरी याही अस्तित्व मिळवण्यासाठी आतुर असतील?

या ब्रम्हांडातील प्रत्येक कण अस्तित्वासाठी धडपडत असतो . . सूर्यकिरणांनी मातीतल्या बीजाला आवेगाने भेटावं आणि त्याला फुटलेल्या अंकुराच्या रुपात अस्तित्व मिळवावं इतका आवेग या धाग्यांमधी असेलच . . .

मग पुन्हा सुरु होत असावा प्रवास . . . शरीर . . . विकार . . . मुक्ती . . . अन् पुन्हा शोध अस्तित्वाचा!

- मेघधारा

माझिया गावी . . .

साधारण सहावी सातवीत असताना पु . लं . चं 'तुम्हाला कोण व्हायचंय - पुणेकर, मुंबईकर की नागपूरकर' वाचलं, तेव्हा या यादीत कोल्हापुरकर का नाही, या प्रश्णानं बराच काळ छळलं होतं मला . पण जशी समज वाढत गेली तसं कळलं की, अहो कोल्हापुरकर व्हायला तुम्हाला वेगळं असं काही करावंच लागत नाही . तुम्ही कुणीही असलात तरी त्याचवेळी कोल्हापुरकरही आरामात होवू शकता कारण तुम्ही काही करण्याआधी कोल्हापुरकरच तुम्हाला आपलंसं करून घेतात!!

कोल्हापूर, माझं गाव . पंचगंगेकाठी वसलेलं . कोल्हापूरची ही जीवनदायिनी .

कोल्हापूर आमच्या अंबाबाईचं . हो, खुद्द कोल्हापुरात तिला अंबाबाईच म्हणतात, बाकी महाराष्ट्रभरासाठीची ती महालक्ष्मी . साडेतीन शक्तिपीठांपैकी एक . पश्चिमेकडे तोंड करुन बसलेली, नखशिखांत सालंकृत असलेली, मिनिटागणिक साड्या बदलणारी, प्रेमळ डोळ्यांची आणि प्रसन्न मुद्रेची . अगदी देखणी . कोल्हासूरमर्दिनी . पुण्यात जेव्हा आम्ही नवीन घरात रहायला आलो तेव्हा शेजारच्या इमारतीत रहाणाऱ्या आमच्या स्नेह्यांना आम्ही घरी बोलावलं होतं, पहिल्यांदाच . आमच्या घरात शिरतानाच दर्शनी भिंतीवर अंबाबाईचा बऱ्यापैकी मोठा फोटो लावलेला आहे . त्यांनी आत आल्या आल्या विचारलं, कोणती देवी आहे हो ही? मी थक्क! असा प्रश्न मला कधी कुणी विचारेल ही अपेक्षाच नव्हती . तर म्हणे आम्ही नागपूरचे आहोत आणि कधी आलोच नाही तिकडे त्यामुळे माहीत नाही . माझ्या चेहऱ्यावरच्या हावभावांमुळे विचाऱ्यांना प्रचंड ओशाळल्यासारखं झालं असेल . माझीही चुक झाली कि मी गृहितच धरून चालले कि ही सर्वांना माहितच आहे . पण खरंच हो, अगदी कानाकोपऱ्यातले लोकदेखील तिला ओळखतात . अजून मीही कधी माहूर, वणीला गेले नाही, तरी मला यमाई, सप्तशृंगी या बघून माहिती आहेत . . . . आणि ही बाई तर अगदी आवर्जून लक्षात राहण्याइतकी विलक्षण देखणी आहे . जाऊ दे, होतं असंही कधी कधी . पण बहुतेक सगळी मराठी कुटुंबं निदान आयुष्यात एकदा तरी भेटतातच! आम्हा स्थानिक लोकांचा तर एकदा तरी तिचं दर्शन घेतल्याशिवाय मुळी दिवसच पूर्ण होत नाही . शिवाय ती अशा ठिकाणी बसली आहे की देवळात कितीही गर्दी असली तरी महाद्वारात उभं राहून विना अडथळा तिचं दर्शन घेता येतं . अगदी आपल्यालाच काय, रविराजालासुध्दा! या रचनेमुळे साधारण जानेवारीत सूर्याची उन्हं पश्चिमेकडून प्रथम तिच्या पावलांवर आणि मग वर सरकत चार पाच दिवसांनी चेहऱ्यावर पडतात . जणू समोरचा रंकाळ्याकडून येणारा ताराबाई रस्ता हा त्या सूर्यासाठीच खास तयार करण्यात आला असावा . मी स्वत: कधी हे दृश्य पाहिलं नाही, पण ते केवळ अपूर्व असेल!

मंदिर भला मोठ्ठा प्राकार असलेलं . उंच शिखरं, काळ्या पाषाणाचं घडीव बांधकाम, मोजकं कोरीवकाम असलेलं मुख्य देऊळ . प्राकारात मोठाल्या दीपमाळा, मोठं कारंजं आहे . मुख्य देवळाला लागुनच असलेला गरुड मंडप . अलिकडच्या काळात बांधलेला . हा कोडोलीकरांच्या पूर्वजांनी (माझं सासर) बांधलाय, हे हल्लीच मला कळलं . (अभिमानास्पद गोष्ट!) इथे भजनं, किर्तनं, प्रवचनं होतात . महाद्वार दरवाजाच्या शेजारीच माडीवर सनई चौघड्याची जागा . अजूनही सणासुदीला, नवरात्रात ते झडतात . तशीच घाटी दरवाजावरची अवाढव्य पंचधातूची घंटा, पुर्वी हिचा घाट अख्ख्या शहराला ऐकु जात असे . प्राकारात मुख्य देवळाच्या आजुबाजूला असलेली दत्तगुरु, महादेव (अतीबलेश्वर), गारेचा गणपती (हा संगमरवरी आहे म्हणून असं नाव), तुळजाभवानी, रामराय, मारुतराय, खंडोबा, शनीमहाराज आणि इतर असंख्य देवांची देवळं . देवळाच्या बाहेर घाटी दरवाजात काशी विश्वेश्वर (याच्या समोरच्या कुंडातली भरपुर कासवं हे आमचं शाळेत जातायेताचं मुख्य आकर्षण) आणि जरा दूर ज्योतिबाही . देवळाच्या मागच्या बाजुला भलाथोरला वड आणि त्याला पार, हा रामाचा पार . याच्याच एका कोपऱ्यात तोफ ठेवलेली आहे जी दर शुक्रवारी रात्री 10 वाजता डागली जाते . देवीची नवरात्रातली शोभा तर डोळे दिपून जावेत अशी! दर दिवशी एक नवी पूजा, दर रात्री पालखीतून परिक्रमा, तिच्या पायी सेवा वहायला आलेल्या कलाकारांचे कार्यक्रम (सु . ग . शेवडेगुरुजी आणि रामदासीबुवा यांच्या प्रवचनांना आम्ही अगदी आवडीने जायचो) आणि तिच्या दर्शनासाठी झालेली भक्तांची अफाट गर्दी . नवरात्रातलं कोल्हापूर काही वेगळंच असतं .

देवळाला एकूण चार दरवाजे . महाद्वार (पश्चिमेचा), घाटी (उत्तरेचा), पूर्व (देवीच्या मागचा) आणि विद्यापीठ दरवाजा (दक्षिणेचा) अशी ही भव्य प्रवेशद्वारं . महाद्वार दरवाजाबाहेरचा रस्ता म्हणजे महाद्वार रस्ता, हा म्हणजे जसा पुण्याचा लक्ष्मी रस्ता . (कोल्हापुरातले तरुण संध्याकाळी एकदा तरी इथे चक्कर टाकतातच, का ते मी सांगायला नकोच!) संध्याकाळी आबालवृध्द, बाळगोपाळ, स्त्रिया यांची देवळाच्या आवारात खूप गर्दी असते . घरातल्या कुणाला शोधायचं असेल तर देवळात चट्कन् सापडतात . दिवाळीच्या पहिल्या दिवशी अभ्यंगस्नान झाल्यावर नवे कपडे ल्यालेलं कोल्हापूर पहिलं देवीच्या दर्शनाला लोटतं, मग घरी जाऊन पहिला फराळ . पुण्यात आल्यापासून दिवाळीची ही सकाळ मी अगदी मिस करते .

अंबाबाई ही तिरुपतीच्या बालाजीची अर्धांगिनी . तो विष्णू आणि ही महालक्ष्मी . अलिकडेच कोल्हापूर ते तिरुपती ही 'हरिप्रिया एक्सप्रेस' सुरु झाली ती हे नातं लक्षात घेऊनच . कोल्हापूरच्या एका टोकाला गावाबाहेर वसलेली 'त्र्यंबोली' उर्फ 'टेंबलाई' आणि अंबाबाई या दोघी बहिणी बहिणी . पण दोघीत काहीतरी बिनुष्ट आलं म्हणुन ती रुसून तिकडे जाऊन बसली तीही पुर्वेकडे तोंड करुन म्हणजे हिच्याकडे पाठ करुन . वर्षातुन एकदा अंबाबाई या बहिणीला पालखीतून भेटायला जाते तो नवरात्रातल्या पंचमीचा, या दिवशी टेंबलाईला मोठी जत्रा भरते .

कोल्हापूर पूर्वी कधीतरी टुमदार असलं पाहिजे . बिंदु चौकातले आजही सुस्थितीत असलेले दोन भव्य बुरूज ही पूर्वी गावाची हद्द होती . ही पुर्वेकडची वेस धरून डावीकडे सरकलं तर गंगावेस, रंकाळावेश, वरुणतीर्थ वेस या वेशी देऊळ मध्यभागी ठेवून वर्तुळ काढायचं म्हटलं तर परिघावर याव्यात . त्यापुढच्या वेशी कालौघात नामशेष झाल्या असण्याची शक्यता आहे . या वेशींवरुन आमच्या घरात एक गंमत घडायची . माझं माहेर देवळाच्या अलिकडे तर सासर पलिकडे . पूर्वी आम्ही शिवाजी रस्त्यावर रहायचो आणि हा रस्ता बिंदु चौकात संपतो . त्यावरुन माझा नवरा मला चिडवायचा की आम्ही वेशीबाहेरचे म्हणुन . मला राग यायचा तेव्हा पण आता माझे बाबा महाद्वार रस्त्यावरच रहायला आल्यामुळे हे बंद झालंय .

कोल्हापुरात शिरतानाच कावळा नाका चौकात एक अजब बघायला मिळतं ते म्हणजे घोड्यावर बसलेल्या ताराराणीचा पुतळा . तिने तलवार उंचावुन त्वेषाने घोड्याला टाच मारली आहे, त्यामुळे त्याचे दोन पाय हवेत आणि दोन पाय खाली टेकलेले आहेत, वरचं सगळं वजन त्या दोन टाचांवर पेललेलं आहे . दोन टाचा आणि घोड्याचं शेपूट या तीन बिंदूंच्या आधारे प्रभावीपणे गुरुत्वाकर्षणाच्या नियमाचा वापर करुन ही किमया साधली आहे . त्यामुळे हा शिल्पकलेचा एक उत्तम नमुना समजला जातो . हा पुतळा बनवला आहे ख्यातनाम शिल्पकार रविंद्र मेस्त्रींनी . (प्रख्यात चित्रकार बाबुराव पेंटर जे प्रभात फिल्म कंपनीतही कार्यरत होते, त्यांचे हे चिरंजीव .)

कोल्हापूर हे रसिकांचं गाव . प्रसिध्द शास्त्रज्ञ डॉ . जयंत नारळीकर मुळचे कोल्हापूरचे . हे त्यांचं जन्मगावही . गेल्या वर्षीपर्यंत महाद्वार रस्त्यावर त्यांचं घरही होतं . नुकतंच ते नवीन बांधलंय . संगीत क्षेत्रातल्या सर्व दिग्गजांचे गुरु स्व . अल्लादियाखाँ साहेब वास्तव्याला कोल्हापुरात होते . आता देवल क्लबच्या चौकात त्यांचा पुतळा उभा आहे . भारतीय चित्रपट सृष्टीचा पाया घातलेल्या दादासाहेब फाळकेंनी कारकिर्दीला सुरुवात कोल्हापुरातुन केली . आता त्यांनी हाताळलेला कॅमेरा त्यांची स्मृती म्हणुन माझ्या शाळेशेजारी न्यु महाद्वार रस्त्यावर लावलाय, ज्याचं अनावरण व्ही . शांतारामांच्या हस्ते झालं होतं . किर्तीमान प्रभात फिल्म कंपनी ही स्थापन कोल्हापुरात झाली आणि काही वर्षानंतर पुण्यात स्थलांतरीत झाली . महाराष्ट्राबद्दल बोलावं तर काव्य -शास्त्र -विनोदाशी निगडीत बहुतेक सर्वच अतीरथींचं कोल्हापुराशी घट्ट नातं राहिलेलं आहे . प्रा . शिवाजीराव भोसले शिकायला काही काळ राजाराम कॉलेजला होते आणि त्यांना शिकवत प्रा . ना . सी . फडके . मराठी चित्रपटातले जुने थोर कलाकार तर इथेच रहात, नावं घ्यायची म्हटलं तर जागा पुरायची नाही, आम्ही मुलं या लोकांना पहातच लहानाचे मोठे झालो . फार पुर्वी सुधीर फडके, संगीतसुर्य केशवराव भोसले, मंगेशकर भावंडंही इथे रहात हे सर्वांनाच माहित आहे आणि हे सर्वच पुढे किर्तीवंत, यशवंत झाले तेव्हा कोल्हापुरबद्दल कृतज्ञ राहिले .

कोल्हापुरातल्या काही नामवंत संस्था, जसे जयप्रभा आणि शांतिकिरण स्टुडिओ, देवल क्लब, भोसले नाट्यगृह, शिवाजी विद्यापीठ, राजाराम कॉलेज, करवीर नगर वाचन मंदीर, खासबाग मैदान,

यांनी कोल्हापुर खच्या अर्थानं समृध्द करायला हातभार लावला . देवल क्लबने नृत्य -गायन -वादन }या कला वृध्दिंगत करण्यासाठी अविरत प्रयत्न केले, अजुनही करते आहे . टेंबे रस्त्याच्या कोपऱ्यावर असलेल्या क्लबच्या मुळ इमारतीत मलाही शिकायला मिळालं . मधे मोठा हॉल, त्याच्या भिंतींवर मोठमोठ्या कलाकारांच्या तसविरी आणि सर्व बाजुंनी हॉलमधे उघडणाऱ्या खोल्या अशी ती एक आदर्श जागा होती . त्या खोल्यांतुन गाणं, नृत्यामुळं घुंगरू, संवादिनी, तबला, सतार, व्ह्यायोलीन अशा सगळ्या सुरांची हॉलमधे सरमिसळ होउन एक जादूभरं वातावरण निर्माण होत असे! आता क्लब समोरच भोसले नाट्यगृहापाशी गेलंय . भोसले नाट्यगृह तर सर्वात जुन्या थिएटर्स पैकी एक . बालगंधर्व, दिनानाथ यांनी गाजवलेलं याचं व्यासपीठ . इथलं वैशिष्ट्य असं की या स्टेजखाली मोठी विहीर आहे, ज्यामुळे आवाज उत्तम प्रकारे घुमतो . मलाही इथे उभं रहायला मिळालं ते माझ्या शाळेमुळे . मी पद्माराजेची विद्यार्थीनी आणि दरवर्षी संगीत नाटकं सादर करायची शाळेची जुनी परंपरा . शाळेकडे कायमचा रंगपटच तयार असायचा ज्यात खरे शालू, दागिने, पडदे, भरजरी कपडे असत . मी आठवीत असताना 'स्वयंवर' करायचं ठरलं आणि मला कृष्णाची भुमिका मिळाली . सगळी शिलेदार मंडळी आमच्या तालमी घेत, तेव्हा स्व . जयराम शिलेदारही होते . प्रयोग अर्थातच भोसले नाट्यगृहात झाले . आजही त्या आठवणींनी मन अभिमानानं भरुन येतं . करवीर नगर वाचन मंदिर ही तर एक सुखद वास्तु . इमारतीसकट सगळं वातावरण वाचनाला पुरक . लहान असताना आत्याबरोबर मी तिथे जात असे पुस्तकं आणायला . मला वाचनाची गोडी या वाचनालयानं लावली आणि वाढवली बाबांच्या न्यु . हायस्कुलच्या लायब्ररीनं . शिवाजी विद्यापीठानं तर कोल्हापुरला महाराष्ट्राच्या शैक्षणिक नकाशावर स्थान दिलं . माझे बाबा सांगतात की 1962 साली त्यावेळचे राष्ट्रपती डॉ . राधाकृष्णन् यांच्या हस्ते उद्घाटन झाल्यावर सुरुवातीला काही वर्षे याचे वर्ग कावळा नाक्याजवळ असलेल्या ओपल हॉटेलमधे भरत . मग स्वतंत्र इमारत झाल्यावर आता गेल्या पाव शतकात तिकडचा परिसरही विकसीत झाला . राजारामपुरीचं शेवटचं मारुती मंदिर आहे तिथवरच वस्ती होती पुर्वी, बाईच्या पुतळ्यापर्यंत, नंतर विद्यापीठामुळं राजारामपुरी वाढली . खासबाग हे तर केवळ कुस्तीसाठीच असलेलं प्रसिध्द मैदान . मैदान असं नव्हेच, कुंडा जसा असतो तशी चहुबाजुंनी उतरती बैठक असलेली आणि मधे छोटं बुड असल्यासारखी एक मोठी जागा, प्रचंड आवाका असलेली . हे कोल्हापुरकरांचं अंबाबाईखालोखाल भक्तीस्थान . मी स्वत: तर कुस्ती कधी पाहिली नाही पण माझे सासरे माझ्या नवऱ्याला नेत असत त्यामुळे त्याच्याकडुन वर्णनं ऐकली आहेत . जेव्हा मोठ्या कुस्त्या असत तेव्हा भारत पाकिस्तान क्रिकेट मॅचच्या वेळी पडतात तसे रस्ते ओस पडत एवढं लक्षात आहे . जशी पुण्यातली तरुण मंडळं तशा इथल्या तालमी . त्यातही मोतीबाग, गंगावेश, शाहूपुरी, काळाइमाम, बाराइमाम या विशेष . मी शाळेत असताना युवराज पाटलांबद्दल क्रेझ होती, कारण त्यांनी सत्पालला हरवलं होतं . हिंदकेसरी आणि रुस्तम् -ए -हिंद हरीश्चंद्र बिराजदार, हिंदकेसरी गणपतराव आंदळकर असे सगळे नामवंत मल्ल जाता येता रस्त्यावर दिसायचे .

यावरुन आठवला तो आमचा दुधकट्टा! हे एकमेव असं शहर आहे जिथे म्हशीचं धारोष्ण दुध विकत मिळतं . गंगावेश आणि मिरजकर तिकटी या कट्ट्यांवर रात्री गवळी म्हशी आणुन बांधतात . आपल्याला दुध हवं असल्यास सरळ पितळेच्या लख्ख घासलेल्या पेल्यातच आचळं पिळून पेला भरुन निरसं, कढत दुध देतात . या दुधाचं पोषणमुल्य जबर असतं . तशीही कोल्हापुरच्या दुधाची चवच न्यारी, गुणवत्ताही . म्हणुन तर इथलं आईस्क्रीम खा, पोट भरेल पण मन भरणार नाही, तीच गोष्ट दह्यातुपाची, खव्याची . गोकुळ, वारणा, स्फुर्ती ही सगळी उत्पादनं इकडचीच . आजकाल चितळेदेखील पाटी लावतात 'खव्याची खात्री नाही' पण अशी पाटी कोल्हापुरात काय दिसेल तुम्हाला? शक्य नाही!

कोल्हापुरबद्दल बोलावं आणि मिसळ, पांढरा रस्सा, गुळ या बाबी विसराव्या, कसं शक्य आहे? पुण्यातली कुठलीही मिसळ खाल्ली तरी आम्हाला आवडत नाही कारण त्यात असते बटाट्याची भाजी, पोहे आणि ही एवढी लाल तिखटाची भुकटी! मुळ मिसळ अशी नसते, ती फक्तच तिखट नसते, तिला अफाट चव असते, आम्हाला कधी सर्दी झाली तर बाबा मिसळ खायला नेत, असं नाकाडोळ्यातुन पाणी वाहे की सर्दी गायब! पांढऱ्या रश्शाबद्दल मात्र मी याशिवाय फार काही सांगु शकणार नाही की कुणीही सेलेब्रिटीज इथे आले की ते पांढऱ्या रश्श्याची फर्माईश करतात, मग तो ऋषी कपूर असो, मिलींद गुणाजी असो की दीक्षितांची माधुरी! कोल्हापुर ही गुळाची सर्वात मोठी बाजारपेठ . जिल्ह्यात एकुण 17 साखर कारखाने असले तरी सगळेच काही ऊसाची साखर करत नाहीत . आजुबाजुला सगळा ऊसच असल्यामुळे गुऱ्हाळंही तितकीच . आता यावर्षीचा सीझन नोव्हेंबरपासुन सुरु होईल . बाहेरच्या रस्त्यांवरुन शहरात शिरताना रात्रीच्या वेळी बाजुच्या शेतांमधुन धूर निघताना दिसतात, प्रचंड भट्ट्या पेटलेल्या दिसतात, त्यावर ह्या थोरल्या काहिली चढवलेल्या असतात आणि माणसं घामाघुम होऊन लगबग करत असतात . सोन्यासारख्या रंगाच्या पहिल्या सायीच्या ताज्या गुळाची चव घेतली आहे का कधी? या मग कोल्हापुरला, जाऊ आपण . गुळाबरोबरच एक शिसा भरुन काकवीही मिळेल प्रेमाने .

कोल्हापुरची चप्पल ही देखील आता आंतरराष्ट्राय आवडीची गोष्ट झालीय, तिचे निर्यातीचे दरसाल वाढत चाललेले आकडेच सांगतात . एक पुर्ण चांभार आळीच आहे कोल्हापुरात जिथे कोल्हापुरी चप्पलेशिवाय इतर काही दिसत नाही . कसाही पाय असो, ही त्या पायाचा रुबाब वाढवते हे निश्चित . इतक्यांदा कोल्हापुरला जाते पण दरवेळेस मित्रमंडळींपैकी कोणी ना कोणी चप्पल आणायला सांगतंच .

कोल्हापुर एक ऐतिहासीक गाव . पूज्य ताराराणीसाहेबांनी मराठी साम्राज्याची एक शाखा इथे आणुन स्वतंत्र गादी स्थापन केली . पुढे करवीरच्या इतिहासात आणि अस्पृश्य निवारणाच्या कार्या मुळे भारताच्या इतिहासात अजरामर झालेले राजर्षी शाहू महाराज हे त्याच फांदीचं वटवृक्षात झालेलं रुपांतर . हे घराणं आजही अस्तित्वात आहे, अगदी सरंजामशाही टिकुन आहे असं नाही म्हणता येणार पण करवीरच्या प्रजेच्या मनातलं मानाचं स्थान टिकवुन आहे . साताऱ्याच्या मुळ शाखेच्या वंशजांनी इतिहासाला गालबोट लावणारी कृत्यं केल्याच्या पार्श्वभूमीवर तर हे मुद्दाम सांगणं आवश्यक आहे . काही परंपरा या आजही मनोभावे, सादर पाळल्या जातात . बोलकं उदाहरण शिलंगणाचं, कोल्हापुरात एक चौकच आहे यासाठी, या दसरा चौकात स्वत: श्रीमंत शाहू महाराज आणि त्यांच्या कुटुंबीयांनी सीमोल्लंघन केल्याशिवाय प्रजा सोनं लुटत नाही . खंडेनवमीला घरातल्या शस्त्रास्त्रांची यथासांग पुजा केली जाते . बहुतेक सरदार घराणीच असल्यामुळे अजुनही कोल्हापुरात मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्रं आहेत .

मराठी इतिहासाची साक्ष देणाऱ्या जुन्या इमारती आजही कोल्हापुरात उत्तम स्थितीत दिसतात . जुना राजवाडा, तुळजाभवानीचं मंदिर (या दोन्ही इमारती इतक्या भव्य आहेत की यात तीन स्वतंत्र हायस्कुल्स भरतात!), नवा राजवाडा (इथे दुसऱ्या मजल्यावर स्वत: राजे रहातात), रंकाळा तलाव आणि त्याच्या काठावरचा शालिनी पॅलेस (आता इथे हॉटेल झालय), ही सगळी ऐतिहासीक बांधकामं . रंकाळ्याबद्दल असं म्हटलं जातं की त्यात एक भुयार आहे, जे थेट पन्हाळ्याला जाऊन उघडतं!! (मी लहान असताना राजवाड्यासारख्याच इमारतीत भरणाऱ्या इंदूमतीदेवी या मुलींच्या शाळेत तर अशी वदंता होती की तिथल्या दुसऱ्या की तिसऱ्या मजल्यावरच्या एका दालनात अमावस्या की पोर्णिमेला एक सुंदर मेंदी काढलेला, भरपुर बांगड्या घातलेला आणि मोरपीस घेतलेला हात दिसतो!! आता हसू येतंय पण तेव्हा गाळण उडायची ऐकताना!) पुर्वी जुन्या राजवाड्यात एक बर्चीबहाद्दर नावाचा हत्तीही झुलत असायचा, नंतर अंकुशाने झालेली जखम चिघळुन त्याचा मृत्यु झाला . नवीन राजवाड्यातल्या आणि तुळजाभवानी मंदिरात ठेवलेल्या शाहू महाराजांच्या वस्तु तेव्हाच्या वैभवाची साक्ष पटवतात तर त्यांनी मारलेला प्रचंड गवा शेजारीच उभ्या असलेल्या त्यांच्या मूर्तीपुढे गरीब गायीसारखा दिसतो!

कोल्हापुरात ब्राह्मण तसे अल्पसंख्यांकच . बहुतेक वस्ती ही खानदानी मराठा (96 कुळी) आणि मुस्लीम समाजाची . पण हे दोन्ही समाज आजवर गुण्यागोविंदानं रहात आले आहेत . इथल्या 96 कुळी मराठ्यांची गंमत सांगायची म्हणजे थोडी पुनरोक्ती होईल पण तरीही सर्वांना माहित असेलच असं नाही म्हणुन पुन्हा सांगते . पं . हृदयनाथ मंगेशकरांनी एकदा कोल्हापुरात त्यांच्या कार्य क्रमात 'वेडात मराठे वीर दौडले सात' म्हटलं . मध्यंतरात सहासात तरुण आत आले आणि विचारु लागले की तुम्ही मराठ्यांना वेडे का म्हणताय वगैरे . त्यावर त्यांनी सांगितलं की बाबांनो, हे मी नाही तर कुसुमाग्रज म्हणतात आणि वेड म्हणजे खुळ नाही तर, ते सगळे महाराजांच्या आज्ञेने बेभान होऊन खानाच्या छावणीवर तुटुन पडले आणि त्या त्यांच्या आवेशाला वेड असं कवीनं संबोधलंय वगैरे . यावर त्यातल्या एकानं हळुच विचारलं, का हो? ते सगळे 96 कुळी होते का? पंडीतजींना हसावं का रडावं कळेना, ते गंमतीनं म्हणाले, अहो 96 कुळीच, मी स्वत: छावणीच्या दरवाजात उभा होतो आणि कुणालाही 96 कुळी का असं विचारल्याशिवाय आतच सोडलं नाही!!
असा हा अभिमान 96 कुळी असण्याचा .

कोल्हापुर हे कोकणचं प्रवेशद्वार . रत्नागिरी तर पुर्वी कोल्हापुरच्या ऑक्सीजनवर असायची . भाज्या, औषधं, फळं, काही ताजं मिळायचं नाही तिथे . मुंबईच्या तुलनेत कोल्हापुर मात्र अगदी जवळ, एक आंबा घाट ओलांडला की बस्स! याच रस्त्यावर एका बाजुला पन्हाळा आहे . बाजीप्रभूंच्या पराक्रमाची साक्षीदार पावनखिंडही इथुन जवळच . कोल्हापुरातुन 12 मैल पन्हाळा तर 12 मैल ज्योतिबा . दोन्ही स्थानं आमच्या हृदयाजवळची, जणू वेशींवर उभे दोन पहारेकरीच . ही दोन ठिकाणं, गारगोटी रस्त्यावरचं कात्यायनीचं शांत रम्य देऊळ, कागल रस्त्यावरचा मोठा कण्हेरी

मठ, ही आमची एका दिवसाच्या सहलीसाठी जायची ठिकाणं. जाऊन नुसतीच धमाल करायचो, कचरा किंवा वाह्यातपणा नाही. पण आता पन्हाळा मात्र या वाईट गोष्टींमुळे पार पावित्र्यच हरवुन बसलाय, अगदी बकाल झालाय. कोल्हापुर कर्नाटकाच्या हद्दीवर असल्यानं इथल्या बोलण्यातही एक हेल स्पष्ट जाणवतो ज्यामुळे एक स्पेशल कोल्हापुरी टोन निर्माण झालाय, विशिष्ट गोडवा निर्माण झालाय तिच्यात. पुर्वी मला तो अजिबात आवडायचा नाही, मी लहान असताना दिवाळी, मे महिन्याच्या सुट्टीत, इतरही वेळी सारखी पुण्यातच असायची त्यामुळे तिथे राहुनही माझ्या बोलण्यात तो हेल कधीच आला नाही. पण आज मात्र त्याचं वाईट वाटतं की प्रयत्न करुनही मी तसं बोलु शकत नाही.

कोल्हापुरच्या आदरातिथ्याबद्दल काय बोलावं? अगदी पिठलं भात का होईना, पण असा आग्रहाने वाढतील की जीव गुदमरुन जावा! लवंगी मिरची मागा, पण गुळमाट जेवण मात्र इथे मिळायचं नाही. तीही अशी तिखट की एका मिरचीला अख्खा नारळ लागतो, तरीही प्राण कंठाशी आणणारा झणझणीतपणा शाबुत!! इथला छत्र्यांचा संगीत चिवडाही नामांकीत. पु. ल. जेव्हा पहिल्यांदा परदेश प्रवासाला निघाले तेव्हा स्वत: छत्र्यांनी खुप वय झालं असुनही आपल्या हाताने केलेल्या चिवड्याचा डबा त्यांना पाठवला होता जो त्यानी तब्बल 40 वर्षांनी स्वत: बनवला.

कोल्हापुरात खरेदीची माझी अत्यंत आवडीची ठिकाणं म्हणजे घाटी दरवाजातल्या फुलवाल्यांकडुन, समोरच्या माळणींकडुन फुलाचा पुडा घ्यायचा, महाद्वारातल्या गजरेवाल्यांकडुन गजरे घ्यायचे (इथे 12 ही महिने त्या त्या मोसमाच्या फुलांचे गजरे मिळतात, जाई, अबोली, मोगरा वगैरे) आणि कपिलतीर्थात जाऊन ताजी रसरशीत भाजी घ्यायची, सणासुदीला तिथेच भास्करराव जाधव वाचनालयाखाली बसलेल्या खवेवाल्याकडुन कधी बासुंदी, कधी गुलाबजाम तर कधी नुसता खवा घ्यायचा! कित्येकदा तरी आम्ही तो नुसताच साखर घालुन खातो! बेळगावच्या कुंद्यासारखा लागतो.

माझं गाव म्हणुन सगळे गोडवेच गातेय असं म्हणाल, पण खरोखरंच मुद्दाम दाखवण्यासारखे दुर्गुण असे नाहीतच. एकच आहे तो म्हणजे सुस्त जीवनक्रम. कुणाला कशाची घाई नाही, कसली फारशी चिंता नाही. इमानेइतबारे नोकरी आणि घर याशिवाय जग नाही. मुंबई जशी अतीजलद तसं कोल्हापुर अतीसुस्त. आज बाहेर पडल्यावर हे जाणवतंय, पण पुर्वी मी तिथे असताना अशीच वागत असेन. एका दृष्टीने बरंही वाटतं की निदान यांना आपल्यासारखी धावपळ करावी लागत नाही. . . . ऊठलो म्हणेपर्यंत ऑफिसला जायची वेळ होते की डबा भरुन चालायला लागा, घरी येईपर्यंत अंधार पडुन दिवस जवळजवळ संपलेला असतो आणि जरा झोपतोय म्हणेपर्यंत लगेच ऊठायची वेळ होतेच. . . . !!

मी जरी कोल्हापुरची असले तरी माझा जन्म तिथला नाही. पण संस्कारक्षम म्हणतात त्या वयात मी कोल्हापुरातच होते आणि आयुष्यातल्या उलथापालथ करणाऱ्या घटना तिथेच घडल्या. त्यामुळे असं म्हणता येईल की तिथे आयुष्याचा पाया घातला गेला. पुर्वी मला अजिबात कोल्हापुर आवडत नसे, कधी एकदा इथुन बाहेर पडतो असे झालेले, पण आता कोल्हापुराची किंमत कळतेय. इतकी की नुसती कोल्हापुरकडे जाणारी एखादी बस बघितली तरी बरं वाटतं. पुर्वी तर कुठेही एम्. एच्. 09 दिसली तरी लगेच आम्ही तिच्या मागावर जायचो! किती वेडेपणा! पण आम्हाला पुण्यातच असल्यामुळे कोल्हापुरशी संबंधीत काही ना काही सतत दिसु शकतं, अगदीच रहावलं नाही तर मिळेल ती गाडी पकडुन लगेच गावाकडं निघुही शकतो, पण सातासमुद्रापलिकडे असणाऱ्यांचं काय? आम्हाला जशी पुणे कोल्हापुर निमआराम दिसते, तसं तुम्हा बाहेर असणाऱ्यांना एखादं न्युयॉर्क कोल्हापुर, लंडन कोल्हापुर असं थेट हवाईजहाज दिसलं तर? मजा येईल ना? मग तसं ते तुम्हाला कधीतरी नक्की दिसो ही रम्य कल्पना दिवाळीच्या अनंत शुभेच्छांसह मोफत भेट !!!!

- सई कोडोलीकर

हास्यमंच

- लेडी पोलीस - विनय देसाई
- उगाच आपलं काहीतरी . . . - प्रसादशिर
- संथ घोरते कृष्णाबाई - मिल्या
- दिवस तुझे हे फुगायचे - अवधूत दिगंबर

लेडी पोलीस

सदा मित्रांचा 'टोळक्यात' बसून 'गजाली' करत होता तेवढ्यात रस्त्यावर हवालदार दिसला. 'भाजीबाजारात' हवालदार दिसणे ही काही अपूर्व घटना नव्हती त्यामुळे सर्वांनी त्याला पाहिलं असलं तरी गजालींचा विषय तसाच चालू राहिला. काल रात्री झालेल्या मारामारीचा. सदा कोणाचीतरी कशी खेचली हे रंगवून सांगत होता, आणि बाकी मंडळी खिदळत होती.

'अरे, मियां तुका सांगतय, तो परत माझ्या वाटेक कदी येवचो नाय. माका शिकवता. राग इलो तर बापाशीक बापूस म्हणाचय नाय मी. काय समाजला?'

खरं सांगायचं तर सदा हा आमच्या गावातला एक बेकार तरूण. शाळेच्या दिवसात शाळेपेक्षा इतर गोष्टीमध्ये लक्ष असायचं त्याचं. पायात साधं बाटाचं स्लीपर घालून माडावर चढायचा तो. तो शाळेत असेपर्यंत शाळेच्या आवारातल्या माडावरचे 'बोंडे' कधी नाहीसे होत कळत नसे. कसा बसा ढकलत ढकलत पाचवी पर्यंत शाळेत गेल्यानंतर सदाने शाळा सोडली आणि तो S.T. स्टँडवर दिवसभर फिरायला मोकळा झाला. उन्हाळ्यात कोकणात सुट्टीसाठी येणाऱ्या चाकरमान्याना परत जाताना मुम्बई गाड्यांवर शीटा मिळवून देणे, प्रायवेट गाड्यांची तिकिटे ब्लॅक करून तिकिटामागे पाच धा रूपये कमावणे, दुबईहून आलेल्या लोकांची घड्याळं, टेप इत्यादी सामान ब्लॅकमध्ये विकून देणे, असे बरेच उद्योग तो करत असे. (ब्लॅकच्या धंद्यामुळे त्याला सदा " काळे " म्हणून ओळखत असत.) कसंबसं पोट भरेल एवढे पैसे त्याला सुटत असत. बाकी वेळ मित्रांबरोबर बसून मोठ - मोठ्या गजाली करणे, मोठी मोठी स्वप्नं बघणे यातच सदाचं बालपण कधी गेलं ते त्यालाही कळलं नाही. थोडक्यात सदाच्या आयुष्यात सांगण्या सारखं काही विशेष नव्हतं.

पण हल्ली मात्र सदामध्ये बराच फरक दिसून येत होता. पूर्वी जे लोक त्याला काडीचीही किंमत द्यायचे नाहीत ते हल्ली 'कसां काय सदा ?' असं विचारू लागले होते. 'चाय'च्या हाटेलाचा मालक पूर्वी चहा देण्याआधी 'आमी उदारी बंद केली हा' असं बीनधास्तपणे सांगत असे तो आता काही न बोलता चूपचाप 'उधारी' करू देत होता. सदा सारख्या इतर अनेक तरूणांच्या टोळक्यामधे का असेना सदाला 'भाव' होता.

कोकणात गेल्या काही वर्षात 'श्रीसेने'चा प्रभाव वाढत होता. पूर्वी चाकरमान्याच्या 'खोली' आणि 'चाळी'तून आलेली 'श्रीसेना' हळूहळू आपले पाय त्यांच्या घरात म्हणजे 'कोकणात' पसरत होती. गावा गावात 'श्रीसेने'च्या कचेऱ्या उघडत होत्या. पूर्वी 'रिकामटवळी' फिरणारी बरीच तरूण पोरं आता 'श्रीसेने'त सामील झाली होती.

सदा हा असाच एक तरूण. पोटापाण्याचा काही उद्योग मिळेल या आशेने सेनेच्या कचेरीत पोहोचला. आणि त्यांचे जाहीरातींचे फलक रंगवता रंगवता एका 'निवडणूक' हंगामात एकदम 'लीडर' झाला. खरं तर तो 'लीडर' आहे असं त्याला कोणी सांगितलं नव्हतं. 'श्रीसेने'ची गावची कचेरी सोडली तर त्याला बाहेर कोणी ओळखला नसता. पण ऐन निवडणूकीच्या धामधूमीत काही पैसे खिशात खुळखुळायला लागले होते. चार दोन स्थानिक आणि एका दोघा राज्यस्थरावरच्या पुढाऱ्यांबरोबर प्रचाराला जायला मिळाल्यामुळे त्याचा 'भाव' वधारला होता. प्रचारा - निमित्त पंचक्रोशीत कुढे पोस्टर लाव, कुठे हँडबिलं वाट अशी फुटकळ काम तो अभिमानाने करत होता.

निवडणूक आली आणि गेली सुध्दा. पण सदाच्या अंगातून 'श्रीसेना' उतरली नाही. पेट्रोलचे दर वाढल्यामुळे झालेल्या संपात काही पुढाऱ्यानी 'रस्तारोको' आंदोलन केलं तेव्हा लागणाऱ्या गर्दीत सदा होताच. त्यात कोणातरी पुढाऱ्याला पाणी देताना सदाचा फोटो पेपरात आला. त्यामुळे सदा स्वत:ला 'लीडर' समजायला लागला. आंदोलनात रस्ता अडवणाऱ्या पुढाऱ्याना पोलिसानी अटक केली, तेव्हा सदाने 'झाळकी'त दडी मारून मागच्या मागे पळ काढला हे गावातल्या पोरा - पोराना देखील माहित होतं, पण सदा मात्र

'काय छाती त्या इंस्पेक्टराची माका अटक करूची, मी तोंडार थुकतय त्या XXXXX च्या'

असे लोकाना ऐकवत फिरत होता. लोकही त्याला 'तुजी काय बुवा, घसण आसा बाळ्याबरोबर' असं चढवत होते. पण मागून मात्र

'कोण, सदगो, मेलो झाळकेत दडान पाटच्या पाटी पळालो म्हणून सुटलो हां, आमका सांगता गोष्टी. पोलिसानी सगळ्यांच्या समोर कानफाटात मारल्यानी तेच्या' अशी बातमी गावात पसरली. खरं तर 'रस्तारोको' मध्ये अगदी थोड्या लोकानी भाग घेतला होता पण आता सगळे एकामेकाना
'मी थंयच कसो उभो होतय, स्वत:च्या डोळ्यानी कसां बघलय' हे ऐकवत होते. हे पण सदाला माहित नव्हते असे नाही.

लोकानी तोंडावर केलेली प्रशंसा ऐकून सदाची छाती आणि 'लीडरगिरी' अजून फुगायला लागली. पूर्वी 'सदगो' म्हणून ओळखला जाणारा सदा आता 'लीडर सदा' म्हणून ओळखला जात होता. त्यामुळे येणाऱ्या हवालदाराकडे एक कटाक्ष टाकत सदाने आपली गोष्ट पुढे चालू ठेवली. पण हवालदार काही कच्चा नव्हता. त्याने आल्या आल्या डाफरायला सुरूवात केली.

‘तुमच्यात सदानंद साटम कोण आहे ?’

‘सदानंद साटम ? कोन सदानंद साटम?’ कुणी तरी उत्तर दिले . सदाचे पूर्ण नाव काय ते सदालाही पटकन आठवले नसते .

‘हां, म्हणजे सदा, सदा " काळे " , हो काय हंय बसलोहा’

‘मी मी सदा, काय काम आहे ?’, सदाने लगेच टेचात विचारले .

‘चला, तुम्हाला इन्स्पेक्टरसाहेबानी बोलावलय’ हवालदार पुढे होत म्हणाला .

‘कित्याला , म्हन्जे आपलं कशाला , त्यांचं माझ्याकडे काय काम हाये ?’ सदाची गुर्मी .

‘चल, पोलीस ठाण्यावर मग सांगतो’, हवालदाराला असली गुर्मी ऐकायची सवय नव्हती .

‘नाय येत, काय करशील ?’

आता सगळ्याना सदा काय करतो याची उत्कंठा लागली . सदाला ही जमाव बघून जोर चढला . सदा एकदम मातृभाषेवर आला

‘काय करशीत बोल?’

‘चूपचाप माझ्या बरोबर चल’ ,म्हणत म्हणत हवालदार पुढे होऊन त्याची कॉलर धरणार तेवढ्यात

‘ए, आंगाक हात लावायचो नाय , काय समाजलस, Lady Police आल्याशिवाय हात लावायला देणार नाही’ .

‘काय ?’, पुढे होणारा हवालदार देखील एक क्षण बावचळला, ‘काय म्हणालास ?’

‘ Lady Police आल्याशिवाय हात लावायला देणार नाही’ .

जमलेली मंडळी ही नवीच गम्मत ऐकून खदा खदा हसू लागली . हवालदाराला देखील हसू आवरेना . पण त्याला त्याचं काम करणं भाग होतं . भाजीबाजारात आता बघ्यांची गर्दी वाढायला लागली . सदाची दादागिरी आणि आजूबाजूची गर्दी बघून हवालदाराने माघार घेतली . सदाला अजूच चेव चढला . पोलीस निघून गेल्यावर तर त्याने शिव्या आणि वल्गनांचा पाऊस पाडला . बाकी लोक सदाला अजून चढवत होते आणि सदा पेटत चालला होता .

सदाचा हा जोर ओसरतो न ओसरतो तोच पोलिसांची जीप भाजीबाजारात आली . जीप मधून एक इन्स्पेक्टर आणि मघाचा हवालदार उतरले . सदा आणि त्याचे काही मित्र अजूनही मघाची जीत साजरी करत होते .

‘सदा साटम कोण आहे?’ इन्स्पेक्टरने आपल्या पोलीसी आवाजात विचारले . हवालदाराने लगेच सदाकडे बोट दाखवले .

‘तू सदा काय ?’

‘मी . . .मी सदा, काय काम आसा?’

‘माज आला काय रे?’ म्हणत इन्स्पेक्टरने सरळ त्याच्या कॉलर हात घातला .

‘ए, आंगाला हात लावायचा काम नाय’ .

इन्स्पेक्टरला असली भाषा ऐकायची सवय नव्हती . त्याने कॉलरसकट सदाला उचलला .

‘ Lady Police आल्याशिवाय अंगाला हात लावायचा नाही . . .’, सदा वळवळत म्हणाला . तो पुढे काही बोलला असता पण तेवढ्यात इन्स्पेक्टरने मारलेली सणसणीत थप्पड भाजीबाजारात सगळ्याना ऐकू आली . हे प्रकरण सिरीयस दिसतय हे लक्षात आल्यावर बहुतेकानी काढता पाय घेतला . मांजरीच्या पिल्लासारखं मानगुटीला धरून पोलिसानी त्याला जीपमध्ये कधी टाकला आणि जीप पोलिसठाण्याला कधी गेली हे कुणालाच कळलं नाही .

दोन चार दिवसानी सदा सुटला आणि पुन्हा गावात फिरायला लागला . आता पुन्हा त्याच्या मित्राना चघळायला एक नवीन विषय सापडला . टोळकं जमलं आणि नेहमी प्रमाणे चर्चा सूरू झाली . सदा नेहमीप्रमाणे आपल्या सुरस आणि चमत्कारिक कथा ऐकवत बसला होता . पोलिसानी सदाला चांगलाच चोपला आहे हे सदाच्या सुजलेल्या थोबाडावर दिसतच होते . मित्रानी पोलिसांचा विषय काढायचा नाही असे ठरवले असले तरी त्याना राहवेना . मग कुणी तरी सुरूवात केलीच .

‘सदा, ती . . . पोलिसांची भानगड काय ?’

‘काय नाय रे, ती रात्री मारामारी झाली ती भानगड’

‘पण , तुका कित्याक मारल्यानी ?’

‘इन्स्पेक्टराक राग इलो . मी Lady Police मागलय म्हणून . तेचा कपाळ फिरलेलां . मेलो हसा आणि माज्या कानपाटात मारी परत कानपाटात मारी आणि हसां, मेल्यान मारून मारून मजो जीव काडल्यान पण माका बोलाक देयना मारे . नायतर मी तेका बरोब्बर सुनावला असता .’

यावर जमलेल्या सगळ्या मित्रानी सदाच्या भावनांची कदर न करता हसून घेतले . मग कुणीतरी हळूच विचारले,

‘पण, सदग्या तुका मेल्या Lady Police कित्याक ?’

‘कित्याक म्हन्जे, मी ’लीडर‘ आसय ’श्रीसेनेचो‘, काय समाजलस’

‘अरे होय, तू लीडर आसस . पण म्हणून काय झालां ?’

‘अरे, परवाच्या संपात ती विमलताई कुमठेकर नाय इलेली . ती मोठ्ठी लीडर आसा, तिना पण सांगलेन Lady Police होई म्हणून’

‘अरे मेल्या तिचा म्हणणा बरोबर पण तू तर बापयो आसास मारे ?, तुका Lady Police म्हणजे काय ता समाजता?’

‘मगे, मोठ्या लीडराक मोठी पोलीस नको ?’

‘अरे मेल्या सदग्या, lady police म्हणजे मोठ्ठी पोलीस न्हय, Lady म्हणजे बायलमाणूस’

यावर हास्याची ही कारंजी उसळली आणि सदाला आपला गाढवपणा स्वत: कबूल करावा लागला नाही .

– विनय देसाई

उगाच आपलं काहीतरी . . .

'आमचे येथे सर्व प्रकारची भुतं, पिशाच्च इ ठोक तसेच किरकोळ भावात कॉम्प्युटराईज्ड पद्धतीने उतरवून मिळतील - स्वामी चंद्रकुमार जोशी (BE Comp, US Returned)
सूचना: वाड्यात चौकशी करत बसू नये, अपमान होईल . कुठेही काहीही चौकशी न करता डाव्या हाताच्या जिन्याने दुसऱ्या मजल्यावर येणे .
उपसूचना: जिन्याची पाचवी पायरी झिजलेली आहे .)

या जोशाच्या सूचना संपतच नाहीयेत, मी मनात म्हणालो दारावरची पाटी आणि त्या खालच्या सूचना वाचून मी अगदी योग्य ठिकाणी पोचलो आहे अशी मला खात्री झाली . चिमाची आई म्हणालीच होती की बाजीराव रोडनी शनिवारवाड्याकडे जायला लागलं की 'सकाळ'कडे न वळता 'शारदा'च्या बोळात शिरलं की डावीकडचा तिसरा वाडा . तशी त्यांनी दक्षिणमुखी मारुती ही पण एक खूण सांगितली होती पण मी तिकडे दुर्लक्ष केलं . काय आहे मी पुण्यात नवीन नवीन आलोय आणि या मंदिरांच्या नावानी माझा सॉलिड गोंधळ होतो . परवाच या देशपांड्यांचाच पत्ता शोधताना मी पासोड्या विठोबापासून जिलब्या गणपतीपर्यंत हिंडून सर्व गल्लीबोळांमधे खुन्या मुरलीधर शोधत बसलो होतो! बरं शोधाच्या भरात ज्या कुठल्या वाड्यात शिरावं तिथे एखाद दोन देशपांडे सापडायचेच . शेवटी विचारत विचारत खुन्या मुरलीधर सापडल्यावर तिथल्या कोणीतरी सांगितलं की 'तो दातपाड्या देशपांडे ना तो भिकारदास मारुतीपाशी रहातो' आता डेंटिस्टला दातपाड्या म्हणणं हे केवळ सदाशिव पेठेतच शक्य आहे . असो, तर सांगायचा मुद्दा असा की देवळांच्या नावानी होणाऱ्या माझ्या गोंधळावर मात करुन मी या कॉम्प्युटराईज्ड जोशाच्या वाड्यात पोचलो होतो .

तुमच्या सगळ्यांसारखाच माझाही या बुवा, बाबा, महाराज लोकांवर फारसा विश्वास नाही आणि शिवाय माझ्या सारख्या साध्या सरळ माणसाचा भुताखेतांशीही फारसा संबंध येत नाही . अहो, नुकताच पुण्यात येऊन शारदा सहकारी बँकेत 9 ते 5 खर्डेघाशी करणाऱ्या माणसाला कसली माहित असणार हो भुतं खेतं! मला कामाचा ढीग देउन त्रस्त करणारे हेडक्लार्क गोडांबे आणि रोज केस मोकळे सोडून तूफान मेकप करुन येणाऱ्या ब्रँच मॅनेजर जगदाळे बाई यांच्यापलिकडे मला कुठलाच समंध आणि पिशाच्च माहित नाही . तर माझा इतर भुताखेतांशी काहीही संबंध नसताना मी या भुतं उतरवणाऱ्या कॉंप्युटराईज्ड जोशाकडे कसाकाय हा प्रश्न तुम्हाला पडणं स्वाभाविकच आहे (पडला नसेल तर आता पडू द्या नाहीतर ही गोष्ट पुढे सरकायची नाही!)

त्याचं असं झालं की परवा मी देशपांडे काकांकडे गेलो होतो ना (तेच ते दुसऱ्यांचे दात कोरुन पोट भरणारे!), तेंव्हा माझ्यावर फारच दारुण प्रसंग ओढावला . देशपांडे काका माझ्या पपुपिंचे (परम पूज्य पिताजी) जुने मित्र . आमच्या आमानी (आदरणीय माताजी) तयार करून माझ्या बरोबर दिलेले बेसनाचे लाडू त्यांचापर्यंत पोचवण्याची जोखमीची जबाबदारी माझ्यावर होती . पुण्याच्या गल्लीबोळांमधून मोठ्या हिकमतीनं मी त्यांचा पत्ता कसा शोधून काढला हे मी बरती सांगितलंच आहे . साधारण संध्याकाळच्या सुमारास मी त्यांच्या Apartment च्या बाहेर पोचलो . तिथेही अगदी साधीच पुणेरी पाटी होती 'दातांचा दवाखाना चालू आहे' (आणि या पाटीखाली कोणा चावट पुणेकरानं लिहिलं होतं . . . दवाखान्यातली मुलगीही 'चालू' आहे) मी apartment मधे शिरल्यावर असं लक्षात आलं की देशपांडे काकांचा घरातच दवाखाना होता . हॉलमधे एका टेबलामागे एक मुलगी बसली होती, ती बहुदा त्यांची receptionist असावी . (आता इथे मी त्या तरुणीचं डीटेल मधे वर्णन करावं अशी काही चावट वाचकांची अपेक्षा असेल . पण मी काही वर्णन बिर्णन करणार नाहीये! सदाशिव पेठेमधल्या डेंटिस्टकडे कोणत्या प्रकारची receptionist असू शकते यावर प्रत्येकानं आपापली कल्पनाशक्ती लढवावी!) तर ही टेबलामागची रिसेप्शनिस्ट बया मान खाली घालून धपाधप काहीतरी लिहित बसली होती . मी पुढे झालो

' Excuse me ', अस्मादिक

'हुं . . . .' बया (मान वर न करता)

'ते . . . ते डॉ देशपांडे . .'

'आहेत . . . वेळ लागेल' बयेची मान अजून खालीच . . .

'अहो पण मला . . . म्हणजे . . . भेटायचंय त्यांना . . . personal काम आहे'

'इथे सगळेच त्यांना भेटायला येतात . . . हे टोकन घ्या आणि बसा, तुमचा नंबर आला की बोलावतील' बयेची मान अजूनही खालीच . . .

मी मुकाट्यानं तिनं दिलेलं टोकन (एक पुठ्ठ्याचा जीर्ण झालेला तुकडा) घेतलं आणि बसून बसून खड्डे पडलेल्या एका सोफ्यावर जाउन बसलो . तिथल्या टीपॉयवर चाळून चाळून गलितगात्र झालेली चारेक महिन्यांपूर्वीची मायापुरी, India Today वगैरे मासिकं होती . (ही मासिकं देशपांडे Hair Cutting Saloon वाल्यांकडून Second Hand विकत घेत असावेत!) बसल्या बसल्या मी सहजच हातातलं टोकन पाहिलं आणि उडालोच . टोकनवर 63 नंबर होता . मी परत डोळे चोळून खोलीत सगळीकडे पाहिलं, टेबलमागे बसून धपाधप लिहित सुटलेली ती बया आणि मी सोडून खोलीत कोणीच दिसत नव्हतं . बरं देशपांडे काका आतमधे बासष्ट लोकांचे दात एकदम तपासत असतील हे जरा अती वाटलं, पण रिसेप्शन वरच्या बयेला काही विचारण्यात अर्थ नव्हता, ती बया लिखाण सोडुन वर बघायलाही तयार नाही . . . तेवढ्यात आतल्या खोलीतून आवाज आला . . . . 'नंबर बासष्ट . . .' मी इकडे तिकडे पाहिलं . . . . कोणी नव्हतंच तर जाईल तरी कसं कोण! परत एका मिनिटानी आवाज आला, 'नंबर बासष्ट . . .' परत एक मोठा pause . . . कुठेही काहीही हालचाल नाही . मग आवाज आला, 'नंबर त्रेसष्ठ . . .' हुश्श . . . सुटलो, मी उठून आत जायला लागलो

'टोकन इथे ठेवून जा' टेबल मागून आवाज आला
'आँ .... ' मी चमकलो .
'म्हणलं टोकन इथेच ठेवून जा'
'अहो पण . . .' माझा एक केविलवाणा प्रयत्न . . .
'अहो पण काय? टोकन कशाला पाहिजे तुम्हाला आतमधे, दात तपासायचेत का टोकन?'
त्या बयेनं एकदाचं वर बघितलं . इतक्या वेळात पहिल्यांदाच मला तिचा चेहरा दिसला (आणि माझ्या काळजाचा ठोका चुकला . . . इ . इ . इ . ! आता इथे पुन्हा एकदा आपापल्या कल्पनाशक्तीला वाव देउन एक सुंदर चेहरा imagine करा! तेवढेच माझे कष्ट कमी)

'अहो मॅडम पण मला . . .'

'ठेवा म्हणलं ना इथे . . . तेवढं एकच टोकन आहे आमच्याकडे . . . तुम्ही आत गेल्यावर दुसरं कोणी आलं तर त्यांना काय देऊ मी?'
'अहो पण ते आत्ताच आतमधुन बासष्ठ बासष्ठ असं ओरडत होते त्याचं काय?'
'तुम्हाला कशाला हव्याय्त नसत्या चौकशा . . . ठेवा ते टोकनं इकडे, माझ्या लिखाणात उगाच जास्त व्यत्यय आणू नका . . .' बयेनं आता रुद्रावतार धारण केला!

'काय झालं गं चिमे' आतून एक मध्यमवयीन गृहस्थ बाहेर येत येत म्हणाले . हेच बहुदा देशपांडेकाका असावेत . देशपांडेकाकांची personality अलोकनाथछाप typical मुलीचा बाप type होती!

'बघा ना हो बाबा . . . हे टोकनच परत देत नाहियेत'

आयला ही धपाधप लिहिणारी बया, चिमा का उमा का कोण, ही या देशपांडेकाकांची मुलगीच आहे का काय? संपलं आता हिनं काही उलट सुलट सांगितलं तर काका भूल न देता माझे दात उपटून हातात देतील . पण तसं काही झालं नाही . तिच्याकडे दुर्लक्ष करुन काकांनी शांतपणे माझ्याकडे पाहिलं आणि म्हणाले
'या, आपण आत बसून बोलुया'

त्यांच्याबरोबर आत जाताना मला माझी ओळख करुन द्यायची संधी मिळाली . आपल्या जुन्या मित्रानं आठवण ठेवून बेसनाचे लाडू पाठवल्याबद्दल काकांना भरुनच आलं (हो, आणि बेसनाचे म्हणल्यावर चावायला बरे असा एक डेंटिस्टी विचार मी करुन टाकला!) काकांनी आतून काकुंना बोलवून माझी ओळख करून दिली . मग त्या दोघांबरोबर चहा घेता घेता मी बिचकत बिचकत विषय काढला . . .

'काका . . . नाही म्हणजे . . . तसं काही नाही . . . पण चिमा जरा . . .'

चिमाचं नाव काढताच काकूंनी निरुपा रॉयची पोझ घेउन डोळ्यांना पदर लावला . काकांनीही अलोकनाथच्या चेहऱ्यावरची सगळी असहायता, दु:ख, लाचारी इ.इ. चेहऱ्यावर आणून मला सांगितलं . . .

अरे काय सांगणार तुला सदु, चिमा आमची एकुलती एक मुलगी . . . तिचीच तर सतत काळजी लागून राहिली आहे .'

'काळजी . . . कसली काळजी . . . चांगली अभ्यासू दिसतिये . . सतत लिहित बसली होती काहितरी'

'तोच तर problem आहे . . .'

'म्हणजे?'

'अरे इतकी सुंदर आणि हुषार मुलगी पण हे लेखनाचं खूळ कुठून तिच्या डोयात शिरलंय काही कळत नाही . सकाळ, दुपार, संध्याकाळ जेंव्हा बघावं तेंव्हा नुसती लिहित बसलेली असते . . . कथा, कविता, कादंबऱ्या, पटकथा, लेख, स्फुटं . . . तिला काही म्हणजे काही वर्ज नाही रे . . .

'अहो चांगलंच आहे की मग . . . एक कलाकार तुमच्या घरात आहे आणि तुम्ही . . .'

'चांगलं? थांब तुला दाखवतोच मी आता . . .'

काकांनी ड्रॉवरमधुन एक आठ दहा फुलस्केप वह्या काढुन माझ्या समोर ठेवल्या

'इथे एवढ्याच आहेत, बाकिच्या सगळ्या माळ्यावर ठेवल्या आहेत . काय सांगू अरे, रद्दीवालाही घेत नाही या वह्या . . . Anyways तूच बघ आणि सांग . . .'

मी घाबरत घाबरत पहिली वही उघडली . पहिल्या पानावर मध्यभागी लिहिलं होतं 'चांदणे झाले फुलांचे' आणि खाली झोकदार सही होती 'चिन्मयी', आयला चिमेचं नावं चिन्मयी आहे तर! बरं! मी पहिलं पान उघडलं आणि ती दीर्घकथा वाचायला सुरुवात केली

'नागमोड्या वाटेच्या एका टोकावर रमा उभी होती, आपल्या वळणदार दु:खांच्या आवेगांना कुरवाळत . . . अस्तित्वाच्या उन सावल्या असतातच अशा गहिऱ्या . . . उजेडवेड्या पणत्यांच्या आठवणी रमानं आपल्या उराशी बाळगल्या असत्याही . . . पण का ही अशी . . . . .'

बास . . . धाप लागली मला . . . आईशप्पत . . काय लिहिते ही बया . . . पण पटकन वही दूरही ढकलता येईना . मग उगाचच एक एक पान उलटत राहिलो पानापानावर मला पणत्या, तुळशी, दिवे, पक्षी, गजरे, मोगरे, नाती गोती, प्रेमालाप . . असं बरंच काही असंबद्ध दिसत होतं . मी उगाचचं 'हुं, अरे वा' असं काहीसं पुटपुटत पानं उलटत होतो . . . तशीच दुसरी वही, तशीच तिसरी . . . . मला चक्कर यायला लागली . . .

'सगळे उपाय करुन झाले रे' देशपांडे काका . . .

'अं . . .'

'नाही म्हणलं सगळे उपाय करुन झाले, प्रेमानी समजावून सांगितलं, रागवून बघितलं, धमक्या दिल्या, psychiatrist कडे नेलं सगळं सगळं झालं . पण ही मुलगी काही केल्या तिचं लिखाण थांबवत नाहिये . मी जर राजा असतो ना तर हिचं हे वेड बरं करणाऱ्याला मी अर्ध राज्य बक्षीस दिलं असतं . पण काय करणार, माझी ही अशी Dental Practice , दुसऱ्याचे दात कोरुन आम्ही पोट भरणार . . . काय करावं काही कळत नाही . . .'

मला काकांची फारच दया आली . पण मी तरी काय करू शकणार होतो? दहावीपर्यंत जे कंपल्सरी शिकावंच लागलं होतं ते सोडलं तर माझा आणि मराठी वाङ्मयाचा काहीच संबंध नव्हता .

आणि तेंव्हाचाही माझा मराठीचा अभ्यास एकवीस अपेक्षित पुरताच मर्यादित होता. असं असताना या चिन्मयी उर्फ चिमाच्या लेखनवेडाचं मी काय करु शकणार होतो?

'परवाच शहाणे वहिनी सांगत होत्या' काकू आता बोलायला लागल्या.

'शहाणे वहिनी म्हणजे चांगलच असेल काहीतरी' मी आपलं उगाचच काहीतरी. . .

'त्या सांगत होया स्वामी चंद्रकुमार जोशी म्हणून कोणीतरी आलेत म्हणे अमेरिकेहून आणि कशानीही झपाटलेल्या माणसाला एक दोन visits मधे खडखडीत बरं करतात म्हणे!'

बास. . . आता या पुढच्या प्रसंगाचं मी काही फार सविस्तर वर्णन करत नाही. काकूंनी मला जोशाबद्दल सांगणं. काकांनी सारखा सारखा अलोकनाथसारखा दयनीय चेहरा करणं, मग मला चिमाला तिकडे घेउन जायची गळ घालणं आणि मीही ती जबाबदारी माझ्या शिरावर घेणं हा घटनाक्रम तुम्ही ओळखला असेलच.

या सगळ्याचा परिणाम म्हणूनच मी आत्ता इथे उभा आहे, दक्षिणमुखी मारुतीच्या बोळात, स्वामी चंद्रकुमार जोशी यांच्या वाड्यात आणि माझ्या सोबत आहेत, मराठी वाङ्मयाच्या उदयोन्मुख तारका चिमा उर्फ चिन्मयी देशपांडे.

या जोशाच्या वाड्यात आलोय खरं, पण अजुनही मी या कॉम्प्युटराईज्ड जोशाबद्दल जरा साशंकच आहे. एक तर हा जोशी, त्यातून पुण्यातला आणि पुण्यात कॉम्प्युटरचा कोण कसा वापर करेल काही सांगता येत नाही. थोड्याच दिवसांपूर्वी मी एका ठिकाणी पाटी पाहिली होती 'येथे कॉम्प्युटरवर पत्रिका करुन मिळतील' लग्नाळू असल्यामुळे मी आत गेलो आणि Computer वर पत्रिका करायची ऑर्डर दिली. मी पैसे भरल्यावर तिथल्या माणसानी Computer चा CPU आडवा पाडला आणि त्यावर एक कागद ठेवून हातानीच पत्रिका लिहून दिली! आणि याहून कमाल म्हणजे, या दुकानाच्या शेजारीच 'येथे कॉम्प्युटरवर चकल्या करून मिळतील अशी पाटी होती आणि तिथे एक बाई CPU वर रद्दी पेपर टाकुन सोऱ्यानी चकल्या पाडताना दिसत होती! तर पुण्यामधे Computerized याचा अर्थ दुकानात कुठेतरी computer आहे आणि त्याचा आम्ही कसातरी वापर करतो असा होतो!

पुणेकरांच्या Computerization बद्दल असा अनुभव जमेस असल्यामुळे हा computerized पद्धतीने भुतं उतरवणारा जोशा नक्की कसा असेल याचं चित्र मी डोळ्यासमोर आणायचा प्रयत्न करत होतो राहुन राहुन मला असं वाटत होतं की लांब दाढी वाढवलेला, मांत्रिका सारखी कफनी घातलेला, गळ्यात CDs ची माळ आणि कपाळी जळक्या flopies चं भस्म लावलेला कोणी बाबा असावा. पण मी प्रत्यक्षात त्याला पाहिलं तेंव्हा हे चित्र घुळीस मिळालं! स्वामी चंद्रकुमार असं भारदस्त नाव धारण केलेला हा माणूस बर्मुडा, टीशर्ट, उलटी टोपी, छानदार पोनीटेल आणि एका कानात डूल घातलेला typical US returned software professional दिसत होता!

तर अशा दिसणाऱ्या या मांत्रिकाच्या गुहेत, sorry जोशीबुवांच्या Advanced CyberNeurotic Research Lab मधे आम्ही शिरलो! जोशानी आमचं हसुन स्वागत केलं. मग त्याची Methodology, Professional Ethics, Consulting Fees असे सगळे तपशील American accent मधल्या मराठीत सांगितले! सगळं सांगून झाल्यावर NDAs, Legal Disclaimers अशा काय काय कागदांवर आमच्या सह्या घेऊन तो आम्हाला त्याच्या Lab मधे घेऊन गेला.

त्याच्या त्या lab मधे अनेक वेगवेगळ्या प्रकारची यंत्र विखुरलेली होती. सगळीकडुन अनेकप्रकारचे दिवे लुकलुकताना दिसत होते. या सगळ्या यंत्रांना जोडणाऱ्या वायरींमधुन वाट काढत काढत आम्ही आत शिरलो.

तिथल्या एका विचित्रशा दिसणाऱ्या खुर्चीवर त्यानी चिमाला बसवलं. त्या खुर्चीतून बाहेर आलेल्या काही वायरींची टोकं तिच्या हातावर, कपाळावर अशी चिकटपट्टीनी लावली. हे सगळे सोपस्कार पार पाडून स्वामीजी त्यांच्या computer वर जाउन बसले. त्यांनी चिमाला सांगितलं, 'डोळे मिटा आणि तुम्ही तुमचं आवडतं लिखाण करत आहात असं imagine करा' चिमानी डोळे मिटले आणि तो जोशा त्याच्या computer वर काय काय खुडबुड करायला लागला. तोंडानी काय काय पुटपुटणं, मधेच काही टाइप करणं, मधेच माउस हलवून क्लिकक्लिकाट करणं असं बरंच काही तो जोशा बराच वेळ करत होता. जस जसा वेळ जायला लागला तस तसा त्याच्या कपाळावर घाम जमायला लागला आणि चेहऱ्यावर टेंशन दिसायला लागलं. शेवटी दीड दोन तासाच्या अथक प्रयत्नांनंतर त्यानी चेहरा पाडून माझ्याकडे पाहिलं आणि म्हणाला,

'खूपच अवघड केस आहे हो, काय होतंय काही कळत नाहीये. Normally येवढ्या वेळात मी भल्या भल्या केसेस solve केल्या आहेत. पण या मॅडमच लेखनवेड फारच powerful दिसतंय. अहो, आता माझ्या computer लाही problem यायला लागलाय. मला code मधे changes करावे लागतील बहुदा. तुम्ही एक काम करा, आज यांना घेउन जा आणि परत एका आठवड्यानी या. तोवर मी जरा नविन code ही लिहीन आणि system ही upgrade करुन घेइन'

मी हताश होऊन चिमाला घेउन तिथून बाहेर पडलो तिला तिच्या घरी नेऊन काका काकूंना सगळा वृत्तांत सांगितला. त्यांना पुढच्या appointment बद्दलही सांगितलं.

त्या पुढचे दोन तीन आठवडे मी खूपच कामात अडकलो म्हणून मी त्यांच्याकडेही जाउ शकलो नाही आणि चिमालाही जोशाकडे घेउन जाउ शकलो नाही. मला त्यांचा काही फोनही आला नाही आणि मलाही फोन करायला जमलं नाही. ते चिमाला घेउन जोशाकडे गेले का नाही काही कळायला मार्ग नव्हता. पण आता वाटतंय की ते नक्कीच गेले असावेत. त्याचं काय झालं की काल परवाच मी दक्षिणमुखी मारुतीच्या बोळातून चाललो होतो तेंव्हा सहज म्हणून जोशाच्या वाड्याकडे पाहिलं तर तिथे मला एक नविन पाटी दिसली. . .

'आमचे येथे सर्व प्रकारच्या कथा, कादंबऱ्या, कविता इ. वाङ्मय प्रकार ठोक तसेच किरकोळ भावात कॉम्प्युटराइज्ड पद्धतीने तयार करुन मिळतील - भेटा: चंद्रकुमार जोशी व चिन्मयी देशपांडे'

- प्रसाद शिरगांवकर

चाल ः संथ वाहते कृष्णामाई

संथ घोरते कृष्णाबाई
पारावरल्या गोंगाटाची
जाणिव तिजला नाही
संथ घोरते कृष्णाबाई

झोप नव्हे ही निसर्गनीती
कित्येक जण हे, रोज घोरती
मग का तिजला बोल लावती
सारे ठायी ठायी
संथ घोरते कृष्णाबाई

कुणी झोपेतच झाडी लाथा
कुणी पेंगते बसता बसता
डोईवरती उशी घेउनी
घोरत कुणी राही
संथ घोरते कृष्णाबाई

सतत होतसे उर बरखाली
घावरुनी जाती झुरळ नि पाली
नादापुढे त्या, विमानाचीही
घरघर ऐकू न येई
संथ घोरते कृष्णाबाई

मिल्या

दिवस तुझे हे फुगायचे

दिवस तुझे हे फुगायचे
झोपळ्या वरती झुलायचे

भलते सलते खाणे
वरती भाजले चणे
सतत उदर भरायचे

मोजावी नाभीची खोली
केवढी कंबर ढोली
त्यावर जिनहे चढवायचे

थरारे धरती फार
सोसेना तुझा हा भार
लोकांचे सोफे मोडायचे

माझ्या या धाव्याच्या पाशी
थांबू तू नको जराशी
आधीचे बिल आहे फेडायचे

– अवधूत दिगंबर

उणे अधिक

- मधुमेह आणि हृदयविकार - मुकुंद
- साठवण - आरती
- साडेसातिचा महिमा - आश्विनी
- आठवणींचा फराळ - अर्च
- गोळ्यांची करामत - नरेंद्र गोळे
- या शिकुया अ आ इ अनुराधा गानू

मधुमेह आणि हृदयविकार

नमस्कार मित्रांनो! तुम्हा सगळ्यांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा . हे नव वर्ष तुम्हा सगळ्यांना सुखाचे, समृद्धीचे आणि आरोग्याचे जावो ही सदिच्छा!

वरील शुभेच्छा आपण दर दिवाळीला आपल्या आप्तस्वकीयांकडून आणी मित्र परीवारांकडून ऐकतो . . . नाही का? आपण सगळे खरच आपल्या समृध्दीकरता आणि सुखाकरता या आयुष्यात धडपडत असतो . त्याकरीता माझ्यासारखेच बरेच लोक आपला प्रिय देश सोडून विदेशातही येतात आणि स्थायिक होतात . बऱ्याच वेळेला आर्थिक कारण, म्हणजेच धनधान्यसमृध्दी या एकाच ढोबळ हेतुने आपल्यातले बरेच जण परदेशात आलेले असतात . धनसमृध्दी ही आपल्यापैकी बऱ्याच जणांनी मिळवलेलीही आहे आणि मिळवतीलच . पण अशा परदेशात आलेल्या व्यक्तींना यासाठी कितीतरी समस्यांना धीराने सामोरे जावे लागते, अनेक प्रतिकूल परीस्थींशी झगडून त्यांवर मात करून दाखवावी लागते . त्यांच्या काही विशिष्ट समस्या असतात . अशा दिवाळीसारख्या आनंद सोहळ्याच्या वेळी जेव्हा आपण आपल्या आप्तस्वकीयांना म्हणतो की येणारे नवीन वर्ष आपल्याला आरोग्याचे जावो त्यावेळी आपण सगळ्यांनी 'आपले आरोग्य' या विषयावर थोडे अंतर्मुख व्हावे असे नाही का तुम्हाला वाटत? असे अंतर्मुख होउन विचार केल्याने नक्कीच आपणा सगळ्यांना पुढचे एकच काय तर येणारी अनेक वर्षे स्वास्थ्याची जाण्यास हातभार मिळू शकेल . नाही का?

जोपर्यंत आपल्याला काही त्रास होत नाही तोपर्यंत सगळे ठीक आहे असे समजणे हा मनुष्याचा स्वभावधर्म आहे . मी तर अजून विशीत किंवा तिशीतच आहे! मला काय झाले आहे? आणि काही होत नाही तोपर्यंत कशाला काळजी करा? असे आपल्यापैकी किती जणांनी ऐकले आहे आणि स्वत: असा विचार केला आहे? खरे सांगा! पण मित्रांनो वस्तुस्थिती अशी आहे कि जेव्हा आपल्याला काही व्याधी व्हायला सुरु होतात तेव्हा कदाचित खूप उशीर झालेला असतो! मी खास करुन मधुमेह आणि हृदयविकार या दोन अतिशय धोकादायक व्याधींविषयी बोलत आहे . हृदयविकार हे आज जगातले एक नंबरचे मृत्युचे कारण आहे आणि त्यातल्या 50 टक्के लोकांना मधुमेहामुळे हृदयविकार जडलेला असतो! आणि आणखीन विशेष बाब म्हणजे त्यातल्या 50 टक्के लोकांना त्यांना मधुमेह आहे हे ते डॉक्टरकडे हृदयविकारासाठी जातात तेव्हा समजून येते! कारण? करण हेच की जोपर्यंत काही होत नाही तोपर्यंत फिकीर कशाला करा हा माणसांचा स्वभाव! म्हणून आपल्याला जर चाळिशीत, पन्नाशीत आणी साठीत आरोग्य हवे असेल तर त्यासाठी आपण विशी आणि तिशीमधेच काळजी घेतली पाहीजे! चाळिशीत आणि पन्नाशीत नाही! It may be too late by then !

तर तुम्ही म्हणाल जर विशीत आणि तिशीत आम्हाला काही त्रास होत नसेल तर आम्ही नेमके काय करायचे? तर मित्रांनो, या लेखाचा खरा उद्देश्य सर्वसामान्य व्यक्तींना ते काय करू शकतील याचे मार्गदर्शन व्हावे हाच आहे . खासकरुन माझ्यासारखे जे परदेशात स्थायिक झाले आहेत त्यांनी या लेखाची गांभिर्याने दखल घ्यावी ही मनापासून इच्छा . कारण गेल्या काही वर्षात परदेशात स्थायिक झालेल्या भारतीय स्त्री पुरुषांच्या आरोग्यसमस्यांवर जो काही माफक अभ्यास झाला आहे त्या सर्व अभ्यासातून एक निष्कर्ष सातत्याने आढळून येत आहे की भारतीय वंशाच्या व्यक्तींमधे मधुमेह रक्तदाब आणि म्हणून हृदयविकराचे प्रमाण इतर वंशाच्या लोकांपेक्षा दीडपटीने जास्त आहे! आता ते असे का याची सगळी कारणे इथे नमूद करणे शक्य नाही पण एक प्रमुख कारण म्हणजे काही कारणास्तव भारतीय वंशाच्या स्त्री पुरुषांमधे (स्त्रियांमधे जास्त) Insulin resistance हा प्रकार जास्त आढळून येतो . म्हणून आपल्यात मधुमेह होण्याचे प्रमाण सुद्धा जास्त दिसून येते आणि पर्यायाने हृदयविकारचे प्रमाणही जास्त!

आता हा Insulin resistance हा काय प्रकार असतो? त्याचा मधुमेहाशी काय संबंध? आणी मधुमेहाचा आणि उच्च रक्तदाब, हृदयविकार याच्याशी काय संबंध? हे प्रश्न तुम्हाला पडणे साहजिकच आहे . या सगळ्यावर इथे थोडक्यात उहापोह करुयात आणि इच्छुकांनी आपल्या फॅमिली डॉक्टरकडून या बाबतीत अधिक माहिती मिळवावी असे मी त्यांना आवाहन करतो .

आपल्या शरीरात स्वादुपिंड (pancreas) नावाची ग्रंथी इंसुलीन नवाचे एक हॉर्मोन तयार करते . त्याचे मुख्य कार्य म्हणजे आपण जे अन्न खातो ते जेव्हा पचून रक्तात ग्लुकोजच्या रुपाने शोषले जाते, तेव्हा त्या ग्लुकोजचा शरीरातल्या सर्व पेशींना, जिथे त्या ग्लुकोजची इंधनाकरता जरुरी असते, पुरवठा करणे . जर शरीरात इंसुलीन नसेल तर रक्तप्रवाहात असलेले ग्लुकोज शरीरपेशींमधे न जाता रक्तातच साठून राहते . अशा वेळेला तुमच्या शरीरातल्या पेशी भुकेने काव काव करत असतात कारण त्यांना ग्लुकोज मिळत नाही . म्हणजे तुम्ही कीतीही खात राहिलात तरी तुमच्या शरीरातल्या पेशी भुकेलेल्याच राहतात! सगळे ग्लुकोज फक्त रक्तातच राहते . म्हणून अशा लोकांना सदैव भूक लागते . पण या जास्त खाण्याचा काहीच उपयोग होत नाही आणि त्याचे खरे कारण हेच कि त्यांच्या शरीरात पुरेसे इंसुलीनच नसते! अशा रक्तप्रवाहातच (नको त्या ठिकाणी!) साठून राहिलेल्या ग्लुकोजमुळे अशा लोकांचे रक्त घट्ट होते व त्यामुळे त्यांना तहानही जास्त लागते . आणि जास्त पाणी पिउन त्यांच्यात लघवीचे प्रमाणही जास्त दिसून येते . म्हणजे अशी माणसे 3 प्रमुख लक्षने दाखवतात . खूप भूक लागणे, खूप तहान लागणे आणि खूप लघवीला लागणे! यालाच मधुमेहाची क्लासिक लक्षणे मानली जातात . Insulin resistance ही मधुमेहाची पहिली पायरी! ज्या लोकांमधे Insulin resistance आढळुन येतो त्या लोकांच्या शरीरात होते काय कि त्यांचे स्वादुपिंड इंसुलीन तर तयार करते पण शरीरातल्या पेशी त्याला हवा तसा प्रतिसाद देत नाहीत . म्हणजे, समजा निरोगी व्यक्तीच्या शरीरात 100 ग्रॅम ग्लुकोज रक्तामधून शरीरातल्या पेशीत पोहोचविण्यासाठी जर 1 ग्रॅम इंसुलीनची आवश्यकता असेल तर ज्या लोकांमधे Insulin resistance दिसून येतो अशा व्यक्तींना तब्बल 2 ग्रॅम इंसुलिन तेच काम करण्यासाठी लागते! म्हणजे होते काय की अशा व्यक्तींच्या शरीरात स्वादुपिंडाचा कारखाना ओव्हरटाइम काम करतो आणि काही वर्षात अती ताण पडल्यामुळे स्वादुपिंडाचा कारखानाच बंद पडतो किंवा थकुन भागून कमी काम करतो! अशा वेळी व्यक्तीला मधुमेह झाला असे आपण म्हणतो . म्हणून Insulin resistance ला मधुमेहाची पहिली पायरी म्हणून ओळखले जाते . (ते तपासण्यासाठी डॉक्टरकडे जाउन साधी टेस्ट करून घेता येते .) तर लक्षात आला का हा सगळा प्रकार?

म्हणजे आता तुमच्या लक्षात येइल की मधुमेहामुळे आपल्या रक्तप्रवाहात ग्लुकोजचे (म्हणजेच त्याला शुगर असेही म्हणतात ,त्या शुगरचे) प्रमाण खूप वाढते . त्यामुळे रक्तवाहिन्यांवर असा परीणाम होतो की रक्तामधले असलेले कोलेस्टेरॉल आणि फॅट रक्तवाहिनीच्या आतल्या बाजूने नॉर्मल माणसापेक्षा दुपटीने भराभर डीपॉझीट व्हायला लागतात . त्यामुळे रक्तवाहिन्यांचा व्यास कमी कमी होउन त्यांचा लवचीकपणाही कमी होतो . त्यामुळे अशा व्यक्तींना रक्तदाबाचा त्रास सुरु होतो . तसेच हृदयातील रक्तवाहिन्या बारीक झाल्यामुळे अशा व्यक्तींन हृदयविकाराचा झटका येउ शकतो . तसेच मूत्रपिंडातल्या रक्तवाहिन्या नॅरो झाल्यामुळे मूत्रपिंडही काही काळाने नादुरुस्त होउन अशा लोकांना बऱ्याच वेळेला डायालिसीस वर जगावे लागते . तसेच रक्तप्रवाहातील अती शुगरमुळे अशा लोकांच्या जखमाही लवकर भरून येत नाहीत . तसेच त्यांच्या संवेदनाही कमी होतात . त्यामुळे पायाला जर जखम झाली तर ती त्यांना कळून येत नाही आणि ती जखम रक्तातल्या जास्त ग्लुकोजमुळे लवकर भरून न येता तशीच चिघळते . त्यात पायाला नॅरो रक्तवाहीन्यांमुळे होणारा कमी रक्तप्रवाहाची भर! त्यामुळे पुष्कळ वेळेला अशा व्यक्तींना त्यांचे पायही गमवावे लागतात . तर अशी ही मधुमेह या भयानक व्याधीची लक्षणे आणि परिणाम!

आता तुम्हाला मधुमेह आणि हृदयविकार भारतीय वंशाच्या व्यक्तींमधे जास्त आढळून येतात (खास करुन परदेशातील!)हे कळल्यावर आपण हे टाळण्यासाठी काय करू शकतो असा प्रश्न पडणे हे साहजिकच आहे . तर मित्रांनो! या खाली मी देत असलेया गोष्टी आपल्यापैकी बहुतेक सगळे सहज करू शकतील असे मला वाटते .

1 . आपल्या आरोग्याची आपण विशीत आणि तिशीत असतानाच व्यवस्थीत काळजी घेणे .

2 . त्याकरता नियमीत शारिरीक तपासणी . (विशीत आणि तिशीत दर दोन वर्षांनी डॉक्टरकडून पूर्ण चेक अप आणि चाळीशीनंतर दर वर्षी नियमीत पूर्ण चेक अप करणे)

3. नियमीत आणि विचार करून आहार करणे आणि त्यावर नियंत्रण ठेवणे. (अती खाण्याने होते काय की पोटातले
सगळे अन्न शेवटी रक्तात ग्लुकोजच्या रुपाने शोषले जाते आणि इंसुलीनच्या
मदतीने ते शरीरातल्या पेशींपर्यंत पोहोचविले जाते. तुम्ही जेवढे जास्त खाल तेवढे जास्त इंसुलीन शरीराला तयार करायला लागते आणि असे खूप वर्षे झाल्यावर स्वादुपिंडाच्या पेशी थकून निकामी होउन इंसुलीन तयार करण्याचे थांबवून टाकतात किंवा पुरेसे तयार करत नाहीत. थोडक्यात म्हणजे स्वादुपिंड burn out होण्याचा संभव असतो. तेव्हा खाण्यावर नियंत्रण ठेवून असा ताण स्वादुपिंडावर आणूच नये!) खासकरून तेलकट तुपकट पदार्थांचे सेवन आहारात कमी करावे. मीठ सुध्दा बेताचेच खावे (आळणी खा असे मी म्हणत नाही बरं का!)आहार पिरॅमिड शेपचा करावा, म्हणजे पिरॅमिडचा पाया कार्बोहायड्रेट, मग वरचा भाग प्रोटीन्स चा आणि सर्वात शेवटी वरचा छोटा भाग म्हणजे फ़ॅट्चा असु द्यावा. रोज पाच फळे आणि भाज्या (दोन्ही मिळून) खाण्यात आणि 8 ग्लास पाणी पिण्यात असावे.

4. नियमीत स्वत:अचे वजन करणे आणि ते आपल्या आयडीअल वजनाच्या आसपास (उणे अधिक 5 किलो!) नियंत्रित ठेवणे. आपला Body mass index काय आहे यावरही लक्ष ठेवणे. वजन आणि Body mass index चे तक्ते इंटरनेटवरही तुम्हाल मिळू शकतील. पोटाचा घेर (Central obesity) आणि हृदयविकाराचा झटका येण्याचे प्रमाण, यात थेट संबंध असतो हे ध्यानात असू द्यावे.

5. नियमीत म्हणजे आठवड्यातून 3 वेळा, 30 मीनीटे प्रत्येकी, एरोबिक व्यायाम करणे. (म्हणजे ज्यात तुमच्या हृदयाचा वेग नेहमीपेक्षा दुप्पट होतो असा व्यायाम.) तो करण्याआधी डॉक्टरकडून व्यवस्थीत आपला चेक अप करण्यास मात्र विसरू नका!

6. आपल्या रोजच्या कामामधे घरी आल्यावर लक्ष देउ नका. त्या ऐवजी आपल्या आवडत्या छंदाकडे लक्ष द्या, गाणी ऐका, फिरायला जा, प्रवास करा, निसर्गाला भेट द्या, खेळ खेळा, मित्रांबरोबर हसा खेळा. या सर्व गोष्टी जाणूनबुजून आचरणात यासाठी आणा की जेणेकरुन आपल्यावरील ताण कमी व्हावा.

7. धुम्रपान करत असल्यास त्वरित सोडा!(मधुमेहात रक्तवाहिन्यांच्या आत कोलेस्टरॉलची साठवण नॉर्मल माणसापेक्षा दुप्पट वेगाने होत असते, पण तीच मधुमेह असणारी व्यक्ती जर धुम्रपान करत असेल तर तो वेग दसपटीने जास्त असतो!सावधान!)

तर मित्रांनो असे आपण केल्यास मधुमेह आणि हृदयविकार आपण आपल्यापासुन दुर ठेवू शकतो. फक्त त्याकरता नियमीत शरीर तपासणी, नियमीत व्यायाम आणि नियंत्रित आहार या तीन गोष्टींची मात्र आवश्यकता आहे. या तीन गोष्टींसाठी माझ्या रोजच्या कामाच्या रगाड्यात मला वेळ नाही असे म्हणू नका. (खास करुन स्त्रिया आपले शरीर आणि दुखणी घरच्या आणि कामाच्या रगाड्यात दुर्लक्षित करण्यात पटाईत असतात!) कारण हे लक्षात असू दे की HEALTH IS WEALTH!

पुन्हा एकदा सर्व वाचकांना दिवाळीच्या हार्दीक शुभेच्छा! येणारे वर्ष आणि पुढची अनेक वर्षे तुम्हा सगळ्यांना सुखाची ,समृध्दीची आणि खास करुन आरोग्याची जावोत ही शुभेच्छा!

- मुकुंद

साठवण . . .

बरेच दिवसांपुर्वी वर्तमानपत्रात सुनिताबाईचा काव्यवाचनाचा एक कार्यक्रम मुंबईत झाला असे वाचले . त्यादिवशी पेपरची घडी घालता घालता एक दीर्घ उसासा बाहेर पडला . 'किती चांगल्या गोष्टी निसटून जातात', अशा अर्थाचा आणि आज परत एकदा पेपरची घडी घालता घालता तसाच एक उसासा बाहेर पडला होता . परत एकदा त्याच कार्यक्रमाची बातमी वाचली होती . त्याच काव्यवाचनाच्या कार्यक्रमाचे recording पु . लं च्या पुण्यतिथीच्या निमीत्ताने यशवंतराव चव्हाण सभागृहात दाखवण्यात येणार होते . कार्यक्रमाची वेळ संध्याकाळची होती, तिकीटे ही उपलब्ध होती, कार्यक्रम पुण्यात, मीही पुण्यात . पण तरीही एक मोठ्ठे प्रश्नचिन्ह होते, जावे की नाही ? कारण असे की सोमवारी माझी परिक्षा होती आणि फ़क्त दोनच दिवस माझ्या हातात होते . पूर्ण वर्षभर पुस्तके जणू सोवळ्यात आहेत अशी परिस्थिती होती . पण तरीही कार्यक्रमाचा मोह सुटत नव्हता . जावे किंवा नाही या संभ्रमातच ऑफीसचा रस्ता संपला आणि जागेवर पोहोचल्या बरोबर मैत्रिणीला फोन करुन सांगितले, 'आपण आज कार्यक्रमाला जात आहोत' . कसा ते समजले नाही पण क्षणात निर्णय झाला हे मात्र खरे .

साधारणपणे तीन तासांचा कार्यक्रम . अगदी सुरवातीपासून ते थेट शेवटापर्यंत एक एक क्षण डोळ्यात, कानात, मनात कुठे कुठे म्हणून साठवू असे काहीसे होवून गेले होते . उतकृष्ठ काव्यवाचन आणि तितकीच सुरेख संवाद साधण्याची पध्दत . काही जुन्या आठवणी, अनुषंगाने आलेले एक दोन विनोदी किस्से . प्रत्येक कविचे एखादे खास असे वैशिष्ट्य . असे कार्यक्रमाचे परिपूर्ण स्वरुप .

राम गणेश गडकरीं पासून सुनिताबाईनी कार्यक्रमाला सुरुवात केली . ज्येष्ठ साहित्यिक म्हणुन गडकरींचा मान पहिला आहेच परंतु पु . ल . आणि सुनिताबाई यांच्या काव्यवाचनाच्या कार्यक्रमांची सुरुवात ही गडकरींच्या कवितांपासून झाली होती . गडकरींच्या नाटक व इतर गद्य लिखाणाचा वाचक वर्ग मोठा होता . परंतु त्यांच्या कविता तितक्याश्या लोकांपर्यंत पोहोचल्या नव्हत्या . त्यांच्या या तिसऱ्या रुपाचे दर्शन रसिकांना घडावे या हेतुने पु . ल . व सुनिताबाईनी त्यांच्या कवितावाचनाचे कार्यक्रम करण्यास सुरुवात केली होती . 'गडकरींच्या मृत्यूनंतर नऊ महिन्यांनी माझा जन्म झाला, चार चौघात जरी भाई हे गमतीने म्हणत असे तरी आत कुठेतरी त्याला या गोष्टीचा अभिमान होता' अशी गमतिशीर आठवण सांगून सुनिताबाईनी गडकरींची 'मंगल देशा, पवित्र देशा' ही कविता सादर केली .
. . . खरच गडकरींचेच हे चौथे रुप नसेल कशावरुन ? त्यांचे अपूर्ण राहिलेले लेखन पु . लं . च्या रुपात पूर्ण झाले . पु . लं . चे लेखन क्षेत्र गडकरींपेक्षा संपूर्णपणे भिन्न होते . म्हणुनच वाटते नक्कीच गडकरी पु . लं . च्या रुपात आपल्यात आले असतील . एव्हढा मोठ्ठा आनंदाचा ठेवा घेउन, एक असामान्य कर्तृत्व, निर्लेप दातृत्व घेउन . असेच पु . ल . ही नक्कीच परत आले असतील . कारण ज्यांना सतत माणसांची ओढ असते ते माणसांमधेच तर परत येणार . आपण फक्त 'पु . लं . च्या मृत्युनंतर नऊ महिन्यांनी माझा जन्म झाला' असे सांगणाऱ्याची वाट पहायची . असो .

गडकरींनंतर आले मर्ढेकर . 'मर्ढेकर हा एकमेव सुटाबुटातला कवी' अशी सुनिताबाईनी मर्ढेकरांची ओळख करुन दिली . साधारणत साहित्यिक म्हंटले की अतिशय साधी रहाणी हे चित्र पूर्वीतरी लोकांच्या डोळ्यासमोर होते . अभियांत्रीकी पार्श्वभूमी असलेल्या मर्ढेकरांनी नोकरीत मोठ मोठी पदे भुषविली होती . कविता त्यांची आवड होती, चरितार्थ नव्हता . कदाचित म्हणूनही हा फरक असेल . कुठल्याशा कार्यक्रमाचे मर्ढेकर अध्यक्ष असताना पु . ल . व सुनिताबाई त्यांना भेटण्यासाठी म्हणुन व्यासपीठावर गेले होते, 'ही माझी बायको' अशी पु . लं . नी सुनिताबाईची ओळख करुन दिली . आणि सुनिताबाईनी त्यांच्या स्वभावगुणाला अनुसरुन मर्ढेकरांना घरी जेवायला येण्याचे मामंत्रण दिले . त्यांनी पण लगेचच येण्याचे कबूल केले, पण एका अटीवर . अट कोणती? तर . . बेत पिठलं भाकरीचा असावा आणि खाली पाटावर जेवायला वाढावे . प्रतिभावंतांमध्ये अभावानेच आढळणारा साधेपणाचा एक अनोखा रंग . सुनिताबाईनी निवडलेल्या मर्ढेकरांच्या कविताही अशाच विविध रंगी . 'या दुखाच्या कढईची गा, अशीच देवा घडण असु दे . .' या कवितेतून जितका कणखरपणा प्रतीत होतो, तितकाच नाजुकपणा निथळतो 'दवात आलीस भल्या पहाटे, शुक्राच्या तोऱ्यात एकदा . . .' याओळींमधून . 'पोरसवदा होतीस काल परवा पावेतो . .' मधील अवखळपणा, 'असे काहीतरी व्हावे अशी होती दाट इच्छा, असे काहीतरी झाले पुरविते तेच पिच्छा' मधील अगतिकता, सुनिताबाईनी पण तेव्हड्याच सामर्थ्याने व्यक्त केली . तर 'फलाटदादा फलाटदादा' या कवितेतील 'बोला ना फलाटदादा' म्हणत सुनिताबाईनी केलेले आर्ज व ऐकुन खरंच आता फलाटदादा तरी बोलेल नाहीतर सुनिताबाईच्या डोळ्यांमधून अश्रुधारा वाहतील असेच वाटुन गेले . पण शेवटच्या ओळी बरोबर त्या अगदी पूर्ववत होऊन जात . त्यांच हे असं प्रत्येक कवितेत आत . .बाहेर येणं . .जाणं ही तर फक्त अनुभवण्याचीच गोष्ट आहे, लिहिण्या वाचण्याची नाहीच .

सगळ्यात जास्त रंगला तो खानोलकरांचा किस्सा . कवि चिं . त्र्यं . खानोलकर उर्फ आरती प्रभु मूळ कोकणातले . त्यांच्या वडिलांची कोकणात खानावळ होती . वडिलांना मदत म्हणून खानोलकर गल्ल्यावर बसत असत . तिथे बसल्या बसल्या रिकाम्या वेळात कविता लिहीणे हा त्यांचा छंद होता . खानावळीत नियमीत येणाऱ्यापैकी दोघांची नजर गल्ल्यावर बसलेल्या ह्या तरुणावर असे . हा कागद पेन घेउन एव्हढे पानेच्या पाने रोज काय लिहीतो हा मोठाच प्रश्न त्यांच्या पुढे होता . मुलगा तरुण आहे आणि अगदी हरवून जाऊन लिहितोय म्हणजे नक्कीच प्रेमपत्र असणार, असा निष्कर्ष तर त्यांनी काढला पण खात्री करुन घेण्यासाठी त्यांनी एके दिवशी त्यातले काही कागद पळवून आपल्या खोलीवर नेले . 'ऊभी लिहितात ती कविता आणि आडवे ते गद्य' एवढीच मराठी साहित्याची ओळख असलेल्या त्या दोघांना आपण पळवून आणल्या त्या, त्या मुलाने लिहिलेली प्रेमपत्रे नसून कविता आहेत असा अर्थबोध झाला . पुढे त्यातल्याच काही कविता त्यांनी मुंबईस मौज प्रकाशनात छापण्यासाठी पाठवल्या . अगदी खानोलकरांच्या नाव पत्त्यासहीत . परंतु तीन चार महिने वाट पाहुनही जेंव्हा त्या छापून आल्या नाहीत तेंव्हा कविचे चि . त्र्यं . खानोलकर हे विचित्र नावच त्याला कारणीभूत असावे असे समजून ह्या महाशयांनी मग कविचे नाव बदलून पुन्हा नव्याने कविता छापण्यासाठी पाठवून दिल्या . आणि यावेळेस पत्ता जरी तोच होता तरी नाव होते 'आरती प्रभु' . आश्चर्य म्हणजे यावेळेस कविता छापुनही आल्या . आणि स्वत:च्याच प्रतिभेपासून अनभिज्ञ असलेला एक थोर कवि महाराष्ट्राला मिळाला . अचानक मिळालेल्या या अफाट प्रसिध्दीमुळे खानोलकर थोडे विचीत्र मनस्थितीत सापडले . 'आपण कोणीतरी अदिवतीय आहोत', असा अहंकार आपल्यात निर्माण तर होणार नाही ना अशी भिती त्यांना वाटू लागली . आणि कविता जन्मली, 'येरे घना, येरे घना, न्हाउ घाल माझ्या मना' . या कवितेतले आरती प्रभुंचे घनास आळवणे, 'एका रिमझिम गावी, भासत आहे हृद्यस्थ तान, पण . . .' या 'पण' मधील अगतिकता, 'गेले द्यायचे ते राहुन, तुझे नक्षत्रांचे देणे' मधील अस्वस्थता सुनिताबाई प्रेक्षकांपर्यंत अगदी थेट पोहोचवतात .

बा . भ . बोरकर, पु . ल . व सुनिताबाईवर त्यांचा विशेष लोभ होता . त्यामुळे बोरकरांच्या कविता त्यांनी अधिकच समरसुन वाचल्या . त्यांच्या विशेष असलेल्या प्रेमाची जाणीव कशी झाली याची आठवण सांगताना सुनिताबाईनी सांगितलेला प्रसंग अगदी मन हेलावून टाकतो . बोरकर अगदी अंथरुणाला खिळून होते . या आजारातून आता ते उठत नाहीत हे सगळे समजून चुकले होते . सुनिताबाई त्यांना भेटण्यासाठी म्हणून गेल्या होत्या . बोरकरांना तर उठून बसणे ही शक्य नव्हते . वाचन तर लांबची गोष्ट . म्हणुन त्यांनी सुनिताबाईना सांगितले, मला माझी समुद्राची कविता म्हणुन दाखव . ती बोरकरांची अगदी सुरुवातीच्या काळातली कविता असल्यामुळे सुनिताबाईनाही पाठ नव्हती . शेवटी बोरकरांच्या मुलीच्या मदतीने घरातच शोधाशोध करुन, पुस्तक मिळवून सुनिताबाईनी ती वाचली . आणि कविता संपता संपताच ते कोमात गेले आणि दोनच दिवसांनी दुनिया सोडून . परंतु मृत्यू शय्येवरही 'समुद्र बिलोरी ऐना, सृष्टीला पाचवा महिना . .' सारखी अवखळ प्रेम कविता ऐकण्याची इच्छा करणारा कवि किती तरुण मनाचा असेल याची कल्पना येते . सुनिताबाईबरोबर सगळे प्रेक्षकही अगदी भावुक होवून गेले होते हा प्रसंग ऐकताना . या नंतर बोरकरांच्या एक से बढकर एक कवितांची उधळणच होती . 'सरीवर सरी आल्या ग, सचैल गोपी न्हाल्या ग', 'हवा पावसाळी, जरा रात्र काळी', 'मी विझल्यावर त्या राखेवर', 'कळत जाते तसे, कसे जवळचेही होतात दूर' . . . सगळ्याच कविता सुनिताबाईनी अप्रतीमरित्या सदर केल्या .

कार्यक्रम कितीही रंगला तरी शेवट हा अपरिहार्यच असतो . या कार्यक्रमाचा शेवट सुनिताबाईनी त्यांची प्रीय सखी पद्मा गोळे ह्यांच्या दोन कवितांनी केला . 'आता मी नसतेच इथे' ही कविता अगदी मनाला चटका लाउन गेली . सुनिताबाई त्यांच्या मनातले भाव तर बोलत नाहीत ना? असे काहीसे क्षणभर वाटून गेले . आजकाल त्यांचे शक्यतो एकटे एकटे रहाणे आणि कवितेचा आशय यात कुठेतरी साधर्म्य जाणवले . कार्यक्रमाचा परमोच्च बिंदु म्हणजे 'चाफ्याच्या झाडा . .' ही कविता! अर्थातच पद्माबाईची, पण ही माझीच कविता आहे असे सुनिताबाईनी म्हंटल्यामुळे कोड्यात पडलेल्या प्रेक्षकांसमोर, त्या मागचे गुपीत उलगडत सुनिताबाईनी जेंव्हा सादर केली तेंव्हा अंगावरचे रोमांच टाळ्यांचे रुप घेउन प्रेक्षागृहात दुमदुमले .

‘चाफ्याच्या झाडा, चाफ्याच्या झाडा
का बरे आलास आज स्वप्नात ?
तेंव्हाच तर आपलं नव्हतं का ठरलं ?
दुख नाही उरलं आता मनात ’

- आरती

साडेसातीचा महीमा

आकाशातल्या ग्रहांचा वेध घेऊ पाहाणाऱ्या, भविष्यात डोकावू इच्छिणाऱ्या प्रत्येक व्यक्तिच्या मनात कुठेतरी एक अनामिक भय असतं, एक कुतूहलमिश्रीत औत्सुक्य असतं ते म्हणजे साडेसातीचं . साडेसातीविषयी लोकांमध्ये नाना प्रवाद आहेत . साडेसाती सुरू झाली की आपण संपलोच अशी लोकांची धारणा असते . आता काय काय भोगावं लागणार असे विचार मनात येऊ लागतात .
या लेखामध्ये आपण साडेसाती म्हणजे नक्की काय, ती कुणाला कशी फळे देते आणि साडेसातीत साधारणपणे काय काळजी घ्यायची हे पाहाणार आहोत .
साडेसाती शनी या ग्रहाशी निगडीत आहे हे तर सर्वांना माहीत असतेच . साडेसाती म्हणजे, शनी आपल्या राशीला बारावा, पहीला व दुसरा असतानाचा साडेसात वर्षाचा काळ . शनी एका राशीत प्राय: अडीच वर्षे राहातो . बारा राशीत भ्रमण करून परत तो त्या राशीत यायला तीस वर्षे लागतात . म्हणजेच एकदा साडेसाती संपली की परत साडेबावीस वर्षांनी परत तिचा सामना करावा लागतो .

शनी जेंव्हा आपल्या चंद्रराशीच्या आधिच्या राशीत प्रवेश करतो तेंव्हा साडेसाती सुरू होते आणि जेंव्हा आपल्या चंद्रराशीच्या नंतरच्या राशीतून बाहेर पडतो तेंव्हा ती संपते . उदाहरणार्थ, एखाद्या व्यक्तीची रास वृषभ असेल तर शनी वृषभेच्या आधिच्या राशीत म्हणजे मेषेत गेला तेंव्हा (एप्रिल 1998) तिला साडेसाती सुरू झाली . मेषेत शनी जुलै 2000 पर्यंत होता . ही वृषभ राशीच्या व्यक्तीची साडेसातीतली पहीली अडीच वर्षे . जुलै 2000 ते एप्रिल 2003 शनी वृषभेत होता . ही वृषभ व्यक्तीची मधली अडीच वर्षे . त्यानंतर एप्रिल 2003 पासून ते सप्टेंबर 2004 पर्यंत शनी मिथुनेत आहे . ही वृषभ व्यक्तीची शेवटची अडीच वर्षे . सप्टेंबर 2004 मध्ये शनी कर्केत गेल्यावर वृषभ व्यक्ती साडेसातीतून मुक्त होईल . आत्ता शनी मिथुनेत आहे त्यामुळे वृषभ, मिथुन आणि कर्क या तीन राशीच्या व्यक्तींना साडेसाती चालू आहे .
साडेसातीचे मुख्य फळ म्हणजे, दु:ख, नैराश्य, मानहानी, अपेक्षाभंग, अडथळे व प्रत्येक कार्यात उशीर . थोडक्यात सुख व मनाची शांती मिळणे दुर्लभ होते .

सर्वसाधारण फळे -
बारावा शनी: संकटे, आर्थिक हानी, कोर्टकचेऱ्या, मानहानी, कर्ज, अनारोग्य, मानसिक क्लेश
पहिला शनी: रोग, नैराश्य, अडथळे , स्थलांतर, पती वा पत्नीचे अनारोग्य
दुसरा शनी: आर्थिक संकट, कोर्ट, कर्ज, अनिष्ट घटना
साडेसातीची किंवा ज्योतिष्यातल्या कुठल्याही योगाची फळे पाहाताना एक सर्वात महत्वाची गोष्ट लक्षात ठेवायची ती म्हणजे सर्वच कुंडल्यात ही फळे मिळतातच असे नाही . जन्मकुंडलीतील चंद्र आणि शनीचे स्थान व राशीबळ, त्यांचे इतर ग्रहांशी होणारे शुभ अशुभ योग, आणि शनीचे इतर गोचर ग्रहांशी होणारे योग यावर ते अवलंबून राहील . पत्रिकेचा सर्वसामान्य दर्जा हा सुद्धा फलिताच्या दृष्टीने महत्वाची भूमिका बजावतो . एखादा राजयोग किंवा शुभ ग्रहांचा एखादा नवपंचम योगही पत्रिकेचा दर्जा वाढवतो . शुभ ग्रहांच्या, लग्नेश किंवा राजयोगकारी ग्रहांच्या दशा, विदशा सुद्धा साडेसातीच्या अनिष्ट परिणामांची तीव्रता पुष्कळ कमी करतात .
मकर, कुंभ या शनीच्या स्वत:च्या राशी आहेत . या राशीतून भ्रमण करत असताना तो तुलनेने चांगली फळे देतो . तसेच बुध, शुक्र हे त्याचे मित्र ग्रह आहेत . त्यांच्या राशीत म्हणजे मिथुन, कन्या, वृषभ आणि तुळ या राशीत तो तितकासा त्रास देत नाही . त्याउलट रवी, गुरू, मंगळ आणि चंद्र हे शनीचे शत्रु ग्रह आहेत . त्यांच्या राशीत म्हणजे, सिंह, धनु, मीन, मेष, वृश्चिक आणि कर्क ह्या राशीत तो अधिक अनिष्ट फलदायी ठरतो . मेष ही शनीची नीच रास आहे तर तुळ ही उच्च रास आहे .

वरील वृषभ व्यक्तीच्या उदाहरणात, पहीली अडीच वर्षे या व्यक्तींना खूप त्रासाची जातील कारण शनी मेषेत आहे व मेषेचा स्वामी मंगळ हा शनीचा शत्रू आहे . इतकच नव्हे तर मेष ही शनीची नीच रास आहे . परंतु तेच तो वृषभेत व पुढे मिथुनेत गेल्यावर तेव्हढा त्रास होणार नाही . तसेच कन्या राशीच्या व्यक्तींना पहीली अडीच वर्षे प्रचंड त्रास होईल (इथे सगळ्याच कन्या व्यक्तींना होईल असे नाही . वरचा सर्वसाधारण फळे नंतरचा परिच्छेद पाहा .) कारण शनी सिंहेत आहे व सिंहेचा स्वामी रवी हा शनीचा प्रथम प्रतीचा शत्रू आहे . परंतु मधली अडीच वर्षे जेंव्हा शनी कन्येत असेल ती त्यांना साधारण जातील . कन्या जातकांना शेवटची अडीच वर्षे खूप चांगली जातील कारण तेंव्हा शनी तुळेत म्हणजे त्याच्या उच्च राशीत असतो .
तसेच जर शत्रुग्रहांच्या राशी जन्मकुंडलीत सहा, आठ, बारा स्थानी असतील किंवा त्यात पापग्रह असतील तर अशुभ फळांची तीव्रता आणखी वाढते .
जन्मकुंडलीत शनी शुभफलदायी असता, किंवा शुभयोग करीत असता, साडेसातीत व्यक्तीमध्ये अनेक चांगल्या गुणांचा विकास होतो . महत्वाकांक्षा, जिद्द, कार्यकुशलता, आत्मविश्वास वाढतो . अधिकारप्राप्ती होते .
साडेसातीपासून रक्षण करण्यासाठी अनेकजण अनेक उपाय करतात . यामध्ये शनिवारी उपास, जप, शनीला तेल वाहाणे , नीलमणी वापरणे इ . अनेक प्रकार मोडतात . या सर्वांचा किती उपयोग होतो हा एक संशोधनाचा विषय आहे .
साडेसातीमध्ये काळजी घेण्याची एकच गोष्ट सगळ्यात महत्वाची आहे ती म्हणजे , आत्मसंयमन . कुठल्याही परिस्थितीला तोंड देण्याची मनाची तयारी असणे . आपल्यात मानसिक आणि शारिरीक स्तरावर पॉझिटीव्ह बदल करणे , सत्याची कास धरणे , कर्तव्यपालनात कसूर न करणे , न्याय, सदाचार आणि शिस्त यांचे पालन करणे . साडेसाती माणसाला खूप काही शिकवून जाते . त्याचे विचार, त्याच्या श्रद्धा, त्याचे भावनिक आणि नात्यांचे बंध या सर्वांचा त्यावर कस लागतो आणि त्यातून जे उरतं ते शंभर नंबरी शुद्ध सोनं असतं जे पुढच्या आयुष्यासाठी त्याला मार्गदर्शक ठरतं .

आठवणींचा फराळ

कालच आम्ही लहानपणच्या गप्पांत रंगून गेलो होतो . इथे अमेरिकेत आल्यापासून दिवाळीच्या फराळात 'भारतातल्या दिवाळीची मजा' हा एक खुसखुशीत item असतो .

मी मुळची कोकणातली . दिवाळीच्या फराळात खाजाचे कानवले, घरी बनवलेल्या भाजाणीची चकली, घरच्या तांदळाचा, फुलवून आणलेल्या पोह्याचा चिवडा, गुलाबांसारखे दिसणारे चिरोटे , आणि खास घरची वेलची अन् केळी घालून केलेली बोर असायची .

खाजाच्या कानवल्यांसाठी सारण असायचं खोबऱ्याचं . ते पण कसं बनवलं जायचं तर घरचे नारळ खऊन, फक्त पांढरं खोबरं घेऊन, नंतर ते उन्हात सुकवून . आम्हा मुलांना खोबरं सुकवताना राखण म्हणून बसवलं जायचं . पत्त्याचा डाव टाकत आम्ही ते काम करायचो . कधी कधी खेळात राखणीचं भान रहायचं नाही, पण " काय रे आहे न लक्ष " अशी मोठ्यांची हाक आली की " हो ग . . सारखं काय विचारतेस " अशी उत्तरं असायची . खरं तर ते काम इतकं कंटाळवाणं असायचं . खाजाचे कानवले म्हणजे अगदी सुगरणीची परिक्षा असायची . खोबऱ्याच्या चवाने टम्म फुगलेले, तुपात मंद आचेवर तळलेले पण तरीसुध्दा पांढरे शुभ्र राहिलेले, न फुटता पापुदे सुटलेले ते कानवले तोंडात टाकले की विरघळलेच पाहिजेत . एकंदर काय तर नजाकतीचं काम . रवा भिजवून तो कुटायचं काम घरात काम करणारी धाकली करायची . आई मोड्या पोळ्या लाटून, तुपाचं सारण लावून गुंडाळ्या करून त्याचे पागोट्यासारखे तुकडे करून द्यायची . पारी लाटायच काम आमच्याकडे असायचं . तेही तस कौशल्याच काम . आतलं सारण न निघता पारी लाटता आली पाहिजे . आजी खोबऱ्याचं सारण भरून कानवले तयार करायची आणि आई ते पापुद्रे फुलवत रंग न बदलता तळायची . त्या दिवसाचा दुपारचा चहा बाबांकडे असायचा . दिवसभर चालत असे ते काम . पण सगळ्यांनी मिळून करण्यात वेगळीच मजा असायची . डबाभर कानवले केले जायचे . डब्यात भरून ठेवणं म्हणजे पण एक जबाबदारीचच काम . एकावर एक ठेवताना न फुटू देता करता आलं पाहिजे न ते काम . माझ्या मोठ्या बहिणीवर ही जबाबदारी असायची . ही माझी मोठी बहीण आता Pediatric Surgeon आहे . मला वाटतं हळुवारपणे कानवले हाताळल्यामुळेच ती Pediatric Surgeon होवू शकली नाहितर Orthopedic Surgeon झाली असती .

चकलीसाठी भाजाणी आई घरीच करायची . मंद आचेवर धान्य आणि डाळी भाजल्या जायच्या . पिठात भेसळ होवू नये म्हणून पीठ घरीच जात्यावर दळलं जायचं . चकलीचा आकार 4 ते 5 इंच व्यासाचा असायचा . आमच्या घरात पदार्थाच्या रंगाला चवीइतकच महत्व दिल जायचं . सगळ्या चकल्या अगदी एका रंगाच्या आणि आकाराच्या असायच्या . दिसायला सुंदर आणि चवीला अगदी खमंग आणि खुसखुशीत . खाताना हाताला तेल न लागणाऱ्या . डब्यात भरून ठेवताना राजगिऱ्याच्या लाह्या packing म्हणून टाकल्या जायच्या . का तर डबा उचलताना चकल्या एकमेकांवर आपटून तुटता कामा नयेत . मोठ्या डब्यात light brown चकल्या त्या राजगिऱ्यांच्या लाह्यात दिसायच्या मात्र मस्त .

लाडू दोन प्रकारचे बनायचे . बेसनाचे आणि रव्याचे . बेसनाचे लाडू अगदी साजूक तुपातले असायचे . बेसन भाजतानाचा मंद खमंग वास सुटायचा घरभर . आपल्या आईला बेसन भाजायला इतरांपेक्षा जास्त वेळ का लागतो हे इतरांकडचे टाळ्याला चिकटणारे बेसनाचे लाडू खाल्यावर कळायचं . मला स्वत:ला रव्याच्या लाडवापेक्षा बेसनाचे लाडू वळणन जास्त आवडतं . एकतर हाताला चिकटत नाही आणि दुसरं म्हणजे कसा लुसलुशीत स्पर्श असतो त्या भाजलेल्या बेसनाचा . प्रत्येक लाडवाला, कमीत कमी एक बेदाणा लावत आणि दोन बेदाणे तोंडात टाकत लाडू वळायचं काम आम्ही संपवायचो .

चिरोटे मात्र माझी आई आणि आजी मिळून करायच्या . आम्हाला मदतीला घेण्याचा आणि काही बिघडवण्याचा chance त्यांना घ्यायचा नसावा . थोडासाच लाल रंग टाकून पीठ अगदी किंचित गुलाबी रंगाच केलेल असायच . तूप आणि तांदळाच्या पिठीचं सारण लावून मैद्याच्या पोळ्या गुंडाळल्या जायच्या आणि परत त्याचे पागोट्यासारखेच गुंडाळलेले गोळे हलक्या हाताने पुरीसारखे लाटले जायचे . त्या पुऱ्या तुपात मंद आचेवर फुलांसारखे पापुद्रे उमलवत तळल्या जायच्या . तळल्यावर ह्या पुऱ्या उमलत्या गुलाबांसारख्या दिसायच्या . नंतर त्यावर शुभ्र पिठीसाखर टाकली जायची . इतके सुरेख दिसायचे न ते चिरोटे . . . !

दिवाळीच्या पहिल्या, दुसऱ्या दिवशी सगळ्यांना देण्यासाठी डबे भरले जायचे . डबा अगदी सजवल्यासारखा दिसायचा . आम्ही लहान असताना कोणाचे पदार्थ दिसायला छान, कोणाचे चवीला छान आणि कोणाचे चव आणि दिसायला छान अशा categories करायचो .

इथे आल्यापासून मात्र मी सगळ्याला shortcut शोधत असते . काय आणि कसं केलं की पदार्थ पटकन आणि चांगला लागेल ह्यासाठी युक्त्या शोधत रहाते . पण तोंडात चव मात्र आईने केलेल्या पदार्थांचीच रेंगाळत असते .

— अर्च

गोळ्यांची करामत

चकलीत रसिक जरी
नजर गुंतते भारी ।
जिव्हा न विसरते
आतिषबाजी खारी ।।
- नरेंद्र गोळे

ही सौम्य करंजी
सदैव ठरते प्यारी ।
जणु मंद तेवते
खाद्याची चव न्यारी ।।
- नरेंद्र गोळे

नरेंद्र गोळे

या शिकुया अ आ इ

नमस्कार :

अमेरिकन भूमीवर मी पाय टाकून आता पाव शतकाहून अधिक काळ उलटून गेला . अर्ध्याहून अधिक आयुष्य जिथे काढलं, तिला खरं तर कर्मभूमी म्हणायला काहीच हरकत नाही . त्यामुळे कुणाला वाटेल की मराठी मातीशी असलेले बंध आता उसवून गेले असतील . मनात जपलेल्या मराठमोळ्या मोरपिसांचे रंग आता विटून गेले असतील . मराठी संसकृतीची रेखाचित्रे आता धूसर झाली असतील . पण घडतय मात्र उलटच . जसजशी वर्षे सरताहेत तसतसे हे बंध अधिकच दृढ होत आहेत . मनात जपलेल्या मोरपिसांचे रंग अधिकच गडद गहिरे होत आहेत . मराठी मातीची ओढ अधिकच आतुरतेने आम्हाला आर्त साद घालत आहे . ही आर्तता, ही ओढ, हे बंध, हे गंध , हे नाद, हे रंग पुढच्या पिढीपर्यंत पोचवण्याची निकड आम्हाला जास्तच प्रकर्षाने जाणवते आहे . आम्हाला मिळालेला वारसा, आमच्या मर्मबंधातली ठेव पुढील पिढीच्या सक्षम, उत्सुक हातात सोपवून ह्या मातीच्या, ह्या संसकृतीच्या ऋणातून आम्हाला मुक्त तर व्हायचंच नाही . उलट ह्या ऋणातच राहून तृप्त मात्र व्हायचं आहे .

इंग्लंड, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, मॉरिशस, मध्य पूर्व इ . दूर दूरवर पसरलेल्या लाखो मराठी मनांना हे मराठमोळ्या मातीपासूनचं, संसकृतीपासूनचं अंतरलेपण, पारखेपण जाणवतं ते मुख्यत्वेकरून भौगोलीक अंतरामुळे व सांसकृतिक भिन्नतेमुळे . पण जरा डोळसपणे इकडे तिकडे बघितल्यावर असं लक्षात आलं की भारतात देखील इंग्रजी भाषेच्या वरवंट्याखाली भरडलेल्या उमलत्या पिढीच्या वाट्याला हे सांसकृतीक अंतरलेपण आले आहे .

जागतिकीकरणाच्या ह्या उसळत्या लाटेत इंग्रजी भाषा येणं हे अगदी अनिवार्यच आहे . पण त्याचा अर्थ मराठी भाषा येऊ नये असा कुठे आहे? भाषा म्हणजे संसकृती नाही, हे जरी खरं असलं तरी संसकृतीचा एक अविभाज्य व अत्यंत महत्वाचा घटक म्हणजे भाषा आणि भाषेच्याच माध्यमातून संसकृती जतन होते ही वस्तुस्थिती कुणालाही मान्य व्हावी . त्याचबरोबर भाषा व आचार विचार हे अनुवांशिक नसून अर्जीत असतात हेही लक्षात घ्यायला हवं . त्यामुळे इंग्रजी माध्यमाच्या शाळेत जाणाऱ्या मराठी मुलांच्या पालकांसाठी हे मराठी मातीशी असलेलं नातं जपण्याची, हे मराठमोळेपण जतन करण्याची जबाबदारी येऊन पडते . आणि ती पार पाडण्यासाठी मराठी भाषा शिकवण्याची निकड शब्दातीत होते .

कारण प्रत्येक शब्दाचं रूपांतर करता येत नाही . गणपती किंवा मोदक म्हटल्यावर मराठी मनात त्या विघ्नहर्त्याबद्दल, त्या विद्याकलेच्या अधिष्ठात्या देवतेबद्दल जे प्रेम, जो भक्तीभाव, जी टाळ मृदुंगाची व आरत्यांची धून वाजू लागते ती Elephant Headed God किंवा Rice Dumpling म्हणून येत नाही . म्हणुनच पु . ल . देखील म्हणुन गेले की 'आमच्या हिच्या हातच्या थालिपीठाची सर कश्शाकश्शाला नाही याचे इंग्रजीत रुपांतर कसं करणार?'

थोडक्यात म्हणजे मराठी संसकृतीची ओळख व जोपासना होण्यासाठी नविन पिढीला मराठी भाषा येण्याची व अनुषंगाने शिकवण्याची नितांत आवश्यकता आहे हे अनेकांनी जाणले आहे . तसेच अनेक व्यक्ती व संस्थांनी त्या दृष्टीने विविध प्रयोग चालवले आहेत, उपक्रम राबवले आहेत . हे प्रयोग, उपक्रम नक्कीच स्तुत्य आहेत . पण मला त्यांच्यात एक त्रुटी प्रकर्षाने जाणवली . ती ही की ते मुख्यत्वेकरुन बालकांसाठी नसून पालकांसाठी झाले आहेत . भाषा, तिच्यातिल साहित्यनिर्मिती, संसकृती प्रवाह शिकवण्या आधी निकड आहे मुलांना अक्षर ओळख व बाराखड्या शिकवण्याची . म्हणून मी तीन ते पाच या वयोगटातील मुले डोळ्यापुढे ठेवून त्याना अक्षर ओळख करून द्यायचा घाट घातला . काळ बदलला, साधनं बदलली . म्हणून माहिती तंत्रज्ञान युगाला साजेसं माध्यम मी निवडलं . VCD! त्यायोगे संगणक किंवा TV कोणत्याही माध्यमातून आपल्याला या मराठी शाळेत अगदी घरात बसून हजेरी लावता येईल .

काळ बदलला, साधनं बदलली तरी संगीताची ओढ मात्र कायमच आहे . कारण संगीत ही हृदयाची भाषा आहे . तिला कोणत्याही भाषेचं बंधन नाही . ह्या सर्व विचारमंथनातून मी माझ्या सहकाऱ्यांची निवड केली . त्या सर्वांच्या सहकार्यातून आम्ही शतकानुशतकं किंवा पिढ्यान् पिढ्या लोकप्रिय असलेल्या देशविदेशातील बालगीतं व बडबडगीतांचा आधार घेउन आम्ही ही मराठी अक्षरांची व भाषेची दिंडी आपल्या दारापर्यंत आणली आहे . रंजनातून बोध हा साधा विचार त्यामागे आहे .

मुलाना एकटं वाटू नये म्हणून आम्ही त्यांच्यासाठी नवे सवंगडी तयार केले आहेत . जसे की अप्पू हत्ती, मोती कुत्रा, मनी मांजरी व मिठ्ठू पोपट . त्यांच्या समवेत तुमची ही मुले परीराणीच्या शाळेत जातील, खोड्या करतील, दंगा करतील, गातील, हसतील . पण मुख्य म्हणजे त्यांच्याही नकळत अ ते ज्ञ ही अक्षरं शिकतील, बाराखड्या म्हणतील, लिहायला लागतील . पण त्याही पलीकडे जाउन कृष्णाचा मामा कोण? नारिंग म्हणजे काय? राखी पौर्णिमिला काय करतात? चिरोटे केव्हा खातात? . . . . असे अनेक नवीन संदर्भ त्याना मिळतील . त्यातून ती प्रश्न विचारतील, त्यांचे कुतुहल वाढेल, त्यांची जिज्ञासा जागृत होईल . व ही मराठी मातीची ओढ , तिचा गंध, तिचा नाद त्यानाही खुणावेल . मग पुलंचे विनोद त्याना हसवतील, कुसुमाग्रजांच्या कवितांतून ती गरजतील, हर हर महादेव ही गर्जना त्यांना पुलकीत करील व ' निवृत्ती ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई एकनाथ नामदेव तुकाराम ' ह्या नामगजरात तीही धुंद होतील!

- अनुराधा गानू

आणिक स्मृती ठेवुनी जाती

- सु. शि. — - मैत्रेयी
- गौरी देशपांडेंच्या साहित्यातील नायिका — - गौरी देशपांडे
- 'लंपन' आणि त्याचे बाबा — - राज
- आकाश उजळले होते — - प्रसाद __ शिर

सु . शिं .

एक वय असतं . . वयात येण्याचं !! वेड्या स्वप्नांचं . .बंडखोरीचं . . . लहानश्यादेखिल धाडसाच्या कल्पनांनी थरारून उठण्याचं . . आणि अगदी हेच वय असतं, -- 'सु शि' वाचण्याचं !!

त्या रहस्यकथा, थरार कथांमधली जादूच तशी आहे . . पकड घेणारी सुरुवात . . एखाद्या अनपेक्षित घटनेतून थरारक रहस्याची चाहूल . . नायकाचं (आणि वाचकाचं ही!)त्यात अडकत जाणं . . मधेच काही हमखास हसू फुलवणारी 'पात्रे' . . एखादे गुलाबी 'प्रकरण' . . गुन्हेगारी विश्वाचं श्वास रोखायला लावणारं वर्णन . . आणि हळू हळू उलगडत जाणारे ते रहस्य . . सु शिंच्या कुठल्याही रहस्यकथेची ही व्यवच्छेदक लक्षणे !! मग काय, पुस्तक कोणत्याही वेळेला हातात घेतले तरी वाचून संपेपर्यन्त खाली ठेवले जाणे शक्य च नाही !!

मला अगदी आठवतंय, 2 दिवसांवर परीक्षा असतानाही, नेमके दादाने नवे सु शिचे पुस्तक आणलेले पाहिल्यावर न रहावून मी एका बैठकीत ते वाचून काढलं होतं (आणि वडिलांची बोलणी पण खाल्ली होती!)
सु शिंच्या असंख्य चाहत्यांनी त्यांच्या पुस्तकांवर, त्यातल्या नायकांवर असं झपाटून प्रेम केलं आहे . . प्रेयसीची वाट पहावी तशी धड्धड उरात घेऊन त्यांचे नवे पुस्तक मिळण्याची वाट पाहिली आहे . .
मी जेव्हा रहस्यकथा वाचण्याच्या वेडात होते तेव्हा बाबूराव अर्नाळकर ,गुरुनाथ नाईक वगैरेंची पुस्तके ही त्यातल्या भाषेमुळे असेल कदाचित, पण काहीशी कालबाह्य वाटत होती . . त्या मानाने सु शि अगदी नव्या पिढीचे वाटायचे . . सु शि वाचायला सुरुवात केली तेव्हा त्या लिखाणातल्या ताजेपणाने, नाविन्याने मला आकर्षित केलं .
सु शिंचे नायक अमर, फिरोज, मंदार, दारा हे सगळे एकजात अगदी देखणे, स्मार्ट, ज्याला larger than life म्हणतो असे सर्व काही असले तरीही आपले, समकालीन वाटायचे . फक्त नायकच नाही तर त्यांच्या पुस्तकातली बॅ दीक्षित, डॅनी, गोल्डी, इं . ब्रिज, डॉ . चक्रवर्ती अशी इतर पात्रे, त्यांच्या लकबी, अत्याधुनिक गाड्या हे सगळे अगदी तेव्हा आमच्या गप्पांचे आवडते विषय असायचे .

1971 साली सु शिंनी लेखन सुरु केले त्या नंतर सुमारे 2 तपांच्या कालखंडात त्यांनी 71 कादंबऱ्या आणि 11 कथा संग्रह लिहिले . पण एवढ्या मोठ्या काळातले त्यांचे कोणतेही पुस्तक घ्या, तुम्ही जर ते प्रथम वाचत असलात तर ते नविनच आले आहे असे वाटते . ते सातत्य, तो ताजेपणा होता त्यांच्या लिखाणात . . . .ती कधी जुनी वाटली नाहीत, यातच त्यांचे यश आहे .

सु शि उर्फ सुहास शिरवळकरांनी जन्म घेतला तो कीर्तनकार वडिलांच्या घरात . कथा रंगवून सांगण्याच्या त्यांच्या हातोटीचे 'रहस्य' कदाचित हे असावे !! सु शिंचे मोठे भाऊ उत्तम हे देखिल लेखन करत असल्यामुळे त्यांच्याकडूनही सु शिंना लेखनाची प्रेरणा मिळली .

अनेक मान्यवर लेखकांप्रमाणे सु शिंचादेखील मूळ पेशा शिक्षकाचा . पण इतर मान्यवर लेखकांशी असलेले त्यांचे साम्य इथेच संपते . . कारण त्यांच्या लेखनाच्या आणि लोकप्रियतेच्या मानाने त्यांना समीक्षकांचे कौतुक, मान्यता कधीच मिळाली नाही . त्यांना कधीच लेखक म्हणून 'मुख्य प्रवाहात' स्थान मिळाले नाही . .
अर्थात त्यात त्यांचा काही दोष नाही, रहस्यकथा हा साहित्य प्रकार च 'चटोर' मानला जातो त्याला कुणाचा काय इलाज!! असो .

सु शिंनी केवळ रहस्य कथा लिहिल्या असे नाही . त्यांच्या 'थरार','सन्नाटा' ,'चॅलेंज', 'वंडर ट्वेल्व' अशा गाजलेल्या रहस्यमय पुस्तकांबरोबरच त्यांनी 'पहाटवारा','बरसात चांदण्यांची', 'कल्पान्त' अशा सामाजिक कादंबऱ्याही लिहिल्या .
'दुनियादारी' या महाविद्यालयीन जीवन, कट्टा संसकृतीवर आधारित कादंबरीने तर तरुणांना वेड लावले होते . . .
अलिकडेच त्यांच्या कथेवर आधारित 'देवकी' हा मराठी चित्रपटही आला होता .
थोडक्यात म्हणजे, समीक्षकांचे नसले तरी वाचकांचे प्रेम आणि बाजारात पुस्तके येताच ती हातोहात संपण्याचे भाग्य त्यांना पुरेपूर लाभले .
11 जुलै ला पेपर मधे सुशिंच्या निधनाची बातमी वाचली तेव्हा ते खरंच वाटलं नाही . . 52 हे काही जायचं वय नव्हतं . .
त्यांच्या रहस्यकथांप्रमाणेच त्यांच्या जीवनाचा अंत देखिल धक्का देऊन गेला . . अनपेक्षित . . हूरहूर लावणारा ठरला . .

- मैत्रेयी

गौरी देशपांडेंच्या साहित्यातील नायिका . . .

दि . 1 मार्च 2003 ह्या दिवशी प्रसिद्ध लेखिका गौरी देशपांडे आपल्यातून निघून गेल्या .

काहीही व्यक्तिगत ओळख नसतानाही त्यांच्या साहित्यामुळे माझ्यासारख्या अनेक चाहत्याना त्यांचा मृत्यू एका जवळच्या जिव्हाळ्याच्या व्यक्तीच्या मृउत्यूसारखाच चटका लावून गेला .

मराठी माणसाचं आदराचं स्थान असलेल्या प्रसिद्ध कर्वे घराण्यात जन्मूनही लौकिकार्थाने त्या प्रकाशात नव्हत्या . त्यामुळे साहित्याच्या वर्तुळात काही मोजक्या जवळच्या व्यक्ती वगळता त्यांच्या व्यक्तिमत्वाची ओळख सर्वसामान्य वाचकाला त्यांच्या साहित्यातूनच झाली .

लेखनाची अत्यंत आकर्षक अशी स्वतंत्र शैली असलेल्या ह्या लेखिकेने कर्वे घराण्याच्या परंपरेनुसार समाजाच्या रुढ चौकटीतून बाहेर पडून मानवी नातेसंबंधाना नवं परिमाण देणारं लेखन केलं . त्यांच्या सर्व प्रकारच्या साहित्यामध्ये हाच मूळ विचार प्रामुख्याने दिसतो . नातेसंबंधातली भावनिक गुंतागुंत आणि ह्या गुंतागुंतीची अतिशय वेगळ्या दृष्टिकोणातून उकल करताना नायिकेने स्वत:चा शोध घेत प्रगल्भ होणं, हा एक समान धागा त्यांच्या प्रत्येक कथेतून दिसून येतो . उदाहरणार्थ, 'दुस्तर हा घाट' मधील नमू, प्रगल्भ साहित्यप्रेमी, संवेदनशील व बुद्धिमान अशी ही नायिका मनोमन जाणून असते की वनमाळी आवडत असला तरी त्याच्यावर आपलं प्रेम नाही . त्यामुळे जेव्हा जेव्हा हरिभाई (वनमाळीचे वडिल) तिला विचारतात, ' माझा वनमाळी मनापासून आवडतो ना तुला?' तेव्हा तिच्या मनात अतिशय आदराचं आणि आपुलकीचं स्थान असलेल्या हरिभाईना वाईट वाटू नये म्हणून नमू म्हणते, ' हे काय हरिभाई? तुम्हाला माहितच आहे वनमाळी किती प्रेम करतो माझ्यावर आणि मीही हळू हळू पडेनच की प्रेमात त्याच्या .' नमू, वनमाळी, ॲलिस्टर आणि हरिभाई या सगळ्यांचीच एकमेकांबरोबरची नाती अतिशय संवेदनशील आणि घट्ट विणीची आहेत . नमू वनमाळीबरोबरच्या आपल्या नात्याचा प्रामाणिकपणे शोध घेत असतानाच तिला अचानक लक्षात येते की 'अरे, शेक्स्पिअर इतके आपण आत्तापर्यंत कोणाच्याच प्रेमात पडलो नाहिये .' गौरीताई नमूचा हा सगळा शोध प्रवास अतिशय तरल पणे आणि परिणामकारकपणे चित्रीत करतात .

एकूणच गौरीताईची कुठलीही कथा वाचताना शास्त्रीय संगीत ऐकल्या सारखा गहिरा आणि उत्कट आनंद मिळतो . संगीतातील सुंदर हरकतीना जशी नकळत वाहवा मिळते तशीच गौरीताईच्या साहित्यातील काही वाक्यं अपेक्षित परिणाम साधून जातात . उदाहरणार्थ . ॲलिस्टर नमूला भेटायला हॉलंड मधून भारतात येतो आणि भारताच्या आधुनिकतेचा स्पर्शही न झालेल्या ओबडधोबड निसर्गसौंदर्याने प्रभावीत होतो तेव्हा नमू म्हणते, " तुझ्या देशाचे किंवा इंग्लंडचे अमेरिकेचे सौंदर्य हे सिनेमानटीच्या सौंदर्या सारखे कुणीही जाऊन बघावं असं आहे पण माझ्या देशाचे सौंदर्य दिसायला मनाचे डोळे लागतात . आणि एकदा हे सौंदर्य पाहिले की डोळ्यांना दुसरं काही बघायची इच्छाच उरत नाही . " गौरीताईच्या कथेतील नायिका स्व:तच्याच मनाचा आतला आवाज ऐकणाऱ्या आहेत आणि त्या आवाजाशी प्रामाणिक राहून निर्णय घेताना समाजातील रुढ नातेसंबंधांची चौकट मोडायला त्या कचरत नाही . त्यामुळे बाळबोध संस्काराची वाट सोडून मुक्त विचार सरणी स्वीकारलेल्या ह्या नायिका उच्छृंखल वाटत नाहीत .
गौरीताईनी त्यांच्या कथनामध्ये सर्व प्रकारच्या
1 . पारंपारिक
अ . सासू - सून (कथा : गोफ)
ब . दोन मैत्रिणी (कथ : चन्द्रिकेग सारिकेग)
क . भाऊ - बहिण (कथा : चन्द्रिकेग सारिकेग)
ड . दोन बहिणी (कथा : निरगाठी)
ए . आई - मुलगे (कथा : निरगाठी)
फ . गुरु - शिष्य (कथा : दुस्तर हा घाट)

2 . अपारंपारिक
अ . सावत्रवडील - मुलगी (कथा : निरगाठी)
ब . प्रौढ स्त्री - पुरुष (कथा : चन्द्रिकेग सारिकेग)

नात्यांचा खोलवर वेध घेतला आहे .

गौरीताईनी सर्वच कथांसाठी खूप वेगळे आणि परिणामकारक फॉर्म निवडले आहेत . उदाहरणार्थ : निरगाठी ह्या दीर्घकथे मध्ये वापरलेला पात्रांचा फॉर्म हा त्यातील आई - मुलगी, बहिणी बहिणी, पुनर्विवाह झालेले नवरा - बायको, सावत्र वडील - मुलगि, Psychiatrist व पौगंडावस्थेतील गोंधळलेली मुलगी यांच्या एकमेकांबरोबरच्या नात्यांमधील गुंतागुंत अतिशय नेमकेपणाने पोचवतो .

'तेरुओ' मधील आत्मनिवेदनाची शैली त्यातील कवितेसारखा तरल अनुभव अधोरेखित करते, तर 'चन्द्रिके ग सारिके ग' मधल्या दोन जिवलग मैत्रिणींच्या परस्पर विरोधी व्यक्ती चित्रणा मुळे (Extremely opposite characterization) कथेला एक नाट्यमय जिवंतपणा आला आहे .

गौरीताईच्या लघुकथांमध्ये त्यांची सूक्ष्म विनोदबुद्धीही प्रत्ययाला येते .

'थांग' आणि 'मुक्काम' ह्या दीर्घकथांमधील नायिका कालिंदी ही ज्या दिमित्रिबरोबरच्या जिवघेणी ओढ लावणाऱ्या नात्याचा शोध घेण्यासाठी सातासमुद्रांचा प्रवास करून ग्रीसला पोहोचते त्याच नात्याची गुंतागुंत सोडवल्या नंतर स्वेछेने तळेगाव सारख्या ठिकाणी एकटं राहण्याचा अकल्पित निर्णय घेते .
एकूणच गौरी देशपांडेंच्या साहित्यातून चाकोरीबद्ध आणि पठडीतल्या स्त्री प्रतिमेला छेद दिला गेला आणि मानसिक व बौद्धिक पातळीवर स्वतंत्र तसेच भावनिक दृष्ट्या स्वयंपूर्ण अश्या प्रगल्भ स्त्रीची नवी वाट उदयाला आली असे म्हणता येइल .

- गौरी देशपांडे

‘लंपन’ आणि त्याचे बाबा

एखाद्या पुस्तकाने झपाटून जाणे हा एक नविन नसला तरी फ़ार आनंददायक प्रकार असतो आणि जेव्हा त्या पुस्तकाच्या पाठोपाठ तशाच प्रकारची अजून 3 पुस्तके येतात तेव्हा तर माझ्या सारख्या अधाशी वाचकाला काय करावे ते कळेनासे होते . एवढे चांगले वाचल्यावर ते कुणाला तरी सांगितलेच पाहीजे असे वाटू लागते . संतांचे चार कथा संग्रह वाचल्यावर माझे नेमके असेच झाले .

बाल वाङमयाचे 2 प्रकार असतात . लहानांनी लहानांसाठी लिहिलेले, मोठ्यांनी लहानांसाठी लिहिलेले . अर्थात काही लहानांनी लिहिलेले हे मोठ्यांनाही न कळणारे असते पण त्यापेक्षा सर्वस्वी वेगळ्या प्रकारात बसणारे लेखन म्हणून प्रकाश नारायण संत ह्यांची ‘लंपन कहाणी’ म्हणता येइल . अर्थात संत काही मराठी वाचकांना नविन नाहीत . अनेक दिवाळी अंकातून त्यांच्या कथा - दीर्घकथा मराठी वाचकांच्या परिचयाच्या आहेत . त्याशिवाय त्यांची पुस्तके म्हणजे ‘वनवास’, ‘पंखा’, ‘शारदा संगीत’ आणि ‘झुंबर’ . ह्या सगळ्या पुस्तकातून ‘लंपन’ ह्या लहान मुलाचे भावविश्व आपल्यासमोर उलगडत जाते . रूढ अर्थाने हे बाल वाङमय नाही . मोठ्यांना पण ह्यातून अनेक पदरी अर्थ काढता येउ शकतात . बाल्यावस्थे कडून युवावस्थे पर्यंतचा ‘ via पौगंडावस्था’ हा प्रवास वाचकांना त्यांच्याही थोड्या बहुत अशाच शारिरीक मानसिक संक्रमणाची आठवण करुन देतो .

प्रस्तुत लेखाचा विषय म्हणजे 4 पुस्तकांची मिळून ही एक मालिका . अशा प्रकारचं लिखाण आपल्याला ‘आर . के . नारायण’ ह्यांच्या ‘स्वामी & हीज फ्रेन्ड्स’ , किंवा फास्टर फेणे अशाच पुस्तकातून वाचायला मिळालेलं आहे . पण संतांच्या लिखाणाची जातकुळी ह्या सर्वांहून सर्वस्वी भिन्ना आहे . स्वामी हे पूर्णपणे लहान मुलांसाठी ‘बाल वाचकांसाठी’ असलेले पुस्तक आहे . मोठ्यांना त्यातून साहित्यिक आनंद मिळत नाही असे नव्हे पण ‘लंपन’ च्या भावविश्वासारखे अनेक पदर त्याला नाहीत . ‘रंगतदार पद्धतीने सांगितलेल्या लहान मुलांच्या गोष्टी’ एवढेच ‘स्वामी’चे मर्यादित यश उरते . अर्थात प्रत्येक लेखक आपल्या प्रतिभेने अशा गोष्टींना एक वेगळे परिमाण प्राप्त करून देत असतो पण संतांची झेप मात्र त्या सगळ्यांपेक्षा मोठी आहे . एका छोट्या मुलाच्या नजरेतून दिसणारे आणि केवळ त्या अवस्थेतून गेल्यावरच कळू शकतील असे अनेक बारकावे संतांची लेखणी टिपते . आणि ह्याच गोष्टीचे अजून एक मोठ्ठे वैशिष्ट्य म्हणजे, नुसतेच टिपते, त्यावर भाष्य टाळते, इंग्रजीत म्हणतात तसे 'its left to reader's interpretation' . पूर्णपणे वाचकांच्या अनुभूतीवर सोडून दिले आहे त्यामुळे एकाच छोट्या घटनेतून अनेक अर्थ निघू शकतात जे ते ज्याने त्याने आपापल्या अनुभवांशी पडताळून पहावेत .

संतांची लेखणी केवळ रूढ, चाकोरीबद्ध बालजीवन दाखवत नाही . रोजच्या, आजुबाजुला घडणाऱ्या घटनांतून संतांच्या ‘लंपन’ ला बरेच वेगवेगळे अर्थ सापडत जातात जे बऱ्याच वेळेला त्यालाही अभिप्रेत नसतात आणि वाचकांनाही . पण त्याचे वाटणे हे अद्याप जाणिवेच्या पातळीवर आलेले नाही . कुठे तरी काहीतरी धूसरपणे त्याला जाणवते आणि ह्यातच त्याचे खरे यश दडलेले आहे . तो एक 12 - 13 वर्षाचा मुलगा, त्याच्या वयापलिकडे जाउन कुठलीही गोष्ट करत नाही आणि अशा प्रकारच्या Larger Than Life गोष्टी संत त्याच्याकडून करवून घेत नाहीत हे आपले केवढे मोठे भाग्य .

संतांची भाषा हा तर वेगळा अभ्यासाचा विषय आहे . कानडीची चाल लागलेली मराठी प्रामुख्याने येते पण त्याच्यात कोंकणीचेही तेवढेच गोड मिश्रण आहे . ‘लंपन’ कथांची पार्श्वभूमी ही महाराष्ट्र कर्नाटकच्या सीमेवर असल्यामुळे तिथे मराठी आणि कानडी दोन्ही भाषांची सरमिसळ होणे अगदी स्वाभाविक आहे आणि नेमका हाच गोडवा संतांनी त्यांच्या लिखाणात अचूक पकडला आहे . बरकरणी अशुद्ध वाटणारी मराठी भाषा कानडीची सुरावट जोडीला घेउन अगदीच गोड वाटू लागते . ‘लंप्या तुला अण्णा बोलवायलेत’, किंवा ‘मी तो खोडरबर खिशात घातलो’, किंवा ‘घेउन सोड जा’ अशासारखी कानडी मिश्र मराठी साध्याही संभाषणाला वेगळाच उठाव देऊन जाते . शिवाय त्यांचे ते नेहेमी येणारे काही typical शब्द . ‘मॅड सारखे, सणसणीत, किंवा तंतोतंत’ . अशा शब्दांच्या नियमित वापरामुळे त्याच त्याच वाक्यांना एक वेगळीच जिव्हाळ्याची छटा प्राप्त होते . आणि आपल्या घरी नेहेमी येणारे लोकं जसे आपल्या परिचयाचे स्नेहधर्मी होउन जातात तसेच हे शब्द ही . अशा अनेक कानडी मराठी शब्दांची एक रांगच संत आपल्यापुढे उभी करतात आणि मग त्या रांगेतला प्रत्येक शब्द सुटा सुटा न राहता आगगाडीच्या डब्यासारखा एकमेकाना जोडला जातो .

ह्या चारही पुस्तकात एक गोष्ट प्रामुख्याने जाणवते ती म्हणजे संतांनी राखलेले काळाचे अचूक भान . त्यांना ‘लंपन’ च्या वाढत्या वयाचे आणि त्या वाढत्या वयाबरोबर मना - शरीरात होत जाणाऱ्या बदलांचे इतके नेमके ज्ञान आहे की ‘वनवास’ ते ‘झुंबर’ ह्या पुस्तकी प्रवासात ते अगदी प्रकर्षाने जाणवते . आधी थोडासा अल्लड, बालपणातून अजून पुरता बाहेर न आलेला ‘लंपन’ आता किशोरावस्थेकडून तारुण्याच्या उंबरठ्यावर येउन पोहोचला आहे ह्याची अगदी पुसट जाणीव संत मोजक्याच वाक्यातून करुन देतात . त्यादृष्टीने त्यांची ‘झांज’ ही कथा विलक्षण वाचनीय आहे . ‘लंपन’ च्याच वयाची ‘सुमी’ त्याच्या आजुबाजुला वावरते तेव्हा त्याच्या कानात कसली तरी गुंज भरुन राहिली आहे, कसली तरी झांज वाजते आहे असे त्याला वाटत रहाते, हा म्हणजे त्याला ‘सुमी’ बद्दल वाटणाऱ्या आपुलकीचा, स्नेहाचा, जिव्हाळ्याचा (ह्याला अजून प्रेमाचा नाही म्हणता येणार कारण ते दोघे अजून तसे बरेच लहान आहेत) ओझरता उल्लेख ह्या गोष्टीला एक वेगळीच उंची देऊन जातो . हा उल्लेखही केवळ ओझरता असल्यामुळेच त्यातली खुमारी वाढते .

निसर्गावर संतांचे विशेष प्रेम असावे . ह्या चार कथा संग्रहात मिळून बेळगाव कारवार बाजूचा म्हणजेच महाराष्ट्र कर्नाटक दोघांचे गुण अंगी असणारा निसर्ग येतो . हा निसर्ग म्हणजे कोसळणारा पाऊस, मलप्रभा, ताम्रवर्णी सारख्या गावात पूर आणणाऱ्या नद्या, नदीकाठची वाळू आणि गावात फुलणारा निसर्ग , रेल्वेचे रूळ आणि त्यावरून आपले इंजिनाचे धूड घेउन जाणारी आगगाडी, आमराया आणि काजुच्या बागा, पेरू फक्त चोरण्यासाठीच असतात अशी समजूत करुन देणारी पेरू, करवंदांची झाडे . असा हा निसर्ग ‘लंपन’ च्या भावविश्वातला एक साथिदार बनूनच पुढे येतो . घराकडून स्टेशनाकडे जाणारी पायवाट, ‘पिच खाल्लेले’ ग्राउंड किंवा घसरगुंड्या नी नटलेले मधुमालतीचे मैदान अशा गोष्टी डोळ्यापुढे उभ्या रहाव्या इतक्या जिवंत रेखाटल्या जातात आणि मग ‘लंपन’ प्रमाणेच आपलाही त्यांच्याशी ऋणानुबंध सुरु होतो .

संतांची खरी हुकूमत कशावर असेल तर हाडामांसाची माणसे साध्या साध्या शब्दातून जिवंत करणे . ह्या कथांतल्या सगळ्याच व्यक्ती ह्या ‘व्यक्तिरेखा’ न वाटता एक माणूस म्हणून पुढे येतात आणि आपल्यालाही चटका लावून जातात . मनुष्य - स्वभावाचे अनेकविध नमुने संत आपल्याला दाखवतात आणि त्यांच्यावर ‘लंपन’ च्या बालसुलभ वृत्तीनुसार भाष्य ही करतात . अर्थात कुठेही व्यक्तिचित्रांचा किंवा स्वभाव विश्लेषणाचा आव नसतो पण साध्याच घटनांतून ही माणसे आपल्यासमोर अगदी जिवंत होउन उठतात आणि एकंदर कथानकामधले त्यांचे आत्तापर्यंत दुर्लक्षित राहीलेले महत्त्व एकदम अधोरेखित होऊन जाते . मग ते ‘शारदा संगीत’ मधले ‘जमखंडीकर’ असोत, किंवा रुळांअवर आत्महत्या करणारी ‘शेवंती’ असो किंवा लंपनच्या अगदी जवळचे बाबुराव, सुमी असोत . सगळ्यांना त्यांचे त्यांचे एक ठसठशीत व्यक्तित्व आहे जे ही माणसे कुठल्याच कथेत ‘हरवत’ नाहीत . त्यांच्या त्यांच्या स्वभाववैशिष्ट्या नुसार ती कायम वागत बोलत असतात आणि मग ही खरी खुरी माणसे नसून एका लेखणीने चितारलेल्या ह्या व्यक्तिरेखा आहेत ह्याचाच जणू आपल्याला विसर पडून जातो . ह्या व्यक्ती चित्रणाचं अजून एक विशेष म्हणजे त्या ‘सर्व सामान्य’ आहेत, आपल्या आजुबाजूला दिसू शकणाऱ्या चार चौघांसारख्याच त्या वागतात पण मधेच अशी एखादी अनपेक्षित झलक दाखवून जातात ज्यामुळे त्यांची ‘साहित्यिक’ उंची एकदम वाढते .

ह्या चारही कथा संग्रहातल्या कथा ह्या एकेकट्या सुद्धा तितक्याच वाचनीय आहेत . म्हणजे कुठलीही पूर्वपीठिका नसताना त्यातली कोणतीही कथा वेगळी काढून वाचली तरी एक ‘निखळ कथा’ वाचल्याचा आनंद ती देऊन जाते . ह्या कथा संग्रहाला एक समान धागा असला तरी एक समान सूत्र नाही, म्हणजे सुटे सुटे मोती जसे विखरुन पडावेत तशा ह्या कथा आहेत . एकाच संग्रहात असण्याचे कुठलेही बंधन त्यांच्यावर आलेले नाही . आणि म्हणूनच त्या वाचताना आपणही ‘लंपन’ सारखेच मॅड होउन जातो, अगदी तंतोतंत .

- कॅच मी

आकाश उजळले होते . . .

15 मार्चची सकाळ . . . नेहमीप्रमाणे ऑफीसमधे गेल्यागेल्या आधी e-Sakal उघडला आणि देशाकडच्या बातम्या वाचायला लागलो ठळक बातम्यांमधेच ती बातमी दिसली . . . कदाचित काहीतरी गफलत असेल म्हणून लोकसत्ताही उघडून पाहिला, तिथेही तीच बातमी . . . सुरेश भट गेले . . . आयुष्यभर ज्या माणसाने साध्या सोप्या शब्दांमधून आयुष्याचं अनंतरंगी चित्र रेखाटलं त्या माणसाच्या शेवटाची बातमी पाच साध्या शब्दांमधे 'सुरेश भट यांचे दु:खद निधन' . . . . कशातच लक्ष लागेना . . . भटांचे एक एक शब्द, एक एक गीत, एक एक गझल मनात रुंजी घालायला लागले

मेल्यावरी जगाचे आभार मानले मी
जाउ दिले मला हे उपकार मानले मी

हे असो किंवा

सोडताना प्राण त्यांना मी कुठे बोलावले
खातरी झाली न त्यांची ते घरी डोकावले

वार झेलायास केली मी जरी छाती खुली
नेमके पाठीस माझ्या चावणारे चावले

हे असो, भटांची वेदना, यांचा विखार आठवून मन अस्वस्थ झालं . जिवंतपणीच या माणसाने अनेक मरणयातना अनुभवल्या असाव्यात पण त्या यातनांमधुनच त्यांनी अत्यंत प्रभावी असं काव्य निर्माण केलं .

हा संवेसनाशील कवी, नुसतीच आपली वेदना कुरवाळत बसला नाही, या वेदनेचं मूळ ज्या समाजव्यवस्थेत आहे त्या समाज व्यवस्थेला हादरे देउन त्यात बदल घडवून आणण्यासाठी आपल्या काव्यातून त्यांनी एल्गार केला . . .

म्हणूनच

अद्यापही सुऱ्याला माझा सराव नाही
अद्यापही पुरेसा हा खोल घाव नाही

असा नकारात्मक शेर लिहिणाराच कवी, याच गझलेमधे

साध्याच माणसांचा एल्गार येत आहे
हा थोर गांडुळांचा भोंदू जमाव नाही

असा साध्या माणसाची ताकद सांगणारा सकारात्मक शेरही लिहितो

भटांचं साध्या माणसावर आणि साधेपणावर फारच प्रेम होतं . जसं भटांचं महाराष्ट्रावर आणि मराठीवर आत्यंतिक प्रेम होतं . आणि हे प्रेम त्यांच्या काव्यात आपल्याला ठिकठिकाणी दिसतं

लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी असं आदरपूर्वक म्हणणारा हा कवी मराठा लाईट इन्फण्ट्रीला अधिकृत मार्चिंग सॉंग म्हणून

मर्द आम्ही मराठे खरे, दुश्मनाला भरे कापरे
देश रक्षावया धर्म तारावया कोण झुंजात मागे उरे

असे जोशपूर्ण शब्दही लिहून देतो

मी तुझी गाईन गाणी मायदेशा
दे मला तेजाळ वाणी मायदेशा

मी तुझ्या वाचून कोणा शब्द मागू
तूच काव्याची कहाणी मायदेशा

अशा शब्दांमधून आपल्या देशाचं पूजन करत असतानाच

व्यर्थ त्यांच्या घोषणांच्या टाकसाळी
पाडती खोटीच नाणी मायदेशा

काढले आहे तुला ज्यांनी विकाया
ते उद्याचे सांडपाणी, मायदेशा

अशा शब्दांमधे देशाचं वाटोळं करायला निघालेल्या राजकारण्यांवरचा संतापही व्यक्त करतात . पण नुसताच संताप व्यक्त करून थांबणारा हा कवी नव्हता . आजही जेंव्हा आपल्या देशामधे सुरू

असलेली राजकीय आणि सामाजिक अनागोंदी पाहिली की आजही मला उप:काल होता होता काळरात्र झाली अरे पुन्हा आयुष्यांच्या पेटवा मशाली' शब्दांपासून प्रेरणा घेउन आयुष्याची मशाल पेटती ठेवावीशी वाटते .

भट हे काव्यसृष्टीमधलं एक आश्चर्य होतं . 'उप:काल होता होता' किंवा 'गे मायभू तुझे मी फेडीन पांग सार'ए सारखी दाहक वा प्रेरणादायक गीतं लिहिणारा हाच कवी 'मालवून टाक दीप' किंवा 'चांदण्यात फिरताना माझा धरलास हात' सारखी कमालीची उत्कट आणि संवेदनशील काव्यंही लिहून गेला . त्यांच्या काव्यामधली उत्कटता आणि तरलता आपण पदोपदी आपल्या आयुष्यात शोधायचा प्रयत्न करत असतो .

जेंव्हा कोजागिरीचं अफाट चांदणं पसरतं आणि ते आपण अनुभवत असतो तेंव्हा नकळत शब्द येतात

काय हा तुझाच श्वास
दर्वळे इथे सुवास
बोल रे हळू उठेल चांदण्यावरी तरंग

आणि हेच चांदणं जेंव्हा पहाटे पहाटे खिडकी मधून आत येत असतं तेंव्हा

उजाडल्यावरी सख्या निघून जा घराकडे
अजूनही उशीवरी टिपुर चांदणे पडे
उगीच वेळ सारखी विचारतोस काय तू
पुन्हा पुन्हा मिठीतही शहारतोस काय तू
पुन्हा अशी हवी तशी कुणास रात्र सापडे

आणि हे चांदणं, हे उधाण नाकारून निघून जाणाऱ्या आपल्या जिवलगासाठी शब्द येतात

एवढं तरी करून जा
हा वसंत आवरून जा

तारकां पल्याड जायचे
या नभास विसरून जा

किंवा

सांग या कोजागिरीच्या चांदण्याला काय सांगू
उमलते अंगांग माझे हाय तू मिटलास का रे
तरुण आहे रात्र अजुनी राजसा निजलास का रे

हा शब्दांचा उत्सव कधीच न संपणारा आहे . कोणताही भावोत्कट प्रसंग अनुभवताना त्यांचे शब्द, त्यांचं काव्य आपल्याभोवती रुंजी घालत असतं .

भटांचं नाव मुख्यत्वेकरुन मराठी गझलेशी जोडलं गेलेलं असलं, तरी खरंतरं भटांनी आपलं काव्य इतरही काव्यप्रकारांच्या माध्यमातून व्यक्त केलं आहे . आपल्या पाच दशकांच्या दीर्घ काव्यसाधनेमधे त्यांनी केवळ पाच कविता संग्रह प्रकाशित केले . या पाचही काव्य संग्रहांमधून गझलांबरोबरच, कविता, गीतं इतकंच काय पण मुक्तछंदही आपल्याला दिसतो! भटांच्याच शब्दात सांगायचं तर 'अभिव्यक्तीच्या लाटांना विविध नावे दिली तरी शेवटी ह्या सर्व लाटांचा जन्मदाता काव्यसागरच असतो' सुरेश भट हे या काव्य सागरामधे मुक्त संचार करणारे साधे दर्यावर्दी नव्हते तर या काव्यसागरामधे स्वत:ला हव्या तशा लाटा निर्माण करायची त्यांची ताकद होती, आणि तशा त्यांनी केल्याही . . .

हा लेख सुरेश भटांच्या काव्याची समीक्षा करणारा किंवा त्यांच्या जीवनाचा आढावा घेणारा असा काहीच नाही . . . तेवढी माझी कुवतही नाही आणि आवाकाही . हा लेख आपल्या सगळ्यांच्या आनंदासाठी एक बहुरंगी काव्याचा बगिचा निर्माण करुन गेलेल्या एका अस्सल मराठी कवीला वाहिलेली एक आदरांजली आहे .

जाता जाता भटांनी कवि आणि काव्य याबद्दल त्यांच्या अनुभवांमधून जे काही सांगितलं ते इथे सांगावंसं वाटतं, जे कदाचित माझ्या सारख्या नवोदितांना मार्गदर्शक ठरेल .

'कवितेच्या प्रवासातील प्रत्येक मुक्कम म्हणजे नव्या मुशाफिरीचा आरंभ असतो . . . आधी साधना, नंतर सिद्धी व शेवटी आपोआप प्रसिद्धी मिळते . . . . कवीच्या बाबतीत ही सिद्धी म्हणजे आपण पंचेंद्रियांनी जे अनुभवतो आणि आपल्या प्रज्ञेने जे समजून घेउन निष्कर्ष त्याबद्दल काढतो ते सर्व रसायन अचूक व प्रत्ययकारी व्यक्त करणाची क्षमता होय .'

या साधकाला, या सिद्धाला, या मुसाफिराला माझी अत्यंत मनापासुन आदरांजली . . . त्यांनी सुरु केलेला हा काव्ययज्ञ या पुढेही निश्चितच चालू राहील, त्यांच्याच शब्दांत सांगायचं तर:

मी एकटाच त्या रात्री आशेने तेवत होतो
मी विझलो तेंव्हा सारे आकाश उजळले होते

– प्रसाद शिरगांवकर